रजि १९६४

म. ग्रं. सं. ठाणें

विषय ग्रु प्रवास

सं. क्र. ४32

REFBK-0014282

REFBK-0014282

# युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र.

## स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम.................................. दि ....................

REFBK-0014282

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

प्रकाशक–
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर–१.

अनुवादक–
प्रा. प्र. ग. सहस्रबुद्धे,
एम्. ए., एल्एल्. बी.,
खामगांव.

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ४९ वें
( श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्वाधिकार सुरक्षित )

मुद्रक—
श्री. दि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय,
रुईकर रोड, नागपूर

मूल्य रु. २.२०

# प्रास्ताविक

'युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी' हें आमचें नवीन प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. स्वामी विवेकानंदांनी पाश्चात्त्य देशांमधें जो प्रवास केला होता त्याचा वृत्तान्त त्यांनी दैनंदिनीच्या रूपाने लिहिला होता. प्रस्तुत पुस्तक हा त्या दैनंदिनीचा मराठी अनुवाद आहे. स्वामी विवेकानंदांनी ही दैनंदिनी खुसखुशीत भाषेंत विनोदी पद्धतीने लिहिली होती. त्यांची मुळांतली लेखनशैली अनुवादांतहि कायम ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

स्वामी विवेकानंदांनी ज्या ज्या देशांत प्रवास केला होता त्या त्या देशांतील लोकांचें समाजजीवन, त्यांचा इतिहास, त्यांच्या चालीरीती इत्यादि गोष्टींचेंहि त्यांनी निरीक्षण केलें होतें. त्यामुळे त्यांच्या प्रवासवृत्तान्तांत प्रवासाचें केवळ वर्णनच आढळत नाही, तर त्याबरोबरच विभिन्न देशांच्या जीवनपद्धतींचें आणि तेथील विचारप्रणालींचें चित्रहि रेखाटलेलें दिसून येते. युरोपांतील निरनिराळ्या देशांच्या समाजजीवनावरून व इतिहासावरून भारताला कोणता बोध घेतां येतो याचेंहि प्रत्यंतर हा प्रवास-वृत्तान्त वाचतांना येतें. पाश्चात्य समाजजीवनांत जें सदोष आहे तें टाळून आणि जें भारताच्या विकासासाठी उपयुक्त आहे तें ग्रहण करून भारताने आपली सर्वांगीण उन्नति करून घ्यावी असें स्वामी विवेकानंदांना प्राणोप्राण वाटत असे. त्यांची ही तळमळ पुस्तृत पुस्तकांत अनेक ठिकाणीं प्रकट झालेली आढळून येते

आणि तिचा परिणाम वाचकांच्याहि मनावर झाल्यावांचून राहत नाही.

प्रा. प्र. ग. सहस्रबुद्धे, एम्. ए., एल्एल्. बी., खामगांव यांनी प्रस्तुत पुस्तकाचा अनुवाद केला आहे. त्यांच्या या महत्त्वाच्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

दि. १५-१-१९६४ — प्रकाशक

---



स्वामी विवेकानन्द

# युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी

## सुरुवात

ओम् नमोनारायणाय स्वामीजी ! * परंतु बंधुवर, नमो मधला 'मो' हृषीकेशकडील पद्धतीप्रमाणे जरा वरच्या पट्टींत उच्चारायचा बरें का ! बोटीवर येऊन आता मला सात दिवस झाले. येथील एकंदर जीवनक्रमाविषयी तुम्हांला लिहावें असा रोज विचार करतों. दौत, टाक, कागद इत्यादि लेखनसाहित्य म्हणाल, तर तेंहि तुम्हीं भरपूर देऊन ठेवलें आहे. पण--पण बंगाली माणसाची विशेषता म्हणजे आळस. तो आड येतो आणि सगळें बिघडवून टाकतो. तेव्हा पहिली गोष्ट म्हणजे हा आळस. दैनंदिनी की काय तुम्ही म्हणत असतां ती लिहिण्याचा मी रोज विचार करतों, पण अनेकविध उद्योगांमुळे तें कार्य कधी न उजाडणाऱ्या 'उद्या'वर ढकललें जातें आणि तसेंच राहतें. दुसरी गोष्ट म्हणजे दिवस, तारखा वगैरे आजकाल माझ्या लक्षांतच राहत नाहीत. तेव्हा

---

* संन्यासी हे एकमेकांना असेंच संबोधून नमस्कार करीत असतात. इ. स. १९०० सालीं स्वामी विवेकानंद जेव्हा दुसऱ्यांदा पाश्चात्त्य देशांत गेले होते तेव्हा श्रीरामकृष्ण-संघातर्फे कलकत्त्याहून निघणाऱ्या 'उद्‌बोधन' नामक बंगाली नियतकालिकाचे संपादक स्वामी त्रिगुणातीतानंद यांना स्वामी विवेकानंदांनी आपल्या प्रवासाचा वृत्तान्त पत्रांनी लिहून पाठविला होता. म्हणूनच 'ओम् नमो नारायणाय स्वामीजी' अशी त्यांनी सुरवात केली आहे. हीं पत्रें स्वामी विवेकानंदांनी मूळ बंगालींत अतिशय खुसखुशीत विनोदी पद्धतीने लिहिलीं होतीं. त्यामुळे कितीहि प्रयत्न केला तरी मुळांतील शैली भाषांतरांत पूर्णपणें उतरणें कठीण आहे.

तारखाबिरखा टाकण्याचें काम तुम्हांलाच करावें लागेल. आणखीहि एक गोष्ट सांगतों. मात्र तुम्हीं थोडी उदार दृष्टि ठेवायला हवी. हृदयांत सतत भगवंताची मूर्ति विराजमान असल्यामुळे भक्तराज हनुमंताप्रमाणे तिथि, वार आदि क्षुद्र गोष्टी माझ्याहि लक्षांत राहीनाशा झाल्या आहेत असें समजा ! पण खरें सांगूं ? या सगळ्याच्या मुळाशीं आहे माझा मूर्खपणा आणि आळस. कांही तरीच लिहिलें मीं. ही काय तुलना झाली ! "क्व सूर्यप्रभव वंश:"; नव्हे, चुकलों मी; "क्व सूर्यप्रभववंशचूडामणिरामैकशरण वानरेन्द्र:"––कोठे तो सूर्यवंशमुकुटमणि श्रीरामचंद्रांना संपूर्ण हृदय समर्पण करणारा हनुमंत, आणि कोठे दीनातिदीन मी ! प नाही म्हटलें तरी तुलना करायला थोडीफार जागा आहे बरें क शत योजनें पसरलेला समुद्र त्याने एका उड्डाणांत उल्लंघिला आ आम्ही एका लाकडी घरांत बसून तो ओलांडीत आहोंत. आता घरांतहि आम्ही इकडेतिकडे कोलमडत आहोंत आणि खांबांना दांड्यांना धरून कसेंतरी स्वत:ला सावरीत आहोंत ती गो निराळी. पण एका बाबतींत आम्हीच वरचढ आहोंत. राक्ष राक्षसिणींचें दर्शन हनुमंताला लंकेंत प्रवेश केल्यावर लाभलें. ये आम्ही त्यांच्या तांड्यासह समुद्र ओलांडीत आहोंत. भोजनाच्य वेळच्या शेकडो सुऱ्यांच्या चमचमाटाने आणि शेकडो कांट्यांच्य खणखणाटाने आपला बंधु तुरीयानंद असा भेदरला की विचार सोय नाही. तो मधूनच दचकायचा. त्याच्या शेजारी बसली होत एक लालकरड्या केसांची आणि मांजऱ्या डोळ्यांची बाई. त्याल वाटायचें की ही बाई चुकून आपल्या शरीरांत तर सुरी भोसकणार नाही ना ? आपण तुकतुकीत आणि लठ्ठ आहोंत या जाणिवेने त्याला तशी अधिकच भीति वाटायची. बरें, मी म्हणतों, समुद्र

ोलांडतांना हनुमंताला, समुद्रप्रवासाचा आजार म्हणतात, तसें कांही झालें होतें का? उलटया, मळमळणें वगैरेंचे उल्लेख प्राचीन ग्रंथांत कोठे आढळतात का ? तुम्ही सगळे जाडे विद्वान् आहांत; ामायण आदि पुराणांचा तर तुमचा गाढ व्यासंग आहे. तेव्हा म्हीच या प्रश्नाचा निर्णय लावा. आपले आधुनिक लेखक या ्यावर चूप आहेत. कदाचित् हनुमंताला समुद्रप्रवासाचा आजार ला नसावा. पण मग तो कोणाच्या तरी जबडयांत शिरला रे तें काय आहे ? त्यामुळे शंका येते. आपला बंधु तुरीयानंद ची काय अवस्था झाली तें सांगतों. बोटीचा पुढचा भाग एकदा काशांत देवाधिदेव इंद्राशीं कानगोष्टी करायला चालल्यासारखा उसळतो आणि लगेच तो पाताळांतील बळी राजाला आणखी पायला चालल्यासारखा खाली समुद्रतळाकडे शिरतो--अशा ों, कोणाच्या तरी भयानक लांबरुंद जबडयांत आपण शिरत ोंत असें त्याला वाटतें. माफ़ करा हं ! पण खरें सांगतों, तुम्ही लें काम सोपवायला माणूस चांगलाच निवडला! गेल्या सात ासांचा समुद्रपर्यटनाचा वृत्तान्त चांगल्या काव्यमय पद्धतीने लित्यपूर्ण भाषेंत नटवून सजवून तुम्हांला कळवायचा, तें राहिलें जूला आणि मी आपलें भलतेंच भरकटत बसलों. पण खरें सांगू ? तत्त्वाचें खोबरें खायचें आणि मायेची करवंटी फेकून द्यायची प्रयत्नांत माझा सगळा जन्म गेलेला; तेव्हा आता एकाएकी सर्गसौंदर्याच्या आस्वादनाकडे माझें मन कसें लागावें? आयुष्य-र मीं सगळ्या भारतांत भ्रमण केलें. गोस्वामी तुलसीदासजींनी ्हटलें आहे ना, "कहँ काशी कहँ काश्मीर कहँ खुरासान गुजराथ", याप्रमाणे किती टेकडया आणि नद्या, किती पर्वत आणि झरे, कती दऱ्या आणि खोरीं, नित्य बर्फाच्छादित असणारीं आणि

मेघमेखला धारण करणारीं किती पर्वतशिखरें, खवळलेले, गरजण
फेसाळ असे किती सागर मीं ऐकले, पाहिले, आणि उल्लंघिले
आणि कविश्रेष्ठ श्यामाचरणांची स्थिति कशी होती ? दिवसासु
दिवा लावावा लागतो अशा तळमजल्यावरील अंधेऱ्या खोल
एका मोडक्या चौकीवर ते बसत असत. भिंतीवर जिकडे ति
पान खाऊन पिकाच्या पिचकाऱ्या उडविलेल्या; उंदीर-घुशी खड
करीत आहेत; पाली चुकचुकत आहेत; जवळच असलेल्या मोठ
रस्त्यावर ट्रामगाड्या, खटारगाड्या, टांगे वगैरे वाहनें धा
आहेत; त्यांच्या आवाजाने खोली दणाणत आहे; मधेच एख
धुळीचा लोट येतो आहे आणि त्याने खोली अंधारून जात आहे
अशा काव्यमय वातावरणांत बसून कवि श्यामाचरणांनी हिमाल
समुद्र, हिरवीगार कुरणें, वालुकामय प्रदेश आदींचीं कशीं सु
चित्रें रेखाटलीं आहेत! मधूनमधून आपला सर्वपरिचित हुक्क
ओढीत आहेत आणि धूर सोडीत आहेत आणि तिकडे हुबेहुब अ
जिवंत शब्दचित्रें रेखाटलीं जात आहेत. बंगाल्यांना किती अ
मानास्पद आहे हें सारें! त्यांच्या काव्यासारखें काव्य करण्य
यत्न करणें सुद्धा व्यर्थ होय. श्यामाचरण आपल्या बाल्यावस
'पश्चिम' प्रदेशांत गेले होते. तिकडलें पाणी फारच पाचक. प
भर जेवल्यानंतर एक लोटाभर पाणी प्या की सगळें पचून फस
पुन्हा भूक जागृत. इथेच श्यामाचरणांची प्रतिभा जागृत झाल
तिला निसर्गाच्या दिव्य, उदात्त सौंदर्याचा साक्षात्कार झाला.
मुष्कील हीच की श्यामाचरणांची ती 'पश्चिम' बंगालच्या बंग
मधेच होती—त्यांचें पर्यटन फक्त बरद्वानपर्यंतच झालें होतें!

असो. एकतर तुम्हीं माझ्या मागे लकडाच लावला अ
आणि दुसरें असें की मी कांही अगदीच काव्यरसविहीन नाहीं

मला सिद्ध करावयाचें आहे. या दोन्हीं कारणांमुळे मी आता देवाचें नांव घेऊन लेखनकार्य प्रारंभ करतों. तुम्ही मात्र आता मी काय म्हणतों तें कान देऊन ऐका.

### बंदरापासून नदीच्या मुखापर्यंत

कोणतेंहि जहाज रात्रीच्या वेळीं बहुधा कधीहि बंदर सोडीत नाही. त्यांतून कलकत्त्यासारखें व्यापारी बंदर आणि हुगळीसारखी नदी असल्यावर तर बोलायलाच नको. जहाज खुल्या समुद्रांत पोहोचेपर्यंत तें 'पायलट'च्या, म्हणजे नदीच्या त्या भागाची पूर्ण माहिती असलेल्या सुकाण्याच्या ताब्यांत असतें. तोच कप्तान म्हणून काम करतो आणि सर्व आज्ञा देतो. जाणाऱ्या जहाजाला खुल्या समुद्रांत पोहोचविलें किंवा येणाऱ्या जहाजाला खुल्या समुद्रांतून बंदरांत आणलें की त्याचें काम संपलें. आपल्या हुगळीच्या मुखाशीं दोन ठिकाणीं धोक्याच्या जागा आहेत. पहिली म्हणजे बजबजवळील 'जेम्स आणि मेरी' नांवाचा चोरकिनारा आणि दुसरी म्हणजे डायमंड हार्बरच्या तोंडाशीं असलेला वाळूचा दांड. दिवसाउजेडीं आणि खूप भरतीच्या वेळींच सुकाण्याला तेथून जहाज हाकारतां येतें. त्यांतहि त्याला फार काळजी घ्यावी लागते. इतर वेळीं तें मुळीच शक्य नसतें. त्यामुळे हुगळींतून बाहेर पडायला आम्हांला दोन दिवस लागले.

### हृषीकेशच्या आणि कलकत्त्याच्या गंगेची शोभा आणि माहात्म्य

हृषीकेशची गंगा तुम्हांला आठवते का? काय तें स्वच्छ निळसर पाणी! दहा हात खालच्या माशांचे पंखसुद्धा खुशाल मोजून घ्या. अहाहा! तें मधुर बर्फगार पाणी—"गांगं वारि मनोहारि!" त्या खळाळत्या पाण्यांतून निघणारा तो 'हर हर' ध्वनि आणि पुन्हा आसपासच्या डोंगरपहाडांतून पडणाऱ्या प्रपातां-

तून ऐकूं येणारा त्याचा 'हर हर' असा प्रतिध्वनि ! सगळें किती अद्‌भुत ! रानावनांतील तें जीवन तुम्हांला आठवतें का ? तें माधुकरी मागणें ! तें गंगेंतील खडकाळ बेटांवर बसून खाणें, तें ओंजळीने पोटभर पाणी पिणें आणि भाकरीच्या लहान लहान तुकड्यांसाठी होणारी माशांची ती निर्भय धावपळ! सगळेंच किती रमणीय! गंगाजलाबद्दल आपल्याला वाटणारें तें असीम प्रेम तुम्हांला आठवतें का? काय त्या गंगेचा महिमा वर्णावा ! तिच्या जलाच्या नुसत्या स्पर्शाने माणसाच्या मनांतील वासनाविकार पार धुतले जातात. हिमालयांतून निघालेली आणि श्रीनगर, टेहरी, उत्तर-काशी आणि गंगोत्री आदि स्थानें पावन करीत चाललेली ती गंगा! तुमच्यापैकी कांहीजणांनी तर तिचें उगमस्थानहि पाहिलें आहे.पण आपल्या ह्या कलकत्त्याच्या गंगेंत कांहीतरी अविस्मरणीय असें आकर्षण आहे. ती गढूळ आहे; जणु शंकराच्या शरीरस्पर्शानें पांढुरकी झाली आहे. तिच्या प्रवाहावर हजारो लहानमोठ्या नौका तरंगत असतात. कलकत्त्याच्या गंगेचें नांव घेतांक्षणीं कां बरें माझ्या भावना येवढ्या उचंबळून आल्या ? जन्मस्थानावरील प्रेमामुळे की बाल्यकालीन संस्कारामुळे ? कोण जाणे ! गंगामातेचें आणि हिंदूंचें हें नातें किती अद्‌भुत आहे ! तो काय नुसता अंध-विश्वास आहे ? असेलहि. सगळ्या जन्मभर ' गंगा, गंगा ' हे शब्द त्यांच्या ओठांवर नाचत असतात; अंतकाळीं गंगाजलांतच ते आपला देह विसर्जित करतात; दूरदूरचे लोक तांब्याच्या कलशांत सीलबंद करून आपल्या बरोबर गंगाजल घेऊन जातात आणि पर्वकाळीं गंगाजलाचे बिंदु प्राशन करतात. राजे, महाराजे मोठ्या घागरींत तें साठवून ठेवतात. अमाप पैसा खर्च करून गंगोत्रीचें पाणी नेऊन रामेश्वरच्या महादेवाला अभिषेक करतात. अनेक हिंदु

रंगून, जावा, हाँगकाँग, मादागास्कर, सुएझ, एडन, माल्टा आदि परदेशांतील ठिकाणीं जातात. ते आपल्याबरोबर गंगाजल आणि गीता घेऊन जातात.

गीता आणि गंगाजल यांतच हिंदूंचें हिंदुत्व भरलें आहे. गेल्या खेपेस पाश्चिमात्य देशांत जातांना मीं देखील आपल्याबरोबर थोडें गंगाजल घेतलें होतें. न जाणो कशी वेळ येते, असावें आपल्याजवळ ! आणि मधूनमधून मी त्यांतील कांही थेंब पीत असे. मानवांच्या त्या प्रचंड प्रवाहांत, सभ्यतेच्या त्या गजबजाटांत, लक्षावधि स्त्रीपुरुषांच्या त्या धावपळींत—अशा त्या पाश्चात्त्य वातावरणांत देखील गंगाजलाचे चार थेंब प्राशन करतांच माझें मन कसें शांत आणि स्थिर होत असे. पाश्चात्त्य देशांतील तो मानवप्रवाह, त्यांच्या जीवनांतील रजोगुणाचें तें तांडव, पदोपदीं आढळणारा तो संघर्ष व ती स्पर्धा, तीं विलासी नगरें, तें स्वर्गीय ऐश्वर्य, तें पॅरिस, लंडन, न्यूयॉर्क, बर्लिन आणि रोम,—सगळें, सगळें डोळ्यांसमोरून नाहीसें व्हायचें आणि ' हर हर 'चा तो अद्‌भुत ध्वनि कानांवर यायचा. हिमालयांतील निवान्त अरण्यें डोळ्यांसमोर नाचूं लागायचीं. असें वाटायचें की ती स्वर्गनदी कलकल निनाद करीत माझ्या हृदयांतून, मस्तकांतून, नसानसांतून वाहते आहे आणि गरजते आहे ' हर, हर, हर !'

या वेळीं देखील तुम्ही मद्रासासाठी आमच्या बरोबर गंगामाईला दिलें आहेच. पण कसल्या विचित्र भांड्यांत तुम्हीं तिला घातलें आहे ! आपले बंधु तुरीयानंद आहेत बालब्रह्मचारी; "ज्वलन्निव ब्रह्ममयेन तेजसा "—"जळजळीत ब्रह्मतेजाची मूर्ति." पूर्वी त्यांना नमस्कार करायचा म्हणजे ब्राह्मण म्हणून "नमो ब्रह्मणे" म्हणावें लागायचें. आणि आताचें काय सांगावें ? आता ते झाले

आहेत संन्यासी, म्हणून आता " नमो नारायणाय " म्हणावें लागतें. केवढा उदात्त बदल ! म्हणूनच मला वाटतें, त्यांच्या स्वाधीन होतांना गंगेने ब्रह्मदेवाचा कमंडलु सोडून गडव्यांत प्रवेश केला ! तें कसेंहि असो, रात्रीं मधेच उठून पाहतों तों गंगामाईला त्या विचित्र भांड्यांत राहणें असह्य झालेलें दिसलें आणि त्या भांड्याचा भेद करून ती त्यांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होती ! मला भीतिच वाटली. म्हटलें, आई आता पुन्हा तो जुना इतिहास घडविणार की काय ! तें हिमालय फोडणें, तें ऐरावताला वाहून नेणें, तें जन्हूची झोपडी उध्वस्त करणें वगैरे पुन्हा झालें तर कठीणच काम ! अनेक प्रकारें स्तुति करून, स्तोत्रें म्हणून मीं मातेला प्रार्थना केली, " आई, थोडीशी थांब, उद्या आपण मद्रासला पोहोचूं, मग तिथे तुला जें हवें तें तूं कर, हत्तीच्या कवटीपेक्षा जाड कवटी असलेले लोक तेथे पुष्कळ आहेत. तेथील बहुसंख्य लोक जन्हू-सारखेच झोपडींत राहतात. अर्धमुंडन केलेले, लांबलांब शेंड्या ठेवलेले लोक तेथे आहेत; त्यांचीं डोकीं तर जणु दगडाचींच केलेलीं आहेत. त्यांच्यापुढे हिमालय म्हणजे मेणासारखा मऊ ! तीं फोड हवीं तितकीं, पण कृपा करून आता थोडें थांब." पण माझ्या सगळ्या अर्ज-विनंत्या फुकट गेल्या. आईने माझें मुळीच ऐकलें नाही. मग मला एक युक्ति सुचली आणि मी तिला म्हणालों, "आई, बघ ते जाकिटें घातलेले आणि फेटे बांध-लेले नोकर बोटीवर इकडे तिकडे फिरतांना दिसत आहेत; ते सगळे आहेत मुसलमान—पक्के गोमांसभक्षक मुसलमान; आणि हे झाडझूड करणारे लोक आहेत ना, ते सगळे लालबेगचे शिष्य म्हणजे पक्के भंगी आहेत. तूं जर माझें ऐकत नसशील तर मी त्यांना बोलावितों आणि तुला शिवायला सांगतों ! तेवढ्यानेहि

जर तूं ऐकलें नाहीस आणि शांत झाली नाहीस तर मी तुला तुझ्या पित्याच्या घरीं पाठवून देईन. ती पाहा ती एक खोली आहे. तेथे मीं तुला बंद केलें की तुला तुझें हिमालयांतील पूर्वरूप प्राप्त होईल. मग तुझी सगळी चळवळ शांत होईल आणि तूं एक गोठलेला बर्फाचा तुकडा होऊन पडशील." ही मात्रा चांगलीच लागू पडली. गंगामाई शांत झाली. तात्पर्य, देव असोत की माणसें असोत, एकच नियम सर्वत्र आढळतो,--गरीब भक्त मिळाला की बसतात त्याच्या डोक्यावर !

पाहिलेंत, पुन्हा माझा विषय राहिला बाजूला आणि मी चाललों भलतीकडेच वाहवत ! मीं तुम्हांला आधीच सांगितलें की, हें काम कांही मला जमायचें नाही. पण अजूनहि तुमची सहनशक्ति असेल तर करतों आणखी प्रयत्न.

### बंगालचें नैसर्गिक सौंदर्य

प्रत्येकाला आपलीं स्वत:चीं माणसें फार सुंदर वाटतात. तसलें सौंदर्य त्याला इतरांमधे आढळत नाही. आपले बहीणभाऊ, मुलेंमुली नकटींचपटीं असलीं तरी तीं आपल्याला सुंदर वाटतात. स्वर्गांतील गंधर्वसुद्धा आपल्याला तेवढे सुंदर वाटणार नाहीत. त्यांतून समजा असें घडलें की स्वर्गांत फेरी मारून आल्यावर तुम्हांला असें आढळलें की तेथील गंधर्वापेक्षा आपलीं माणसें खरोखरच अधिक सुंदर आहेत, तर मग तुमच्या आनंदाला पारावार उरत नाही. हजारो नद्यांच्या माळा धारण करणाऱ्या आपल्या शस्यश्यामला वंगभूमीचें एक विशिष्ट सौंदर्य आहे. तसलें सौंदर्य थोडेसें मलबार आणि काश्मीर येथे पाहावयास मिळतें. पाण्यांत देखील काय सौंदर्य नाही ? मुसळधार वर्षा होते आहे, सगळीकडे पाणीच पाणी झालें आहे, ब्रह्मराक्षसाच्या पानांवरून पाण्याचे थेंब

घरंगळत आहेत, नारळाचीं आणि खजुरीचीं असंख्य झाडें थोडा माथा झुकवून त्या कोसळत्या धारा झेलत आहेत, बेडकांची डराव डराव सर्वत्र अखंड चालू आहे--अशा दृश्यांत काय सौंदर्य नाही? आणि आपल्या गंगेच्या किनाऱ्याचें जें सौंदर्य आहे तें कळायला तुम्हांला परदेशांतूनच यायला हवें आणि परदेशाहून येतांना डायमंड हार्बरमधून गंगेंत प्रवेश करायला हवा. तें निळेंनिळें आकाश,त्यांत जमा झालेले काळेकाळे ढग, त्यांच्याखाली सोनेरी कडा असलेले पांढुरके मेघ, आणि त्यांच्या खाली नारळाचीं आणि खजुरीचीं हजारो झाडें आपलीं मस्तकें डोलवीत आहेत. जणु तीं चवऱ्याच ढाळीत आहेत! त्यांच्या खाली पसरल्या आहेत गर्द, फिक्या, पिवळसर, काळवट अशा नाना छटांच्या हिरव्या राया--आंबे, लिचू, जांभळें, फणस आदि झाडांची गर्दी. या झाडांचीं पानें इतकीं दाट आहेत की बुंधे, फांद्या वगैरे कांहीएक दिसत नाही. जवळच उभीं असलेलीं बांबूचीं वनें वाऱ्यावर डोलत आहेत. आणि सर्वांच्या खाली आहे दूरवर पसरलेलें हिरवें हिरवें गवत. किती मृदु आणि तजेलदार. त्याच्यापुढे यारकंद, इराण आणि तुर्कस्थान येथील गालिचे म्हणजे कांहीच नव्हत. नजर जेथपर्यंत पोहोचते तेथपर्यंत सगळीकडे हिरवें हिरवेंगार गवत उगवलेलें. इतकें एकसारखें की जणु नुकतीच कोणीं त्याची काटछाट करून तें सारखें केलें असावें. ही सुंदर हिरवळ थेट नदीच्या पात्राला जाऊन भिडलेली दिसते. हिरव्या गवताने सुशोभित अशा त्या किनाऱ्यावर गंगेच्या लहरी येऊन आदळत आहेत आणि दोन्ही तटांवरील त्या हिरवळीला स्पर्शून गंगा वाहत आहे. आता तुम्हीं क्षितिजापासून मध्य-आकाशापर्यंत दृष्टि फिरविली तर त्या एका रेषेंत विविध रंग उधळलेले तुम्हांला दिसतील. तुम्ही कधीहि कोठेहि पाहिल्या

नसतील इतक्या एकाच रंगाच्या विविध छटा तुम्हांला पाहायला मिळतील. एक गोष्ट विचारतों, तुमच्यावर कधी रंगांची मोहिनी पडली आहे? जी मोहिनी पतंगाला दिव्यावर झेप घ्यायला लावते आणि ज्या मोहिनीमुळे भुंगा कमलांच्या कैदेंत उपाशी मरतो तसली मोहिनी तुमच्यावर पडली आहे काय? एक गोष्ट सांगूं का? गंगेवरील रमणीय सौंदर्याचा आनंद जर लुटायचा असेल तर हीच त्याची वेळ आहे. अंतःकरणाची तृप्ति होईपर्यंत तो मनसोक्त लुटून घ्या; कारण थोड्याच काळानंतर सगळें दृश्य बदलून जाईल. द्रव्यवेड्या व्यापाऱ्यांच्या कचाट्यांत ही जमीन सापडली की ही सगळी शोभा येथून नाहीशी होईल, ह्या हरित तृणाऐवजी जागोजागीं विटांच्या भट्ट्या उभ्या राहतील. विटांसाठी माती उकरल्यामुळे ठायींठायीं मोठमोठे खड्डे पडलेले दिसतील. हल्ली जेथे गंगेच्या मृदुमंद लहरी गवताशीं खेळत आहेत तेथे उद्या तागाचे गठ्ठे लादलेले धक्के आणि मालवाहू पडाव दिसतील. नारळ आणि ताड, आंबे आणि लिचू यांच्या झाडांच्या निरनिराळ्या रंगछटा, तें निळें आकाश, ढगांचें तें रंगीबेरंगी सौंदर्य—ह्या साऱ्या गोष्टींना लवकरच आपण मुकणार आहोंत. त्याऐवजी तुम्हांला तेथे दिसेल कोळशाचा सर्वग्रासी काळाकुट्ट धूर; आणि त्या धुरांत अंधुकपणें दिसणाऱ्या भुतासारख्या उभ्या असलेल्या कारखान्यांच्या चिमण्या.

आता आमची बोट खुल्या समुद्रांत आली. कालिदासाच्या रघुवंशांत दुरून दिसणाऱ्या समुद्रकिनाऱ्याचें वर्णन आलें आहे. "ताडांच्या आणि अन्य वृक्षांच्या छायेमुळे समुद्र निळा दिसत होता" आणि "एखाद्या लोखंडी धावेवर गंजाची बारीक रेघ असावी तसें दिसत होतें" वगैरे वर्णन वस्तुस्थितीशीं मुळीच न जुळणारें

आहे.* त्या महाकवीला प्रणाम असो. पण मला वाटतें, त्यानें आपल्या जीवनांत समुद्रहि पाहिला नसावा आणि हिमालयहि पाहिला नसावा. †

**गंगा जिथे सागराला मिळते--**

येथे पांढऱ्या आणि श्यामवर्ण पाण्याचा संगम झाला आहे. प्रयागला जसा गंगायमुनांचा संगम दिसतो तशीच थोडीशी छटा येथे दिसते. अन्यत्र मुक्ति मिळणें कितीहि कठीण असलें तरी ती "गंगाद्वारे प्रयागे च गंगासागरसंगमे"--"हरिद्वार, प्रयाग आणि गंगेचें मुख" या तीन ठिकाणीं निश्चितच मिळते. पण असें म्हणतात की हें कांही गंगेचें खरें मुख नव्हे. तें कांहीहि असो! मी त्या प्रभूला येथेच प्रणाम करतों, कारण सर्वतोऽक्षिशिरोमुखम्-"त्याचे चक्षु, त्याचें मस्तक व त्याचें मुख सर्वत्र आहे."

किती सुंदर! समोर जेथवर दृष्टि पोहोचते तेथवर समुद्राचें निळेंभोर पाणी पसरलें आहे. त्याच्यावर फेनिल लाटा उसळत आहेत आणि त्या वाऱ्याच्या संगतीनें तालबद्ध नृत्य करीत आहेत. आमच्या मागल्या बाजूस गंगेचें पवित्र जल आहे. शिवानें चर्चिलेल्या विभूतीमुळे तें पांढरें झालें आहे. "गंगेच्या फेसाने पांढऱ्या झालेल्या शंकराच्या जटा" असें वर्णन आपण वाचतोंच.‡ तुलनेने पाहतां

---

* "दूरादयश्चक्रनिभस्य तन्वी
तमालतालीवनराजिनीला ।
आभाति वेला लवणाम्बुराशेः
धारानिबद्धेव कलंकरेखा ।।"

† कालिदासाने हिमालय पाहिला नव्हता हें स्वामीजींचें मत पुढे बदललें.

‡ "गंगाफेनसिता जटा पशुपतेः,"--श्रीमत् शंकराचार्यकृत शिवापराधभंजन स्तोत्र.

गंगेचें पाणी पुष्कळच शांत आहे. आमच्या समोरच दोन्ही जलांची सीमारेषा दिसत आहे. तेथे पांढरें पाणी संपतें. आता समुद्राचें निळें पाणी सुरू होतें. पुढे काय,मागे काय,आता फक्त निळें पाणी. सगळीकडे निळें निळें पाणी आणि त्यावर अविरत उठणाऱ्या लाटा. समुद्राचे केस निळे, त्याचें शरीर निळें आणि त्याचे कपडे देखील निळेच. देवांच्या भीतीने लक्षावधि असुर समुद्रांत लपले असल्याचें आपण पुराणांत वाचतों. आज त्यांना बाहेर येण्याची संधि मिळाली आहे. वरुणदेव त्यांचा मित्र झाला आहे आणि पवनदेव त्यांचा पाठीराखा बनला आहे. भयानक गर्जनांनी आणि विकट हुंकारांनी दिशा दणाणून सोडीत त्यांनी समुद्राच्या पृष्ठभागावर उग्र समरतांडव सुरू केलें आहे. फेनिल जललहरी म्हणजे त्यांचें विकट हास्यच होय. ह्या कोलाहलांतच आमची बोट आपला मार्ग आक्रमीत आहे. त्या बोटीवर मनोहर वेषभूषा केलेले, चंद्रकिरणासारख्या स्निग्ध रंगाचे, समुद्रवलयांकित जगतावर आधिपत्य गाजविणाऱ्या राष्ट्राचे नागरिक स्त्रीपुरुष मोठ्या ऐटीने इकडे तिकडे फिरत आहेत. त्यांच्या रूपाने जणु आत्मविश्वास आणि स्वावलंबन साकार झाले आहेत. आम्हां 'काळ्या' माणसांना ते गर्वाचे आणि दंभाचे पुतळे भासत आहेत. डोक्यावर पावसाळी ढगांचा गडगडाट चालू आहे, चहुबाजूंना फेसाळणाऱ्या लाटा नृत्य आणि गर्जना करीत आहेत, समुद्राच्या शक्तीवर मात करणाऱ्या आमच्या बोटीच्या बलशाली एंजिनांचीहि प्रचंड घरघर चालू आहे--निरनिराळ्या ध्वनींचें तें अद्‌भुत मिश्रण मी चकित होऊन ऐकत होतों. एकप्रकारची माझी तंद्रीच लागली होती. तितक्यांत या सगळ्या आवाजांचा भेद करून गंभीर पण खणखणीत आवाजांत स्त्रीपुरुषांनी मिळून म्हटलेलें "रूल ब्रिटानिया, ब्रिटानिया रूल्स दि वेव्हज्" हें इंग्लंडचें राष्ट्र-

गीत माझ्या कर्णपटावर येऊन आदळलें. मीं एकदम दचकून सभोवार पाहिलें. बोट बेफाम डोलत होती आणि बंधु तुरीयानंदांनी आपलें डोकें दोन्ही हातांनी गच्च धरून ठेवलें होतें. त्यांना बोट लागल्यामुळे उलट्या होत होत्या.

### 'सी-सिकनेस' (बोट लागणें)

पाश्चात्त्य देशांत विद्यार्जन करण्यासाठी निघालेले दोन बंगाली युवक दुसऱ्या वर्गाने प्रवास करीत आहेत. त्यांची स्थिति तर अधिकच वाईट आहे. त्यांच्यापैकी एकजण फार घाबरला आहे. तो जर किनाऱ्यावर उतरूं शकला तर आनंदाने पळत पळत सरळ घरीं जाईल. तीं दोन मुलें आणि आम्ही दोघे असे आम्ही चौघेच भारतीय या बोटीवर आहोंत——आम्हीच येथे आधुनिक भारताचे प्रतिनिधि आहोंत. दोन दिवस बोट जेव्हा गंगेच्या पात्रांत होती तेव्हा बंधु तुरीयानंद यांनी, 'उद्‌बोधन'च्या संपादकाकडून त्यांना मिळालेल्या गुप्त सूचनेनुसार, माझा 'आधुनिक भारत' हा लेख मीं लवकर पूर्ण करावा याविषयी एकसारखा माझ्यामागे लकडा लावला होता. आज मलाहि योग्य संधि मिळाली आणि मीं त्यांना विचारलें, "बंधुवर, आधुनिक भारताची अवस्था तुम्हांला कशी काय वाटते ?" त्यांनी एकदा दुसऱ्या वर्गाकडे पाहिलें, एकदा स्वत:कडे पाहिलें आणि दीर्घ सुस्कारा टाकून म्हटलें, "फारच शोचनीय आहे. भलताच गोंधळ माजला आहे."

### हुगळी नदीच्या विभिन्न काळांतील अवस्था

वास्तविक पाहतां गंगेची जी 'पद्मा' नामक शाखा आहे ती मोठी आहे, पण लोक हुगळीलाच जास्त महत्त्व देतात; कारण, अनेकांच्या मतें हुगळी हेंच गंगेचें आधीचें आणि मुख्य पात्र आहे; पुढे नदीने आपला प्रवाह थोडासा बदलला त्या वेळीं पद्मेचा फाटा

निघाला. त्याचप्रमाणे हल्ली ज्याला "टोलीचा नाला" (Tolley's Nullah) म्हणतात तोच पूर्वी गंगेचा प्राचीन प्रवाहमार्ग होता. म्हणूनच त्याला 'आदिगंगा' म्हणतात. कविकंकणाने आपल्या व्यापारी नायकाला याच मार्गाने लंकेला नेलें आहे. प्राचीन काळीं गंगेंतून त्रिवेणीपर्यंत मोठमोठीं जहाजेंहि जात येत असत. त्रिवेणी घाटाच्या थोडेसें पलीकडे सरस्वती नदीच्या किनाऱ्यावर 'सप्तग्राम' नांवाचें बंदर होतें. फार प्राचीन काळापासून बंगालच्या परदेशाशीं होणाऱ्या व्यापाराच्या दृष्टीने 'सप्तग्राम' हेंच मुख्य बंदर होतें. हळूहळू सरस्वतीचें मुख गाळाने भरून गेलें. इ. स. १५३९ सालीं त्याची अशी अवस्था झाली की पोर्तुगीज लोकांना आपलीं जहाजें थांबविण्यासाठी आणखी पुढे जाऊन गंगाकिनाऱ्यावर जागा पाहावी लागली. त्यांनी वसविलेलें तें बंदरच पुढे वाढतां वाढतां हुगळी शहर म्हणून प्रसिद्ध झालें. गंगेंत गाळ साठण्याबद्दल सोळाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच भारतीय आणि परकीय व्यापाऱ्यांना फार काळजी वाटूं लागली होती. पण त्यांच्या काळजीने काय होणार होतें! नदीच्या पात्रांत हळूहळू पण अविरत साठत जाणाऱ्या या गाळाच्या बाबतींत मानवी यंत्रशास्त्र अयशस्वी ठरलें आहे. आणि अजूनहि गाळ साठणें चालूंच आहे. इ. स. १६६६ मधे, गंगा नदी सुतीजवळ गाळाने पूर्ण भरून गेल्याचें एका फ्रेंच पाद्र्याने लिहिलें आहे. 'ब्लॅक होल' प्रकरणांतील हॉलवेल साहेब जेव्हा मुर्शिदाबादला गेला होता तेव्हा नदीच्या उथळपणामुळे शांतिपूरजवळ त्याला लहान नौकेंत बसावें लागलें. हुगळी आणि जलांगी * या नद्यांमधे उन्हाळ्यांत नावा चालणें अशक्य असल्याचें इ. स.

* जलांगी नदी नवद्वीपापासून थोड्या अंतरावर गंगेला मिळाली आहे. या संगमानंतरच गंगेला 'हुगळी' असें नांव आहे.

गीत माझ्या कर्णपटावर येऊन आदळलें. मीं एकदम दचकून सभोवार पाहिलें. बोट बेफाम डोलत होती आणि बंधु तुरीयानंदांनी आपलें डोकें दोन्ही हातांनी गच्च धरून ठेवलें होतें. त्यांना बोट लागल्यामुळे उलटचा होत होत्या.

**'सी-सिकनेस' (बोट लागणें)**

पाश्चात्त्य देशांत विद्यार्जन करण्यासाठी निघालेले दोन बंगाली युवक दुसऱ्या वर्गाने प्रवास करीत आहेत. त्यांची स्थिति तर अधिकच वाईट आहे. त्यांच्यापैकी एकजण फार घाबरला आहे. तो जर किनाऱ्यावर उतरूं शकला तर आनंदाने पळत पळत सरळ घरीं जाईल. तीं दोन मुलें आणि आम्ही दोघे असे आम्ही चौघेच भारतीय या बोटीवर आहोंत--आम्हीच येथे आधुनिक भारताचे प्रतिनिधि आहोंत. दोन दिवस बोट जेव्हा गंगेच्या पात्रांत होती तेव्हा बंधु तुरीयानंद यांनी, 'उद्‌बोधन'च्या संपादकाकडून त्यांना मिळालेल्या गुप्त सूचनेनुसार, माझा 'आधुनिक भारत' हा लेख मीं लवकर पूर्ण करावा याविषयी एकसारखा माझ्यामागे लकडा लावला होता. आज मलाहि योग्य संधि मिळाली आणि मीं त्यांना विचारलें, "बंधुवर, आधुनिक भारताची अवस्था तुम्हांला कशी काय वाटते ?" त्यांनी एकदा दुसऱ्या वर्गाकडे पाहिलें, एकदा स्वतःकडे पाहिलें आणि दीर्घ सुस्कारा टाकून म्हटलें, "फारच शोचनीय आहे. भलताच गोंधळ माजला आहे."

**हुगळी नदीच्या विभिन्न काळांतील अवस्था**

वास्तविक पाहतां गंगेची जी 'पद्मा' नामक शाखा आहे ती मोठी आहे, पण लोक हुगळीलाच जास्त महत्त्व देतात; कारण, अनेकांच्या मतें हुगळी हेंच गंगेचें आधीचें आणि मुख्य पात्र आहे; पुढे नदीने आपला प्रवाह थोडासा बदलला त्या वेळीं पद्मेचा फाटा

निघाला. त्याचप्रमाणे हल्ली ज्याला "टोलीचा नाला" (Tolley's Nullah) म्हणतात तोच पूर्वी गंगेचा प्राचीन प्रवाहमार्ग होता. म्हणूनच त्याला 'आदिगंगा' म्हणतात. कविकंकणाने आपल्या व्यापारी नायकाला याच मार्गाने लंकेला नेलें आहे. प्राचीन काळीं गंगेंतून त्रिवेणीपर्यंत मोठमोठीं जहाजेंहि जात येत असत. त्रिवेणी घाटाच्या थोडेसें पलीकडे सरस्वती नदीच्या किनाऱ्यावर 'सप्तग्राम' नांवाचें बंदर होतें. फार प्राचीन काळापासून बंगालच्या परदेशाशीं होणाऱ्या व्यापाराच्या दृष्टीने 'सप्तग्राम' हेंच मुख्य बंदर होतें. हळूहळू सरस्वतीचें मुख गाळाने भरून गेलें. इ. स. १५३९ सालीं त्याची अशी अवस्था झाली की पोर्तुगीज लोकांना आपलीं जहाजें थांबविण्यासाठी आणखी पुढे जाऊन गंगाकिनाऱ्यावर जागा पाहावी लागली. त्यांनी वसविलेलें तें बंदरच पुढे वाढतां वाढतां हुगळी शहर म्हणून प्रसिद्ध झालें. गंगेंत गाळ साठण्याबद्दल सोळाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच भारतीय आणि परकीय व्यापाऱ्यांना फार काळजी वाटूं लागली होती. पण त्यांच्या काळजीने काय होणार होतें ! नदीच्या पात्रांत हळूहळू पण अविरत साठत जाणाऱ्या या गाळाच्या बाबतींत मानवी यंत्रशास्त्र अयशस्वी ठरलें आहे. आणि अजूनहि गाळ साठणें चालूंच आहे. इ. स. १६६६ मधे, गंगा नदी सुतीजवळ गाळाने पूर्ण भरून गेल्याचें एका फ्रेंच पाद्र्याने लिहिलें आहे. 'ब्लॅक होल' प्रकरणांतील हॉलवेल साहेब जेव्हा मुर्शिदाबादला गेला होता तेव्हा नदीच्या उथळपणामुळे शांतिपूरजवळ त्याला लहान नौकेंत बसावें लागलें. हुगळी आणि जलांगी * या नद्यांमधे उन्हाळ्यांत नावा चालणें अशक्य असल्याचें इ. स.

* जलांगी नदी नवद्वीपापासून थोड्या अंतरावर गंगेला मिळाली आहे. या संगमानंतरच गंगेला 'हुगळी' असें नांव आहे.

१७९७ मधे कॅप्टन कोलब्रुक याने लिहून ठेविलें आहे. इ. स. १८२२ ते १८८४ या काळांत हुगळी नदींत नौकांची वाहतूक पूर्णपणें बंद होती. यांपैकी चोवीस वर्षें तर अशी स्थिति होती की पात्रांत फक्त दोन तीन फूट खोल पाणी असे. सतराव्या शतकांत हुगळीच्या पलीकडे चिनसुरा येथे डच लोकांनी आपलें एक व्यापारी केंद्र उघडलें. फ्रेंच आणखी मागाहून आले, त्यांनी आणखी पुढे जाऊन चंद्रनगर येथे आपलें व्यापारी केंद्र प्रस्थापित केलें. इ. स. १७२३ मधे जर्मन ऑस्टेन्ड कंपनीने चंद्रनगरच्याहि पांच मैल खाली जाऊन नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर बांकीपूर येथे एक कारखाना उघडला. इ. स. १६१६ मधे डेन्मार्कच्या लोकांनी चंद्रनगरच्या पलीकडे आठ मैलांवर श्रीरामपूर येथे एक कारखाना उघडला होता. त्यानंतर आणखी खाली जाऊन इंग्रजांनी कलकत्ता नगर वसविलें. वर उल्लेखिलेल्या कोणत्याहि जागीं आज जहाजें नेतां येत नाहीत. कलकत्ता मात्र चालू बंदर आहे, पण त्याचेंहि पुढे काय होणार आहे याची सर्वांना चिंताच आहे.

तरी देखील जवळजवळ शांतिपूरपर्यंत उन्हाळ्यांतसुद्धा जें इतकें अधिक पाणी राहतें त्याचें एक विचित्र कारण आहे. तेथे काय होतें की, वरचा प्रवाह बंद पडतो, पण खूपसें पाणी आंतल्या-आंत जमिनींतून झिरपून वर नदींत येतें. गंगेचें पात्र अजूनहि किनाऱ्यालगतच्या जमिनीपेक्षा खाली आहे म्हणून बरें आहे. पण गाळ सारखा जमतां जमतां जर पात्र उंच होऊं लागलें तर मात्र कठीण प्रसंग येणार आहे. आणखीहि एका धोक्याबद्दल लोक सांगतात. धरणीकंपामुळे किंवा अन्य कारणामुळे अगदी कलकत्त्याच्या जवळ सुद्धा कधीकधी नदी इतकी सुकून गेली होती की माणसें खुशाल पात्रांतून पायीं चालत गेलीं. इ. स. १७७० मधे अशी

घटना घडल्याचें सांगतात. आणखी एका वृत्तानुसार गुरुवार दिनांक ९ ऑक्टोबर १७३४ रोजीं दुपारीं ओहोटीच्या वेळीं नदी अगदी कोरडी ठणठणीत पडली. तेंच जर आणखी थोड्या वेळाने, अशुभ मुहुर्तावर घडलें असतें तर त्याचा काय परिणाम झाला असता तें मी तुमच्याच कल्पनेवर सोपवितों. कदाचित् गंगा पुन्हा तिच्या पात्रांत आलीच नसती.

**‘ जेम्स आणि मेरी ’ चोरकिनारा**

हें झालें हुगळीच्या वरच्या भागाबद्दल. आता कलकत्त्याच्या खालच्या भागाबद्दल पाहूं. ‘ जेम्स आणि मेरी ’ चोरकिनारा ही या भागांतील फार धोक्याची जागा आहे. पूर्वी दामोदर नदी आणि गंगा यांचा संगम कलकत्त्याच्या उत्तरेला तीस मैलांवर होता. पण काळाचा महिमा असा की तें संगमस्थल कलकत्त्यापासून एकतीस मैलांहून अधिक खाली घसरलें. या स्थानाच्या सहा मैल खाली रूपनारायण नद आपलें पाणी गंगेंत आणून ओततो. इकडून दामोदर आणि तिकडून रूपनारायण असा तो संगम तर फार छान जुळून आला आहे, पण त्यामुळे जो अफाट गाळ वाहून येतो त्याची काय वाट लागणार ? परिणामत: नदीच्या पात्रांत खूप रेताड गाळ साचला आहे. गाळाच्या त्या टेकड्या नेहमी आपल्या जागा बदलतात. कधी तो गाळ सैल होतो, तर कधी घट्ट होऊन खडका-सारखा टणक बनतो. हीं सगळींच परिवर्तनें नेहमी भयप्रद असतात. रात्रंदिवस नदीची खोली मोजण्यांत येत असते. निष्काळजी-पणामुळे दोन चार दिवस जर हें काम झालें नाही तर जहाजांचा नाश झालाच म्हणून समजावें. अशा एखाद्या चोरकिनाऱ्यावर जहाज आदळलें की एक तर तें उलथून पडणार किंवा गाळांत गडप होणार. असेंहि घडलें आहे की तीन डोलकाठ्यांचें एक मोठें

जहाज गाळांत अडकलें व अर्ध्या तासाच्या आंत तें त्यांत इतकें खोल गेलें की फक्त डोलकाठ्यांचे शेंडे वर राहिले. अशा मोठ-मोठ्या जहाजांना गिळंकृत करून हा भाग दामोदररूप नारायणाचें 'मुख' हें आपलें नांव सार्थ करतो. संथाळ लोकांचीं खेडीं नाहीशीं करून दामोदर तृप्त झाला नाही. आता तो जहाजें आणि आगबोटी मागतो आहे. मुख्य पदार्थ खाऊन वीट आला म्हणजे थोडी चटणी लागायचीच ! इ. स. १८७७ मधे "काउन्टी ऑफ स्टर्लिंग" नांवाचें एक मालवाहू जहाज कलकत्त्याहून १४४४ टन गहूं लादून निघालें. तें याच मुखांतील एका भयानक चोर-किनाऱ्यावर आदळलें आणि आठ मिनिटाच्या आंत तें त्यांत दिसेनासें झालें. इ. स. १८७४ मधे २४०० टन माल नेणाऱ्या एका आगबोटीची अवघ्या दोन मिनिटांत तीच गत झाली. गंगामाई ! धन्य आहे तुझ्या या मुखाचा महिमा ! आम्हांला धडपणें बाहेर पडूं दिलेंस याबद्दल तुला प्रणाम करतों. बंधु तुरीयानंद मला म्हणाले, "महाराज, गंगामाईच्या या कृपेबद्दल तिला आपण एखादा बकरा अर्पण करायला हवा." मीं म्हटलें, "अगदी बरोबर आहे तुमची सूचना, पण एखाद्याच दिवशीं अर्पण करण्याचा प्रश्न कोठे येतो ? येथे तर रोज अर्पण होत आहेत." दुसऱ्या दिवशीं आपल्या बंधूंनी पुन्हा तो विषय काढला, पण मी कांहीच बोललों नाहीं. तिसऱ्या दिवशीं जेवणाच्या वेळीं, किती बोकड बळी दिले गेले तें मीं त्यांना दाखविलें.बंधुवर जरा बुचकळ्यांत पडल्यासारखे दिसले.ते म्हणाले, "गंगेला कुठे अर्पण केले ? हे तर लोक खात आहेत." मग मोठ्या प्रयासाने मीं तें सारें त्यांना समजावून दिलें. मीं त्यांना एक गोष्ट सांगितली. एकदा कलकत्त्याचा एक तरुण आपल्या सासुरवाडीला गेला. त्याची सासुरवाडी गंगेपासून फार दूर असलेल्या एका गावांत

होती. जेवायच्या वेळीं जावईबापूंनी पाहिलें की ताशेवाजंत्रीवाले उभे आहेत, सगळा थाटमाट सजला आहे व लोक आपली वाट पाहत आहेत. तेवढ्यांत सासूबाई आल्या आणि आग्रहाने म्हणाल्या, "जेवायच्या आधी हें दूध पिऊन टाका." जावयाला वाटलें, असेल बुवा इकडची रीत, आपण कशाला मोडा! त्याने पेला उचलला आणि एक घोट घेतो न घेतो तोंच वाजंत्रीताशे धडाक्याने वाजूं लागले. सासूबाईंच्या डोळ्यांतून घळघळा आनंदाश्रु वाहूं लागले. जावयाच्या डोक्यावर हात ठेवून त्यांनी त्याला आशीर्वाद दिला आणि त्या म्हणाल्या, "बेटा, जावई म्हणजे पुत्रच. पुत्राचें कर्तव्य तूं आज खरोखर पार पाडलेंस. अरे, तुम्ही गंगाकिनाऱ्यावर राहणारे लोक. त्यामुळे तुझ्या पोटांत आहे गंगेचें पाणी, आणि त्या दुधांत होतें तुझ्या दिवंगत सासऱ्याच्या अस्थींचें चूर्ण. तेव्हा तुझ्या दूध पिण्यामुळे त्यांचीं हाडें गंगेंत जाऊन पडलीं आणि त्यांच्या आत्म्याला सद्गति मिळाली." तीच गोष्ट इथे आहे. इथे आहेत कलकत्त्याची मंडळी. आणि जहाजावर प्रत्यहीं बकऱ्याच्या मांसाचे अनेक पदार्थ बनत आहेत. जेव्हा जेव्हा ते पदार्थ खाल्ले जातात तेव्हा तेव्हा तो बळी गंगामाईलाच मिळतो. तेव्हा तिला निराळा बळी देण्याची चिंता करण्याचें कांही कारण नाही. आपले बंधु तुरीयानंद किती गंभीर प्रकृतीचे आहेत हें तुम्हांला माहीतच आहे; त्यामुळे या माझ्या निवेदनाचा त्यांच्या मनावर काय परिणाम झाला तें कांही कळलें नाही.

### जहाजांत होत गेलेल्या सुधारणा

जहाज ही किती अद्‌भुत गोष्ट आहे! किनाऱ्यावरून नुसता दृष्टिक्षेप टाकला तरी जो समुद्र भयानक वाटतो, सगळें आकाश ज्याला नम्र होऊन भेटतें, ज्याच्या पोटांतून सूर्यगोल

बाहेर पडतो आणि ज्याच्या पोटांत तो पुन्हा परत जातो, ज्याच्या एका भृकुटिभंगाने हृदयाचा थरकांप उडतो अशा त्या समुद्राला जहाजाने किती नमविलें आहे ! समुद्र म्हणजे माणसाचा सर्वांत स्वस्त असा राजरस्ता बनला आहे. जहाज प्रथम कुणीं शोधून काढलें ? कोणा एका विशिष्ट व्यक्तीचें नांव घेतां येत नाही. जहाज हा एक सामूहिक प्रयत्नांचाच परिपाक होय. ज्या यंत्रांशिवाय माणसाचें मुळीच चालत नाही आणि ज्या यंत्रांनी कारखाने तयार झाले आहेत तीं सर्व यंत्रें सामूहिक प्रयत्नांचेंच फळ होय. जहाजहि अशाच सामूहिक प्रयत्नांतून निर्माण झालें आहे. चाकाचें उदाहरण घेऊं या. चाकाशिवाय आज जगांत चालूंच शकत नाही. करकरणाऱ्या बैलगाडीपासून तों जगन्नाथाच्या रथापर्यंत आणि चरख्यापासून तों कारखान्यांतील अजस्त्र यंत्रांपर्यंत सर्वकांही चाकांवर चाललें आहे. या चाकाचा शोध कोणीं लावला ? कोणाहि एका विशिष्ट माणसाने लावला नाही, म्हणजेच सगळ्यांनी मिळून लावला. प्राचीन काळांतील मानव कुऱ्हाडींनी झाडें कापायचा आणि त्यांचीं खोडें टेकडीच्या उतारावरून तो गडगडत खाली सोडून द्यायचा. त्यांतून त्याला हळूहळू भरीव चाकाची कल्पना सुचली. पुढे आणखी विकास होऊन आजचें मांदळा आणि आरे यांनी युक्त असें चाक प्रचारांत आलें. या अवस्थेपर्यंत यायला मानवाला किती लाख वर्षें लागलीं असतील कोण जाणे ! पण भारताने प्रत्येक गोष्टीच्या प्रगतीच्या टप्प्यांतील निरनिराळे सगळे नमुने सांभाळून ठेविले आहेत. एखाद्या गोष्टींत कितीहि बदल झाला किंवा तिचा कितीहि विकास झाला तरी तिच्या खालच्या टप्प्यांतील नमुने वापरणारे लोक कुठे ना कुठे आढळतातच. याप्रमाणे सर्वच टप्प्यांतील नमुने टिकून

राहिलेले दिसून येतात. उदाहरणार्थ अगदी सुरवातीला जें वाद्य तयार झालें त्याचें स्वरूप म्हणजे नुसता एक बासाचा तुकडा व त्याला बांधलेली एक तार असें होतें. पुढे घोडयाच्या केसांचा गज बनवून त्याच्या साहाय्याने हें वाद्य वाजविण्यांत येऊं लागलें. अशा रीतीने पहिलें व्हायोलिन तयार झालें. पुढे त्यांत अनेक परिवर्तनें झालीं. विभिन्न तारांचा आणि तांतींचा उपयोग सुरू झाला. निरनिराळ्या आकारांचे गज निरनिराळीं नांवें घेऊन पुढे आले. असा विकास करीत करीत आम्ही 'गिटार'पर्यंत आणि 'सारंगी'-पर्यंत येऊन पोहोचलों. पण इतकी प्रगति झाली असली तरी आपल्या भारतांत सगळे जुने नमुने पाहावयास मिळतात. मडक्याच्या तुंब्यावर बासाचा तुकडा बसविला आहे, त्यावर तार कसला आहे, घोडयांच्या केसांचा एक ओबडधोबड गज त्यावरून फिरतो आहे, आणि भसाडया आवाजांत गाणें गायिलें जात आहे— "मोरा मस्त कहरवा जाल बुनें रे!" अनेक मुसलमान टांगेवाल्यांना असें गातांना आपण आजहि पाहत नाहीं का? तीच गोष्ट चाकाची. चाकाच्या रचनेंत इतकी प्रगति झाली असली तरी आजहि तुम्ही मध्यप्रदेशांत जाऊन पाहा. तुम्हांला तेथे भरीव चाकें लावलेल्या गाडया रस्त्यावरून जातायेतांना दिसतील. रबरी धावांच्या या युगांत असलीं जुनीं चाकें लोकांचा मठ्ठपणाच दर्शवितात, नव्हे का?

फार प्राचीन काळीं, त्या सुवर्णयुगांत मनुष्याचा सगळा व्यवहार उघडा आणि सचोटीचा होता. बाहेर एक, आंत एक असा दांभिकपणा होऊं नये म्हणून ते शरीर सुद्धा झाकीत नसत! स्वार्थीपणा येऊं नये म्हणून ते लग्न देखील करीत नसत. 'माझें-तुझें' हा भेदच त्यांना माहीत नव्हता. लाकडाचीं दांडकीं आणि

दगड यांच्या आधारावर त्यांना परद्रव्य लोष्ठवत् वाटत होतें ! त्या काळांत त्या प्राचीन मानवांनी जलप्रवासासाठी होड्या व तराफे आदि साधनें शोधून काढलीं. एखाद्या झाडाच्या खोडाचा गाभा जाळून ते नाव तयार करीत आणि एकाला एक लाकडें बांधून तराफे बनवीत. ओरिसा ते कोलंबो या समुद्रकिनाऱ्यावर अजूनहि आपल्याला असले तराफे आढळतात. त्यावरून हे तराफे समुद्रांत किती दूरवर जाऊं शकतात याची तुम्हांला कल्पना आली असेल. नौकानिर्माणाचा हाच ओनामा होय.

आणि त्या पूर्वबंगालमधील नावाड्यांच्या नौका ! त्यांवर चढायचें म्हणजे पांचहि जलदेवतांचें स्मरण करूनच चढायला हवें ; आणि त्या चितगांवकडील खलाशांच्या गृहनौका ! लहानसें जरी वादळ आलें तरी त्या नौकेंतील सुकाण्याची पार घाबरगुंडी उडते आणि तो प्रवाशांना शेवटचा इलाज म्हणून सांगतो की——आता आपापल्या कुलदैवताचें स्मरण करा. त्या पश्चिमेकडील प्रांतांतील नावा ! त्यांच्या समोरच्या भागीं पितळेचे दोन विचित्र डोळे बसविलेले असतात. त्यांचे नावाडी त्या नावा उभ्याउभ्याच वल्हवीत असतात. आणि ती त्या 'श्रीमंत' नांवाच्या व्यापाऱ्याची नौका ! (कविकंकणाच्या मतें त्या श्रीमंत नामक व्यापाऱ्याने वल्ह्यांच्या साहाय्यानेच बंगालचा उपसागर ओलांडला होता. त्याची नाव एकदा माशांच्या समुदायाने घेरली व ती त्यांच्या मिशांत अडकून नाव उलटायची पाळी आली होती, शिपेला तो एक लहान मासाच समजला आदि मोठी मजेदार हकीकत कंकणाच्या काव्यांत आहे.) तिलाच आपण 'गंगासागर नौका' म्हणून ओळखतों. तिच्यावर चांगलें छत असतें. आणि तिचा तळ बांबूच्या कामट्यांचा केलेला असतो. आंतमधे गंगाजलाने भरलेलीं अनेक भांडीं ओळीने ठेविलेलीं

असतात. (तें पाणी अतिशय चवदार आणि थंडगार असतें. मी म्हणतों, तुम्ही एकदा ऐन हिवाळ्यांत गंगासागराची सफर कराच. उत्तरेकडून येणारा थंडगार झोंबणारा वारा तुमच्या सगळ्या थंड पेयांची आवड पार नाहीशी करून टाकतो. ) आणि त्या बंगाली बाबूंच्या कचेऱ्यांत जाण्यायेण्याच्या लहान लहान नावा ! त्यांच्यावर बहुधा बाली येथील नावाडी असतो. तो मोठा कुशल आणि चतुर असतो. अगदी दूर, कोन्नगरपाशी जरी त्याने एखादा मेघखंड पाहिला तरी तो चट्दिशी आपली नाव आडोशाला नेतो ! हे बाली येथील लोक जाऊन त्यांच्याऐवजी या नावांवर आजकाल जोनपूरकडील धष्टपुष्ट नावाडी येऊं लागले आहेत. त्यांची बोली मोठी विचित्र असते. एकदा तुमच्या महंत महाराजांनी कांही जोनपुरी नावाड्यांना सहज गंमत म्हणून बगळा पकडायला सांगितलें. पण बगळा न म्हणतां विनोदाने त्यांनी ' बकासुर ' हा शब्द वापरला. तो शब्द ऐकतांच गोंधळून जाऊन ते नावाडी म्हणाले, " महाराज, हा राक्षस कुठे राहतो ? आम्हांला तर तुमचें म्हणणें कांही समजत नाही. " आणि मग ती भली मोठी पण संथ चालणारी नाव ! बंगाली लोकांनी तिचें नांव ठेविलें आहे ' गधाबोट '. ती कधी सरळ जात नाही. आणि तीं मोठीं गलबतें ! त्यांना एक, दोन किंवा तीनतीन डोलकाठ्या असतात. तीं लंका, मालदीव किंवा अरबस्थान येथून नारळ, खजूर आणि सुकलेले मासे आणतात. असे नौकांचे किती म्हणून प्रकार वर्णावे ! ते अनेक आहेत. नौकांचा कसा कसा विकास झाला ह्याचीं तीं प्रतीकें आहेत.

### शिडाचें जहाज, आगबोट आणि युद्धनौका

शिडांच्या साहाय्याने जहाज चालविणें हा मोठाच आश्चर्यकारक शोध आहे. वारा कुणीकडून कुणीकडे का वाहीना, शिडांच्या

चतुर योजनेने जहाज बरोबर आपल्या गंतव्य स्थलीं पोहोचतें. वारा विरुद्ध दिशेने वाहत असेल तर अर्थातच वेळ अधिक लागतो. तें जहाज चालतांना फारच सुंदर दिसतें. दुरून तर तें असें दिसतें की, जसा कांही अनेक पंख असलेला एखादा विराट पक्षीच आकाशांतून खाली उतरत आहे. मात्र शिडें असलीं की जहाज पाणी कापीत सरळ जाऊं शकत नाही, आणि वारा जर थोडा विरुद्ध असला तर त्याला नागमोडीं वळणें घेत जावें लागतें. पण वारा जर का अगदीच पडला तर मात्र शिडांचा कांहीएक उपयोग होत नाही. तीं गुंडाळून ठेवावीं लागतात. मग जहाजें अगतिक होऊन एकाच जागीं उभीं ठाकतात. विषुववृत्ताच्या जवळील प्रदेशांत अजूनहि असे प्रसंग अनेकवार येतात. आजकाल शिडांच्या जहाजांच्या बनावटींत सुद्धा लाकडाचा उपयोग कमी होऊं लागला आहे. बव्हंशीं तीं लोखंडाचींच असतात. आगबोटीचा कप्तान किंवा नावाडी बनण्यापेक्षा शिडांच्या जहाजाचा कप्तान किंवा नावाडी बनणें फार कठीण आहे. चांगल्या अनुभवावांचून कोणीहि शिडांच्या जहाजाचा कप्तान होऊं शकत नाही. आगबोटीच्या तांडेलाच्या अंगीं जे गुण लागतात त्यांच्यापेक्षा शिडाच्या जहाजाच्या तांडेलाजवळ दोन गुण तरी अनिवार्यतः अधिक असावेच लागतात. ते दोन गुण म्हणजे, घटकेघटकेला होणारीं वाऱ्याचीं स्थित्यंतरें तात्काल जाणणें आणि दूरदूरच्या धोक्याच्या जागा आधीच ओळखून सदा सावध राहणें. आगबोटीचीं अधिकांश सूत्रें मनुष्याच्या हातांत असतात. एका क्षणांत तिचें एंजिन थांबवितां येऊं शकतें. ती ताबडतोव पुढे, मागे, बाजूला किंवा कोणत्याहि इच्छित दिशेने हाकारली जाऊं शकते; पण शिडाचें जहाज वाऱ्यावरच अवलंबून असतें. शिडें बांधतां बांधतां, सुकाणू फिरवितां फिरवितां एखादें

जहाज किनाऱ्यावर, दुसऱ्या एखाद्या जहाजावर, किंवा एखाद्या पाण्यांत लपलेल्या खडकावर आदळूं शकतें. मजुरांची ने-आण सोडली तर आजकाल माणसांच्या वाहतुकीसाठी बहुधा शिडांचीं जहाजें वापरलीं जात नाहीत. साधारणतः तीं मालाची वाहतूक करतात. तो मालहि बहुधा मीठ इत्यादि पदार्थांसारखा निकृष्ट प्रकारचा असतो. दुकाठी तारवांसारखीं लहान जहाजें किनाऱ्याच्या जवळपासचा व्यापार सांभाळतात. सुएझ कालव्यामधून जायचें म्हणजे शिडाच्या जहाजांना आगबोटीकडून ओढून घ्यावें लागणार —त्यासाठी त्यांना हजारो रुपये भाडें द्यावें लागणार. हें त्यांना परवडणारें नसतें, त्यामुळे तीं जहाजें आफ्रिकेला वळसा घालून सहा महिन्यांनी इंग्लंडला पोहोचतात.

शिडांच्या जहाजांतील या दोषांमुळेच प्राचीन काळीं आरमारी युद्ध फार धोक्याचें मानलें जात होतें. वाऱ्याची किंवा जलप्रवाहाची दिशा थोडीशी जरी बदलली तरी तेवढ्याने लढाईचा निकाल पूर्ण बदलत असे. पुन्हा, तीं जहाजें असत लाकडाचीं. त्यामुळे वारंवार आगी लागत आणि त्या विझवाव्या लागत. त्यांची रचनाहि निराळ्या प्रकारची असे. त्यांचें एक टोक खूप उंच व सपाट असे. त्यावर पांचसहा मजले असत. सर्वांत वरच्या मजल्यावर एक लाकडी पडवी असे. तिच्या समोर कमांडरची बैठक व कार्यालय असे. त्याच्या दोन्ही बाजूला इतर अधिकाऱ्यांच्या खोल्या असत. मधे बरीच जागा मोकळी सोडलेली असे. तिच्या एका टोकाला कांही खोल्या असत. एकाखाली एक खालच्या मजल्यांवर सुद्धा तशाच मोठमोठ्या खोल्या असत.सर्वांत खालच्या मजल्यावर नावाड्यांच्या झोपण्याच्या, जेवणाच्या आदि खोल्या असत. जहाजाच्या वा ‘ डेक ’च्या दोन्ही बाजूला रांगेने तोफा बसविलेल्या असत. जहा-

जांच्या भिंतींना जीं भोकें असत त्यांतून त्यांचीं तोंडें बाहेर निघालेलीं असत. तोफांच्या दोन्ही बाजूंना गोळे ठेवलेले असत. लढाईच्या दिवसांत बारुदीचीं पोतींहि तेथे ठेवलेलीं असत. जुन्या काळच्या या आरमारी जहाजांचीं छतें फार ठेंगणीं असत. त्या खोल्यांतून चालायचें म्हणजे ओणवें होऊनच चालावें लागे. आरमारी शिपाई गोळा करणें हेंहि एक मोठेंच कठीण काम होतें. मिळतील तेथून कपटाने, जुलुमजबरदस्तीने कशाहि रीतीने आरमारी शिपायांची भरती करायला सरकारने कायमची आज्ञा देऊन ठेवली होती. मुलांना त्यांच्या मातांपासून आणि पतींना त्यांच्या पत्नींपासून बळजबरीने ओढून नेण्यांत येत असे. पण एकदा ते जहाजावर आले ( बिचारे कदाचित् पूर्वी कधी जहाजावर चढलेहि नसतील ) की त्यांना सरळ डोलकाठीवर चढायला सांगण्यांत येई. भीतीमुळे त्यांनी जर तो हुकूम अवमानला तर त्यांना फटके मारण्यांत येत. त्या दिव्यांत कित्येक जण आपले प्राणहि गमावीत. देशांतील श्रीमंत आणि प्रतिष्ठित लोक हे कायदे करीत असत; कारण लुटीचा, व्यापाराचा,किंवा निरनिराळ्या देशांशीं झालेल्या लढायांचा सगळा फायदा त्यांनाच मिळत असे. गरीब बिचाऱ्या शिपायांचें काम एवढेंच की त्यांनी आपलें रक्त सांडायचें आणि बळी जायचें.सगळ्या जगाच्या इतिहासांत सर्वत्र असेंच चालत आलें आहे. आता ते कायदे विद्यमान नाहीत. आरमारांत भरती करणारी मंडळी म्हटली की पूर्वी शेतकऱ्यांच्या आणि गरीब लोकांच्या हृदयाचा नुसतां थरकांप होत असे. आता ती गोष्ट राहिली नाही. आता ज्याच्या त्याच्या इच्छेचा प्रश्न आहे. ज्याला वाटेल त्याने आरमारांत नोकरी करावी. पण अजूनहि, अनेक तरुण गुन्हेगारांना तुरुंगांत डांबण्याऐवजी आरमारी जहाजांच्या नावाड्यांचें शिक्षण देण्यांत येतें.

बाष्पशक्तीने या सर्व गोष्टींत क्रांति घडवून आणली. आजकालच्या जहाजांवरचीं शिडें बहुधा शोभेचींच असतात. आता त्यांना वाऱ्यावर विशेष अवलंबून राहावें लागत नाही. वादळें इत्यादींपासून त्यांना फारच कमी भीति असते. पाण्यांत लपलेल्या खडकांवर न आदळण्याचीच तेवढी जहाजांना आता काळजी घ्यावी लागते. आणि आधुनिक युद्धनौका प्राचीन युद्धनौकांपेक्षा अगदीच निराळ्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्या मुळी जहाजांसारख्या दिसतच नाहीत. निरनिराळ्या आकाराचे लोखंडी किल्लेच तरंगत आहेत असें त्यांना पाहून वाटतें. तोफांची संख्याहि आता बरीच कमी असते. पण आजकालच्या त्या उंच मनोऱ्यांतील तोफांपुढे प्राचीन तोफा म्हणजे खेळणींच होतीं. या युद्धनौकांचा वेगहि किती जास्त असतो ! पाणतीर फेकणारी नौका ही या नौकांत सगळ्यांत लहान असते. थोड्याशा मोठ्या युद्धनौकांकडे शत्रूंच्या व्यापारी जहाजांना जिंकण्याचें काम असतें; प्रत्यक्ष सागरी युद्ध करणाऱ्या राक्षसी युद्धनौका खूप मोठ्या असतात.

### युद्धनौकांमधे होत गेलेल्या सुधारणा

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत जेव्हा यादवी माजली तेव्हा 'एकता' पक्षाने एक युक्ति केली. त्यांनी आपल्या लाकडी जहाजांच्या भिंतींना बाहेरून लोखंडी रूळ एकाखाली एक बसवून झाकून टाकलें. त्यामुळे शत्रूंच्या गोळ्यांनी जहाजांची कांहीच हानि होईनाशी झाली. त्यानंतर तो एक नियमच बनला. जहाज बनविलें की लाकडी भिंतींना शत्रूंच्या गोळ्यांपासून हानि पोहोचूं नये म्हणून त्यांवर लोखंडी आवरण चढवायचेंच. जहाजांवरील तोफांमधेसुद्धा सुधारणा झाली. त्यांचा आकार अधिकाधिक मोठा होऊं लागला आणि पूर्वी मोर्चे बांधणें, तोफा भरणें, त्या डागणें आदि जीं कामें

हातांनी होत असत तीं आता यंत्रांनी होऊं लागलीं. पांचशे लोकांना सुद्धा जी तोफ रेसभरहि हलवितां येणें अशक्य, ती तोफ आज एखादा लहान मुलगाहि नुसती कळ दाबून उभी किंवा आडवी फिरवितो, भरतो, आणि उडवितो. आणि हें सगळें तो एका क्षणांत करतो. जहाजांच्या त्या लोखंडी भिंतींची जाडी जसजशी वाढू लागली तसतशा वज्रासारखी शक्ति असलेल्या तोफाहि तयार होऊं लागल्या. आजघटकेला युद्धनौका म्हणजे लोखंडी भिंतींचा एक किल्लाच असतो आणि तोफा म्हणजे तर साक्षात् मृत्युच ! एक गोळा बसला की मोठ्यांत मोठ्या जहाजाचा असा फडशा उडतो की त्याचे अगदी तुकडे तुकडे होतात. परंतु हें गर्वोन्नत लोहमंदिर– जें (बंगाली लोककथेंतील) नकिंदरच्या बापाने कधी स्वप्नांतहि पाहिलें नसेल आणि जें 'साताली' पर्वतावर न उभें राहतां सत्तर हजार पर्वतप्राय लाटांवर नाचत असतें––अशा या गर्वोन्नत लोहमंदिराला देखील पाणतीराचें प्राणान्तिक भय वाटत असतें. पाणतीर म्हणजे चिरुटाच्या आकाराची एक नळी असते. एखाद्या लक्ष्यावर सोडला की तो माशासारखा पाण्यांतून धावतो. लक्ष्यावर जाऊन तो आदळला की त्यांत असलेल्या अत्यंत स्फोटक द्रव्यांचा भयानक गर्जनेसह स्फोट होतो आणि ज्या जहाजाखाली हें घडतें तें जहाज पार आपल्या पूर्वस्थितीला जाऊन पोहोचतें, अर्थात् कांही अंशीं त्याचें लोखंडाच्या व लाकडाच्या लहान लहान तुकड्यांत रूपान्तर होतें आणि उरलेल्या अंशाचें आगींत व धुरांत पर्यवसान होतें. स्फोटाच्या तडाख्यांत सापडलेल्या माणसांचा कांहीच पत्ता लागत नाही. कांही अवशेष आढळलेच तर ते मांसाच्या लहान लहान तुकड्यांच्या रूपांत असतात. पाणतीरांचा शोध लागल्यापासून सागरी युद्ध अधिक काळ चालणें अशक्य झालें आहे.

एकदोन लढायांतच निकाल लागतो. एकतर मोठा विजय मिळतो, नाहीतर पूर्ण पराजय होतो. पण या युद्धनौका प्रचलित होण्यापूर्वी लोकांना जें वाटत होतें की त्यांचा उपयोग सुरू होतांच दोन्ही पक्षाकडील सगळेच्या सगळे लोक समाप्त होतील तसें कांही झालेलें दिसून येत नाही.

### यंत्रांच्या वाढीचे परिणाम

रणांगणावर दोन्ही पक्षांकडून बंदुकीच्या गोळ्यांची जी सरबत्ती केली जाते त्यांपैकी कांहींचें जरी लक्ष्य साधलें तरी दोन मिनिटांत दोन्ही पक्षांकडील एकूण एक माणूस मरून जाईल. त्याचप्रमाणे युद्धनौकांवरून निघणाऱ्या दर पांचशे गोळ्यांपैकी एकाने जरी लक्ष्यवेध केला तरी दोन्ही नौका नामशेष होतील. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे की, एकीकडे बंदुका आणि तोफा यांच्यांत सुधारणा होत आहेत, बंदुका हलक्या होत आहेत, त्यांच्या नळ्या उत्कृष्ट बनत आहेत, त्यांचा पल्ला वाढत आहे, त्या भरण्याचीं यंत्रें वाढत आहेत, त्या सोडण्याचा वेगहि वाढत आहे, तर दुसरीकडे लक्ष्यवेध चुकण्याचें प्रमाणहि वाढत आहे. जुन्या काळांतील त्या लांब नळीच्या जेजाला आणि तोडच्याच्या बंदुका घेऊन, त्या तिपाईवर ठेवून, प्रत्यक्ष बत्ती लाऊन, तिच्यावर फुंकर घालून ती पेटवून बरकजाई आणि अफ्रीडी लोक अगदी नेमका लक्ष्यवेध करतात. उलट आधुनिक प्रशिक्षण घेतलेला शिपाई अनेक यंत्रें असलेली मशीनगन घेऊन मिनिटाला एकशेपन्नास गोळ्या उडवतो, आणि करतो काय तर नुसतें वातावरण तापवतो ! अल्प प्रमाणांत यंत्राचा उपयोग चांगला, पण त्याचा अतिरेक झाला की स्वतःची बुद्धि चालविण्याच्या माणसाच्या वृत्तीला आळा बसतो आणि तो एक निर्जीव यंत्र बनतो. कारखान्यांतील माणसांचें

काय होतें ? एकच एक कंटाळवाणें काम दिवसच्या दिवस, रात्रीच्या रात्री, वर्षानुवर्षे त्यांना करावें लागतें. ठराविक माणसांच्या तुकडीला ठराविक विशेष काम देण्यांत येतें. उदाहरणार्थ कोणी टांचण्यांचीं नुसतीं डोकींच तयार करतात; कोणी दोन धाग्यांना जोडण्याचेंच काम करतात; कोणी मागाबरोबर एकसारखे पुढेमागे सरकत असतात; आयुष्यभर हे लोक असलें एकच एक काम करतात. परिणामत: तें विशिष्ट काम त्यांना मिळेनासें झालें की त्यांचा जणु मृत्युच ओढवतो. जीविकोपार्जन करण्याचा दुसरा मार्ग कांही त्यांना अवलंबितां येत नाही आणि त्यांच्यावर भुकेने मरण्याची पाळी येते. यंत्रासारखें ठराविक काम करूनकरून माणूस निर्जीव यंत्रच बनतो. आणि याच कारणामुळे जन्मभर शिक्षक किंवा कारकून म्हणून काम करणारा माणूस शेवटीं महामूर्ख वनतो, जडपिंडवत् होऊन जातो.

### उतारू नेणारीं व माल वाहणारीं जहाजें

मालवाहू जहाजें आणि उतारू नेणारीं जहाजें वेगळ्या प्रकारचीं असतात. कांही मालवाहू जहाजें, युद्धकाळ असल्यास, तोफा चढवून शत्रूच्या अरक्षित मालवाहू जहाजांचा पाठलाग करतात व त्या दृष्टीनेच त्यांची बांधणी झालेली असते. यासाठी त्यांना त्यांच्या सरकारकडून मोबदला मिळतो. तरीपण युद्धनौकांत व त्यांच्यांत खूपच फरक असतो. आता बहुतेक सगळीं मालवाहू जहाजें म्हणजे आगबोटीच असतात. त्यांचा आकार इतका विशाल असतो आणि त्यांची वांधणी इतकी खर्चाची असते की त्या बहुधा कोणाहि व्यक्तीच्या मालकीच्या नसतात, तर त्या कंपन्यांच्या मालकीच्या असतात. भारत आणि युरोप यांच्यांत मालाची ने-आण करणाऱ्या कंपन्यांपैकी पी. अ‍ॅन्ड ओ. ही सर्वांत जुनी व सर्वांत

श्रीमंत कंपनी आहे. दुसरा क्रमांक लागतो बी. आय. एस्. एन्. कंपनीचा. त्यानंतर क्रमांक लागणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. परदेशांतील कंपन्यांपैकी 'मेसाजरी मरीतीम' (फ्रेंच), 'ऑस्ट्रियन लॉईड', 'जर्मन लॉईड', 'रुबॅटिनो कंपनी' (इटालियन) या कंपन्या प्रसिद्ध आहेत. या सर्व कंपन्यांपैकी पी. ॲन्ड ओ. कंपनीच्या उतारू नेणाऱ्या आगबोटी सामान्यपणें सर्वांत सुरक्षित आणि सर्वांत वेगवान मानल्या जातात. 'मेसाजरी मरीतीम' मधील भोजनाची व्यवस्था उत्कृष्ट असते.

'नेटिव्ह'

या खेपेला जेव्हा आम्ही युरोपला जायला निघालों त्या वेळीं उपरिनिर्दिष्ट कंपन्यांपैकी शेवटच्या दोन कंपन्यांनी, प्लेगचा संसर्ग लागेल या भीतीने 'नेटिव्ह' प्रवाशांना तिकिटें देणें बंद केलें होतें. इमिग्रेशन ऑफिसकडून प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय कोणाहि भारतीयाला परदेशीं जाऊं द्यायचें नाही असा भारत सरकारचा कायदा आहे. त्याला कोणी गुलाम म्हणून विकण्याकरिता किंवा मजूर म्हणून डांबण्याकरता नेत नसून तो स्वेच्छेने जात आहे याची खात्री करून घेणें हें या ऑफिसचें कार्य आहे. जहाजावर चढण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांना हें प्रमाणपत्र दाखवावें लागतें. परदेशांत जाणाऱ्या भारतीय सुशिक्षित लोकांसाठी हा कायदा आजवर लागू केला जात नसे. परंतु हल्ली प्लेगची साथ सुरू झाल्यामुळे, परदेशीं जाणाऱ्या प्रत्येक 'नेटिव्हा'ची आपल्याला माहिती असावी या दृष्टीने सरकारने तो आता सर्वांना लागू केला आहे. आपण आपल्या देशांत 'अमुक लोक सुशिक्षित, वरच्या दर्ज्याचे आहेत आणि अमुक लोक खालच्या दर्ज्याचे आहेत' असें म्हणतों, पण सरकारच्या दृष्टीने मात्र आपण सगळेच 'नेटिव्ह'

आहोंत. महाराजे, राजे, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र सगळ्यांची जात एकच—ती म्हणजे 'नेटिव्ह'. मजुरांना जी कसोटी आणि जो कायदा लागू तोच सगळ्या 'नेटिव्हां'ना लागू. धन्य इंग्रज सरकार ! त्याच्या कृपेमुळे, कांही क्षण का होईना, पण मला 'नेटिव्हां'शीं एकरूप झाल्यासारखें वाटतें.

ह्या साम्यभावनेचें मी विशेषच स्वागत करतों, कारण हें शरीर कायस्थ कुलांत उत्पन्न झाल्यामुळे त्याला अनेक वर्गांतील लोकांकडून आलेले वाग्बाण सहन करावे लागले आहेत. आज भारतांतील सगळ्या जातींच्या तोंडून आपण एकच घोषणा ऐकतों; ती म्हणजे 'आम्ही शुद्ध आर्य आहोंत' ही होय. कोणी म्हणतात आमच्यांत शंभर टक्के आर्य रक्त आहे; कुणी म्हणतात अमक्यांत तें थोडें कमी आहे तर अमक्यांत तें थोडें जास्त आहे. याच बाबतींत थोडासा मतभेद आढळतो. पण आपण कायस्थांपेक्षा श्रेष्ठ आहोंत याबद्दल मात्र सर्वांचें एकमत आहे. वंशाच्या दृष्टीने इंग्रजांचें आणि त्यांचें फार जवळचें म्हणजे अगदी चुलत भावासारखें नातें असल्याचें ते सांगतात. आणि म्हणतात की 'आम्ही नेटिव्ह नाहीं.' इंग्रजांप्रमाणे तेहि दयेने प्रेरित होऊन येथे आले आहेत असा त्यांचा दावा असतो. बालविवाह, बहुपत्निकत्व, मूर्तिपूजा, सतीची प्रथा, पडदा पद्धति आदि वाईट चालींना आमच्या धर्मांत कधीच स्थान नव्हतें, कायस्था-फायस्थांच्या पूर्वजांपासून त्या आमच्यांत शिरल्या असें ते म्हणतात. त्यांचा धर्म म्हणे अगदी इंग्रजी थाटाचाच आहे ! त्यांचे पूर्वज अगदी हुबेहुब इंग्रजांसारखे दिसत होते, भारतांतील कडक उन्हामुळेच ते म्हणे काळे झाले ! हिंमत असेल तर या आता पुढे आणि मांडा आपले दावे. सरकार चक्क म्हणतें की 'तुम्ही सगळेच

नेटिव्ह आहांत.' काळचा लोकांच्या या सगळ्या समूहांत कणभर कमीअधिक काळेपणा कोण पाहतो ? सरकार म्हणतें की 'ते सगळे नेटिव्ह आहेत.' आता तुमचें इंग्रजी पद्धतीने वेषभूषा करणें व्यर्थ आहे. तुमच्या त्या साहेबी टोप्या आदींचा आता तुम्हांला कांहीएक उपयोग होणार नाही. सगळा दोष हिंदूंच्या माथीं मारून तुम्ही जर इंग्रजांशीं भ्रातृभाव जोडूं पाहाल तर लाथाबुक्क्यांचा अधिकच प्रसाद तुम्हांला सेवन करावा लागेल. त्यांत कांही कमी होणार नाही. धन्य इंग्रज सरकार ! दैवाचा तुझ्यावर वरदहस्त आहेच, आणखीहि तुझी सदा भरभराट होत राहो ! लंगोटी आणि धोतर ही आमची राष्ट्रीय वेषभूषा जर पुन्हा सुरू झाली तर आम्ही फार सुखी होऊं. हे इंग्रजांनो, तुमच्या कृपेने आम्ही आमच्या देशांत या टोकापासून त्या टोकापर्यंत उघड्या डोक्याने व अनवाणी हिंडूं आणि अगदी भारतीय पद्धतीने बोटांचा उपयोग करून वरण-भाताचें जेवण पोटभर जेवूं. हे प्रभो, धन्य आहे तुझी ! आजपर्यंत आम्ही देशी साहेबीपणावर विनाकारण भाळलों होतों, त्याच्या चकचकाटाने फसलों होतों. आम्ही असें ऐकत होतों की आम्हीं देशी वेषभूषा, धर्म, रीतीरिवाज आदि सोडले रे सोडले की इंग्रज लोकांनी आम्हांला खांद्यावर उचलून घेऊन आमचे देव्हारे माजवलेच म्हणून समजा. आणि आम्ही त्याप्रमाणे करणारच होतों, तोंच इंग्रजाच्या हातांतील चाबूक सबकन् आमच्या पाठीवर बसला आणि वर खाडकन् त्याच्या बुटाची लाथ बसली. तात्काळ सगळ्यांच्या मनाने धसका घेतला आणि ते परत फिरले. साहेबी रीतीभातींना त्यांनी रामराम ठोकला आणि ते म्हणूं लागले की आम्ही जन्माने 'नेटिव्ह'च आहोंत.

इंग्रजांची नक्कल करण्याचा आम्ही जो कसोशीने प्रयत्न

करीत होतों तो इंग्रजांच्या बुटांनी आमच्या डोक्यांतून काढून टाकला ! धन्य इंग्रज सरकार ! त्यांचें सिंहासन दृढ होवो ! त्यांचें राज्य शाश्वत चालो ! आणि माझ्यामधे इंग्रजी चालीरीतींबद्दल जो काय थोडा ओढा उरला होता तोहि अमेरिकन लोकांच्या कृपेने नाहीसा झाला. दाढी बरीच वाढली होती आणि मी संत्रस्त होतों. मी एका केशकर्तनालयांत शिरतों न शिरतों तोंच कोणीतरी ओरडलें, "तुमच्यासारख्या घाणेरड्या लोकांसाठी ही जागा नाही." मला वाटलें माझा फेटा, भगवी कफनी आणि एकंदर लोकविलक्षण वेष पाहून त्या माणसाचा माझ्याविषयी वाईट ग्रह झाला असावा. तेव्हा माझ्या मनांत विचार आला की इंग्रजी पद्धतीचा कोट आणि हॅट विकत घ्यावी. मी माझा विचार अमलांत आणणार इतक्यांत सुदैवाने मला एक अमेरिकन सद्गृहस्थ भेटले. त्यांनी मला समजावून सांगितलें की बाबारे, हा तुझा भगवा वेषच चांगला आहे, त्यामुळे निदान सभ्यगृहस्थांचा तरी गैरसमज होणार नाही, पण जर का युरोपियन पद्धतीचा वेष केला तर लोक मागे लागून पळतां भुई थोडी होईल. आणखी एकदोन केशकर्तनालयांत मला तसाच अनुभव आला. त्यानंतर स्वहस्तें दाढी करण्याचा उपक्रम मीं सुरू केला. एकदा मी भुकेने अगदी काकुळतीला आलों होतों म्हणून एका उपाहारगृहांत शिरलों आणि 'अमुक वस्तु द्या' म्हणून सांगितलें. त्यावर तेथील माणूस म्हणाला, "आमच्याजवळ ती वस्तु नाही." मीं म्हटलें, "ती काय, दिसते तर आहे." त्यावर तो म्हणाला, "भल्या माणसा, स्पष्ट शब्दांत सांगायचें तर आमच्या येथे तुला जेवायला बसायला जागा नाही." "कां बरें?" मीं विचारलें. उत्तर आलें, "कारण तुझ्या टेबलावर तुझ्याबरोबर बसून कोणालाहि भोजन करतां येणार नाही. जो करील त्याला

लोक जातिबहिष्कृत करतील." मग अमेरिकेंतहि आपल्या देशांतल्याप्रमाणे जाती आहेत हें कळल्यामुळे मला अमेरिका आवडूं लागली ! आम्ही गोरे, आम्ही काळे, आम्ही 'नेटिव्ह' असलों तरी आमच्या रक्तांत आर्यांचें रक्त इतक्या प्रमाणांत असल्यामुळे आम्ही श्रेष्ठ, आदि बाष्कळ कल्पना आता पुरे झाल्या ! त्यांतून, गुलामांनी आपल्या वंशावळीबद्दल उगीचच चोखंदळपणा दाखवावयाचा हें किती विचित्र वाटतें ! एक डोंब होता. तो म्हणायचा, "सगळ्या पृथ्वीभर हिंडलांत तरी आमच्यापेक्षा श्रेष्ठ जात तुम्हांला आढळायची नाही. समजलांत आम्ही कोण आहोंत ? आम्ही आहोंत डोऽऽम्ब !" यांतील एक गंमत सांगूं का ? एकंदर मानवजातींत ज्यांना निकृष्ट समजलें जातें तेच लोक बहुधा जातिभेदाचा अतिरेक करतात.

## जहाजांतील निरनिराळे वर्ग

सर्वसाधारणपणें शिडांच्या जहाजांपेक्षा आगबोटी खूपच मोठ्या असतात. अटलांटिक महासागरावर चालणाऱ्या आगबोटी आमच्या या "गोलकोंडा"* बोटीपेक्षा दीडपट तरी मोठ्या असतात. जपानहून ज्या बोटींत बसून मीं पॅसिफिक महासागर ओलांडला ती बोटहि फार मोठी होती. अशा ज्या मोठमोठ्या आगबोटी असतात त्यांच्या मध्यभागीं पहिल्या वर्गाच्या खोल्या असतात. त्यांच्या दोन्ही बाजूंस मोकळी जागा असते. नंतर असतात दुसऱ्या वर्गाच्या खोल्या. त्यांच्या दोन्ही बाजूंना सुकाणू विभाग असतो. एका टोकाला नावाड्यांच्या आणि नोकरांच्या खोल्या असतात. सुकाणू विभाग हा जणु तिसरा वर्ग असतो. ऑस्ट्रेलिया,

* बी. आय्. एस्. एन्. कंपनीची आगबोट. या आगबोटीने स्वामी विवेकानंद दुसऱ्यांदा पाश्चात्त्य देशांत गेले.

अमेरिका आदि देशांत राहावयास जाणारे फार गरीब लोक या तिसऱ्या वर्गाने प्रवास करतात. या लोकांसाठी ठेवलेली जागा फार लहान असते. त्यांना जेवणासाठी टेबलांची सोय नसते. त्यांच्या हातांतच भोजन दिलें जातें. इंग्लंड व भारत यांच्या दरम्यान ये-जा करणाऱ्या बोटींवर असा सुकाणू विभाग नसतो. पण डेकवर राहून प्रवास करणारे प्रवासी ते घेतात. पहिला वर्ग व दुसरा वर्ग यांच्या मधील जागेंत ते बसणें-झोपणें करतात. पण डेकवरून लांबचा प्रवास करणारा एकहि प्रवासी मला आढळला नाही. मात्र १८९३ साली मी जेंव्हा चीनमधे गेलों तेंव्हा मुंबईपासून हाँगकाँगपर्यंत डेकवरूनच जाणारे चिनी प्रवासी होते.

### 'गोलकोंडा' आगबोट

वादळी हवा सुरू झाली म्हणजे डेकवरील या प्रवाशांना फार हाल सोसावे लागतात. बंदरांत बोट थांबल्यावर जेंव्हा माल उतरविला जातो तेंव्हाहि त्यांना त्रास होतो. 'हरिकेन डेक' सर्वांत वर असतो. तो सोडला तर प्रत्येक डेकमधे एक चौकोनी भाग कापलेला असतो. त्यांतून माल उतरविला चढविला जातो. अशा वेळीं डेकवरील प्रवाशांना थोडा त्रास होतो. एरवी कलकत्ता ते सुएझ या प्रवासांत खुल्या डेकवर फार चांगलें वाटतें; आणि उन्हाळ्यांत तर युरोपमधे देखील डेकवर चांगलें वाटतें. पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या सुसज्जित खोल्यांतील लोक जेंव्हा अत्यधिक उष्णतेमुळे वितळूं लागतात तेंव्हा या खोल्यांच्या तुलनेने डेक म्हणजे स्वर्गासारखा वाटतो.* अशा बोटींतील दुसऱ्या वर्गाच्या खोल्या फार गैरसोयीच्या असतात. फक्त नवीन निघालेल्या जर्मन लॉइड कंपनीच्या, जर्मनींतील बर्जेनपासून ऑस्ट्रेलियापर्यंत चाल- णाऱ्या ज्या बोटी आहेत त्यांमधील दुसऱ्या वर्गांतील व्यवस्था

उत्कृष्ट असते. त्या बोटींत 'हरिकेन डेक' वरहि खोल्या असतात आणि भोजनव्यवस्था तर 'गोलकोंडा' बोटीच्या पहिल्या वर्गाच्या बरोबरीची असते. या बोटी जातां येतां कोलंबोला थांबतात.

'गोलकोंडा' बोटींत 'हरिकेन डेक' वर दोन्ही बाजू मिळून फक्त दोन खोल्या आहेत. एक आहे डॉक्टरसाठी व दुसरी आम्हांला मिळाली होती. पण उष्णतेच्या आधिक्यामुळे आम्हांला खालच्या मजल्याचा आश्रय घ्यावा लागला, कारण आमची ती खोली एंजिनच्या खोलीच्या अगदी डोक्यावर होती. बोट जरी लोखंडाची बनविलेली असली तरी उतारूंच्या राहण्याच्या खोल्या लाकडी आहेत. हवा मोकळी खेळावी म्हणून या खोल्यांच्या लाकडी भिंतींना वर आणि खाली बरींच भोकें ठेवलेलीं आहेत. खोल्यांच्या भिंतींना हस्तिदंतासारखा पांढरा चकचकीत रंग दिलेला आहे. रंगासाठी एका खोलीमागे सुमारे २५ पौंड खर्च केले आहेत. जमिनीवर लहानशी सतरंजी पसरलेली आहे. एका भिंतीवर, बिनपायाचे लोखंडी पलंग असावेत तशा दोन चौकटी एकावर एक ठोकल्या आहेत. समोरच्या भिंतीवरहि तशाच चौकटी बसविल्या आहेत. प्रवेशद्वारासमोरच हात धुण्याचें भांडें आहे. त्याच्यावर पिण्याच्या पाण्यासाठी दोन बाटल्या आणि दोन पेले ठेविले आहेत. प्रत्येक पलंगाच्या बाजूला पितळी चौकटीवर जाळी बसविली आहे. ही चौकट भिंतीलाहि चिकटवितां येते व खालीहि आणतां येते. झोपतेवेळीं उतारूने आपलें घड्याळ आदि आवश्यक व महत्त्वाच्या वस्तु त्या जाळींत ठेवायच्या असतात. खालच्या पलंगाखाली ट्रंका, थैल्या आदि ठेवण्यासाठी जागा असते. दुसऱ्या वर्गांतील व्यवस्था जवळजवळ अशीच असते. फरक येवढाच की तिथे जागा जरा कमी असते आणि फर्निचर हलक्या प्रतीचें असतें. नौकानयनाच्या धंद्यावर इंग्रजांचा

जवळजवळ एकाधिकारच आहे. त्यामुळे इतर राष्ट्रांनी बांधलेल्या बोटींत देखील भोजनव्यवस्था, वेळापत्रक आदि गोष्टी अधिक संख्येने प्रवास करणाऱ्या इंग्रज प्रवाशांना सोयीच्या व्हाव्यात अशा, म्हणजे इंग्रजी धर्तीच्याच असतात. आपल्या देशांत ज्याप्रमाणे बंगाल, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, गुजराथ आदि प्रांतांत जेवणाच्या वेळांत आणि पद्धतींत अंतर असतें त्याप्रमाणे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया येथील लोकांच्याहि जेवणाच्या पद्धतींत आणि वेळांत बरेंच अंतर असतें. पण बोटीवर या निरनिराळ्या पद्धतींची क्वचितच दखल घेतली जाते. बहुसंख्य प्रवासी इंग्रजी बोलणारे असतात, त्यामुळे सगळेंकांही इंग्रजी धर्तीवरच चालतें.

**बोटीवर काम करणारा नोकरवर्ग**

कप्तान हा बोटीवरचा सर्वोच्च अधिकारी असतो. पूर्वीच्या काळीं तर समुद्रावर असतांना कप्तानाला बोटीवर राजासारखे अधिकार असत. गुन्हेगारांना शिक्षा करणें, चांचेगिरी करणाऱ्यांना फाशी देणें आदि वाटेल ते अधिकार त्याला असत. आता अर्थात् ती गोष्ट राहिली नसली तरी अजून बोटीवर त्याचा शब्द म्हणजे कायदा अशी स्थिति असते. त्याच्या हाताखाली, आपल्याकडे ज्यांना 'मालिम' म्हणतात तसे चार अधिकारी असतात. त्यांच्या खाली इंजिनिअर म्हणजे यंत्रज्ञ असतात. ते चार किंवा पांच असतात. प्रमुख यंत्रज्ञाला अधिकाऱ्याचा दर्जा असतो. आणि त्याची भोजनव्यवस्था पहिल्या वर्गाप्रमाणे असते. त्यानंतर, सुकाणू धरणारे चारपांच लोक असतात. ते पाळीपाळीनें सुकाणू धरतात. हे देखील युरोपियनच असतात. बाकीचे, म्हणजे नोकर, खलाशी, कोळसा झोकणारे—हे सगळे भारतीय असतात आणि सगळे मुसलमान असतात. मुंबईकडील बाजूस फक्त मला पी. अॅन्ड ओ.

कंपनीच्या बोटीवर हिंदु खलाशी पाहावयास मिळाले. आमच्या बोटीवरचे नोकर आणि खलाशी कलकत्त्याचे आहेत, तर कोळसा झोकणारे पूर्वबंगालमधील आहेत. आमचे आचारी पूर्वबंगालमधील कॅथॉलिक ख्रिस्ती आहेत. याशिवाय चार भंगी आहेत; स्नानाची व्यवस्था, शौचकूपांची स्वच्छता, बोटींतील घाणेरडें पाणी उपसून बाहेर फेकणें वगैरे कामें ते करतात. मुसलमान नोकर आणि खलाशी ख्रिस्ती आचाऱ्याने शिजविलेलें अन्न खात नाहीत. बोटीवरच्या जेवणांत रोज डुकरांच्या तंगडीचें किंवा डुकराच्या खारावलेल्या मांसाचे कांही ना कांही पदार्थ असतात. पण बोटीवरील मुसलमान लोक आपली कांहीतरी वेगळी व्यवस्था करून घेतात. बोटीच्या भटारखान्यांत भाजलेल्या रोटया स्वीकारण्याला त्यांची कांहीच हरकत नसते. आणि सुधारणेचा 'नवा प्रकाश' प्राप्त झालेले कलकत्त्याहून आलेले नोकर तर खाण्यापिण्याचे बाबतींत कोणतींच बंधनें पाळीत नाहीत. त्या मंडळींसाठी तीन स्वयंपाकगृहें आहेत. एक नोकरांसाठी, दुसरें खलाशांसाठी आणि तिसरें कोळसे झोकणाऱ्यांसाठी. प्रत्येक स्वयंपाकगृहासाठी कंपनी एक आचारी आणि एक नोकर पुरविते.त्यांचीं निरनिराळीं स्वयंपाकगृहें असतात. कलकत्त्याहून कोलंबोला जाणारे कांही हिंदु प्रवासी होते. नोकर मंडळींचें आटोपल्यावर त्यांच्या स्वयंपाकगृहांत ते आपला स्वयंपाक करीत असत. नोकर आपलें पिण्याचें पाणी स्वतः भरतात. प्रत्येक मजल्यावर एका भिंतीला, एक एका बाजूला व दुसरी दुसऱ्या बाजूला, अशा दोन तोटया असतात. एक असते गोडया पाण्याची व दुसरी असते खाऱ्या पाण्याची. मुसलमान लोक याच तोटीचें गोडें पाणी वापरतात. या तोटयांचें पाणी जर हिंदूंनी चालवून घेतलें तर मग त्यांना बाकीचा खाण्यापिण्याच्या बाबतींतला

आपला आचारधर्म सांभाळूनहि इंग्लंडला किंवा दुसऱ्या कोणत्याहि देशाला या बोटींनी सहज जातां येईल. त्यांना स्वयंपाकगृह मिळूं शकेल. कोणीहि न स्पर्शिलेलें असें पिण्याचें व स्नानाचें पाणी मिळूं शकेल. बोटीवर तांदूळ, डाळ, भाजी, मासे, मांस, दूध, तूप आदि सर्व प्रकारचें अन्न मिळतें. विशेषत: ज्या बोटींवर भारतीय नोकर असतात त्यांवर तर जहाजकंपनीला तांदूळ, डाळ, मुळा, कोबी, बटाटे आदि पदार्थ रोज पुरवावेच लागतात. एकच गोष्ट जवळ पाहिजे. ती म्हणजे पैसा. पैसा गाठीला असला की सगळा आचारधर्म सांभाळूनहि वाटेल तेथे जातां येतें.

### बंगाली खलाशी

कलकत्त्याहून युरोपांत जाणाऱ्या सर्व बोटींवर आजकाल हे बंगाली नोकर असतात. हळूहळू त्यांचा एक निराळा वर्गच बनत चालला आहे. जहाजासंबंधीच्या अनेक संज्ञाहि त्यांनी तयार केल्या आहेत. उदाहरणार्थ कप्तानाला ते 'बाडीवाला' म्हणतात. अधिकाऱ्यांना ते 'मालिम' म्हणतात. डोलकाठीला 'डोल', शिडाला 'सड', खाली आणण्याला 'आरिया', वर चढविण्याला 'हबिस' असे शब्द त्यांनी रूढ केले आहेत.

खलाशांचा आणि कोळसे झोकणाऱ्यांचा एक एक प्रमुख असतो. या प्रमुखांना 'सारंग' म्हणतात. त्यांच्या हाताखाली दोन किंवा तीन 'तांडेल' असतात. त्यांच्या हाताखाली असतात साधारण खलाशी आणि कोळसे झोकणारे.

स्वयंपाकगृहांतील नोकरांना 'बॉय' म्हणून हाक मारतात. त्यांच्या प्रमुखाला 'बटलर' म्हणतात. त्यांच्यावर एक युरोपियन अधिकारी असतो; त्याला 'स्टुअर्ड' म्हणतात. बोट धुणें व स्वच्छ करणें; लंगरदोर फेकणें किंवा गुंडाळणें; लहान नावा सोडणें किंवा

उचलून घेणें; शिडें उभारणें किंवा गुंडाळणें ( आगबोटींवर हें शेवटचें काम क्वचितच करावें लागतें ); हीं सगळीं व यासारखीं इतर कामें खलाशांना करावीं लागतात. सारंग आणि तांडेल सारखे फिरत असतात. ते खलाशांच्या सगळ्या कामावर दृष्टि ठेवतात व आवश्यक तेथे त्यांना मदत करतात. कोळसे झोकणारे नोकर इंजिनांतील आग नेहमी ठीक ठेवतात. आगीशीं रात्रंदिवस सामना द्यायचा आणि एंजिन स्वच्छ व व्यवस्थित ठेवायचें ही कामगिरी त्यांच्याकडे असते. तें प्रचंड एंजिन त्याच्या सर्व अंगोपांगांसह स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवणें हें कांही सोपें काम नसतें. आमचा सारंग आणि त्याचा मदतनीस ( त्यांच्या भाषेंत बोलायचें तर त्याचा 'भाई' ) कलकत्त्याचे असून बंगाली बोलतात. ते चांगले सभ्य माणसासारखे दिसतात. शाळेंत गेलेले असल्यामुळे त्यांना लिहितांवाचतांहि येतें. कामचलाऊ इंग्रजीसुद्धा त्यांना बोलतां येतें. आमच्या सारंगाला एक तेरा वर्षांचा मुलगा आहे. तो कप्तानाकडे त्याचा 'ऑर्डरली' म्हणजे हरकाम्या पोरगा म्हणून नोकरीला आहे. खलाशी, कोळसा झोकणारे, नोकर आणि आचारी ही सगळी मंडळी बंगाली असल्याचें पाहून आपल्या प्रांताविषयी माझ्या मनांतील निराशा थोडी कमी होते. वाटतें, कसे हे लोक हळूहळू मर्दुमकीच्या मार्गावर अग्रेसर होत आहेत ! यांचीं शरीरें चांगलीं धष्टपुष्ट आहेत; त्यांची वृत्ति निर्भय आहे आणि तरीहि ते किती नम्र आहेत! 'नेटिव्हां'चें तें हांजी हांजी करणें, तें गोंडा घोळणें, या साऱ्याचा त्यांना गंध सुद्धा नाही; येथील भंग्यांनासुद्धा त्याचा गंध नाही. केवढें हें परिवर्तन !

**भारतीय खलाशी आणि गोरे खलाशी**

युरोपियन खलाशांच्या पावपट पगारांत भारतीय खलाशी

कांहीएक भुणभुण न करतां उत्तम काम करतात. यामुळे इंग्लंड-मधील अनेक लोकांत असंतोष उत्पन्न झाला आहे, कारण अनेक युरोपियन लोकांच्या पोटाला चिमटा बसूं लागला आहे. कित्येक वेळां ते आंदोलनहि सुरू करतात. त्यांना भारतीय खलाशांच्या विरुद्ध विशेष कांही बोलतां येत नाही, कारण भारतीय खलाशी युरोपियन खलाशांपेक्षा हुशार व चुणचुणीत असतात. एकच दोष ते काढतात. ते म्हणतात की, समुद्र भयंकर खवळला आणि जहाजाला धोका वाटूं लागला की या लोकांचें अवसान पार खचतें. राम राम ! कसला हा आरोप ! वास्तविक परिस्थिति पाहतां हा आरोप अगदी निराधार असल्याचें आढळतें. संकटकाळ येतांच युरोपियन खलाशी भीतीमुळे खूपखूप दारू ढोसून इतके बावळे होतात की कोणत्याहि कामाला ते निरुपयोगी ठरतात. उलट भारतीय खलाशी जन्मांत कधी दारूचा थेंबहि घेत नाहीत. आणि आतापर्यंतचा इतिहास पाहतां संकटाच्या काळांत त्यांच्यापैकी एकानेहि कधी भेकडपणा दाखविला नाही. रणक्षेत्रांत तरी भारतीय सैनिक कधी भीरुता दाखवितात काय ? नाही. मुळीच नाही. पण त्यांना चांगलें नेतृत्व मात्र लाभायला हवें. जनरल स्ट्रॅांग नांवाचे माझे एक इंग्रज मित्र ' शिपायांच्या बंडा 'च्या काळीं हिंदुस्थानांत होते. ते मला त्या काळच्या अनेक गोष्टी सांगत असत. एकदा गप्पागोष्टी चालूं असतां मीं त्यांना विचारलें, " शिपायांजवळ तोफा, दारूगोळा आदि सामुग्री भरपूर होती, ते चांगलें शिक्षण घेतलेले मुरब्बी शिपाई होते, असें असतां त्यांचा पूर्ण पराजय कां बरें झाला?" ते म्हणाले, " त्यांचे जे पुढारी होते ते पुढे येण्या-ऐवजी दूर एखाद्या सुरक्षित जागीं बसायचे आणि तेथून ओरडायचे, ' लढा, शूर शिपायांनो, लढा ! ' अधिकारी जोंपर्यंत पुढे होऊन

मृत्यूशीं झुंज घ्यायला उभा ठाकत नाही तोंपर्यंत त्याच्या हाताखालील शिपाई काय खरोखर लढूं शकतात?" प्रत्येक क्षेत्राला हेंच तत्त्व लागू आहे. 'शिरदार तो सरदार'--कोणत्याहि महत्कार्यासाठी जर तुम्ही आपल्या मस्तकाचें बलिदान करूं शकलां तरच तुम्हांला नेतृत्व प्राप्त होऊं शकेल. पण कोणतेंहि बलिदान न करतां आपल्याला नेतृत्व मिळावें असें सर्वांना वाटतें. त्याचा परिणाम होतो--शून्य. कोणीहि आपलें ऐकत नाही!

**भारतांतील उच्चवर्ण मृत आहेत, खालचे वर्णच जिवंत आहेत.**

अहो भारतांतील उच्च वर्णाच्या लोकांनो, तुम्ही खरोखर जिवंत आहांत काय? मारे आर्यांपर्यंत तुम्हीं आपली वंशावळ नेऊन भिडविलीत, प्राचीन भारताच्या वैभवाचे रात्रंदिवस पोवाडे गाइलेत, 'आम्ही अमुक कुळांत जन्म पावलों' असें म्हणून तुम्ही कितीहि ऐटीने मिरविलांत, तरी तेवढ्याने कांही तुमचा जिवंतपणा सिद्ध होत नाही. इजिप्तमधील लोकांचीं हजारो वर्षांपूर्वीचीं मसाला भरून ठेवलेलीं प्रेतें ('ममी') जशीं असतात ना, तशीं तुम्ही दहा हजार वर्षांपूर्वीचीं नुसतीं प्रेतें आहांत. भारतांत आज जर कोठे थोडीशी धुगधुगी आढळत असेल, तर ज्यांचा तुमच्या पूर्वजांनी 'चालतीं बोलतीं प्रेतें' म्हणून तिरस्कार केला त्यांच्याच ठायीं आढळते. आणि तुम्ही? तुम्ही खरीं खरीं 'चालतीं बोलतीं प्रेतें' आहांत. तुमचीं घरेंदारें, तुमच्या घरांतील सर्व साहित्य हीं सारीं इतकीं निर्जीव व जुनाट आहेत की तीं पुराणवस्तुसंग्रहालयांतील नमुनेच वाटतात. तुमच्या चालीरीती, तुमच्या रूढि, आजचें तुमचें एकंदर जीवन अगदी उघड्या डोळ्याने पाहणाऱ्यालाहि असें वाटतें की आपण जणु एखाद्या आजीबाईची गोष्ट ऐकतों आहोंत! तुमच्याशीं प्रत्यक्ष भेटून घरीं यावें तों कलाभवनांतील नुसतीं चित्रें पाहून

आल्यासारखें वाटतें ! अहो भारतांतील उच्चवर्णीयांनो ! या मायामय जगांत तुम्हीच खरोखर आभासमय आहांत, गूढ आहांत, वाळवंटांतील मृगजल आहांत! तुम्ही भूतकाळाचे प्रतिनिधि आहांत. भूतकाळांतील विविध प्रकारांचे तुम्ही नुसते प्रतिनिधि आहांत. तुम्ही वर्तमान काळीं डोळ्यांना दिसत आहांत असें जें वाटतें तें दुसरें तिसरें कांही नसून अजीर्णामुळे पडलेलें एक दुःस्वप्न आहे. भविष्याच्या दृष्टीने तुम्ही शून्य आहांत, भविष्यकाळीं तुम्हांला अस्तित्वच नाही. स्वप्नलोकांतील रहिवाशांनो, कशाला तुम्ही आता इथे अधिक रेंगाळत आहांत ? प्राचीन भारताच्या मृतशरीराच्या रक्तमांसहीन अस्थिपंजरांनो, तुम्ही आता ताबडतोब धुळीला मिळून हवेंत विलीन कां नाही होत ? एक गोष्ट मात्र खरी. अजून तुमच्या बोटांच्या हाडांवर, तुमच्या पूर्वजांनी सांभाळलेल्या हिऱ्यांच्या अमूल्य आंगठ्या झळकत आहेत. आणि तुमच्या सडलेल्या प्रेतांच्या मिठींत अनेक प्राचीन रत्नमंजूषा सुरक्षित आहेत. आपल्याजवळचा हा खजीना दुसऱ्याला देण्याची आतापर्यंत तुम्हांला संधिच मिळाली नव्हती. आता या इंग्रजी राज्यांत शिक्षणक्षेत्र सर्वांना खुलें झालें आहे, ज्ञानाचा मार्ग सर्वांना मोकळा झाला आहे. आता तुमचा तो खजीना अगदी झटपट आपल्या वारसदारांना देऊन टाका बघूं. तुम्ही आता शून्यांत विलीन होऊन जा आणि तुमच्या जागीं नवभारताचा उदय होऊं द्या. नांगर धरणाऱ्या शेतकऱ्यांच्या झोपडींतून नवा भारतवर्ष उभा होऊं द्या. कोळ्यांच्या, चांभारांच्या, भंग्यांच्या झोपड्यांतून नवा भारतवर्ष उभा होऊं द्या. किराणामालाच्या दुकानांतून आणि भडभुंज्यांच्या भट्टीजवळून तो वर येऊं द्या; कारखान्यांमधून, दुकानांतून आणि बाजारांतून तो वर येऊं द्या. झाडाझुडपांतून, रानावनांतून, दऱ्याखोऱ्यांतून, पहाडापर्वतांतून

तो प्रकट होऊं द्या. या सामान्य लोकांनी हजारो वर्षें दडपशाही सहन केली आहे, अगदी तोंडांतून ब्र न उच्चारतां सहन केली आहे. परिणामत: त्यांच्या ठायीं अद्‌भुत सहनशक्ति आढळते. चिरकाल ते दु:खांत राहिले आहेत. त्यामुळे त्यांच्या ठायीं दुर्दम्य जीवनशक्ति वसत आहे. मूठभर सत्तू खाऊन ते सगळ्या जगाला हलवूं शकतात. भाकरीचा चतकोर तुकडा मिळाला तरी त्रिभुवनांत मावणार नाही येवढी कार्यशक्ति ते प्रकट करतील, रक्तबीजा-सारखी * अक्षय प्राणशक्ति त्यांच्या ठायीं आहे. याशिवाय जगांत इतरत्र न आढळणारी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पवित्र आणि नीतिमान जीवन जगल्यामुळे प्राप्त होणारें अद्‌भुत सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. अशी शांत वृत्ति, असें समाधान, असें प्रेम, अबोल आणि अविरत कार्यमग्नता, आणि ज्या वेळीं कृति आवश्यक असेल त्या वेळीं सिंहसदृश सामर्थ्याचें प्रकटीकरण—हें सगळें तुम्हांला आणखी कोठे आढळणार आहे बरें? गतकालाच्या अस्थिकंकालांनो, हे पाहा तुमचे वारसदार तुमच्यासमोर उभे आहेत; भावी भारत-वर्ष तुमच्यासमोर उभा आहे. काढा तुमचीं तीं मणिरत्नभांडारें, काढा तुमच्या त्या हिरे जडविलेल्या आंगठ्या. जितक्या त्वरित हें सर्व तुम्ही त्यांना देऊं शकाल तितक्या त्वरित तें द्या आणि या जगांतून नाहीसे व्हा. केवळ तुमचे कान मात्र उघडे असूं द्या. तुम्ही अदृश्य होतां न होतां तोच नवभारताच्या जागृतीची पहिली ललकारी तुम्हांला ऐकूं येईल. सगळ्या जगाला दणाणून सोडीत लक्ष लक्ष कंठांतून ललकारी उठेल—" वाह गुरु की फतेह! "—गुरूचा जयजयकार असो !

* दुर्गासप्तशतींतील एक दैत्य. त्याचें रक्त सांडल्यावर त्या रक्ताच्या थेंबागणिक त्याच्यासारखे दैत्य निर्माण होत असत.

### बंगालचा उपसागर

आमची बोट आता बंगालच्या उपसागरांत आहे. बंगालचा उपसागर फार खोल आहे असें म्हणतात. जो कांही उथळ भाग होता त्या भागांत गंगेने हिमालयाचा चुरा आणून भरला आणि सगळा उत्तरप्रदेश धुऊन काढून ती माती त्या उथळ भागांत भरली. तो मूळचा उथळ भाग, आणि आता गाळ साठून समतल बनलेला प्रदेश म्हणजेच आपला बंगाल प्रांत होय. सुंदरबनाच्या पलीकडे बंगाल आणखी वाढण्याची कांही लक्षणें दिसत नाहीत. कांही विद्वान म्हणतात की सुंदरबन हा पूर्वी बराच उंच प्रदेश होता. त्यावर अनेक गावें व शहरें वसत होतीं. पण अनेकांना आता हें मत संमत नाही. कसेंहि असलें तरी सुंदरबनांत आणि बंगालच्या उपसागराच्या उत्तरभागांत अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत येवढें मात्र खरें. पोर्तुगीज चांच्यांचीं हीं राहण्याचीं ठिकाणें असत. आराकानच्या राजाने हा प्रदेश आपल्या कबज्यांत आणण्याचे वारंवार प्रयत्न केले. मोगल बादशहाच्या सुभेदाराने, गोन्झालेसच्या नायकत्वाखाली काम करणाऱ्या पोर्तुगीज चांच्यांना शिक्षा देण्याचा येथेच पराकाष्ठेचा प्रयत्न केला. ख्रिस्ती, मोगल, मग आणि बंगाली यांचीं अनेकवार येथेच युद्धें झालीं.

बंगालचा उपसागर नेहमीच जरा खवळलेला असतो, त्यांत आणखी हे पावसाळ्याचे दिवस. त्यामुळे आमची बोट खूपच हेलकावे खात आहे. पण हा म्हणे नुसता प्रारंभ आहे. आम्ही मद्रासला चाललों आहोंत, तेव्हा यानंतर आणखी काय होणार आहे कोण जाणे! दक्षिण भारताचा अधिकांश भाग आता मद्रास प्रांतांत मोडतो. नुसता मोठा भूप्रदेश असून काय उपयोग? भाग्यवान मालकाच्या हातीं एखाद्या वालुकामय प्रदेशाचाहि स्वर्ग

बनतो. एकेकाळीं मद्रास हें एक लहानसें अप्रसिद्ध खेडें होतें. त्या वेळीं त्याला चिन्नापट्टनम् किंवा मद्रासपट्टनम् म्हणत असत. चंद्रगिरीच्या राजाने तें एका व्यापारी मंडळीला विकलें. त्या काळीं इंग्रजांचा व्यापार मुख्यत: जावामधे चालत असे. त्या वेळीं इंग्रजांच्या आशियांतील व्यापाराचें केंद्र बंटम हें शहर होतें. इंग्रजांची मद्रास येथील वखार आणि हिंदुस्थानांतील त्यांच्या अन्य ठिकाणच्या वखारी बंटमच्या आधिपत्याखाली होत्या. आता तें बंटम कुठे आहे ? आणि त्या लहानशा मद्रासने आता केवढी प्रगति केली आहे ! प्रयत्नशील माणसाला दैव साथ देतें हें कांही पूर्ण सत्य नव्हे. त्या जगन्मातेची शक्ति पाठीशीं असल्याशिवाय सगळें व्यर्थ आहे. परंतु हें मी कबूल करतों की प्रयत्नशील माणसालाच जगन्माता बल पुरविते.

### दक्षिणेंतील चालीरीती

मद्रास म्हटलें की खास दक्षिणेकडील प्रांत डोळ्यासमोर उभा राहतो. तसें म्हटलें तर आपल्या कलकत्त्याच्या जगन्नाथ घाटावरहि ओरिसा प्रांतांतील ब्राह्मणांच्या रूपांत दाक्षिणात्यांचा नमुना पाहायला मिळतो. डोक्याचें मुंडन करून मध्यभागीं घेरेदार शेंड्यांचे झुपके लोंबत आहेत; कपाळावर भस्माचे आणि गंधाचे निरनिराळ्या रंगांचे पट्टे शोभत आहेत; जेमतेम बोटें आंत जातील अशा उलट्या सोंडेच्या सपाता पायांत घातल्या आहेत; नाक तपकिरीने बरबटलें आहे; बरोबर असलेल्या लहान मुलांच्या अंगावर जागोजागीं गंधाचे ठसे उमटविले आहेत--असा त्यांचा थाट असतो. गुजराथी ब्राह्मण, काळेकुळकुळीत महाराष्ट्रीय देशस्थ ब्राह्मण, अत्यंत गोरे, मांजरी डोळ्यांचे व चौकोनी डोक्याचे कोकणस्थ ब्राह्मण--या सगळ्यांची वेषभूषा जरी सारखी असली

आणि हे सगळे जरी दाक्षिणात्य म्हणून ओळखले जात असले तरी दाक्षिणात्यांचा खास नमुना मद्रासलाच आढळतो. त्यांच्या कपाळावर रामानुज पंथाची भलीमोठी मुद्रा असते. ज्याला माहीत नसतें त्याला ही मुद्रा सुंदर न दिसतां विचित्रच वाटते. (याचेंच अनुकरण रामानंदी पंथाच्या लोकांनी केलें आहे. या रामानंदी मुद्रांविषयी अनेक गमतीदार कविताहि रचण्यांत आल्या आहेत. आपल्या बंगालमधील वैष्णव संप्रदायाचे नेते आपलें सारें अंग मुद्रांनी चित्रविचित्र करून घेतात, पण रामानुजी मुद्रांपुढे या मुद्रा म्हणजे कांहीच नव्हत.) आणि त्या तेलगू, तामिळ आणि मल्याळी भाषा! सहा सहा वर्षे जरी तुम्हीं सतत ऐकल्यांत तरी एक अक्षर कळायला नको. 'य' आणि 'ड' यांच्या उच्चारणाच्या जितक्या म्हणून छटा असूं शकतील तितक्या त्या भाषेंत आहेत. मिरीं घातलेल्या वरणाशीं त्यांचें तें सपासप भात खाणें! तें त्यांचें वरण इतकें तिखट आणि इतकें आंबट असतें की नुसता एक घास खाल्ल्याबरोबर हृदयाचा थरकांप उडतो. सर्वच पदार्थांत ते कढीनिंब घालतात. मुगाच्या आणि चण्याच्या डाळीचेहि ते अनेक पदार्थ करतात. दहीभातहि त्यांना फार आवडतो. एरंडीच्या तेलाने खूप शरीरमर्दन करून मग ते स्नान करतात. आणि त्याच तेलांत ते मासेहि तळतात. या सगळ्या गोष्टींशिवाय दक्षिण देशाचें चित्रच पूर्ण होणें शक्य नाही.

### धार्मिक क्षेत्रांत दक्षिणात्यांची महत्त्वाची कामगिरी

या दक्षिणेकडील प्रदेशाने एक महत्त्वाची कामगिरी केली आहे. मुसलमानी अमलांत आणि त्याच्या आधीहि त्यानेच हिंदुधर्म जिवंत ठेवला. शंकराचार्य दक्षिणेंतच जन्मले. ज्या जातीचे लोक डोक्याच्या पुढच्या भागावर शेंडी ठेवतात आणि भोजनांत

खोबऱ्याच्या तेलाचा वापर करतात त्या जातींत शंकराचार्य जन्मले. याच प्रदेशाने रामानुजांना जन्म दिला आणि मध्वमुनींचीहि जन्मभूमि हीच आहे. आजचा हिंदुधर्म या तीन महापुरुषांचाच ऋणी आहे. चैतन्य महाप्रभूंचा वैष्णव पंथ म्हणजे मध्वाचार्यांच्या पंथाचीच एक शाखा आहे. उत्तरेंतील कबीर, दादू, नानक, रामसनेही आदि धर्मसुधारक म्हणजे शंकराचार्यांचे प्रतिध्वनिच होत. रामानुजांची शिष्यशाखा उत्तरेंतील अयोध्या आदि नगरांत आजहि आढळते. दक्षिणेंतील हे ब्राह्मण उत्तरेंतील ब्राह्मणांना खरे ब्राह्मण समजत नाहीत, आणि शिष्य म्हणून त्यांचा स्वीकारहि करीत नाहीत. आत्ता परवापरवापर्यंत ते त्यांना संन्यास द्यायलाहि तयार नसत. आज देखील मुख्य मुख्य धार्मिक स्थानें मद्रासी लोकांच्या हातीं आहेत. उत्तरेंत जेव्हा मुसलमानांनी 'अल्लाहो अकबर' आणि 'दीन दीन'ची आरोळी ठोकली तेव्हा तिकडील सगळे हिंदु आपलीं घरेंदारें, देवदेवता, बायकापोरें, मुलीबाळी, धनद्रव्य सोडून रानावनांत लपून बसले. पण त्याच वेळीं दक्षिणेंत विद्यानगरचें स्वतंत्र राज्य दृढपणें प्रतिष्ठित झालें होतें. अद्भुत बुद्धिमत्तेचे ते सायणाचार्य दक्षिणेंतच अवतरले. त्यांच्या पराक्रमी बाहूंनी मुसलमानांचा पराभव करून बुक्क राजाचें आसन दृढ केलें. त्यांच्या चतुर मार्गदर्शनामुळे विद्यानगर साम्राज्याला स्थैर्य प्राप्त झालें. त्यांच्या राजनीतीमुळे दक्षिणेंत चिरकाल शांतता नांदली आणि उन्नति झाली. दैवी प्रतिभेच्या आणि असामान्य उद्योगशीलतेच्या बळावर त्यांनी सगळ्या वेदांवर भाष्यें लिहिलीं. त्यांच्या त्याग-वैराग्याचा आणि संशोधनाचा परिपाक आपल्याला त्यांच्या 'पंचदशी' नामक वेदान्तप्रबंधांत दिसून येतो. अशा त्या संन्यासी विद्यारण्य मुनींचा किंवा सायणाचार्यांचा* जन्म याच भूमींत

* कित्येकांच्या मतें वेदभाष्यकार सायणाचार्य हे विद्यारण्य मुनीचे बंधु होते.

झाला. मद्रास प्रांत हा तामिळ वंशाचें मूळ वसतिस्थान आहे. या तामिळ लोकांची सभ्यता अति प्राचीन आहे. सुमेरियन नामक त्यांच्या शाखेने फार प्राचीन काळीं युफ्रेटिस नदीच्या किनाऱ्यावर सभ्यतेचा विस्तार केला. तामिळ लोकांची ज्योतिषविद्या, त्यांच्या धर्मकथा, त्यांचीं नीतितत्त्वें आणि त्यांचें कर्मकांड इत्यादींच्या पायावरच पुढे अॅसीरियन आणि बाबिलोनियन सभ्यतेची उभारणी झाली. तामिळ लोकांच्या पुराणांतूनच ख्रिस्त्यांच्या बायबलचा उगम झाला. या तामिळ वंशाची दुसरी शाखा मलबार किनाऱ्यावरून पुढे गेली आणि तिने इजिप्तमधील अद्‌भुत सभ्यता उदयाला आणली. आर्य लोक सुद्धा अनेक बाबतींत तामिळ वंशाचे ऋणी आहेत. दक्षिणेंतील त्यांचीं उत्तुंग मंदिरें त्यांच्या वीरशैव आणि वीरवैष्णव पंथांच्या विजयाच्या कथा सांगत आहेत. भारतांत सर्वत्र प्रसृत असलेल्या महान् वैष्णव धर्माची निर्मिति देखील खालच्या जातींतील षट्‌कोप नामक एका तामिळ व्यक्तीने केली आहे. षट्‌कोप हे सुपें विकण्याचा धंदा करीत असले तरी ते एक मोठे योगी होते. आणि तामिळ अलवार संत तर आजहि सर्व वैष्णव सांप्रदायिकांस अतिशय आदरणीय वाटतात. आजहि वेदान्ताच्या द्वैत, अद्वैत आणि विशिष्टाद्वैत या मतांचा अभ्यास जितका दक्षिण भारतांत होतो तितका तो अन्यत्र कोठेहि होत नाही. आज देखील इतर प्रदेशांपेक्षा येथील लोकांची धर्मपिपासा अधिक आहे.

### मद्रास बंदर आणि मित्रांनी केलेलें स्वागत

दिनांक २४ जूनला रात्रीं आमची बोट मद्रासला पोहोचली. सकाळीं उठून पाहिलें तेव्हा मद्रास बंदरांतील चहूबाजूंनी घेरलेल्या एका जागेंत आम्ही असल्याचें आढळलें. बंदराच्या आंतील भागांत समुद्राचें पाणी अगदी शांत होतें. पण बाहेर उत्तुंग लाटा गर्जत

होत्या. मधूनमधून त्या लाटा बंदराच्या भिंतीला धडक देऊन पंधरावीस फूट उंच उसळत. त्या वेळीं जिकडेतिकडे फेसच फेस दिसूं लागे. समोरच मद्रासचा सुप्रसिद्ध स्ट्रॅन्ड रोड दिसत होता. दोन युरोपियन पोलीस इन्स्पेक्टर, एक मद्रासी जमादार आणि बारा शिपाई बोटीवर आले आणि मला मोठ्या नम्रतेने म्हणाले, "युरोपियन लोकांना जरी किनाऱ्यावर जाण्याची परवानगी असली तरी 'नेटिव्हां'ना मात्र ती नाही." 'नेटिव्ह' कोणीहि का असेना त्याच्या सगळ्या सवयी घाणेरड्याच असणार आणि तो प्लेगचे जंतु इकडून तिकडे नेणारच. परंतु माझ्यासाठी मद्रासच्या मंडळींनी खास परवानगी मिळण्यासाठी विनंती केली होती व ती मिळेल अशी त्यांना आशा होती. हळूहळू आपले मद्रासचे मित्र लहान लहान नावांत बसून आमच्या बोटीजवळ जमूं लागले. कोणत्याहि प्रकारचा स्पर्श नियमबाह्य होता. त्यामुळे मधे अंतर ठेवून आम्ही आमच्या बोटीवरून व ते त्यांच्या नावांवरून, असे बोलत होतों. माझे सगळे मित्र तेथे आले होते--आलासिंगा, बिलिगिरी, नरसिंहाचारी, डॉ. नानुजुन्दाराव, किडी व आणखीहि इतर मित्र खाली नावेंत होते. टोपल्या भरभरून, आंबे, केळीं, नारळ, दहीभात आणि मिठाईचे व खाऱ्या पदार्थांचे ढीगच्या ढीग आंत येऊं लागले. हळूहळू गर्दी वाढूं लागली. स्त्रिया, पुरुष, लहान मुलें--सर्वच जमले. जिकडे तिकडे नावाच नावा दिसूं लागल्या. मद्रासला बॅरिस्टर म्हणून प्रॅक्टिस करायला आलेले माझे इंग्रज मित्र श्री. शॅमिअर सुद्धा मला तेथे दिसले. रामकृष्णानंद आणि निर्भयानंद यांनी आपली नाव पुनःपुनः आमच्या बोटीजवळ आणली. सगळ्या दिवसभर, कडक उन्हांत, तेथे नावेंतच थांबण्याचा त्यांनी हट्ट धरला. त्यांच्यावर जेव्हां मी रागावलों

तेव्हा त्यांनी ती कल्पना सोडली. मला किनाऱ्यावर उतरण्याची परवानगी नाकारण्यांत आल्याचें जेव्हा शहरांत सगळ्यांना कळलें तेव्हा नावांची गर्दी आणखीच वाढूं लागली. बराच वेळ कठड्या-वर वाकून उभें राहिल्यामुळे मलाहि थकल्यासारखें वाटूं लागलें. मग मीं माझ्या सगळ्या मद्रासी मित्रांना निरोप दिला आणि माझ्या खोलींत परत आलों. 'ब्रह्मवादिन्'विषयी आणि मद्रास येथील कार्याविषयी माझ्याशीं विचारविनिमय करायला आलासिंगाला मुळीच संधि मिळाली नाही. त्यामुळे त्याने मजबरोबर कोलंबोला येण्याचें ठरविलें. संध्याकाळीं आमच्या बोटीने मद्रास बंदर सोडलें. त्या वेळीं बाहेर मोठा कोलाहल चालल्याचें मला ऐकूं आलें म्हणून मीं माझ्या खोलीच्या खिडकींतून डोकावून पाहिलें तों बंदराच्या भिंतीवर स्त्रिया, पुरुष, मुलें मिळून एक हजार लोक बसल्याचें मला दिसलें. बोट सुटतांच त्यांनी निरोपाची आरोळी दिली. आनंदाच्या प्रसंगीं मद्रासी लोकसुद्धा बंगाली लोकांप्रमाणेच 'हुलू' ध्वनि करतात.

### हिंदी महासागर

मद्रासहून सिलोनला पोहोचायला आम्हांला चार दिवस लागले. गंगेचें मुख सोडल्यापासून ज्या मोठमोठ्या लाटा उसळत होत्या त्या वाढतच गेल्या आणि मद्रास सोडल्यावर त्या आणखीनच वाढल्या. बोट खूपच डोलूं लागली आणि प्रवाशांना बोट लागणें जोरांत सुरू झालें. आमच्याबरोबरच्या त्या दोन बंगाली मुलांची तीच गत झाली. एक तर म्हणत होता की 'मी आता नक्कीच मरणार.' आम्हांला मोठ्या प्रयासाने त्याला शांत करतां आलें. आम्हीं त्याला समजावून सांगितलें, "बाबारे, यांत भिण्यासारखें कांहीच नाही. सर्वांनाच हा अनुभव येतो. बोट लागून कोणीहि

आजवर मेलेला नाही." दुसऱ्या वर्गाच्या खोल्या बोटीच्या पंख्यांच्या वर होत्या. त्यांतून ते दोन बंगाली युवक होते 'नेटिव्ह'. त्यामुळे त्यांची खोली म्हणजे अंधारकोठडीसारखीच होती. उजेड किंवा हवा यायला त्या खोलींत मुळीच जागा नव्हती. त्यामुळे त्यांना खोलींत राहतां येत नव्हतें आणि इकडे डेकवर बोटीचें डचमळणें खूपच तीव्रतेने भासत होतें. त्यांतून बोटीचा पुढचा भाग जेव्हा लाटांच्या पोकळींत शिरून वाट काढायचा तेव्हा मागला भाग खाली गाडल्यासारखा व्हायचा व पंखा चक्क पाण्याबाहेर येऊन हवेंत गिरक्या घ्यायचा. त्यामुळे सगळ्या बोटीला भयंकर हादरे बसायचे. आणि मग त्या पंख्यावर असलेल्या दुसऱ्या वर्गाच्या खोल्यांची स्थिति काय वर्णावी ? मांजराने उंदराला धरल्यावर तें जसें त्याला इकडून तिकडे झटके देतें तशा त्या खोल्या हालत होत्या.

### बोटींतील एक मद्रासी प्रवासी

हे होते पावसाळी दिवस. बोट जसजशी पश्चिमेकडे जाणार तसतसें वादळी वाऱ्याला अधिकाधिक तोंड द्यावें लागणार हें निश्चितच होतें. मद्रासच्या मंडळींनी खूप फळें दिलीं होतीं.त्यांचा अधिकांश मीं त्या मुलांना दिला. मिठाई, दहीभात इत्यादीहि दिलें. आलासिंगाने घाईघाईने तिकिट काढलें होतें आणि तो अनवाणीच बोटीवर चढला होता. त्याने सांगितलें की 'मी पादत्राणें कधीमधीच वापरतों.' निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या रीतीभाती असतात. युरोपांत स्त्रियांनी आपले पाय उघडे टाकणें म्हणजे केवढा लज्जेचा विषय ! पण तेंच गळा आणि खांदे उघडे ठेवण्यांत त्यांना कांहीच संकोच वाटत नाही. आपल्याकडे डोकें हें नीट झाकलेलें असलेंच पाहिजे, मग इतर शरीर भलेंहि झाकलेलें असो वा नसो.

'ब्रह्मवादिन्'चा संपादक आलासिंगा हा रामानुज पंथाचा म्हैसुरी ब्राह्मण आहे. 'रसम्'* हा त्याचा फार आवडता पदार्थ आहे. आलासिंगानें मुंडन केलेलें आहे.त्याच्या सगळ्या कपाळावर 'तेंगल' संप्रदायाच्या मुद्रा आहेत. आपल्या प्रवासांतील शिदोरी त्याने आपल्याबरोबर खूप काळजी घेऊन आणली आहे. तीं त्याचीं दोन लहान पुडकीं. एकांत आहेत पोहे आणि दुसऱ्यांत आहेत मुरमुरे-फुटाणे. आपली जात जाऊं नये म्हणून सिलोनपर्यंतच्या प्रवासांत हाच आहार ठेवण्याचा त्याचा विचार आहे. यापूर्वीहि आलासिंगा एकदा सिलोनला गेला होता. त्या वेळीं त्याच्या जातिबांधवांनी त्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यांत त्यांना यश आलें नव्हतें. हिंदूंच्या जातिव्यवस्थेंतील हा एक गुण आहे. एखाद्या माणसाच्या जातीच्या लोकांनी जर त्याच्या वागणुकीबद्दल हरकत घेतली नसेल तर मग इतर कोणालाहि त्याच्या विरुद्ध कांहीएक बोलण्याचा अधिकार नसतो. आणि दक्षिण हिंदुस्थानांतील जातीं-संबंधी सांगावयाचें झाल्यास कांही जाती तर इतक्या लहान आहेत की कुणांत हजार व्यक्ति असतील तर कुणांत सातशे, तर कुणांत पांचशेच! इतकें सीमित क्षेत्र असल्यामुळे कित्येक वेळां वधू मिळणें कठीण जातें, त्यामुळे कधीकधी बहिणीच्या मुलीशीं लग्न करतात! म्हैसूरला आगगाडी पहिल्याप्रथम सुरू झाली तेव्हाची गोष्ट. दूरच्या ठिकाणाहून जे ब्राह्मण आगगाडी पाहायला गेले त्यांना सुद्धा म्हणे जातिबहिष्कृत करण्यांत आलें! तें कसेंहि असलें तरी आपल्या ह्या आलासिंगासारखीं माणसें या जगांत क्वचितच भेटतात येवढें खरें. किती निःस्वार्थ, किती कष्टाळू आणि किती गुरुभक्त! या अवनीतलावर इतका आज्ञाधारक शिष्य क्वचितच

* खूप तिखट आणि खूप चिंच घातलेलें फोडणीचें पातळ वरण

लाभेल असें मला वाटतें. जन्माने मद्रासी, मुंडन केलेलें व मध्यभागीं घेरेदार शेंडीचा झुपका; धोतर नेसलेला, पायांत कांही नाही आणि पहिल्या वर्गांतून प्रवास! मधून मधून तो डेकवर हिंडायचा आणि भूक लागली की मुरमुरे व फुटाणे खायचा. बोटीवर मद्रासी दिसला की तो चेट्टी म्हणजे व्यापारीच असला पाहिजे असा बोटीवरील नोकरांचा समज आहे. त्यांचें म्हणणें असें की हे लोक खूप पैसा बाळगून असतात, पण आपल्या कपड्यांसाठी किंवा भोजनासाठी ते थोडाहि खर्च करणार नाहीत! परंतु या नोकरांचें असें मत झालें आहे की हा पवित्र ब्राह्मण आलासिंगा आमच्याबरोबर राहून अशुद्ध झाला. आणि तें खरेंहि आहे; कारण, आपल्या संगतींत मद्रासी लोकांची कडक जातिनिष्ठा बरीच ढिली होते.

### सिलोनमधील रीतीभाती

आलासिंगाला बोट लागली नाही. बंधु तुरीयानंद यांना सुरवातीला थोडासा त्रास झाला. पण आता ते ठीक आहेत. म्हणून विविध विषयांवरील सुखद संभाषणांत आणि गप्पांत चार दिवस सहज निघून गेले. तें पाहा, समोर कोलंबो दिसत आहे. सिंहलद्वीप आलें. लंका आली. श्रीरामचंद्रांनी सेतु बांधून समुद्र ओलांडला आणि लंकेचा राजा रावण याला जिंकलें. मीं तो सेतु पाहिला आहे आणि रामनदच्या सेतुपति महाराजांच्या राजवाड्यांतील ती शिलाहि मीं पाहिली आहे. विद्यमान महाराजांच्या पूर्वजांना प्रथम सेतुपति म्हणून त्या शिलेवर प्रभु रामचंद्रांनी बसविलें होतें. पण आजकालचे बौद्धधर्मी सिलोनी लोक कांही हें मान्य करणार नाहीत. ते म्हणतात की आमच्या देशांत तर ही घटना सांगणारी एखादी दंतकथादेखील आढळत नाही. पण त्यांच्या नाही म्हणण्याने

काय होतें? आमच्या प्राचीन ग्रंथांचें प्रमाण काय कमी आहे? ते आपल्या देशाला 'सिंहल' म्हणतात, 'लंका'*म्हणत नाहीत. कसें बरें ते म्हणतील? त्यांच्या बोलण्यांत, वागण्यांत, स्वभावांत, चेहऱ्यामोहऱ्यांत झणझणीतपणा कसा तो मुळी नाहीच! ते लोक लांब लांब झगे वापरतात. केसांच्या वेण्या घालतात आणि वेणींत एक मोठी फणी खोचून ठेवतात. सगळ्यांचे चेहरेमोहरे अगदी बायकी थाटाचे; त्यांचीं शरीरेंहि तशींच——सडपातळ, ठेंगणीं आणि कोमल. आणि हे म्हणे रावणाचे आणि कुंभकर्णाचे वंशज! कोण यावर विश्वास ठेवील? हे लोक बंगाल प्रांतांतून येथे आल्याचें सांगतात. आणि त्यांनी केलें तें बरेंच केलें! आपल्या बंगालमधे आजकाल नव्या नमुन्याचीं माणसें अशींच नाहीत का दिसत? त्यांची ती बायकी वेषभूषा, त्यांचें तें हळूच कोमल बोलणें, त्यांचें तें भित्र्या भागूबाईसारखें दबकत चालणें, त्यांचें तें कोणाच्या नजरेला नजर भिडवितां न येणें, त्यांचें तें जन्मल्यापासून प्रेमगीतें लिहायला प्रारंभ करणें आणि प्रेयसीच्या विरहव्यथेने पीडित होऊन सदा उसासे सोडणें!——हे लोकहि सिलोनमधे का नाही राहायला जात? तिथे त्यांना आपले अनेक जातिबांधव भेटतील! आणि आमचें सरकार काय झोप घेत आहे? परवा त्यांनी कांही लोक पकडण्यासाठी पुरी येथे खूपच गोंधळ घातला म्हणे. त्यांना म्हणावें इकडे तिकडे कशाला पाहतां? खुद्द राजधानींतच असे कितीतरी लोक आहेत की ज्यांना खुशाल पकडावें आणि बाहेर पाठवून द्यावें.

### सिंहलद्वीपाचा इतिहास

प्राचीन काळची गोष्ट. बंगालमधे विजयसिंह नांवाचा एक

* बंगालींत 'लंका' म्हणजे मिरची असाहि अर्थ होतो.

महादुष्ट राजपुत्र होता. तो आपल्या बापाशीं भांडला. पुढे आपल्यासारखेच कांही लोक जमवून तो एका जहाजावर चढला आणि ह्या सिलोन बेटावर येऊन पोहोचला. त्या वेळीं येथे जंगली टोळ्या राहत असत. त्यांचे वंशज आज 'बेदोयू' म्हणून ओळखले जातात. त्या रानटी लोकांच्या राजाने विजयसिंहाचें मोठ्या प्रेमाने स्वागत केलें आणि आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें. कांही काळ विजयसिंह तेथे शांततेने राहिला. पुढे एके रात्रीं, त्याने आपल्या बायकोशीं संगनमत करून कांही लोक जमवून एकाएकी त्या राजावर हल्ला केला आणि त्याला त्याच्या सरदारांसह ठार मारलें. मग विजयसिंह सिलोनच्या सिंहासनावर बसला. पण त्याचा दुष्टपणा कांही येथेच थांबला नाही. कांही काळाने तो आपल्या त्या रानटी राणीला कंटाळला. तेव्हा त्याने भारतांतून आणखी मुली बोलाविल्या. कांही माणसेंहि बोलाविलीं. आपल्या त्या रानटी राणीला टाकून देऊन त्याने अनुराधा नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. मग तो त्या जातीला नामशेष करण्याच्या मागे लागला. ते लोक जवळजवळ सगळे ठार झाले. कांही थोडे उरले ते रानावनांत पळाले. त्यांचे वंशज आजहि आपल्याला तिकडील रानांवनांत आढळतात. अशा प्रकारें लंकेचें नांव 'सिंहल' पडलें आणि हें बेट सुरवातीला बंगाली गुंडांची एक वसाहत बनलें !

### सिंहलद्वीपांत बौद्धधर्माचा प्रचार

पुढे कांही काळानंतर सम्राट अशोकाचा राज्यकाल आला. अशोकाचा मुलगा महिन्द आणि मुलगी संघमित्ता यांनी संन्यासदीक्षा घेतली आणि ते दोघेहि धर्मप्रचारार्थ सिलोन बेटांत आले. तेव्हा त्यांना असें आढळलें की सिलोनमधील सगळे लोक रानटी बनले आहेत. त्यांनी आपलें सर्व आयुष्य त्या लोकांना सुधारण्या-

साठी समर्पित केलें आणि त्यांना शक्य तितकें सभ्य बनविलें. त्यांनी लंकेंतील लोकांसाठी उत्तम नीतिनियम बनविले आणि त्यांना बौद्ध धर्मांत आणलें. लवकरच सिलोनी लोक कट्टर बौद्ध बनले. त्यांनी त्या बेटाच्या मध्यभागीं अनुराधापुरम् नांवाचें मोठें नगर वसविलें. आज देखील त्या नगराचे अवशेष पाहत असतां मनुष्य स्तंभित होऊन जातो. अजूनहि तेथे मोठमोठे स्तूप आहेत. ढासळलेल्या दगडी इमारतींच्या खुणा मैलच्या मैल लांब पसरलेल्या आहेत. त्या नगराच्या बऱ्याचशा भागांत पुढे रान माजलें; तें अजूनहि तसेंच आहे. ज्यांनी मुंडन केलें आहे, ज्यांच्या हातांत भिक्षापात्रें आहेत आणि अंगावर ज्यांनी पीतवस्त्रें परिधान केलीं आहेत असे बौद्ध भिक्षु व भिक्षुणी सिलोनमधे जिकडेतिकडे पसरले. जागोजागीं प्रचंड देवळें बांधण्यांत आलीं. त्यांत बुद्धांच्या विविध अवस्थांतील सुंदर मूर्ति शोभूं लागल्या. कोठे गौतमबुद्ध ध्यानस्थ बसले आहेत, कोठें उपदेश देत आहेत, तर कोठें कुशीवर पहुडलेले असून निर्वाणांत प्रवेश करीत आहेत. त्या देवळांच्या आंतील भिंतींवर सिलोनी लोकांनी जीं चित्रें काढलीं आहेत तीं मात्र बौद्धधर्माची कुचेष्टाच वाटते. त्या भिंतींवर त्यांनी नरकयातनांची कल्पना चित्रित केली आहे. कोणाला पिशाच्चें झोडपत आहेत, कोणाला करवतीनें कापलें जात आहे, कोणाला सांडसाने डागण्यांत येत आहे, कोणाला उकळत्या तेलांत टाकलें आहे, कोणाच्या अंगाची कातडी सोलली जात आहे---अशीं तीं सगळीं अतिशय बीभत्स दृश्यें आहेत. 'अहिंसा परमो धर्मः'ची शिकवण देणाऱ्या धर्मात अशा गोष्टींना वाव असेल असें कोणाला बरें वाटेल? पण चीनमधेहि हेंच आहे आणि जपानमधेहि हेंच आढळतें. एकीकडे अहिंसेचें तत्त्व शिकवितात, तर दुसरीकडे अशा भयंकर शिक्षांचें प्रदर्शन की जें पाहतांच

माणसाचें रक्त गोठावें ! एकदा अशाच एका 'अहिंसा परमो धर्मः'-वाल्याच्या घरांत चोर शिरला. घरमालकाच्या मुलांनी त्याला पकडलें आणि खूप चोपायाला सुरवात केली. घरमालक वरच्या मजल्यावर होता. त्याने तो आरडाओरडा ऐकला, तेव्हा सज्ज्यांत येऊन, कसली गडबड आहे म्हणून त्याने विचारलें. मुलांनी जेव्हा त्याला सगळी हकीकत सांगितली तेव्हा ती ऐकून तो म्हणाला, "थांबवा तें मारणें ! पोरांनो, काय करतां तुम्ही हें, त्याला मारूं नका. अहिंसा परमो धर्मः." अहिंसावाल्याच्या मुलांनी मारणें थांबवून विचारलें, "या चोराचें आता काय करायचें ?" घरमालकाने आज्ञा दिली "त्याला पोत्यांत घालून नदींत टाकून द्या." घरमालकाच्या हृदयांतील ती मानवता पाहून चोर गहिवरला. हात जोडून तो म्हणाला, "मालक, किती हो तुम्ही दयाळू आहांत !" बौद्ध लोक फार शांत असतात, त्यांच्या ठायीं परधर्मसहिष्णुता असते असें मीं ऐकलें होतें. अनेक बौद्ध धर्मप्रचारक कलकत्त्याला येतात आणि आपण त्यांना अतिशय सन्मानाने वागवीत असलों तरीहि ते आपल्या व्याख्यानांत हिंदुधर्मावर गाळीव शिव्यांचा खूप भडिमार करतात. एकदा अनुराधापुरम् येथे माझें व्याख्यान होतें. श्रोते सगळे हिंदु होते, बौद्ध नव्हते. व्याख्यान सार्वजनिक मैदानांत होतें, कोणाच्या खाजगी जागेंत नव्हतें. तेवढ्यांत तिकडून बौद्ध भिक्षूंचा एक जथ्थाचा जथ्था आला. त्यांच्याबरोबर अनेक गृहस्थाश्रमी बुद्धानुयायी स्त्रीपुरुषहि होते. त्यांच्या हातांत ढोल आणि झांजा होत्या. त्यांनी तेथे एकच गदारोळ सुरू केला. माझें व्याख्यान अर्थात् तिथेच थांबलें. रक्तपात होण्याची चिन्हें दिसूं लागलीं. मोठ्या प्रयासाने मीं हिंदूंना समजाविलें. मीं त्यांना शेवटीं म्हटलें, "त्यांनी त्यांचा अहिंसाधर्म पाळला

नाही तर आपणच तो थोडासा पाळूं या." तेव्हा तें प्रकरण शांततेने मिटलें.

हळूहळू उत्तरेकडून तामिळ प्रांतांतील हिंदु सिलोनमधे येऊं लागले. एकंदर परिस्थिति विपरीत झालेली पाहून बौद्धांनी अनुराधापुरम् सोडलें आणि कांडी नांवाच्या एका थंड हवेच्या ठिकाणीं त्यांनी नगर वसविलें. पण थोडयांच काळांत तामिळ लोकांनी तेंहि त्यांच्यापासून हिसकून घेतलें आणि एक हिंदु राजा तेथील सिंहासनावर बसविला. त्यानंतर युरोपियन लोकांच्या टोळ्या येणें सुरू झालें. स्पेनमधील लोक आले, पोर्तुगीज लोक आले, डच लोक आले आणि शेवटीं जे इंग्रज लोक आले ते तर राजेच होऊन बसले. कांडीच्या राजाला त्यांनी तंजावर येथे पाठवून दिलें. तेथे त्याचे वंशज आजहि पेन्शन घेत आहेत आणि "मडगुतन्नी रसम्" खात बसले आहेत.

### सिलोनमधील सध्याच्या चालीरीती

सिलोनच्या उत्तर भागांत हिंदु अधिक आहेत, पण दक्षिण भागांत बौद्ध धर्मीयांचें आणि विविध प्रकारच्या संकरापासून उत्पन्न झालेल्या युरेशिअनांचें प्राबल्य अधिक आहे. हल्लीची राजधानी कोलंबो येथें आहे. तेंच बौद्ध धर्मीयांचें मुख्य स्थान आहे. जाफना हें हिंदूंचें मुख्य स्थान आहे. हिंदुस्थानांतल्यापेक्षा येथे जातिबंधनें बरींच शिथिल आहेत. बौद्ध लोक विवाहाच्या बाबतींत कांही प्रमाणांत जातिभेद मानतात, खाण्यापिण्याच्या बाबतींत मात्र मुळीच मानीत नाहीत. खाण्यापिण्याच्या बाबतींत हिंदु मात्र कांही बंधनें पाळतात. सिलोनमधील सगळे खाटिक पूर्वी बौद्धच होते. परंतु आता, बौद्ध धर्माच्या पुनरुत्थानापासून त्यांची संख्या कमी कमी होत आहे. इंग्रजी धर्तीचीं नांवें

धारण करणाऱ्या अनेक बौद्धांनी आता पूर्वीचीं सिलोनी पद्धतीचीं नांवें लावायला सुरवात केली आहे. सगळ्या हिंदु जाति एकमेकांत मिसळून तेथे आता हिंदूंची एकच जात उरली आहे. पंजाबांतील जाट लोकांप्रमाणे हे लोक कोणत्याहि जातीच्या मुलीशीं विवाह करतात. अगदी युरोपियन मुलगीसुद्धा त्यांना चालते. मुलगा मंदिरांत जातो, कपाळावर त्रिपुण्ड्र लावतो आणि "शिव शिव" म्हणून हिंदु बनतो. एखादा पति हिंदु असतो, तर पत्नी ख्रिस्ती असते. एखादा ख्रिस्ती उठतो, कपाळाला भस्म लावतो आणि "नमः पार्वतीपतये" म्हणतो की लगेच तो हिंदु होतो. यामुळेच येथील ख्रिस्ती मिशनरी आपल्यावर येवढे रागावले आहेत. आपली मंडळी सिलोनमधे येऊं लागल्यापासून ख्रिस्ती लोक मोठ्या संख्येने हिंदु होऊन आपल्या जुन्या जातींत जाऊन बसूं लागले आहेत. भस्म लावायचें आणि 'नमः पार्वती-पतये' म्हणून हिंदु व्हायचें असे प्रकार सर्रास होऊं लागले आहेत. अद्वैतवाद आणि वीरशैववाद हे येथील प्रचलित धर्म आहेत. 'हिंदू'च्या ऐवजी येथे 'शैव' असें नामाभिधान वापरावें लागतें. आपल्याकडे बंगालमधे चैतन्यमहाप्रभूंनी जें धार्मिक नृत्य आणि नामसंकीर्तन सुरू केलें तें मूलतः दक्षिणेंतून तामिळ लोकांकडून आलेलें आहे. सिलोनमधील तामिळ भाषा अगदी शुद्ध तामिळ भाषा आहे आणि सिलोनमधील धर्महि अगदी शुद्ध तामिळ धर्म आहे. कितीहि वर्णन केलें तरी त्यांच्या भक्तिभावाची आणि धार्मिक रीतीभातींची कल्पना येणें शक्य नाही. तीं दृश्यें डोळ्यांनीच पाहायला हवींत. लाखो लोक उन्मत्त होऊन एका आवाजांत शिवस्तुतिपर गीतें गात असतात; हजारो मृदंग वाजत असतात; मोठमोठ्या झांजांचे झणत्कार होत असतात; त्या मंडळींच्या

सर्वांगावर भस्म चर्चिलेलें असतें; त्यांचे डोळे लाल दिसतात; त्यांचीं शरीरें चांगलीं कसलेंलीं असतात; गळ्यांत जाडजाड रुद्राक्षांच्या माळा असतात. असे ते तामिळ लोक जेव्हा तल्लीन होऊन नाचतात तेव्हा ते भक्तराज हनुमंतासारखेच भासतात.

### कोलंबोमधील मित्रांची भेट

आपल्या कोलंबोच्या मित्रांनी, आम्हांला किनाऱ्यावर उतरूं देण्याचा परवाना मिळविला होता, त्यामुळे आम्ही किनाऱ्यावर उतरलों आणि आपल्या तेथील मित्रांना भेटलों. सर कुमारस्वामी हे तेथील हिंदूंमधे अग्रगण्य आहेत. त्यांची बायको आहे एक इंग्रज स्त्री आणि मुलगा पाहाल तर कपाळावर भस्म लावलेला, आपला अनवाणी चालतो आहे! श्रीयुत अरुणाचलम् आणि आपले इतर मित्र मला भेटायला आले होते. फार दिवसांनी इकडील 'मडगुतन्नी' आणि उत्तम प्रतीच्या नारळांतील खोबरें खायला मिळालें. कांहीं शहाळींहि त्यांनी माझ्या खोलींत आणून ठेविलीं. श्रीमती हिगिन्स यांना मी भेटलों आणि बौद्ध मुलींसाठी त्यांनी चालविलेलें वसतिगृहहि मी पाहून आलों. आपल्या जुन्या परिचयाच्या बाई कौंटेस ऑफ कॅनोव्हरा आठवतात ना? त्यांचाहि मठ आणि शाळा मीं पाहिली. कौंटेस बाईंचें घर श्रीमती हिगिन्स यांच्या घरापेक्षा खूपच मोठें आहे आणि अनेक साधनसामग्रींनी सुसज्जहि आहे. कौंटेसबाईंनी स्वतःचा पैसा ओतला आहे, तर हिगिन्सबाईंनी दारोदारीं हिंडून भीक मागून पैसा जमविला आहे. बंगाली बायका साडी नेसतात त्या पद्धतीनें एक भगवें वस्त्र कौंटेसबाई नेसलेल्या असतात. सिलोनच्या बौद्धांना वस्त्र नेसण्याची ही पद्धति फारच आवडली असल्याचें मला आढळलें. ज्यांत स्त्रिया बसल्या आहेत अशा अनेक गाड्या मीं पाहिल्या. त्या सगळ्या स्त्रिया अशाच बंगाली पद्ध-

तीच्या साड्या नेसल्या होत्या.

### बुद्धदंताचा इतिहास आणि आजचा बौद्धधर्म

कांडी येथील बुद्धदंत-मंदिर हें बौद्धांचें प्रमुख तीर्थस्थान होय. सिलोनी लोक सांगतात की बुद्धाचा तो दांत पूर्वी पुरी येथील जगन्नाथ मंदिरांत होता. बऱ्याच भानगडी होऊन शेवटीं तो सिलोनला येऊन पोहोचला. येथे आल्यावरहि कांही कमी भानगडी झाल्या नाहीत. पण आता तो सुरक्षित आहे. सिलोनी लोकांनी त्यांचा इतिहास फार चांगला जतन करून ठेवला आहे. त्यांनी आपल्यासारखें नुसतें भारूड रचून ठेवलें नाही. प्राचीन मागधी भाषेंतील बौद्ध-ग्रंथदेखील येथील लोकांनी नीट सांभाळून ठेविले आहेत. बौद्धधर्म येथूनच पुढे ब्रह्मदेश, सयाम आदि अन्य देशांत पसरला. सिलोनचे बौद्धलोक त्यांच्या धर्मग्रंथांत उल्लेखिलेल्या शाक्य मुनींना तेवढें मानतात, आणि त्यांच्याच उपदेशाचें पालन करण्याचा प्रयत्न करतात. नेपाळ, सिकीम, भूतान, लडाख, चीन, जपान आदि देशांतील बौद्ध ज्याप्रमाणे शिवाचें पूजन करतात किंवा तारादेवी आदि देवींची ज्याप्रमाणे गूढ मंत्रांनी उपासना करतात त्याप्रमाणे सिलोनी बौद्ध करीत नाहीत. परंतु भूतपिशाच्चांनी झपाटणें आदि गोष्टींवर त्यांचा विश्वास आहे. हल्ली बौद्ध लोकांत दोन विभाग पडले आहेत. एक उत्तरेकडील आणि एक दक्षिणेकडील. उत्तरेकडील पंथ स्वत:ला ‘ महायान ’ पंथ म्हणवितो. आणि सिलोनी, ब्रह्मी, सयामी आदि लोकांचा मिळून असलेला दक्षिणेकडील पंथ स्वत:ला ‘ हीनयान ’ म्हणवितो. महायान शाखा बुद्धांची फक्त नांवालाच पूजा करते. मुख्यत: ते पूजा करतात तारादेवीची आणि अवलोकितेश्वराची. (त्यालाच जपानी, चिनी आणि कोरियन लोक ‘ क्वानयन ’ म्हणतात.) गूढ तंत्रमंत्रादींचाहि ते लोक खूप अवलंब

करतात. तिबेटी लोक म्हणजे शंकराचे खरे भूतगण होत. ते सगळे हिंदु देवदेवतांचें पूजन करतात; ते डमरू वाजवितात; माणसाची कवटी जवळ बाळगतात; मृत साधूंच्या अस्थींपासून केलेलीं शिंगें फुंकतात; मांसमदिरेवर यथेच्छ ताव मारतात; मंत्रोच्चारांनी भुतेंपिशाच्चें पळवितात; गूढ मंत्रतंत्रांनी रोग घालवितात. चीन आणि जपान या देशांतील सर्व मंदिरांच्या भिंतींवर मोठमोठ्या सोनेरी अक्षरांत ओं, ऱ्हीं, क्लीं आदि एकाक्षरी मंत्र लिहिलेले मीं पाहिले आहेत. तीं अक्षरें अगदी बंगाली लिपींतील अक्षरांसारखींच असून तीं आपल्यालाहि वाचतां येतात.

कोलंबोहून आलासिंगा मद्रासला परत गेला आणि आम्ही आमच्या बोटीवर चढलों. बोटीवर चढतांना भेटीदाखल बरेच पदार्थ आले आहेत. कुमारस्वामींचा बगीचा आहे. त्यांनी कांही लिंबें, कांही उत्तम नारळ, सरबताच्या दोन बाटल्या आदि पाठविलें आहे. ( कार्तिकेयाला अनेक नांवें आहेत. उदाहरणार्थ सुब्रह्मण्य, कुमारस्वामी इत्यादि. दक्षिणेंत ही देवता फार पूजिली जाते. कार्तिकेयाला ते ओंकाराचा अवतार मानतात.)

### पावसाळा

आमच्या बोटीने २५ जूनला सकाळीं कोलंबो सोडलें.आता आमची खऱ्या पावसाळी हवेशीं गाठ पडणार आहे. जसजशी आमची बोट पुढे जात आहे तसतसें वादळांचें प्रमाण, वाऱ्याचा वेग आणि त्याचें घोघावणें सारखें वाढत आहे. सतत पाऊस पडतो आहे. ढगांनी आकाश भरलेलें असल्यामुळे सगळीकडे अंधारलें आहे. प्रचंड लाटा भयानक गर्जना करीत आमच्या बोटीच्या डेकवर आदळत आहेत. त्यामुळे कोणालाहि तेथे उभें राहणें अशक्य झालें आहे. आमच्या जेवणाच्या टेबलावर, चहूबाजूंना चौकटी बसवून

लहान लहान आडवे उभे खाने केले आहेत, त्यांना ‘फिडल’ म्हणतात. त्यांच्यामधे ठेवलेले खाद्यपदार्थ उसळ्या मारमारून बाहेर येत आहेत. बोट खूप करकरते आहे. लवकरच तिच्या पार चिरफळ्या उडणार असें वाटत आहे. “या वर्षीचा पावसाळा फारच वाईट आहे; बऱ्याच वर्षांत असा पाहिला नव्हता” असें कप्तान म्हणतो. हा कप्तान फारच चांगला माणूस आहे. चिनी समुद्रावर आणि हिंदी महासागरावर त्याने अनेक वर्षें घालविलीं आहेत. तो मोठा गमतीदार माणूस आहे. अद्‌भुत गोष्टी सांगण्यांत तो फारच पटाईत आहे. चांच्यांच्या गोष्टींचा तर त्याच्याजवळ मोठाच खजीना भरलेला आहे. चिनी मजूर बोटीच्या अधिकाऱ्यांना कसे ठार मारीत, बोटीवरचा माल लांबवून कसे पळून जात या आणि अशा धर्तीच्या अनेक गोष्टी तो सांगत आहे. आणि या वेळीं गोष्टी सांगणें आणि ऐकणें हेंच एक कार्य होऊं शकतें.बोटीचें इतकें अघोरी डोलणें चालूं असतांना कुठलें वाचन आणि कुठलें लेखन! खोलीमधे बसणें जवळजवळ अशक्य झालें आहे. लाटा आंत येऊं नयेत म्हणून खोलीच्या सगळ्या खिडक्या बंद केल्या आहेत. एक दिवस बंधु तुरीयानंद यांनी एक खिडकी थोडीशी उघडी ठेवली, तों काय, लाटेचा एक अल्पभाग आमच्या खोलींत शिरला आणि आमची सगळी खोली पाण्याने भरून गेली! आणि डेकवरचें तें लाटांचें तांडव तर केवळ अवर्णनीय होतें. अशा या परिस्थतींत देखील तुमच्या ‘उद्‌बोधन’चें काम थोडें थोडें चालूंच आहे हें लक्षांत ठेवा.

### बोटीवरील एक पाद्री प्रवासी

आमच्या बोटीने दोन ख्रिस्ती धर्मोपदेशकहि प्रवास करीत आहेत. त्यांच्यापैकी एक आहे अमेरिकन. त्याचें नांव बोगेश आहे.

तो सहकुटुंब प्रवास करीत आहे. गृहस्थ मला फारच चांगला वाटला. त्यांच्या लग्नाला सात वर्षें झालीं आणि त्यांच्या मुलांची संख्या आहे सहा. नोकरचाकर म्हणतात की त्यांच्यावर देवाची केवढी कृपा! पण मुलांना मात्र बहुधा ती अवकृपाच वाटते. श्री. बोगेश एक घाणेरडें अंथरूण डेकवर पसरतात आणि तेथे त्या मुलांना निजवून निघून जातात. तीं मुलें मग तिथे मोठमोठ्याने रडतात, लोळतात आणि सगळें अंग घाणीने भरवितात. त्यामुळे इतर प्रवासी मंडळींना डेकवर हिंडण्याफिरण्याचा सुद्धा संकोच वाटतो; वाटतें की बोगेशचें एखादें पोर पायाखाली यायचें. त्यांच्याजवळ उंच कडा असलेली एक चौकोनी टोपली आहे. त्या टोपलींत सर्वांत लहानग्याला ते ठेवून देतात आणि दोघे नवराबायको एकमेकांना मिठी मारून एका कोपऱ्यांत चारचार तास बसून राहतात. हा नमुना पाहून तुमच्या युरोपियन सभ्यतेचें आकलन करणें फार कठीण जातें. सगळ्यांसमोर जर आपण चुळा भरल्या किंवा दांत घासले तर लगेच ते लोक आपल्याला नांवें ठेवतात, रानटीपणा म्हणतात, म्हणतात की अशा गोष्टी आडोशाच्या जागीं कराव्यात. ठीक आहे, पण मीं वर उल्लेखिलेल्या गोष्टीचें काय? अशा गोष्टी नकोत का आडोशाच्या जागीं करायला? आणि आमचे लोक अशा या सभ्यतेची नक्कल करूं पाहत आहेत! असो. या प्रॉटेस्टंट पंथाने उत्तर युरोपवर किती उपकार करून ठेवले आहेत तें त्यांचे पाद्री पाहिल्याशिवाय कळायचें नाही. इंग्रजलोकांची संख्या दहा कोटी आहे. नव्हे का? उद्या त्यांच्यापैकी पाद्रीवर्ग सोडून बाकीचे सगळे जरी मेले तरी हे पाद्री वीस वर्षांत इंग्लंडची लोकसंख्या पुन्हा दहा कोटीची दहा कोटी उभी करतील!

बोट खूपच जोरांत डोलत आहे. त्यामुळे अधिकांश प्रवासी

डोकेदुखीने वेजार झाले आहेत. टूटल् नांवाची एक लहान मुलगी तिच्या वडिलांबरोबर प्रवास करते आहे. तिची आई वारली आहे. आपली निवेदिता त्या टूटल्ची आणि वोगेशच्या मुलांची आई झाली आहे. टूटल् म्हैसूरची राहणारी आहे. तिच्या वडिलांचा तेथे मळा आहे. मीं तिला विचारलें, "टूटल्, कसें काय आहे?" ती म्हणाली, "हा वंगला चांगला नाही. हा फारच डोलतो. म्हणून माझी तव्येत विघडली आहे." कोणतेंहि निवासस्थान म्हणजे तिला वंगलाच वाटतो. बोगेशचें एक मूल आजारी आजारीच दिसतें. आईबापांनी काळजी न घेतल्यामुळेच बहुधा तें तसें झालें असावें. तें बिचारें त्या लाकडी डेकवर दिवसभर इकडे तिकडे लोळत असतें. आमचा म्हातारा कप्तान मधून मधून जेव्हा खोलीबाहेर येतो तेव्हा त्या मुलाला चमचाभर 'सूप' (सार) पाजतो आणि त्याच्या त्या हडकुळचा पायांकडे बोट दाखवून तो म्हणतो, "किती आजारी आहे हें मूल ! काय हें आईबापांचें दुर्लक्ष !"

### पावसाळी वाऱ्यांचें केंद्र

अनेक लोक अक्षय सुखाची इच्छा करतात. पण एका गोष्टीचा ते विचार करीत नाहीत. सुख जर अक्षय झालें तर दुःखहि अक्षय होईल. तसें जर झालें असतें तर मग आम्ही काय एडनला पोहोचलों असतों ? सुदैवानें, या जगांत सुखहि अक्षय नाही आणि दुःखहि अक्षय नाही. म्हणूनच सहा दिवसांचा आमचा प्रवास जरी चौदा दिवसांचा झाला आणि रात्रंदिवस वाऱ्यापावसाशीं आम्हांला खूप झगडावें लागलें तरी आम्ही शेवटीं एडनला पोहोचलोंच. कोलंबोहून जसजसे आम्ही पुढे गेलों तसतसें वादळ आणि पाऊस हीं वाढतच चाललीं, आकाश म्हणजे जणु एखादें ओसंडत असलेलें सरोवरच वनलें. वारा आणि त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या लाटा या

दोघांनीहि रौद्र रूप धारण केलें. अशा वाऱ्याला आणि लाटांना तोंड देत पुढे जाणें आमच्या बोटीला जवळजवळ अशक्य झालें. त्यामुळे तिचा वेगहि अर्धा झाला. सोकोत्रा बेटाजवळ असतांना तें वादळी वातावरण पराकाष्ठेचें उग्र बनलें. तो भाग म्हणजे पावसाळी वाऱ्यांचें केंद्र असल्याचें आमच्या कप्तानाने आम्हांला सांगितलें. तो म्हणाला, "हा भाग एकदा ओलांडला की हळूहळू आपण शांत समुद्रांत जाऊं." आणि झालेंहि तसेंच. त्याबरोबरच तें दुःस्वप्नहि विरलें.

### एडन

आठ तारखेला संध्याकाळीं आम्ही एडनला पोहोचलों. काळ्या किंवा गोऱ्या कोणाहि माणसाला किनाऱ्यावर उतरण्याची मनाई आहे. बोटीवर माल चढविण्याचीसुद्धा कोणालाहि परवानगी मिळाली नाही. इथे तसें विशेष असें कांही पाहण्यासारखेंहि नाही. सगळें राजपुतान्यासारखें वातावरण. टेकड्यांवर हिरवळीचें नांव नाही. कोठेंहि झाडें नाहीत. जिकडे पाहाल तिकडे नुसते वाळवंटाचे पट्टे पसरलेले. टेकड्यांच्या मध्यें किल्ले आहेत. किल्ल्यांवर शिपायांच्या बराकी आहेत. समोरच उपहारगृहें आणि दुकानें आहेत. त्यांची मांडणी चंद्रकोरीसारखी केलेली आहे. येथून बोटीवरूनच तें सर्व दृश्य स्पष्ट दिसत आहे. किनाऱ्यावर अनेक बोटी नांगरून उभ्या आहेत. एक इंग्रज आणि एक जर्मन अशा दोन युद्धनौका आंत आल्या आहेत. बाकीच्या मालवाहू किंवा उतारवाहू बोटी आहेत. गेल्या खेपेला मी एडन शहरांत गेलों होतों. टेकड्यांच्या मागच्या बाजूला देशी शिपायांच्या बराकी आहेत आणि बाजारहि आहे. तेथून कांही मैलांवर टेकड्यांच्या बाजूंनी मोठमोठे खड्डे खणलेले आहेत. त्या खड्ड्यांतून

पावसाचें पाणी साठतें. पूर्वी त्यांतूनच पाण्याचा पुरवठा होत असे. आता समुद्राचें पाणी वाफवून, शुद्ध करून गोडें पाणी मिळण्याची सोय यंत्रयोजनेने करण्यांत आली आहे. अर्थात् हें पाणी फार महाग मिळतें. एडन हें अगदी एखाद्या भारतांतील शहरासारखेंच आहे. आपले भारतीय तेथे खूप मोठ्या प्रमाणांत आहेत. ते लष्करांतहि आहेत आणि अन्य उद्योगांतहि आहेत. तेथे पुष्कळसे दुकानदार पारशी आहेत. सिंधी व्यापाऱ्यांचीहि संख्या बरीच मोठी आहे. एडन हें फार प्राचीन स्थान आहे. कॉन्स्टंटियस नांवाच्या रोमन सम्राटाने ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी येथे अनेक धर्मोपदेशक पाठविले होते. नंतर अरब लोकांनी या ख्रिस्ती लोकांना मारून टाकलें. जवळचा अबिसीनिया देश पूर्वीपासूनच ख्रिस्ती होता. तेव्हा रोमन सम्राटाने अबिसीनियाच्या राजाला त्या अरबांना शिक्षा द्यायला सांगितलें. अबिसीनियाच्या राजाने आपली सेना पाठविली आणि त्याने एडनच्या अरबांना चांगलेंच कडक शासन केलें. पुढे एडन इराणच्या ' सामानिदि ' राजांच्या हातांत गेलें. त्यांनीच सर्वप्रथम पाणी साठविण्यासाठी ते खड्डे खणले असें सांगतात. इस्लाम धर्माच्या उदयानंतर एडन पुन्हा अरबांच्या हातांत आलें. कांही काळानंतर एका पोर्तुगीज सेनापतीनें हें स्थान जिंकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पुढे तुर्कस्थानच्या सुलतानाने. पोर्तुगीजांना हिंदी महासागरांतून हुसकून लावण्याच्या उद्देशाने, एडनला आपला आरमारी तळ निर्माण केला.

पुन: हें स्थान निकटवर्ती अरब राजाच्या ताब्यांत गेलें. त्याच्याजवळून इंग्रजांनी तें विकत घेतलें आणि आजचें शहर वसविलें. आता सगळ्या प्रबल राष्ट्रांच्या युद्धनौका सगळ्या जगभर गस्त घालीत आहेत. जगांतील कोठल्याहि भागांत कांहीहि गडबड

झाली तरी तींत भाग घ्यावा असें प्रत्येक राष्ट्राला वाटतें. प्रत्येक राष्ट्र आपलें आधिपत्य, राजनैतिक हितसंबंध आणि व्यापार यांची जपणूक करीत आहे. त्यासाठी त्यांना सतत कोळशाचा पुरवठा हवा असतो. युद्धकाळीं शत्रुराष्ट्रांकडून कोळसा मिळणें अशक्यच. म्हणून विभिन्न शक्तिमान राष्ट्रें जागोजागीं आपल्या-आपल्या कोळशाच्या वखारी उभारीत आहेत. मोक्याच्या सगळ्या चांगल्या जागा इंग्रजांनी आधीच व्यापून टाकल्या आहेत. मोक्याच्या जागा व्यापण्याच्या बाबतींत दुसरा क्रमांक फ्रेंच लोकांचा लागतो. आणि त्यानंतर युरोपांतील इतर सामर्थ्यवान राष्ट्रें आहेत. कोणी जबरदस्तीने, कोणी विकत घेऊन, कोणी सामोपचाराने आजहि नव्या नव्या जागा मिळवीत आहेत. सुएझ कालवा हा युरोप आणि आशिया यांना सांधणारा महत्त्वाचा दुवा आहे, आणि तो आहे फ्रेंचांच्या ताब्यांत. त्यामुळे इंग्रजांनी एडन येथील आपलें ठाणें खूपच सुसज्ज ठेविलें आहे. आणि इतर राष्ट्रांनी देखील लाल समुद्राच्या काठाकाठाने आपलीं ठाणीं ठेविलीं आहेत. मोक्याची जागा मिळविण्याच्या शर्यतीचे कधीकधी फारच भयंकर परिणाम होतात. सातशे वर्षे इटली देश परकीय सत्तेने पायातळीं तुडविला होता. मोठमोठ्या संकटांशीं सामना देऊन शेवटीं तो देश एकदाचा आपल्या पायावर उभा राहिला, पण तेवढ्यांतच त्याला असें वाटूं लागलें की आपण फारच बलवान आहोंत, आणि तो अन्य देश पादाक्रांत करण्याची आकांक्षा बाळगूं लागला. युरोप-मध्ये तर कोणत्याहि राष्ट्राला इतर राष्ट्राचा एक लहानसा तुकडाहि बळकावतां येणें शक्य नाही, कारण अशी दडपशाही करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध तिकडील सगळीं राष्ट्रें एक होतात. आशियाखंडाचीहि तीच गोष्ट आहे; इंग्लंड, रशिया, फ्रान्स आणि हॉलंड या

सामर्थ्यवान राष्ट्रांनी जवळजवळ सगळा आशिया व्यापून टाकला आहे. आफ्रिकेंत मात्र कांही तुकडे उरले आहेत. इटलीने तिकडेच आपला मोर्चा वळविला. प्रथम तिने उत्तर आफ्रिकेंत प्रयत्न केला. पण तिथे तिला फ्रेंचांनी विरोध केला. त्यामुळे तिने तो विचार सोडून दिला. मग इंग्रजांनी लाल समुद्राच्या किनाऱ्यावर तिला थोडीशी जागा दिली. त्यांत इंग्रजांचा हेतु हाच होता की तिने तेथे आपलें ठाणें बसवून अबिसीनियाचा प्रदेश ताब्यांत घ्यावा. त्याप्रमाणे इटलीने तयारी केली आणि आपलें सैन्य आफ्रिकेंत आणलें,पण अबिसीनियाचा राजा मेनेलिक याने इटलीच्या सैन्याला असा तडाखा हाणला की त्या सैन्याला पळतां भुई थोडी झाली. त्यांतहि आणखी गोष्ट अशी आहे की, रशियांतील आणि अबिसीनियांतील ख्रिस्ती धर्म एकाच प्रकारचा आहे असें म्हणतात. त्यामुळे रशियाचा झार हा अबिसीनियन लोकांचा मित्र असून त्यानेच या लोकांना आंतून बरीच मदत केली असावी.

### लाल समुद्राविषयी पौराणिक कथा

आमची बोट आता लाल समुद्रांतून जात आहे. आमच्या बोटीवरचा तो पाद्री म्हणाला, "हाच तो लाल समुद्र. यहुदी नेता मोझेस याने हा समुद्र आपल्या अनुयायांसह पायीं ओलांडला. त्यांना पकडण्यासाठी इजिप्तच्या 'फेरो' नांवाच्या राजाने जें सैन्य पाठविलें होतें त्याच्या रथांचीं चाकें चिखलांत रुतलीं आणि शेवटीं तें सारें सैन्य याच समुद्रांत बुडालें." आपल्या महाभारतांतील कर्णाच्या रथाचें चाक जसें जमिनींत रुतलें होतें तसेंच हें झालें. तो पुढे म्हणाला की, आधुनिक वैज्ञानिक तर्कप्रणालीने सुद्धा हें सिद्ध केलें जाऊं शकतें. जुन्या धार्मिक चमत्कारांना वैज्ञानिक आधार देण्याची आजकाल प्रत्येक देशांत टूमच निघाली आहे. अरे माझ्या

मित्रा, हें जर सगळें नैसर्गिक शक्तींच्याच द्वारें घडलें असें ठरलें तर मग तुझी ती ' याव्हे ' देवता मधेच कशाला आली ? केवढा पेचप्रसंग ! हे चमत्कार विज्ञानाला जर विरोधी असतील तर ते केवळ भाकडकथा ठरतात आणि तुमचा धर्म खोटा ठरतो. आणि जर त्यांना विज्ञानाचा आधार दाखविला तर मग तुमच्या देव-देवतांचें सामर्थ्य अनावश्यक ठरतें. जशा चार नैसर्गिक गोष्टी तसेच हे चमत्कार असें होऊन जातें. यावर पाद्री बोगेश म्हणाले, " त्यांतून उद्भवणाऱ्या विविध प्रश्नांची मला माहिती नाही. माझी त्या गोष्टींवर श्रद्धा आहे येवढें मात्र खरें." हें म्हणणें आपल्याला एकदम पटलें. असलें विधान आपण समजूं शकतों. पण असे कांही लोक आहेत की जे दुसऱ्यांच्या श्रद्धास्थानांवर खूप टीका करतात, त्यांच्या विरुद्ध अनेक तर्क पुढे मांडतात, पण ज्या गोष्टींवर त्यांची स्वतःची श्रद्धा असते त्या गोष्टींबद्दल त्यांना विचारतांच ते उत्तरतात, " मी फक्त श्रद्धा ठेवतों. त्यांच्या सत्यतेबद्दल माझें मन मला ग्वाही देतें." पण अशा लोकांचें म्हणणें आपण ऐकूं शकत नाहीं. छिः, काय या लोकांची बुद्धि ? अगदीच शून्य ! दुसऱ्यांच्या धार्मिक श्रद्धांना मात्र अंधश्रद्धा, भाबडेपणा आदि नांवें ठेवायला तयार. त्यांतल्या त्यांत युरोपियन लोकांनी जर त्या धर्माला वाईट म्हटलें असेल तर मग विचारायलाच नको. सगळे त्याच्यावर तुटून पडतील. पण आपल्या धर्माच्या बाबतींत मात्र अद्भुत कादंबरीसारख्या ईश्वरी अवताराच्या कथा रचतील आणि त्यांसंबंधी बोलतांना अगदी भावनांनी भारावून जातील.

### इजिप्तमधील सभ्यतेची उत्पत्ति आणि विकास

आमची बोट आता संथपणें उत्तरेकडे चालली आहे. लाल समुद्राचा हा किनारा प्राचीन सभ्यतेचें एक महान् केंद्र होता.

तिकडे एका बाजूला आहे अरबस्तानाचें वाळवंट, तर दुसऱ्या बाजूला आहे इजिप्त. हाच तो प्राचीन इजिप्त देश. हजारो वर्षांपूर्वी हे इजिप्तचे लोक 'पंट' (म्हणजे बहुधा मलबार असावें) येथून निघाले. त्यांनी लाल समुद्र ओलांडला आणि हळूहळू आपलें राज्य पसरीत ते इजिप्तपर्यंत पोहोचले. सामर्थ्य, साम्राज्य आणि सभ्यता या तिन्ही दृष्टींनी त्यांचा विकास फार अद्भुत होता. ग्रीक लोक यांचेच शिष्य होत. या इजिप्तच्या राजांचीं तीं समाधिमंदिरें (पिरॅमिड्स), स्त्रीचें डोकें असलेल्या त्या सिंहाच्या मूर्ति (स्फिन्क्स) सारेंकांही अद्भुत आहे. त्या राजांचीं प्रेतें अगदी आजपर्यंत सुरक्षित ठेवण्यांत आलीं आहेत. तेथेच ते प्राचीन इजिप्तवासी लोक राहत असत. त्यांचे केस कुरळे असत. कानांत ते कुंडलें धारण करीत. त्यांचीं धोतरें पांढरीं स्वच्छ असत. ते काष्टा खोचीत नसत. हाच तो इजिप्तचा प्रदेश. याच चिरस्मरणीय रंगभूमीवर हिक्स वंश, फेरो वंश, इराणचे सम्राट, थोर शिकंदर, टॉलेमी वंशांतील राजे, अनेक रोमन व अरबी विजेते आदि पात्रें आलीं आणि आपआपला अभिनय करून काळाच्या पडद्यामागे अदृश्य झालीं. इतक्या प्राचीन काळीं त्यांनी आपला अगदी तपशीलवार इतिहास आपल्या चित्राक्षर लिपींत पॅपिरसच्या कागदांवर, दगडांवर आणि मातीच्या भांड्यांवर लिहून ठेवला आहे.

### इजिप्तवासीयांचें धर्ममत आणि त्यांच्या 'ममी'

याच भूमींत 'आयसिस' देवता पूजिली गेली आणि 'होरस' उदयास आला. या प्राचीन इजिप्तवासीयांच्या मतानुसार, मृत्यूनंतर माणसाचा सूक्ष्म देह इकडेतिकडे भटकतो, पण मृत शरीराला जर कांही दुखापत झाली तर सूक्ष्म देहालाहि तिचा परिणाम भोगावा लागतो; आणि मृत शरीर जर नाश पावलें तर तिकडे सूक्ष्म

देहाचाहि कायमचा नाश होतो. म्हणूनच येवढा खटाटोप करून त्यांनी तीं प्रेतें सांभाळून ठेवलीं. त्यासाठीच त्यांनी, पिरॅमिड्सच्या रूपांत राजांच्या आणि सम्राटांच्या समाध्या बांधल्या. किती कल्पकता, किती परिश्रम ! अरेरे सगळेंकांही व्यर्थ झालें. खजीने सापडतील या लोभाने चोरांनी पिरॅमिड्स फोडून पाहिले; त्यांच्या आंतील चक्रव्यूहासारखी गूढ रचना पार करून राजघराण्यांतील प्रेतेंहि त्यांनी पळविलीं. ह्या गोष्टी कांही आताच्या नव्हेत. प्राचीन इजिप्तमधील लोकांनीच हें सारें केलें. पांच किंवा सहा शतकांपूर्वी यहुदी आणि अरब वैद्य, या वाळलेल्या प्रेतांमधे मोठे औषधी गुण आहेत असें मानीत असत आणि सगळ्या यूरोपभर, अनेक रोगांवर त्यांची योजना करीत असत. आजदेखील युनानी आणि हकीमी वैद्यकांत जिला 'ममिआ' म्हणतात ना, ती हीच पद्धति असावी !

### इजिप्तमधील बौद्धधर्मप्रचार आणि ख्रिस्ती लोकांचा अत्याचार

इजिप्तमधे टॉलेमी वंश राज्य करीत असतांना सम्राट अशोकाने तेथे आपले धर्मप्रचारक पाठविले होते. ते प्रचारक धर्मोपदेश देत असत आणि लोकांना औषधपाणी देऊन रोगमुक्त करीत असत. ते शाकाहार घेत, ब्रह्मचर्य वृत्तीने राहत, आणि आपली संन्यासी शिष्यशाखा तयार करीत. त्यांनी तेथे थेराप्यूट, अॅस्सीन, मॅनिकी आदि अनेक पंथ निर्माण केले. त्यांतूनच आधुनिक ख्रिस्ती धर्म निघाला. टॉलेमीच्या राज्यकाळांत इजिप्त देश सर्व विद्यांचें माहेरघर बनला होता. विश्वविद्यालय, ग्रंथसंग्रहालय आणि विद्वान् मंडळी यांसाठी सगळ्या जगांत कीर्ति पावलेलें तें अलेक्झांड्रिया शहर येथेच होतें. होय, हेंच तें अलेक्झांड्रिया शहर, जें पुढे निरक्षर, धर्मवेडया आणि रानटी ख्रिस्ती लोकांच्या हातांत सापडलें आणि नाश पावलें. तेथील त्या प्रचंड ग्रंथसंग्रहालयाची

जाळून राखरांगोळी करण्यांत आली. विद्येचा सर्वनाश करण्यांत आला. शेवटीं, विदुषी म्हणून नांवाजलेल्या त्या हायपेशिया नामक स्त्रीला सुद्धा ख्रिस्ती लोकांनी ठार मारलें; पण तेवढ्याने त्यांचें समाधान झालें नाही, मेल्यावरहि, तिच्या शरीराचा त्यांनी नाही नाही तो अपमान केला; सगळें मांस झडून हाडांचा नांगाडा राहीपर्यंत त्यांनी तिचें शरीर रस्त्यारस्त्यांतून फरफटत नेलें !

### अरबांचा अभ्युदय

आणि इकडे दक्षिणेला आहे वालुकामय अरबस्तान--ती वीरप्रसू भूमि ! तुम्ही कधी एखादा बेदायू अरब पाहिला आहे? त्याच्या अंगावर मोठा थोरला झगा असतो. डोक्याला एक मोठा रुमाल लोकरीच्या दोऱ्यांनी बांधलेला असतो. काय ती त्याची ऐट ! ती उभें राहण्याची धाटणी ! ती तेजस्वी मुद्रा !--अन्य कोणत्याहि देशांत तुम्हांला अशी ऐट पाहायला मिळणार नाही. नखशिखान्त स्वतंत्र वृत्तीने रसरसलेला. अनिर्बंध मोकळ्या वाळवंटाचें खुलें वारें प्यालेला,--असा असतो अरब माणूस.

ख्रिस्ती लोकांच्या धर्मवेडामुळे आणि गॉथ लोकांच्या रानटीपणामुळे जेव्हा ग्रीक आणि रोमन सभ्यतांचा नाश झाला, सोनेरी पानांचीं पुटांवर पुटें चढवून इराण जेव्हा आंतला सडलेला भाग झाकण्याचा प्रयत्न करीत होता, भारतांत पाटलीपुत्र आणि उज्जयिनी यांचा गौरवरवि अस्ताला जाऊन जेव्हा निरक्षर हुकुमशहा आधिपत्य गाजवीत होते, भयानक बीभत्सता, कामुक भ्रष्टाचार आणि विलासिता यांचा जेव्हा बुजबुजाट झाला होता-अशी जेव्हा सगळ्या जगाची स्थिति झालेली होती तेव्हा अर्धरानटी अरब जाति पृथ्वीच्या पाठीवर विद्युत् वेगाने पसरली.

## आजचे अरब

तीं पाहा, यात्रेकरूंनी भरलेली एक आगबोट मक्केहून येत आहे. तिच्यावर पाहिलेंत,—ते तुर्क लोक नखशिखान्त युरोपियन पोशाखांत मिरवत आहेत, इजिप्तमधील लोकांनी अर्धामुर्धा युरोपियनांचा वेष केला आहे, सीरियांतील मुसलमान इराणी पोशाखांत वावरत आहेत, पण खऱ्या अरबांनी पायघोळ वस्त्र परिधान केलें आहे. महंमदापूर्वी काबा येथील मंदिरांत, अगदी नग्न होऊन प्रदक्षिणा घालण्याची पद्धति होती. महंमदाच्या काळापासून कपडा गुंडाळून घेणें सुरू झालें. याच कारणास्तव आपल्याकडील मुसलमान नमाजाच्या वेळीं पायजम्यांच्या नाड्या मोकळ्या सोडतात किंवा लुंगीची गाठ मोकळी करतात. अरबांचे ते जुने दिवस आता गेले. काफ्री, शिद्दी आणि हबशी यांच्या रक्तांचें एकसारखें मिश्रण होऊन होऊन त्यांचें तें पूर्वीचें शरीरसौष्ठव, तो जोम, ती तरतरी, सर्वकांही बदललें. 'मुक्त वाळवंटांतील मस्त अरब' असा जो त्यांचा लौकिक होता तो आता पार लयाला गेला आहे. उत्तर भागांत राहणारे अरब म्हणजे आता तुर्की राज्याचे शांतताप्रिय नागरिक आहेत. पण त्या सुलतानाचे ख्रिस्ती प्रजाजन तुर्कांचा अतिशय द्वेष करतात, पण त्यांना अरब लोक मात्र आवडतात. त्यांचें म्हणणें असें आहे की, अरब हे शिक्षण घेण्यास तयार असतात, ते सभ्य बनतात आणि ते तितकेसे त्रासदायक नाहीत; पण खरे तुर्क ख्रिस्त्यांचा फार छळ करतात.

## वाळवंटांतील उष्णता

वालुकामय प्रदेश जरी फार उष्ण असतो तरी येथील उष्णता कांही निःशक्त करणारी वाटत नाही. डोक्यावर आणि अंगावर कांही आवरण असलें की मग कांही तुम्हांला त्रास होत नाही.

शुष्क उष्णता ही निःशक्त करणारी तर नसतेच, पण उलट ती बलदायकच ठरते. राजपुताना, अरबस्तान आणि आफ्रिका येथील लोक याचें उत्तम उदाहरण होत. मारवाडांतील कांही जिल्ह्यांत तर अशी स्थिति आहे की तेथे माणसें, गुरेढोरें, घोडे, सगळेच अगदी सशक्त आणि धिप्पाड असतात. अरब आणि शिद्दी लोकांकडे नुसतें पाहणें सुद्धा आनंदप्रद असतें. जेथे बाष्पयुक्त उष्णता असते तेथे शरीर लवकरच निःशक्त होतें. तेथील सगळे प्राणी अशक्त असतात. आपल्या बंगालची ही स्थिति आहे.

### लाल समुद्राची उष्णता

लाल समुद्राचें नुसतें नांव काढलें तरी प्रवाशांच्या हृदयांत भयाचा संचार होतो. या प्रदेशांत नेहमीच भयानक उष्णता असते; त्यांतून हल्ली उन्हाळा; मग काय, बोलायलाच नको. प्रत्येकजण डेकवर जाऊन बसला आहे, आणि कोणत्या ना कोणत्या भयंकर अपघाताची आठवेल ती माहिती सांगत आहे. त्या गोष्टी सांगण्यांत कप्तानाने सर्वांवर ताण केली. तो म्हणतो की, एकदा चिनीलोकांची एक युद्धनौका लाल समुद्रांतून जात होती. तिचा कप्तान आपल्या आठ खलाशांसह कोळशाच्या खोलींत काम करीत होता. उष्णतेमुळे ते नऊचे नऊजण त्या खोलींत मेलेले आढळले. खरोखर, कोळशाच्या खोलींत काम करणें म्हणजे एक दिव्यच आहे. आधीच सदा भट्टीसमोर उभें राहायचें, त्यांत आणखी ती लाल समुद्रांतील अघोरी उष्णता! त्यामुळे कधीकधी ते लोक वेडे होतात. वेडाच्या झटक्यांत डेकवर धावत येतात आणि समुद्रांत उडी मारून बुडून मरतात. किंवा कधीकधी ते अति उष्णतेमुळे इंजिनाच्या खोलींतच मरतात.

या सगळ्या गोष्टीच आमचा थरकांप उडवण्यास पुरेशा होत्या. पण सुदैवाने आम्हांला तितकीशी उष्णता जाणवली नाही.

वारा दक्षिणेकडून न वाहतां उत्तरेकडून वाहूं लागला. उत्तरेकडून येणारा हा वारा, भूमध्यसमुद्रावरून येणारा थंड वारा होता.

### सुएझ बंदर आणि प्लेगची सांथ

दिनांक १४ जुलैला आमच्या बोटीने लालसमुद्र पार केला आणि ती सुएझला पोहोचली. तो पाहा समोर सुएझचा कालवा दिसत आहे. आमच्या बोटींत सुएझला उतरविण्याचा माल आहे. इजिप्तमधे हल्ली प्लेगची सांथ चालू आहे. आणि आमच्या बोटीवर सुद्धा प्लेगचे जंतु असण्याचा संभव आहे. म्हणून दोन्ही बाजूंना परस्परांच्या स्पर्शाचें भय वाटत आहे. परस्परांचा स्पर्श होऊं नये म्हणून येथे जी खबरदारी घेतली जात आहे ती पाहिली म्हणजे असें वाटतें की आपल्याकडे विशेष कांहीच नाही. बोटी-वरून माल तर खाली उतरवायचा आहे, पण सुएझच्या हमालांनी बोटीला स्पर्श मात्र करतां कामा नये. म्हणजे आता खलाशांना नेहमीपेक्षा कितीतरी अधिक त्रास घ्यावा लागणार. हमालांचें काम आता त्यांनाच करावें लागणार. सगळा माल ते आता क्रेनच्या साहाय्याने उचलतील आणि त्याला स्पर्श न करतां सुएझच्या नावांत तो अलगद सोडतील. मग त्या नावा तो माल किनाऱ्यावर घेऊन जातील. आमच्या बोटीच्या कंपनीचा एजंट एका लाँचमधे बसून आमच्या बोटीजवळ आला आहे, पण बोटीवर चढण्याची त्याला परवानगी नाही. तो आपल्या लाँचमधे उभा आहे. आमचा कप्तान आमच्या बोटीवर उभा आहे आणि दोघेहि एकमेकांशीं बोलत आहेत. हा कांही हिंदुस्थान नाही, समजलांत? तिकडे हिंदुस्थानांत, युरोपियन माणूस म्हटला म्हणजे प्लेगच्या सगळ्या नियमादींच्या पलीकडला समजला जातो. आता युरोपखंड सुरू झाला आहे. मूषकवाहन प्लेगची स्वारी ह्या स्वर्गांत प्रवेशूं नये

म्हणून ही सगळी खबरदारी घेतली जात आहे. प्लेगच्या जंतूंचा पोषणकाल दहा दिवसांचा असतो. म्हणून त्या प्रदेशांतून आलेल्या माणसांना दहा दिवस वेगळें ठेवतात. आम्हांला आता दहा दिवसांवर होऊन गेले, त्यामुळे आमची आपत्ति आता टळली आहे. पण आम्ही इजिप्तमधील एखाद्या माणसाला नुसता स्पर्श जरी केला तरी आम्हांला पुन्हा दहा दिवस वेगळें ठेवण्यांत येईल. तसें घडलें तर नेपल्स किंवा मार्सेलस येथे कोणाहि उतारूला किनाऱ्यावर उतरूं दिलें जाणार नाही. त्यामुळे सगळीं कामें इजिप्तमधील लोकांचा कोणत्याहि प्रकारें स्पर्श न होऊं देतां दुरून दुरून चाललीं आहेत. परिणामतः सगळीं कामें अगदी मंद गतीने होत आहेत. खलाशांना नुसता माल उतरवायलाच पूर्ण दिवस लागणार आहे. आमच्या बोटीवर जर सर्चलाइट बसविला गेला तर सुएझचा कालवा रात्रींच पार करून आम्ही पुढे जाऊं शकूं. पण सर्चलाइट बसवायचा म्हणजे सुएझच्या लोकांचा बोटीला स्पर्श होणार, म्हणजे आलेंच दहा दिवसांचें बहिष्करण! त्यामुळे आमची बोट रात्रीं कांही येथून हालणार नाही. तेव्हा चोवीस तास या सुएझ बंदरांत काढणें क्रमप्राप्त आहे. सुएझ एक फारच सुंदर असें नैसर्गिक बंदर आहे. त्याला जवळजवळ तिन्ही बाजूंनी वाळूच्या पहाडांनी आणि टेकडयांनी वेढलें आहे. पाणीदेखील खूप खोल आहे, असंख्य साधे मासे आणि शार्क मासे त्या पाण्यांत पोहत आहेत. सगळ्या पृथ्वीवर इतके शार्क मासे दुसऱ्या कोणत्याहि बंदरांत आढळत नाहीत. एकतर ते येथे आहेत आणि दुसरें असेंच स्थान म्हणजे ऑस्ट्रेलियांतील सिडनी बंदर. तेथेहि विपुल शार्क आढळतात. थोडीशीहि संधि मिळाली की ते मासे माणसाला गिळून टाकायला अगदी टपलेले असतात. त्यामुळे

कोणीहि पाण्यांत उतरण्याची हिंमत करीत नाही. माणसांचाहि मग सापांवर आणि शार्क माशांवर तितकाच दात असतो. त्यांना ठार मारण्याची संधि ते कधीहि वाया घालवीत नाहीत.

### शार्क आणि बोनिटो

सकाळीं न्याहारी आटोपण्यापूर्वीच कोणींतरी येऊन सांगितलें की आपल्या बोटीच्या मागे मोठमोठे शार्क मासे पोहत आहेत. यापूर्वी जिवंत शार्क मासा मीं कधीच पाहिला नव्हता. गेल्या पाळीला आमची बोट सुएझला फारच थोडा वेळ थांबली होती, आणि ती सुद्धा अगदी वस्तीजवळ. बोटीजवळ शार्क मासे आल्याचें कळतांच आम्ही लगबगीने उठलों आणि तिकडे गेलों. दुसऱ्या वर्गाचें स्थान बोटीच्या मागच्या टोकास होतें. तिथल्या डेकवर पुरुष, स्त्रिया, मुलें यांच्या झुंडीच्या झुंडी कठड्यावरून वाकूनवाकून शार्क मासे पाहण्याचा प्रयत्न करीत होत्या. पण आम्ही तिथे पोहोचलों तोंवर शार्क महाराजांची स्वारी पुढे निघून गेली होती. त्यामुळे आम्ही फारच खट्टू झालों. तेवढ्यांत तेथे चोचीसारखीं डोकीं असलेल्या माशांच्या झुंडीच्या झुंडी दिसूं लागल्या. आणखी एका प्रकारचे अगदी लहानलहान असे खूप मासे तेथे गोळा झाले. मधून मधून एक मोठा मासा बाणासारखा उसळ्या मारीत होता आणि सटकन् इकडून तिकडे जात होता. आपल्याकडे हिल्सा मासा असतो तसा तो दिसत होता. मला वाटलें की तो शार्क माशाचा बच्चा असावा. पण मीं विचारलें तेव्हा कळलें की माझी कल्पना चुकीची होती. माशाचें नांव होतें 'बोनिटो'. बोनिटो जातीच्या माशांबद्दल मीं पूर्वी वाचलें होतें. त्या जातीचे वाळवलेले मासे मोठमोठ्या नौकांतून बंगालमधे येतात हेंहि मीं वाचलें होतें. त्याचें मांस लाल असतें आणि खूप चवदार असतें असेंहि मीं ऐकलें होतें. त्या

बोनिटोचा वेग आणि त्याचें चापल्य प्रत्यक्ष पाहून मला फार आनंद वाटत होता. केवढें मोठें त्याचें शरीर, पण कसा बाणासारखा उसळत होता. पाणी अगदी काचेसारखें स्वच्छ होतें, त्यामुळे त्याच्या सगळ्या हालचाली अगदी स्पष्ट दिसत होत्या. बोनिटोच्या त्या गिरक्या आणि इतर लहान माशांचें अविरत सुळसुळणें पाहत आम्ही जवळजवळ वीस की तीस मिनिटें घालविलीं. अर्धा तास झाला, पाऊण तास झाला, आता आम्हांला तेथें उभें राहण्याचा अगदी कंटाळा आला. तेवढ्यांत कोणीतरी ओरडलें, "अरे तो पाहा !" आणि मग दहाबारा लोक एकदम ओरडले–"तो पाहा तो इकडेच येतो आहे !" मीं माझी दृष्टि तिकडे वळविली पाहतों तों थोड्या अंतरावर एक काळें धूड दिसलें; तें आमच्याकडेच येत होतें. तें पांच-सहा इंच पाण्याखाली असेल. हळूहळू तें अजस्र शरीर जवळ जवळ आलें. एक अवाढव्य पण चपटें डोकें स्पष्ट दिसूं लागलें. त्याची प्रत्येक हालचाल कशी हळूहळू होत होती. बोनिटोसारखी चपलता त्याच्या ठायीं नव्हती. एकदा त्यानें नुसतें आपलें डोकें हालविलें तर केवढेंतरी चक्र फिरल्यासारखें वाटलें. केवढा प्रचंड मासा तो ! अगदी गंभीर चालीने तो पुढे सरकत होता. त्याच्या समोर एकदोन लहान मासे चालले आहेत आणि त्याच्या शरीरावर आणि आसपास तर लहान लहान माशांचा केवढा तरी घोळकाचा घोळका दिसतो आहे. कांही त्याच्या पाठीवर खेळत आहेत, तर कांही नुसतेच बरोबर चालले आहेत. कांहींनी त्याच्या मानेला घट्ट धरून ठेविलें आहे. हाच तो प्रसिद्ध शार्क आपल्या दलबलासह उपस्थित होत आहे. त्याच्या समोर जे मासे चालले आहेत त्यांना 'वाटाडे मत्स्य' (पायलट फिश) म्हणतात. शार्कला त्याचें भक्ष्य दाखविणें हें त्यांचें काम असतें. अर्थात्,

महाराजांच्या कृपाळूपणामुळे त्या वाटाड्यांनाहि त्यांतील कांही तुकडे मिळत असतील. पण त्या शार्कचे ते सतत उघडे असलेले भयानक जबडे पाहिले की त्या बिचाऱ्या वाटाड्यांना कांहीहि उरत नसेल असें वाटतें. शार्कच्या आसपास रेंगाळणाऱ्या आणि त्याच्या पाठीवर चढणाऱ्या माशांना 'चोषक' मत्स्य म्हणतात. त्यांच्या छातीजवळ दोन इंच रुंद, चार इंच लांब असा थोडासा लंबवर्तुळाकार चपटा भाग असतो. पुष्कळशा इंग्रजी बुटांना जसे खाचाखाचांचे रबरी तळ असतात ना, तसा तो भाग असतो. तो आपला भाग हे चोषक मासे शार्कच्या शरीराला भिडवतात आणि त्याला चिकटून राहतात. दुरून दिसायला असें दिसतें की ते जणु-कांही शार्कच्या पाठीवर आणि अंगावर स्वार झाले आहेत. शार्कच्या शरीरावर राहणारे कृमिकीटक खाऊन ते चोषक मासे आपला उदरनिर्वाह करीत असावेत. शार्क म्हटला की त्याच्या मागे पुढे या दोन जातींच्या माशांचा लवाजमा असायचाच. त्यांना बहुधा तो आपले संगीसाथी व अनुयायी मानत असावा, कारण तो त्यांना कधीहि कांही दुखापत करीत नाही. एकदा एका माणसाने चोषक जातीचा एक मासा गळाने धरला.तो मासा खाली पडला असतां त्याच्या छातीवर त्याने हळूच आपला बुटाचा तळवा दाबला आणि मग जेव्हा त्याने आपला पाय वर उचलला तेव्हा पाहतो तों, मासाहि तळव्याला चिकटलेला. याच पद्धतीने चोषक मासा शार्कच्या शरीराला चिकटून राहतो.

### शार्क पकडला जातो

दुसऱ्या वर्गातील प्रवाशांना खूपच जोम चढला आहे. त्यांच्यापैकी एकजण लष्करी पेशाचा माणूस आहे. त्याच्या उत्साहाला तर जणुकांही सीमाच नाही. सगळी बोट पालथी घालून त्या

लोकांनी एक भयंकर मोठा गळ शोधून काढला. तो गळ केवढा मोठा होता म्हणून सांगूं ? आपल्याकडे एखादे वेळीं चुकून विहिरींत कळशी-बादली पडली म्हणजे ती काढण्यासाठी आपण गळ वापरतों ना, त्याच्याहिपेक्षा कितीतरी पटीने मोठा हा गळ होता. त्या गळाला त्या मंडळींनीं एक शेरभर मांस एका दोरीने घट्ट बांधलें आणि त्याला एक मजबूत तार बांधण्यांत आली. सहा फुटांची जागा सोडून त्या तारेला, ती तरंगावी म्हणून एक लाकडी फळी बांधण्यांत आली. मग त्या फळीसह तो गळ पाण्यांत सोडण्यांत आला. आम्ही येथे पोहोचल्यापासून आमच्या बोटीवर पहारा द्यायला पोलिसांची एक नाव उभी आहे. बोटीवरच्या व किनाऱ्यावरच्या लोकांचा परस्परांना स्पर्श होऊं द्यायचा नाही हें त्यांचें काम आहे. त्या नावेवरचे ते दोन शिपाई हात-पाय ताणून गाढ झोपले होते. हें पाहून आमच्या बोटीवरचे लोक त्यांचा तिरस्कार करीत होते. पण या वेळीं त्यांनी आमचें खूपच काम केलें. मित्रासारखे ते आम्हांला उपयोगी पडले. बोटीवरच्या प्रचंड आरडाओरड्यामुळे नावेंतला एक अरब पोलीस जागा झाला आणि डोळे चोळून उभा राहिला. त्याला वाटलें की कांहीतरी भानगड झाली, म्हणून तो आपला गणवेष सावरून तयार झाला. पण तेवढ्यांत बोटीवरच्या लोकांचें काय म्हणणें आहे तें त्याच्या लक्षांत आलें. गळाला जी फळी बांधली होती ती जरा दूर सरकविण्याविषयी बोटीवरचे लोक त्याला विनंती करीत होते. 'अरे राम, येवढ्यासाठीच का इतका हा आरडाओरडा ! मला वाटलें काय झालें !' विशेष कांही घडलें नाहीसें पाहून त्या अरब शिपायाने एक समाधानाचा सुस्कारा सोडला आणि आपली रुंद जिवणी आणखीच रुंदावून तो हसला. मग त्याने एक लांब दांडा उचलून

गळाला वांधलेली ती फळी दूर ढकलली. इकडे, आमची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. पायांच्या पंजावर उभे राहून, मान उंच करून, कठडयावर वाकून, आम्ही शार्क केव्हा दिसेल म्हणून वाट पाहत होतों. "सचकितनयनं पश्यति तव पन्थानम्"* अशी आमची स्थिति झाली होती. ज्याची उत्सुकतेने वाट पाहिली जाते तो बहुधा लवकर येत नाही असाच आपल्याला व्यवहारांत अनुभव येतो, नव्हे का ? येथेहि आमचें तसेंच झालें. स्पष्ट शब्दांत सांगायचें म्हणजे "सखि श्याम न आये !" पण सर्व दुःखाचाहि शेवट असतोच. त्याप्रमाणेच झालें. एकाएकी बोटीपासून शंभर गज अंतरावर भिस्त्याच्या कातडी पिशवीसारखें परंतु आकाराने खूप मोठें असें कांहीतरी पाण्यावर आलेलें दिसलें. त्याबरोबर एकच गर्जना उठली—"तो पाहा शार्क!" "अरे पोरांनो, जरा चुप राहा नाहीतर शार्क पळून जाईल." "अहो, तुम्ही मंडळी ! तुम्ही त्या आपल्या पांढऱ्या टोप्या थोडा वेळ उतरवून कां नाही ठेवीत ? त्यांना पाहून शार्क एखादे वेळीं बिचकायचा !" बोटीवर अशा आरोळ्या उठत असतांनाच तो खाऱ्या समुद्राचा रहिवासी, तो मत्स्यराज शार्क, गळाला लागलेलें तें शूकरमांस गिळंकृत करण्यासाठी, शिडांत वारा भरलेलें एखादे जहाज धावतें तसा सपाट्याने पुढे आला. शार्कच्या जबडयांत आणि आमिषांत केवळ सातआठ फूट अंतर उरलें होतें. पण त्याच्या त्या प्रचंड शेपटीने एक फटकारा मारला आणि सरळ येण्याऐवजी तो देह बाजूला वळला. अरेरे ! गेला, शार्क निघून गेला. तितक्यांत शेपटीने पुन्हा एक फटकारा मारला आणि त्या मत्स्यराजाचा प्रचंड देह पुन्हा सरळ होऊन गळासमोर आला. आता पाहा तो गळाकडेच सरकतो आहे.

* जयदेवकृत 'गीतगोविंदा'ची एक ओळ

त्याने जबडा पसरला, आणि आता तो आमिषावर झडप मारणार इतक्यांत पुन्हा त्या दुष्ट शेपटीने फटकारा मारला आणि थोडासा वळसा घेऊन शार्कने आपला देह दूर नेला. अरे, पण पुन्हा त्याने वळण घेतलें. पुन्हा तो इकडे येतो आहे. पुन्हा त्याने जबडा उघडला आहे. अरे पाहा पाहा, तें आमिष ओढलें त्याने आपल्या जबड्यांत ! आता तो थोडासा एका अंगाला कलल्यासारखा झाला आहे. होय. त्याने आमिष गिळलें. ओढा, ओढा; चाळीस-पन्नास लोक या. एकदम ओढा. सगळें बळ लावून ओढा ! त्या माशाच्या अंगीं केवढें राक्षसी सामर्थ्य आहे ! तो किती धडपडत आहे ! केवढा मोठा त्याचा तो जबडा त्याने वासला आहे! ओढा, ओढा ! आता तो पाण्याच्या पृष्ठभागावर येणार. तो पाहा, तो पाण्यांत वळसे घेतो आहे. पुन्हापुन्हा तो बाजूला कलतो आहे. ओढा, ओढा ! अरेरे ! त्या गळापासून त्याने आपल्याला सोडवून घेतलें. झालें. शार्क पळाला. खरोखर, कसे लोक आहांत तुम्ही! नुसता गोंधळ घातलांत. जरा त्याला आमिष गिळूं तर द्यायचें, थोडें थांबला असतां तर काय हरकत होती ! तो जरा कलला न कलला तोंच घाई करून तुम्हीं ओढायला सुरवात केली. बरें जाऊं द्या, झालें तें झालें. गेल्याचा शोक करून उपयोग नाही.

तो शार्क त्या गळापासून मुक्त झाला आणि सरळ पुढे पळाला. आता त्याने आपल्या वाटाड्या माशांची कशी काय हजेरी घेतली कोण जाणे ! ती वार्ता कांहीं आम्हांला कळली नाही. पण तो शार्क अगदी सहीसलामत सुटला येवढें मात्र खरें. तो शार्क वाघासारखा दिसत होता. वाघाच्या अंगावर पट्टे असतात तसे त्याच्या अंगावर काळे पट्टे होते. तें कांहीहि असलें तरी, पुन्हा त्या गळाशीं प्रसंग नको अशा विचाराने आमचे ते ‘वाघोबा’

आपल्या वाटाड्यांच्या आणि चोषकांच्या सेनेसह ताबडतोब अंतर्धान पावले.

पण म्हणून अगदीच कांही निराश होण्याचें कारण नाही. कारण ज्या बाजूने तो वाघोबा शार्क गेला ना, त्याच बाजूने चपट्या डोक्याचा दुसरा एक अजस्र प्राणी येत आहे. अरेरे, त्या बिचाऱ्या शार्क माशांना बोलतां येत नाही. अन्यथा आपल्या त्या 'वाघोबा'ने खुल्या दिलाने आपले अनुभव त्या नवागताला सांगितले असते आणि धोक्याचा इषारा दिला असता. तो निश्चितच म्हणाला असता, "मित्रा, जरा सांभाळून जा बरें. येथे एक नवा प्राणी आला आहे. त्याचें मांस मोठें खमंग आणि चवदार आहे, पण त्याचीं हाडें किती कठीण आहेत म्हणून सांगूं! अरे याच समुद्रांत मी लहानाचा मोठा झालों; जिवंत, मेलेले, अर्धमेलेले असंख्य प्राणी मीं पचविलें; त्यांच्याबरोबर कितीतरी हाडें, विटा, दगड, लाकडी सामान यांनाहि मीं माझ्या पोटांत स्थान दिलें; पण बाबारे, आत्ता जो हाडांचा टणकपणा मीं पाहिला तो कांही अजबच होता. त्याच्यापुढे वर वर्णन केलेले टणक पदार्थ लोण्या-सारखे ठरावेत. हें पाहिलेंस माझ्या दातांचें आणि जबड्याचें नुसतें खोबरें झालें आहे." असें म्हणून त्या 'वाघोबा'ने त्या नवागताला जवळजवळ अर्ध्या शरीराएवढे ते आपले अक्राळविक्राळ जबडे उघडून दाखविले असते. आणि मग त्या दुसऱ्यानेहि आपल्या अनुभवबहुल प्रौढ वयास अनुसरून, समुद्रोद्भव अमोघ औषधींची त्याला माहिती सांगितली असती—"तुम्ही असें करा, अमुक माशाचें यकृत सेवन करा; किंवा तमक्या माशाची प्लीहा भक्षण करा, तुम्ही कालवाचें कढण प्या; तें जरा शामक असतें" वगैरे वगैरे. पण असें कांहीच घडलें नाही. त्यावरून आपल्याला असा

तर्क करणें भाग आहे की एक तर शार्क माशांची भाषाच नसावी किंवा असली तरी पाण्याखाली बोलणें त्यांना अशक्य असावें. तेव्हा शार्क मंडळींना योग्य अशा अक्षरांचा जोंपर्यंत शोध लागत नाही तोंपर्यंत त्यांचा भाषाव्यवहार अशक्यच आहे. किंवा असेंहि असेल की आपला हा 'वाघोबा' आता बराच वेळ मनुष्यप्राण्यांच्या सहवासांत राहिल्यामुळे त्यालाहि त्यांचा वाण लागला असेल. त्यामुळे खरें सांगायच्या ऐवजी त्याला वाटलें असेल की याचीहि आपल्यासारखी फजिती होऊं द्यावी ;—आणि अशा विचाराने स्मित करून त्याने त्या 'चपटचा'ला नुसताच रामराम ठोकला असेल.

बंगालींत ती एक कविता आहे. "पुढे शंख फुंकीत भगीरथ-राजा चालला आहे आणि त्याच्या मागोमाग गंगा येत आहे" वगैरे. अर्थात् इथें कांही शंख फुंकलेला ऐकूं येत नाही, पण त्यांत वर्णन केल्याप्रमाणेच पुढे वाटाडे चालले आहेत आणि त्यांच्या मागोमाग भल्या मोठ्या अवजड शरीराचा 'चपटचा' येत आहे. त्याच्या अवतीभवती चोषक मासे नाचत आहेत. अहाहा, दिसलें, आमिष दिसलें. अशा चवदार आमिषाचा मोह कोण टाळूं शकतो ? समुद्राच्या पृष्ठभागावर, जवळजवळ पांच गज चौरसचौरस जागेंत चरबीचा तवंग पसरला होता. आणि त्याचा सुगंध किती दूरवर दरवळत होता हें त्या 'चपटचा'लाच ठाऊक. अहो, दिसायलासुद्धा तें आमिष किती सुंदर दिसत होतें !—पांढरें, लाल, पिवळें. एकाच ठायीं सगळ्या रंगांची गर्दी. गळाला लावलेलें तें मांस अस्सल इंग्रजी डुकराचें होतें. कोणाहि प्राण्याला तें खाण्याचा मोह व्हावा अशा आकर्षक स्वरूपांत तें पाण्याखाली लोंबकळत होतें.

हां, आता अगदी गुपचुप राहा. कोणीहि बोलूं नका. उगीच इकडेतिकडे फिरूं नका. ओढायला तयार राहा, पण उगीच घाईहि

करूं नका. हं, दोराच्या जवळपासच राहा बरें का, दूर जाऊं नका.. आला, तो पाहा गळाजवळ आला. तें आमिष आपल्या जबड्यांत ओढून त्याने त्यांचें परीक्षण चालविलें आहे. करूं द्या त्याला खूप परीक्षण. हां, थांबा, तो आता कलला. झुकला एका बाजूला. तो सगळेंच्या सगळें आमिष एकदम गिळतो आहे. गिळूं द्या त्याला. आणि मग तो 'चपटचा' एका बाजूला कलला आणि त्याने आरामांत तें सगळेंच्या सगळें आमिष गिळून टाकलें आणि मग तो ऐटींत पुढे जाऊं लागला. तोंच कोणींतरी त्याला मागें ओढलें. 'चपटचा' चकित झाला. त्याने आपल्या डोक्याला एक झटका दिला आणि तें आमिष तोंडाबाहेर फेकण्याचा प्रयत्न केला, पण त्यामुळे गळ त्याच्या तोंडांत अधिकच अडकला. तो गळ त्याला टोचूं लागला आणि वरून दोर ओढला जाऊं लागला. तरुण, म्हातारे, सगळे भिडले. तें पाहा डोकें पाण्यावर आलें. ओढा, बंधूंनो ओढा आणखी, आता त्याचें अर्धें शरीर पाण्याबाहेर आलें. अबब ! केवढे मोठे हे त्याचे जबडे ! असें वाटतें कीं, तोंड आणि गळा यांचेंच त्याचें सगळें शरीर बनलें आहे. ओढा, आणखी ओढा, तो पाहा वर आला. त्याचें सगळें शरीर पाण्याबाहेर निघालें. तो पाहिलांत, गळ त्याच्या जबड्यांत कसा खोलवर रुतला आहे—ओढा आणखी. पण जरा थांबा; अहो अरब पोलीस दादा, आमचें एक काम करतां का ? ही एक दोरी तेवढी त्या शार्कच्या शेपटीला बांधून द्या. केवढा तो अजस्र राक्षसी देह ! त्याला दोन्हीकडून बांधल्याशिवाय का तो वर ओढला जाणार आहे ? मात्र जरा सांभाळून बरें का बाबांनो, त्या शेपटीचा एक फटकारा बसल्याबरोबर घोड्याची तंगडीसुद्धा मोडते म्हणतात ! ओढा, ओढा,—अबब, किती अवजड प्राणी आहे हा ! हरे राम, हें काय आणखी दिसतें आहे ? त्या शार्कच्या

पोटाखाली हें काय लोंबतें आहे ? तीं त्याचीं आंतडींच तर नाहीत ना ? होय आंतडींच आहेत. त्याच्या शरीराच्या प्रचंड भारानेच तीं बाहेर आलीं आहेत. तर मग असें करा, कापा तीं आतडीं. पडूं द्या तीं समुद्रांत. तेवढेंच वजन जरा हलकें होईल. ओढा बंधूंनो, जोराने ओढा ! अबब, केवढी ही रक्ताची चिळकांडी उडाली. आता जें काय झालें तें झालें. आता कपड्यांची काळजी करण्यांत काय अर्थ ? ओढा आणखी, आलाच समजा आता वर. हां, आता टाका त्याला डेकवर आडवा. पण सांभाळा बरें. अजूनहि फार जपून वागायला हवें. अजूनहि त्याने जर उसळी मारली आणि कोणावर हल्ला केला तर पूर्ण हात तुटला म्हणून समजा. विशेष म्हणजे त्या शेपटीपासून दूर राहा. हां, आता दोराला द्या ढील.––धप्प ! अबब ! केवढा मोठा हा शार्क ! बोटीच्या डेकवर तो आदळला तेव्हा केवढा मोठा आवाज झाला ! अहो आता आणखी किती जपूनजपून वागणार ! व्हा पुढे, आणि हाणा तें दांडकें त्याच्या डोक्यांत. शिपाईदादा, तुम्ही आहांत सैनिक. तुम्हांलाच हें काम जमेल. " त्यांत काय मोठेसें. आत्ता घ्या." तो सैनिक प्रवासी लगेच पुढे झाला. त्याचे सगळे कपडे रक्ताने माखले होते, पण त्याला त्याची पर्वा नव्हती. त्याने एक जाड बल्ली उचलली आणि तो त्या शार्कच्या डोक्यावर दणादण घाव घालीत सुटला. बायका किंचाळूं लागल्या––" देवा ! किती निर्दय लोक आहेत हे ! नका हो त्याला असें मारूं ! " इत्यादि इत्यादि. पण म्हणून त्या तेथून निघून गेल्या म्हणतां काय ? मुळीच नाही. त्यांनी तें दृश्य पाहणें चालूंच ठेवलें ! त्या भयानक दृश्याचें वर्णन आता इतकेंच पुरें. त्या शार्कचें पोट कसें फाडण्यांत आलें ; रक्ताचा भला मोठा पाट कसा वाहिला ; तो राक्षसी प्राणी अगदी ठार

झाल्यावरहि आपल्या शरीराला किती दीर्घ काळ हिसके देत होता; आंतडी, हृदय आदि अवयव काढून घेतल्यानंतरहि त्याच्या उसळ्या मारणें कसें चालू होतें; हाडें, कातडीं, मांस, लाकडें आदि त्याच्या पोटांतून बाहेर पडणाऱ्या वस्तूंचा केवढा ढीग लागला;— वगैरे विषय आता राहूं द्या. इतकें सांगितलेलें पुरें की त्या दिवशीं मला जेवण कांही धड गेलें नाही. सर्व वस्तूंना शार्कचाच वास येत होता.

### सुएझ कालवा

हा सुएझ कालवा म्हणजे कालवे खोदण्याच्या कलेचा एक मोठा विजयच आहे. फर्डिनंड डी लेसेप्स नांवाच्या एका फ्रेंच एंजिनिअरने तो खणला. या कालव्याच्या योगाने भूमध्यसमुद्र आणि लाल समुद्र जोडून, त्याने युरोप आणि भारत यांमधील व्यापारी दळणवळण अगदी सोयीचें करून टाकलें.

### भारताशीं व्यापार केल्यानेच सर्व देशांची उन्नति झाली.

मानवजातीच्या सभ्यतेचें आज जें रूप दिसत आहे त्याच्या प्राचीन कालापासूनच्या कारणांपैकी एक महत्त्वाचें कारण आहे अन्य देशांचे भारताशीं प्रस्थापित झालेले व्यापारी संबंध. धनधान्यसमृद्धि आणि उद्योगधंदे यांच्या क्षेत्रांत भारताने अत्यंत प्राचीन काळापासून इतर सर्व देशांवर मात केली आहे. शंभर वर्षांपूर्वीपर्यंत कापड, कापूस, ताग, नीळ, लाख, तांदूळ, हिरे, मोती आदि पदार्थांची जगाला जेवढी गरज पडली तेवढी भारतानेच पुरविली. भारताइतकें उत्कृष्ट रेशमी, लोकरी व किनखापाचें कापड कोठेहि तयार होत नसे. लवंग, वेलदोडे, मिरें, जायफळ, जायपत्री, आदि मसाल्याचे पदार्थ याच भारतांत निर्माण होत असत. त्यामुळे फार प्राचीन काळापासून आपोआपच असें झालें की जे जे देश सभ्य होत गेले

ते ते देश वरील सर्व पदार्थांसाठी भारतावर अवलंबून राहूं लागले.

**भारतांत येण्याचे मार्ग**

हा व्यापार दोन मार्गांनी होत असे. एक तर अफगाणिस्तान, इराण आदि देशांतून स्थलमार्गाने, किंवा लाल समुद्रांतून जलमार्गाने. इराण देश जिंकल्यावर शिकंदरने सिंधूच्या मुखांतून निघून महासागर पार करून लाल समुद्रांत पोहोचविणारा मार्ग शोधण्यासाठी, नियार्कस नांवाचा एक सेनापति मुद्दाम नियुक्त केला होता. बाबिलोन, इराण, ग्रीस, रोम आदींचें ऐश्वर्य भारताशीं त्यांच्या होणाऱ्या व्यापारावर किती अवलंबून होतें याची अधिकांश लोकांना कल्पना नाही. रोमच्या पतनानंतर, मुसलमानी प्रदेशांतील बगदाद, आणि इटलींतील व्हेनिस व जिनोआ या भारतीय व्यापारी मालाच्या पश्चिमेकडील प्रमुख पेठा बनल्या. पुढे जेव्हा तुर्कांनी रोमन साम्राज्य जिंकलें आणि इटलींतील लोकांना जेव्हा भारतांत जाण्याचा मार्ग बंद करण्यांत आला तेव्हा स्पेननिवासी, किंवा खरें म्हणजे जिनोआनिवासी ख्रिस्तोफर कोलंबसने अटलांटिक महासागर ओलांडून भारतांत पोहोचण्याचा नवा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. त्याच प्रयत्नांत अमेरिका खंडाचा शोध लागला. अगदी अमेरिकेंत पोहोचल्यानंतर देखील, आपण हिंदुस्थानांतच पोहोचलों आहोंत असें कोलंबसला वाटत होतें. म्हणूनच अमेरिकेच्या मूळ रहिवाशांना 'इंडियन्स' हें नांव पडलें. तें आज देखील चालू आहे. वेदांमधे, सिंधुनदीसाठी 'सिंधु' आणि 'इंदु' अशीं दोन्हीं नांवें प्रयुक्त केलेलीं आपल्याला आढळतात. इराणच्या लोकांनी त्याचें 'हिंदु' असें रूपान्तर केलें. ग्रीक लोकांनी त्याला 'इंडस' बनविलें. त्यापासूनच 'इंडिया' 'इंडियन्स' हे शब्द बनले. मुसलमानी धर्माच्या उदयापासून 'हिंदु' या शब्दाला हीनत्व प्राप्त झालें.

'काळ्या कातडीचा माणूस' अशा अर्थाने तो त्यांनी रूढ केला. आजकाल जसा 'नेटिव्ह' हा शब्द हीनत्व दर्शविण्यासाठी वापरण्यांत येतो ना, तसाच.

### युरोपीय सभ्यतेवरील भारताचें ऋण

मध्यंतरींच्या काळांत पोर्तुगीजांनी एक नवाच रस्ता हुडकून काढला. आफ्रिका खंडाला वळसा घालून ते भारतांत पोहोचले. भारताच्या लक्ष्मीची पोर्तुगालवर कृपा झाली. त्यानंतर फ्रेंच, डच, डॅनिश आणि इंग्रज लोक आले. भारताचा व्यापार, भारताचा जमीनमहसूल आणि इतर सर्वकांही आता इंग्रजांच्या ताब्यांत आहे; म्हणूनच ते आज सर्व राष्ट्रांमध्ये अग्रगण्य झाले आहेत. पण आता काळ बदलला आहे. खास भारताच्या म्हणून ज्या वस्तु होत्या त्या आता अमेरिकेंत आणि अन्य देशांतहि उत्पन्न होऊं लागल्या आहेत–हिंदुस्थानांतील वस्तूंपेक्षाहि चांगल्या होऊं लागल्या आहेत. त्यामुळे भारताची ती पूर्वीची प्रतिष्ठा आता राहिली नाही. भारताला एके काळीं असें सन्मान्य स्थान असल्याचें युरोपियन लोक मात्र अमान्य करतात. हा हिंदुस्थान, हा 'नेटिव्ह' लोकांचा देश, हाच त्यांच्या संपत्तीचा व संभ्यतेचा मुख्य आधार आहे हें सत्य मान्य करण्यास ते तयार नाहीत; हें सत्य समजून घ्यायलाहि त्यांची तयारी नाही. पण आपण आपल्याकडून तें सत्य त्यांच्या मनावर ठसविण्याचा अविरत प्रयत्न करीत राहिलें पाहिजे.

### भारतांतील खालच्या वर्गांतील लोक वंदनीय आहेत.

थोडासा विचार तर करून पाहा. भारतांतील तो उपेक्षित खालचा वर्ग–ते शेतकरी, ते विणकर आणि ते इतर लोक. काय ही त्यांची स्थिति! परकीयांनी त्यांना जिंकलें. त्यांच्याच देशांतील 'श्रेष्ठ' जातींनी त्यांना हीन लेखलें. फार प्राचीन काळापासून ते

शांतपणें अविरत खपले; त्यांना पुरी मजुरीहि मिळाली नाही! पण निसर्गनियमानुसार, हळूहळू आता सगळ्या जगांत किती परिवर्तन होत आहे! देशोदेशीं क्रांत्या होत आहेत. सभ्यतांची उलथापालथ होत आहे; विभिन्न देशांचें व लोकांचें वर्चस्व झुगारलें जात आहे. अहो भारतांतील श्रमिकांनो, बाबिलोन, इराण, अलेक्झांड्रिया, ग्रीस, रोम, व्हेनिस, जिनोआ, बगदाद, समरकंद, स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, डेन्मार्क, हॉलंड आणि इंग्लंड या सगळ्यांना क्रमाक्रमाने तुमच्या नीरव व अखंड परिश्रमाने वर्चस्व आणि महत्त्व लाभलें. आणि तुम्ही?---तुमच्याबद्दल विचार करायची सवड कोणाला आहे? स्वामीजी, तुमच्या पूर्वजांनी कुठे तत्त्वज्ञानाचे दोन ग्रंथ लिहिले अथवा दहाबारा महाकाव्यें लिहिलीं अथवा कांही मंदिरें बांधलीं, तर तुम्ही त्यांचा केवढा गवगवा करतां आणि किती डंका पिटतां! पण ज्यांनी आपल्या हृदयांतील रक्ताचें सिंचन करून जगांत घडलेल्या सगळ्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला त्यांची स्तुति कोण करतो? आध्यात्मिकता, युद्ध आणि काव्य या क्षेत्रांत जगज्जेते ठरणाऱ्या वीरांना सगळें जग मानवंदना देते. थोर पुरुष म्हटलें की हेच जगज्जेते डोळ्यापुढे उभे राहतात. पण ज्यांच्याकडे कोणी बघत नाही, ज्यांना कोणी प्रोत्साहन देत नाही, ज्यांचा सर्वजण तिरस्कार करतात, त्यांच्या ठिकाणीं अशा परिस्थितींतहि अपार सहनशीलता, अनंत प्रेम आणि निर्भय कार्यशीलता दिसून येते, असा हा आपला गरीब वर्ग आजहि कर्तव्यदक्ष आहे. थोडीहि कुरकुर न करतां रात्रंदिवस तो घरोघरीं उद्योगांत गढलेला आहे—या त्याच्या कार्यांत काय वीरत्व नाही? एखादें महत्कार्य समोर आलें म्हणजे अनेक लोक वीर बनतात. हजारो लोकांनी वाहवा केली म्हणजे एखादा भित्रासुद्धा सहज

आपले प्राण अर्पण करतो आणि अत्यंत स्वार्थी माणूससुद्धा निष्काम कर्म करतो. पण कोणी पाहायला नसतांनाहि जे लहान-सहान कामेंहि तितक्याच निःस्वार्थपणाने आणि कर्तव्यबुद्धीने करतात तेच खरोखर धन्य होत. भारतांतील चिरपददलित श्रमिक वर्गांनो, तुम्हीच हें प्रत्यक्ष करून दाखवीत आहांत. मी तुम्हांला वंदन करतों.

### सुएझ कालव्याचा इतिहास

या सुएझ कालव्याचा सुद्धा फार जुना इतिहास आहे. इजिप्तमधे फेरो राजे राज्य करीत असतां समुद्राचें खारें पाणी आंत येऊन बनलेलीं अनेक सरोवरें वा खाजणी येथे होत्या. लहान-मोठे पाट काढून त्या एकमेकींना जोडल्या होत्या. अशा रीतीने दोन्ही समुद्रांना स्पर्श करणारा कालवा तयार झाला. इजिप्तमधे जेव्हा रोमन साम्राज्य आलें तेव्हाहि तो कालवा वाहता ठेवण्याचे त्यांनी एकसारखे प्रयत्न केले. नंतर अमरु नांवाच्या मुसलमान सेनापतीने इजिप्त देश जिंकला. त्याने कालव्यांतील वाळू खोदून काढली व त्यांत इतकें परिवर्तन घडवून आणलें की त्याचें मूळ स्वरूप जवळजवळ पार बदलून गेलें.

### सुएझमधून जहाजें जाण्यायेण्याची व्यवस्था

त्यानंतर या कालव्याकडे कोणींहि विशेष लक्ष दिलें नाही. हल्ली आपल्याला दिसतो आहे या रूपांत हा कालवा इजिप्तच्या इस्माइल नामक खेदिवाने खोदविला. हा तुर्कस्थानच्या सुलतानाचा राजप्रतिनिधि होता. त्याने हें कालव्याचें काम फ्रेंच लोकांच्या सल्ल्याने केलें आणि त्या कामासाठी अधिकांश भांडवलहि त्याला फ्रेंचांनीच दिलें. हा कालवा वालुकामय प्रदेशांत आहे. त्यामुळे, वारंवार वाळूने भरून जाणें ही त्याच्या बाबतींत

एक फार मोठी अडचण आहे. या कालव्यांतून मोठें व्यापारी जहाज एका वेळेला एकच जाऊं शकतें. फार मोठी युद्धनौका किंवा फार मोठें व्यापारी जहाज कांही या कालव्यांतून जाऊं शकत नाही असें म्हणतात. येणाऱ्या जाणाऱ्या जहाजांची टक्कर होऊं नये म्हणून आता या कालव्याचे अनेक विभाग पाडले आहेत. प्रत्येक विभागाच्या शेवटीं खूप रुंद अशी मोकळी जागा ठेवली आहे. वेळ आली तर त्या जागेंत दोनदोन तीनतीन जहाजें नांगरून उभीं राहूं शकतात. भूमध्यसमुद्राच्या प्रवेशाजवळ याचें मुख्य कार्यालय आहे. आणि आगगाडीचीं स्टेशनें असतात तशीं प्रत्येक विभागांत स्टेशनें ठेवलीं आहेत. एखाद्या जहाजाने कालव्यांत प्रवेश करतांच मुख्य कार्यालयांत तारेने सतत संदेश पाठविणें सुरू होतें. किती जहाजें येत आहेत, किती जात आहेत, कोणतें जहाज कोणत्या वेळेला कुठे आहे आदि जहाजांच्या हालचाली दर्शविणारा एक मोठा नकाशा मुख्य कार्यालयांत असतो. विरुद्ध दिशेने जाणारीं दोन जहाजें समोरासमोर येऊन मार्ग अडूं नये या दृष्टीने, पुढील स्टेशनावरून मार्ग बिनधोक असल्याची सूचना आली म्हणजेच जहाजाला आपलें स्टेशन सोडतां येतें.

सुएझ कालवा फ्रेंचांच्या ताब्यांत आहे. जरी कॅनॉल कंपनीचे अधिकांश शेअर्स आज इंग्रजांनी घेतलेले आहेत तरी एका राजकीय करारानुसार कालव्याची सगळी व्यवस्था फ्रेंचांच्या हातीं ठेवण्यांत आली आहे.

### भूमध्यसमुद्राचा किनारा—आधुनिक सभ्यतेचें जन्मस्थान

आता आम्ही भूमध्यसमुद्रांत येऊन पोहोचलों. इतक्या स्मृतींशीं निगडित असलेला भूभाग भारताबाहेर इतरत्र आढळत नाही. आशिया व आफ्रिका खंडांची आणि प्राचीन सभ्यतेची

सीमा येथे संपते. एका प्रकाराच्या रीतीभाती, रूढि आणि जीवन-प्रणाली येथे संपतात, आणि चेहरेमोहरे, स्वभाव, अन्नवस्त्र, चालीरीती, सवयी यांचे दुसरेच नमुने येथून दिसूं लागतात. येथून आपण युरोपांत प्रवेश करतों. इतकेंच नव्हे तर वर्ण, वंश, संस्कृति, सभ्यता, रीतीभाती यांच्या मिश्रणाचें हें ऐतिहासिक केंद्र आहे. येथे शतकानुशतकें चाललेल्या मिश्रणांतूनच आधुनिक सभ्यता निर्माण झाली आहे. ज्या धर्माने, संस्कृतीने, सभ्यतेने आणि सामर्थ्याने आज सगळें जग व्यापलें आहे, त्या सर्वांचा जन्म या भूमध्यसमुद्राच्या आसमंतांतच झाला.

तो पाहा, तिकडे दक्षिणेकडे अतिप्राचीन इजिप्त देश आहे. प्राचीन काळीं हा इजिप्त देश धनधान्याने समृद्ध होता, मूर्तिकलेचें तें माहेरघर होतें. इकडे पूर्वेला आशियामायनर आहे. फोनिशियन, फिलिस्टाइन, यहुदी, पराक्रमी बाबिलोनियन, असीरियन व इराणी सभ्यतांची आशियामायनर ही प्राचीन क्रीडाभूमि आहे. आणि उत्तरेला आहे अत्यंत आश्चर्यकारक अशा ग्रीक लोकांचा देश.

### जगाचा जुना इतिहास

स्वामीजी, मला वाटतें आतापर्यंत मीं देश, नद्या, पर्वत आणि समुद्र यांच्याविषयी खूपच लिहिलें. आता थोडासा प्राचीन इतिहास ऐका. शतकानुशतकांचा तो इतिहास अनेक अद्भुत कथांनी भरलेला आहे. अतिशय अद्भुत असला तरी हा इतिहास म्हणजे कादंबरी नाही, तो सत्य आहे. मानवजातीचा तो खरा इतिहास आहे. हे प्राचीन देश अनंत काळापासून विस्मृतीच्या धुक्यांत लोप पावले होते. प्राचीन ग्रीक इतिहासकारांनी सांगितलेल्या अद्भुत काल्पनिक कथा आणि यहुदी लोकांच्या बायबल नामक पुराणांतील

चमत्कारपूर्ण वर्णनें हीच काय ती त्या प्रदेशांतील लोकांची माहिती उपलब्ध होती. आता दगड, इमारती, खोल्या, कौलें आदींवर आढळलेले जुने लेख, आणि भाषाशास्त्रीय विश्लेषण हीं त्या देशांचा विपुल इतिहास सांगत आहेत. त्यांचें हें कथन आताच सुरू झालें आहे, पण येवढ्यांतच त्यांतून अनेक अद्‌भुत गोष्टी प्रकट झाल्या आहेत. भविष्यकाळांत आणखी काय काय त्यांतून निघेल हें कोणीं सांगावें ? देशोदेशींचे महापंडित या कामांत रात्रं-दिवस गुंतले आहेत. खडकावरील एखादा लहानसा लेख, एखादें फुटकें भांडें, एखादी इमारत किंवा एखादें कौल यावरील लेख वाचून ते त्यावर आपलें डोकें लढवितात आणि विस्मृतीच्या गर्तेंत दडून बसलेल्या प्राचीन काळच्या कथा प्रकाशांत आणतात.

### प्राचीन ग्रीस व रोम यांचा संबंध

उस्मान नामक मुसलमान नेत्याने जेव्हा कॉन्स्टॅन्टिनोपल घेतलें आणि इस्लामची विजयपताका जेव्हा सगळ्या पूर्व युरोप-वर फडकूं लागली तेव्हा ग्रीक लोक आपले प्राण वांचविण्यासाठी पश्चिम युरोपांत पळाले. प्राचीन ग्रीक लोकांचे जे ग्रंथ, जी विद्या आणि जी संस्कृति त्यांच्या दुर्बल वंशजांजवळ दडून राहिलेली होती ती या पळून जाणाऱ्या ग्रीकांबरोबर पश्चिम युरोपांत पसरली. फार दीर्घ काळपर्यंत रोमचेंच ग्रीकांवर राज्य होतें, पण विद्या आणि संस्कृति यांच्या बाबतींत ग्रीकच रोमन लोकांचे गुरु होते. ग्रीकांची रोमन लोकांवरील ही पकड फार जबरदस्त होती. इतकी की, ग्रीक लोक ख्रिस्ती झाल्यामुळे आणि ख्रिस्ती लोकांचें बायबल ग्रीक भाषेंत लिहिलें गेल्यामुळे सर्व रोमन साम्राज्यावर ख्रिस्ती धर्माचा पगडा बसला. पण ज्यांना आपण 'यवन' म्हणतों व जे युरोपीय सभ्यतेचे आदिगुरु होते त्या ग्रीक लोकांनी आपली

सभ्यता ख्रिस्ती लोकांच्या कितीतरी पूर्वी फार उच्चकोटीला पोहोचविली होती. जेव्हा ग्रीकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला तेव्हा त्यांची प्राचीन विद्या आणि संस्कृति यांचा लोप झाला. परंतु, हिंदूंच्या घरांत ज्याप्रमाणे आजहि त्यांच्या पूर्वजांची प्राचीन संस्कृति कोणत्या ना कोणत्या रूपांत दृष्टीस पडते त्याचप्रमाणे ख्रिस्ती झालेल्या ग्रीकांजवळ त्यांच्या प्राचीन संस्कृतीचा कांही अंश उरला होता. त्यांच्याजवळ असलेले ग्रंथ सर्व युरोपभर पसरले. इंग्रज, जर्मन, फ्रेंच आणि अन्य राष्ट्रांना सभ्यतेच्या दृष्टीने हीच पहिली चालना मिळाली. सगळ्या युरोपांतील लोकांना ग्रीक भाषा आणि ग्रीक कला शिकण्याचें जणु वेडच लागलें. पहिल्या धडाक्यांत ग्रीकांचीं मिळालीं तीं सगळीं पुस्तकें त्यांनी अधाशासारखीं वाचून काढलीं. त्या पुस्तकांत जें कांही लिहिलें होतें तें त्यांनी तसेंच वाचून काढलें. नंतर त्यांच्या बुद्धीला जसजशी धार येऊं लागली आणि विज्ञानाच्या विविध शाखांत जसजशी प्रगति होऊं लागली तसतसें त्यांनी त्या प्राचीन ग्रंथांचें निर्मितिकाळ, लेखक, विषय, विश्वसनीयता आदि दृष्टींनी संशोधन सुरू केलें. ख्रिस्त्यांच्या धर्मग्रंथांवर वाटेल त्याला वाटेल तें मत देतां येणें शक्य नव्हतें, पण अ-ख्रिस्ती ग्रीकांनी लिहिलेल्या ग्रंथांवर आपलीं मतें स्पष्टपणें प्रकट करण्याला कोणाचीच कांही आडकाठी नव्हती. म्हणून त्यांतून बाह्यांग टीका आणि अंतरंग टीका यांचें एक नवीन शास्त्र निर्माण झालें.

**प्राचीनवस्तुसंशोधनाच्या बाबतींत सत्यासत्याचा निर्णय**

उदाहरणार्थ, समजा एखाद्या पुस्तकांत, अमुक अमुक तारखेला अमुक अमुक घटना घडली असा उल्लेख आहे. पण केवळ एखाद्या ग्रंथांत आढळल्याने एखादें विधान विश्वासार्ह मानावयाचें की काय ? त्या काळीं तर अनेक काल्पनिक गोष्टी ग्रंथनिविष्ट

करण्याची प्रथाच पडली होती. दुसरें असें की त्या काळीं त्यांची निसर्गाविषयीची व पृथ्वीविषयीची माहिती फार अल्प होती. त्यामुळे, कोणत्याहि पुस्तकांत प्रतिपादिलेल्या गोष्टी कितपत विश्वासार्ह मानायच्या याबद्दल तीव्र संदेह उत्पन्न होऊं लागले. एक उदाहरण घेऊं या. समजा एखाद्या ग्रीक इतिहासकाराने, अमक्या अमक्या वर्षी हिंदुस्थानांत चंद्रगुप्त राजा राज्य करीत होता असें लिहून ठेवलें आहे. आता जर हिंदुस्थानांतील ग्रंथांतहि, त्या वर्षी चंद्रगुप्त तेथे राज्य करीत असल्याचे उल्लेख आढळले, तर मग बऱ्याच अंशीं ती गोष्ट सिद्ध झाली असें निश्चितच मानावें लागेल. त्यांतून चंद्रगुप्ताच्या काळचीं कांही नाणीं जर सापडलीं किंवा त्या काळच्या एखाद्या इमारतीवर जर तसा कांही उल्लेख सापडला तर मग त्या गोष्टीची सत्यता पक्कीच सिद्ध झाली.

समजा, दुसऱ्या एखाद्या पुस्तकांत शिकंदरच्या काळांत अमुक गोष्ट घडली असें वर्णन आहे; पण त्या वर्णनांत फार नंतर झालेल्या दोन रोमन सम्राटांचे उल्लेख आहेत; बरें हीं नांवें कोणीं नंतर या वर्णनांत शिरविलीं असतील असेंहि शक्य दिसत नाही. यावरून तें कांही शिकंदरच्या काळचें पुस्तक नव्हे हें निश्चित सिद्ध झालें.

भाषेचा मुद्दाहि असाच महत्त्वाचा असतो. कालान्तराने प्रत्येक भाषेंत कांही ना कांही बदल होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक ग्रंथकर्त्याची स्वत:ची वैशिष्टचपूर्ण अशी कांहीतरी शैली असते. समजा एखाद्या ग्रंथांत, मूळ विषयाशीं संबंध नसलेलें आणि मूळ लेखकाच्या शैलीशीं अगदी विसंगत दिसणाऱ्या शैलींत एखादें वर्णन मधेच आल्याचें आढळलें, तर तो भाग कोणींतरी मागाहून घातलेला म्हणजेच प्रक्षिप्त आहे असा संशय सहजच निर्माण होतो. अशा

सभ्यता ख्रिस्ती लोकांच्या कितीतरी पूर्वी फार उच्चकोटीला पोहोचविली होती. जेव्हा ग्रीकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला तेव्हा त्यांची प्राचीन विद्या आणि संस्कृति यांचा लोप झाला. परंतु, हिंदूंच्या घरांत ज्याप्रमाणे आजहि त्यांच्या पूर्वजांची प्राचीन संस्कृति कोणत्या ना कोणत्या रूपांत दृष्टीस पडते त्याचप्रमाणे ख्रिस्ती झालेल्या ग्रीकांजवळ त्यांच्या प्राचीन संस्कृतीचा कांही अंश उरला होता. त्यांच्याजवळ असलेले ग्रंथ सर्व युरोपभर पसरले. इंग्रज, जर्मन, फ्रेंच आणि अन्य राष्ट्रांना सभ्यतेच्या दृष्टीने हीच पहिली चालना मिळाली. सगळ्या युरोपांतील लोकांना ग्रीक भाषा आणि ग्रीक कला शिकण्याचें जणु वेडच लागलें. पहिल्या धडाक्यांत ग्रीकांचीं मिळालीं तीं सगळीं पुस्तकें त्यांनी अधाशासारखीं वाचून काढलीं. त्या पुस्तकांत जें कांही लिहिलें होतें तें त्यांनी तसेंच वाचून काढलें. नंतर त्यांच्या बुद्धीला जसजशी धार येऊं लागली आणि विज्ञानाच्या विविध शाखांत जसजशी प्रगति होऊं लागली तसतसें त्यांनी त्या प्राचीन ग्रंथांचें निर्मितिकाळ, लेखक, विषय, विश्वसनीयता आदि दृष्टींनी संशोधन सुरू केलें. ख्रिस्त्यांच्या धर्मग्रंथांवर वाटेल त्याला वाटेल तें मत देतां येणें शक्य नव्हतें, पण अ-ख्रिस्ती ग्रीकांनी लिहिलेल्या ग्रंथांवर आपलीं मतें स्पष्टपणें प्रकट करण्याला कोणाचीच कांही आडकाठी नव्हती. म्हणून त्यांतून बाह्यांग टीका आणि अंतरंग टीका यांचें एक नवीन शास्त्र निर्माण झालें.

### प्राचीनवस्तुसंशोधनाच्या बाबतींत सत्यासत्याचा निर्णय

उदाहरणार्थ, समजा एखाद्या पुस्तकांत, अमुक अमुक तारखेला अमुक अमुक घटना घडली असा उल्लेख आहे. पण केवळ एखाद्या ग्रंथांत आढळल्याने एखादें विधान विश्वासार्ह मानावयाचें की काय ? त्या काळीं तर अनेक काल्पनिक गोष्टी ग्रंथनिविष्ट

करण्याची प्रथाच पडली होती. दुसरें असें की त्या काळीं त्यांची निसर्गाविषयीची व पृथ्वीविषयीची माहिती फार अल्प होती. त्यामुळे, कोणत्याहि पुस्तकांत प्रतिपादिलेल्या गोष्टी कितपत विश्वासार्ह मानायच्या याबद्दल तीव्र संदेह उत्पन्न होऊं लागले. एक उदाहरण घेऊं या. समजा एखाद्या ग्रीक इतिहासकाराने, अमक्या अमक्या वर्षी हिंदुस्थानांत चंद्रगुप्त राजा राज्य करीत होता असें लिहून ठेवलें आहे. आता जर हिंदुस्थानांतील ग्रंथांतहि, त्या वर्षी चंद्रगुप्त तेथे राज्य करीत असल्याचे उल्लेख आढळले, तर मग बऱ्याच अंशीं ती गोष्ट सिद्ध झाली असें निश्चितच मानावें लागेल. त्यांतून चंद्रगुप्ताच्या काळचीं कांही नाणीं जर सापडलीं किंवा त्या काळच्या एखाद्या इमारतीवर जर तसा कांही उल्लेख सापडला तर मग त्या गोष्टीची सत्यता पक्कीच सिद्ध झाली.

समजा, दुसऱ्या एखाद्या पुस्तकांत शिकंदरच्या काळांत अमुक गोष्ट घडली असें वर्णन आहे; पण त्या वर्णनांत फार नंतर झालेल्या दोन रोमन सम्राटांचे उल्लेख आहेत; बरें हीं नांवें कोणीं नंतर या वर्णनांत शिरविलीं असतील असेंहि शक्य दिसत नाही. यावरून तें कांही शिकंदरच्या काळचें पुस्तक नव्हे हें निश्चित सिद्ध झालें.

भाषेचा मुद्दाहि असाच महत्त्वाचा असतो. कालान्तराने प्रत्येक भाषेंत कांही ना कांही बदल होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक ग्रंथकर्त्याची स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण अशी कांहीतरी शैली असते. समजा एखाद्या ग्रंथांत, मूळ विषयाशीं संबंध नसलेलें आणि मूळ लेखकाच्या शैलीशीं अगदी विसंगत दिसणाऱ्या शैलींत एखादें वर्णन मधेच आल्याचें आढळलें, तर तो भाग कोणींतरी मागाहून घातलेला म्हणजेच प्रक्षिप्त आहे असा संशय सहजच निर्माण होतो. अशा

रीतीने अनेक प्रकारचे संदेह, संशय, प्रमाणें इत्यादींच्या साहाय्याने ग्रंथाचें सत्यासत्यत्व ठरविण्याचें नवें शास्त्र उदयास आलें.

त्यांत भर म्हणून, अतिशय झपाटयाने प्रगति करणारें आधुनिक विज्ञानहि आलें. या विज्ञानाने सर्व गोष्टींवर विविध बाजूंनी प्रकाश पाडला. त्याचा परिणाम असा झाला की अलौकिक घटनांचीं वर्णनें ज्या ग्रंथांत आलीं ते ग्रंथ पूर्णत: अविश्वसनीय समजले जाऊं लागले.

या सर्वांवर आणखी एका गोष्टीने कडी केली. युरोपमधे संस्कृत भाषेच्या अभ्यासाची जोरदार लाट उसळली. भारतांतील, युफ्रेटिस नदीच्या किनाऱ्यावरील आणि इजिप्तमधील अनेक जुने शिलालेख वाचतां येऊं लागले. जमिनीच्या खाली किंवा टेकडयांच्या बाजूंनी अनेक वर्षांपासून दडलेल्या देवळांचा शोध लागला आणि त्यांच्या इतिहासाचें अधिकाधिक सत्य स्वरूप उपलब्ध होऊं लागलें.

### फ्रेंच पुराणवस्तुसंशोधक मॅस्पेरो

मीं पूर्वीच सांगितलें आहे की त्या नवीन संशोधनशास्त्राने बायबल किंवा 'न्यू टेस्टामेंट' यांसारख्या ग्रंथांना हात लावला नाही. आता मात्र प्राचीन काळांतील त्या भयंकर धार्मिक छळांची कांही भीति उरलेली नाही. आता भीति फक्त समाजाची आहे. पण तिची पर्वा न करतां अनेक विद्वानांनी अशा ग्रंथांचीहि मोठी कडक तपासणी केली आहे. जितक्या निर्दयतेने हिंदूंच्या धर्मग्रंथांचें आणि अन्य धर्मग्रंथांचे ते वाभाडे काढतात तितकीच कर्तव्यकठोरता आणि नीतिधैर्य ते यहुद्यांच्या आणि ख्रिस्त्यांच्या धर्मग्रंथांबद्दलहि दाखवितील अशी आपण आशा करूं या. असें मी कां म्हणतों तें नीट समजावें म्हणून मी एक उदाहरण देतों. मॅस्पेरो नांवाचा एक महापंडित आहे. तो इजिप्तविषयक संशोधनाचा विशेष तज्ज्ञ

७५२०६ ग्रं.प्रका.

१८।३।७९

आहे.त्याने इजिप्शियन आणि बाबिलोनियन लोकांच्या इतिहासावर एक प्रचंड ग्रंथ लिहिला आहे. 'हिस्टॉयर ॲसिएन ओरिएंटेल' असें त्या ग्रंथाचें नांव आहे. कांहीं वर्षांपूर्वी, एका इंग्रज पुराणवस्तुसंशोधकाने केलेलें त्याचें इंग्रजी भाषांतर मीं वाचलें होतें. या पाळीला मीं जेव्हा ब्रिटिश म्युझियममधील एका ग्रंथपालाला इजिप्त आणि बाबिलोन या देशांविषयीच्या ग्रंथांबाबत विचारलें तेव्हा अर्थात् संभाषणाच्या ओघांत मॅस्पेरोच्या पुस्तकाचेंहि नांव आलें. 'त्याचें इंग्रजी भाषांतर माझ्याजवळ आहे' असें जेव्हा मीं त्याला सांगितलें तेव्हा तो म्हणाला, "त्यांत कांही अर्थ नाही. तो भाषांतरकार एक धर्मवेडा ख्रिस्ती माणूस आहे. मॅस्पेरोच्या ग्रंथांत जेथे जेथे त्याला ख्रिस्तीधर्माविरुद्ध कांही आढळलें तेथे तेथे त्या भाषांतरकर्त्याने अशी कांही मुरड घातली आहे की अनेक परिच्छेदांच्या बाबतींत अगदी अर्थाचा अनर्थ झाला आहे." "तुम्ही मूळ फ्रेंच पुस्तक अवश्य वाचा" असें त्याने मला सांगितलें. त्याप्रमाणे मीं जेव्हा ते पुस्तक वाचून पाहिलें तेव्हा अगदी त्याने सांगितल्याप्रमाणेच आढळलें. आता केवढी मोठी ही समस्या उत्पन्न झाली ! धर्मवेड ही किती विचित्र गोष्ट आहे तें तुम्हांला चांगलेंच ठाऊक आहे. धर्मवेड सत्यासत्याची गल्लत करून टाकते. तेव्हापासून तशा संशोधनग्रंथांच्या भाषांतरांवरील माझ्या विश्वासाला मोठाच हादरा बसला.

१८२८

### मानववंशशास्त्र

अलीकडे आणखी एक विज्ञानशाखा विकास पावली आहे. तिला म्हणतात 'मानववंशशास्त्र'. हें शास्त्र कातडीचा रंग, केस, शारीरिक बांधा, डोक्याचा आकार, भाषा आदींच्या साहाय्याने मानवांचें वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करतें.

### निरनिराळ्या देशांतील पंडित

जर्मन लोक तसे तर सर्वच शास्त्रांत प्रवीण आहेत, पण संस्कृत आणि प्राचीन ॲसीरियन संस्कृति यांच्या अभ्यासांत ते विशेषच पारंगत आहेत. बर्गस् आणि अन्य जर्मन विद्वान हे याचें उदाहरण होत. इजिप्तविषयक संशोधनांत फ्रेंच लोक विशेष पारंगत आहेत. मॅस्पेरो इत्यादि विद्वान फ्रेंचच आहेत. यहुद्यांचा धर्म आणि प्राचीन ख्रिस्त्यांचा धर्म या विषयांचें विश्लेषण करण्याच्या कार्यांत डच लोकांनी ख्याति प्राप्त केली आहे. त्यांच्यामधील 'कुना'सारख्या लेखकांना जगन्मान्यता मिळाली आहे. इंग्रज लोक अनेक शास्त्रांची सुरुवात करून देतात आणि मग तीं शास्त्रें सोडून देतात.

या विद्वानांचीं कांही मतें मी तुम्हांला सांगतों. तुम्हांला त्यांचीं तीं मतें जर पटलीं नाहीत तर तुम्ही त्यांच्याशीं खुशाल वाद घाला, मला मात्र कांही दोष देऊं नका.

हिंदु, यहुदी, प्राचीन बाबिलोनियन, इजिप्तवासी आणि अन्य प्राचीन वंश यांची अशी धारणा आहे की सगळी मानवजात म्हणजे एकाच आदिदंपतीची संतति आहे. आधुनिक विद्वान या मताला विशेष मान्यता देत नाहीत.

### निग्रो आणि नेग्रिटो वंश

काळेशार, चपट्या नाकाचे, जाड ओठांचे, कुरळ्या केसांचे आणि खोलगट कपाळाचे काफ्री लोक तुम्हीं कधी पाहिले आहेत काय? अशा वर्णनाच्या त्या लोकांना 'निग्रो' म्हणतात. ते आफ्रिकेंत राहतात. आणि संथाळ, अंदमानांतील लोक आणि भिल्ल लोक तुम्हीं पाहिले आहेत काय? त्यांचाहि चेहरामोहरा जवळजवळ तसाच असतो. पण ते जरा ठेंगणे असतात आणि त्यांचे

केंस थोडे कमी कुरळे असतात. त्यांना 'नेग्रिटो' म्हणजे 'लहान निग्रो' म्हणतात. प्राचीन काळीं हे लोक अरबस्तानच्या कांही भागांत राहत असत. युफ्रेटिसच्या तटावरहि त्यांची कोठे कोठे वसती होती. इराणचा दक्षिण भाग, सगळा हिंदुस्थान, अंदमान आदि बेटें आणि ऑस्ट्रेलिया येथे हेच लोक होते. आता हे लोक हिंदुस्थानांतील कांही जंगलांत, अंदमान बेटांत व ऑस्ट्रेलियांत आढळतात.

### मंगोल आणि मंगोलाइड् वंश

लेपचे, भूटिये, आणि चिनी लोक तुम्हीं पाहिले आहेत काय ? त्यांचा रंग पांढरा किंवा पिवळा असतो. त्यांचे केस काळे व सरळ असतात, त्यांचे डोळे काळे असतात, पण ते सरळ रेषेंत नसतात, त्यांचा परस्परांशीं कोन होत असतो. त्यांना दाढीमिशा कमी असतात. त्यांचा चेहरा चपटा असतो. त्यांचीं गालांचीं हाडें अगदी नजरेंत भरतील अशीं पुढे आलेलीं असतात. या लोकांना 'मंगोल' म्हणतात. आणि तुम्हीं नेपाली, सयामी, ब्रह्मी, मलायी व जपानी लोक पाहिले आहेत काय ? ते मंगोल लोकांसारखेच असतात, पण दिसायला ते जरा लहान असतात. म्हणून त्यांना 'मंगोलाइड्' किंवा 'लहान मंगोल' असें म्हणतात.

हल्ली आशियाचा अधिकांश भाग मंगोल लोकांनीच व्यापलेला आहे. नंतर त्यांच्या अनेक शाखा झाल्या. मोगल, काळचा मुखाचे हूण, चिनी, तार्तर, तुर्क, मांचू, किरगीझ आदि जाति त्यांच्याच शाखा होत. हे लोक भटकें जीवन जगतात आणि आपल्याबरोबर ते नेहमी तंबू बाळगतात. ते मेंढ्या, बकऱ्या, गाईबैल, घोडे आदि जनावरें पाळतात आणि त्यांना जर संधि मिळाली तर टोळधाडीसारखे ते एखाद्या प्रदेशावर तुटून पडतात

आणि सगळें जग उलथेपालथे करून टाकतात. या बाबतींत चिनी आणि तिबेटी लोकांचा मात्र अपवाद आढळतो. हे लोक 'तुराणी' या नांवानेहि ओळखले जातात. 'इराण आणि तुराण' असा वाक्प्रयोग आपल्याकडे रूढ आहे ना? तेच हे तुराणी लोक.

### द्रविड वंश

काळ्या रंगाचा, सरळ केसांचा, सरळ नाकाचा आणि सरळ ठेवणीच्या काळ्या डोळ्यांचा एक वंश प्राचीन इजिप्तमधे आणि प्राचीन बाबिलोनियामधे वसत होता. तो आता सगळ्या भारतांत, विशेषत: दक्षिण भारतांत आढळतो. युरोपमधे देखील क्वचित् कांही ठिकाणीं असे लोक दिसतात. ह्या लोकांचा एक वर्ग मानण्यांत येतो. त्याचें पारिभाषिक नांव आहे 'द्रविड'.

### सेमेटिक वंश

आणखी एक वंश आहे. या वंशांतील लोकांचा रंग गोरा असतो. डोळे सरळ असतात. पण कान आणि नाक हे अवयव थोडेसे बांकदार असतात आणि अग्रभागीं अधिक जाड असतात. त्यांचें कपाळ मागे गेलेलें असतें; त्यांचे ओठ जाड असतात. उत्तर अरबस्थानांतील लोक, आधुनिक यहुदी लोक, प्राचीन बाबिलोनियन, ॲसीरियन, फोनिशियन इत्यादि लोक या वर्गांत मोडतात. त्यांच्यामधे भाषिक साम्यहि बरेंच आढळतें. या वर्गाला 'सेमेटिक' वंश म्हणतात.

### आर्य वंश

आणि संस्कृतशीं सादृश्य असलेल्या भाषा जे बोलतात, ज्यांचें नाक सरळ असतें, तोंड व डोळे व्यवस्थित असतात, वर्ण गोरा असतो, केस काळे किंवा पिंगट असतात, ज्यांचे डोळे काळे किंवा निळे असतात त्यांना 'आर्य' म्हणतात.

### सध्याच्या सगळ्या जाती मिश्र आहेत

उपरिनिर्दिष्ट वंशांच्या मिश्रणांतूनच सगळ्या आधुनिक जाती उत्पन्न झाल्या आहेत. ज्या देशांत ज्या वंशाचे लोक आधिक्याने आहेत तेथे प्राय: त्याच वंशाची भाषा बोलली जाते व तेथील लोकांचे चेहरेहि प्राय: त्या वंशाप्रमाणेच असतात.

### मिश्रणानेच रंग बदलतो

उष्ण प्रदेशांत काळे लोक निर्माण होतात व शीत प्रदेशांत गोरे लोक उत्पन्न होतात या सिद्धान्ताला युरोपमधे कांही सर्व-मान्यता प्राप्त झालेली नाही. काळे व गोरे यांव्यतिरिक्त त्यांमधील अनेक रंगछटांचे जे लोक आज दिसतात त्याचें कारण विभिन्न वंशांचें मिश्रण होय असें अनेकांचें मत आहे.

### प्राचीन सभ्यता

इजिप्त आणि बाबिलोनिया येथील सभ्यता ह्या सर्वांत प्राचीन होत असें विद्वानांचें म्हणणें आहे. या देशांत, इसवी सनाच्या ६००० वर्षांपूर्वीचीं किंवा त्याहिपेक्षा जुनीं घरें व इमारतींचे अवशेष आढळतात. हिंदुस्थानांत उपलब्ध झालेली प्राचीनतम इमारत फार फार तर चंद्रगुप्ताच्या काळची म्हणजे फक्त इसवी सनाच्या ३०० वर्षांपूर्वीची आढळते. संशोधकांना यापेक्षा जुनीं घरें अजून तरी सापडलीं नाहीत.* पण भारतांत ग्रंथ इत्यादि साहित्य फार फार जुनें आहे. इतकें प्राचीन साहित्य इतर कोणत्याहि देशांत आढळत नाही. आमचें वेदवाङमय इसवी सनाच्या कमींत कमी ५००० वर्षांपूर्वी सुद्धा आजच्या रूपांतच विद्यमान होतें असें पंडित

* इ. स. १९२२ पूर्वी हरप्पा आणि मोहेन्जोदारो येथील उत्खनन झालें नव्हतें. त्या उत्खननाने भारतांत, इसवी सनाच्या ३००० वर्षें पूर्वी प्रगत नागरिक सभ्यता अस्तित्वांत होती असें सिद्ध झालें आहे.

बाळ गंगाधर टिळक यांनी पुराव्यानिशी सिद्ध केलें आहे.

### आधुनिक युरोपीय सभ्यता

आज सगळें जग जिंकणाऱ्या त्या युरोपीय सभ्यतेचा जन्म या भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावरच झाला. याच भूमध्यसमुद्राच्या तटावर इजिप्तवासी, बाबिलोनियावासी, फोनिशियावासी, यहुदी आदि सेमेटिक वंशांचें, इराणी, ग्रीक, रोमन आदि आर्यवंशियांशीं मिश्रण झालें आणि त्यांतूनच आधुनिक युरोपीय सभ्यता निर्माण झाली.

### इजिप्तविषयक संशोधन

'रोझेटा स्टोन' या नांवाने ओळखली जाणारी, लेख कोरलेली एक शिला इजिप्तमधे सापडली आहे. त्या शिलेवर कांही लेख चित्रलिपींत आहेत. त्याखाली निराळ्या प्रकारची लिपि आहे. आणि त्या सर्वांखाली जी लिपि आहे ती ग्रीक अक्षरांशीं मिळतीजुळती आहे. या तीन लिपींत लिहिलेला हा मजकूर एकच असावा असा एका विद्वानाने तर्क केला. 'कॉप्ट' लोकांच्या वर्णमालेच्या साहाय्याने त्याला इजिप्तमधील ह्या लेखांतील अक्षरें उकललीं. कॉप्ट हे ख्रिस्ती लोक असून अजूनहि ते इजिप्तमधे राहतात. प्राचीन इजिप्तवासी लोकांचे ते वंशज आहेत असें मानण्यांत येतें. कौलांवर आणि विटांवर बाणाकृति अक्षरांत कोरलेले बाबिलोनियांतील लेख देखील हळूहळू वाचतां येऊं लागले. मध्यंतरीं भारतांतहि कांही लेख सापडले. त्यांचीं अक्षरें नांगराच्या आकारासारखीं होतीं. ते लेख सम्राट अशोकाच्या काळचे असावेत असें तज्ज्ञांचें मत आहे. भारतांत यापूर्वीचे लेख कांही अजून उपलब्ध झाले नाहीत.* सगळ्या इजिप्तमधे आता चित्रलिपींतील

---

* भारतांत आता उपलब्ध झालेली 'इण्डस' लिपि ही सुमेरियामधील आणि इजिप्तमधील लिपीशीं समकालीन मानण्यांत येते.

अनेक लेख आढळले आहेत; कांही देवळांवर आहेत, कांही खांबांवर आहेत तर कांही शवपेटिकांवर आहेत. ते हळूहळू वाचतां येऊं लागले आहेत आणि त्यामुळे इजिप्तचा प्राचीन इतिहास अधिकाधिक स्पष्ट होत चालला आहे.

**भारतांतून इजिप्तमधे आगमन; इजिप्तमधील लोकांच्या देवदेवता**

इजिप्तमधील लोक हे दक्षिणेकडील 'पंट' नांवाच्या देशांतून निघून, समुद्र ओलांडून इजिप्तमधे आले. आज ज्याला आपण 'मलबार' म्हणतों तेंच तें 'पंट' असून इजिप्तवासी व द्रविड लोक एकाच वंशाचे आहेत असें कांहींचें मत आहे. त्यांच्या पहिल्या राजाचें नांव 'मेनुस' असें होतें. त्यांचा प्राचीन धर्महि आपल्या पौराणिक कथांतील कांही भागाशीं जुळणारा आहे. शिबु देवाला नुई देवीने झाकून ठेवलें होतें. पुढे शू नांवाचा दुसरा देव आला आणि तो नुईला बलपूर्वक घेऊन गेला. नुईच्या शरीराचेंच आकाश बनलें. तिचे दोन हात आणि दोन पाय आकाशाचे चार आधारस्तंभ झाले. आणि शिबु हा पृथ्वी झाला. नुईच्या मुलाचें नांव होतें ओसिरिस आणि मुलीचें नांव होतें आयसिस. हे ओसिरिस आणि आयसिस म्हणजे इजिप्तमधील मुख्य देव आणि देवी होत. आणि त्यांचा मुलगा होरस याचें तर सर्वत्र पूजन केलें जात होतें. या त्रयीची एकत्र पूजा होत असे. आयसिसची गाईच्या रूपांतहि पूजा होत असे.

पृथ्वीवरील नाईल नदीप्रमाणेच आकाशांतहि नाईल नदी आहे. पृथ्वीवरील नाईल नदी म्हणजे केवळ तिचा एक अंश होय. इजिप्तमधील लोकांच्या समजुतीप्रमाणे सूर्य हा एका नावेंत बसून पृथ्वीभोवती प्रवास करतो. मधूनमधून 'अहि' नांवाचा सर्प जेव्हा त्याला गिळतो तेव्हा सूर्याला ग्रहण लागतें. ठराविक

काळानंतर एक वराह चंद्रावर हल्ला करीत असतो. त्यांत त्याचे तुकडे तुकडे होऊन जातात. पुन्हा बरें व्हायला त्याला पंधरा दिवस लागतात. इजिप्तमधील कांही देवता जंबुकमुख आहेत, कांही श्येनमुख आहेत, तर कांही गोमुख आहेत. अशा त्यांच्या अनेक देवता आहेत.

### बाबिलोनमधील देवदेवता

याच काळांत युफ्रेटिस नदीच्या किनाऱ्यावर दुसरी एक सभ्यता विकास पावली. बाल, मोलोक, इस्तार्ते आणि दमुझी या तेथील लोकांच्या प्रमुख देवदेवता होत्या. इस्तार्ते ही दमुझी नांवाच्या एका मेंढपाळाच्या प्रेमांत सापडली. एका वराहानें दमुझीला ठार मारलें. तेव्हा इस्तार्ते त्याच्या शोधार्थ 'हेडस'मधे म्हणजे पाताळांत गेली. अलात नांवाच्या एका भयंकर देवीने तेथें तिचा फार छळ केला. शेवटीं इस्तार्तेने अशी घोषणा केली की "कांहीहि झालें तरी दमुझीला प्राप्त केल्याशिवाय मी कांही पृथ्वीवर परत जाणार नाहीं." हें एक मोठेंच संकट उपस्थित झालें; कारण इस्तार्ते ही कामदेवता होती; ती पृथ्वीवर गेल्याशिवाय, मानव, पशु, वनस्पति आदि सर्वांची प्रजोत्पत्ति कशी होणार? मग देवांनी सलोखा घडवून आणला. प्रत्येक वर्षी दमुझीने चार महिने पाताळांत काढावे आणि उरलेले आठ महिने पृथ्वीवर राहावें असें ठरलें. तेव्हा कुठे इस्तार्ते पृथ्वीवर परत आली. ती आल्याबरोबर वसंत ऋतूचें आगमन झालें आणि नंतर सगळीं पिकें उत्तम निघालीं.

अशा या दमुझीला आणखी नांवें आहेत. त्याला अॅदुनाय किंवा अॅदॉनिसहि म्हणतात. उगीच थोडेसे क्षुल्लक भेद सोडले तर सगळचा सेमेटिक वंशियांचा धर्म जवळजवळ एकच होता.

बाबिलोनियन, यहुदी, फोनिशियन आणि उत्तरकालीन अरबांची एकच उपासनापद्धति होती. प्राय: सगळ्या देवांना ते 'मोलोक' किंवा 'बाल' म्हणत असत. आजदेखील बंगालीमधे 'स्वामी' या अर्थी 'मालिक' आणि 'राज्य' या अर्थी 'मुलुक' हा शब्द आपण वापरतों. अर्थात् या देवदेवतांमधे लहानसहान भेद होतेच. कांही विद्वानांच्या मतें या लोकांच्या 'अलात' नामक देवतेचेंच पुढे अरबांच्या 'अल्ला'मधे रूपान्तर झालें.

या देवदेवतांच्या पूजनांतील कांही कांही प्रकार फारच भयंकर आणि ओंगळ असत. मोलोक किंवा बाल यांच्यासमोर लहान मुलांना जिवंत जाळण्यांत येत असे. नैसर्गिक आणि अनैसर्गिक रीतींनी कामवासनेची पूर्ति करणें हें इस्तार्तेच्या देवळांतील प्रमुख कार्य असे.

### बायबलची रचना

बाबिलोनशीं तुलना करतां, यहुदी लोकांचा इतिहास फारच अलीकडचा आहे. विद्वानांचें असें मत आहे की 'बायबल' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या धर्मग्रंथाची रचना इसवीसनापूर्वी ५०० वर्षांपासून होत असावी व ख्रिस्तांनंतरहि बरींच वर्षे ती चालू होती. सामान्यत: फार जुना म्हणून समजला जाणारा बायबलचा पुष्कळसा भाग बराच अलीकडचा आहे. बायबलमधील मुख्य विषयांचा बाबिलोनियामधील लोकांशीं संबंध आहे. बाबिलोनियामधील लोकांच्या सृष्टिनिर्मितीच्या कल्पना आणि जलप्रलयाचीं वर्णनें बायबलच्या अनेक भागांत जशींच्या तशींच स्वीकारलीं आहेत. तसेंच, आशियामायनरमधे पारशी लोकांचें साम्राज्य असतांना यहुदी लोकांनी पारशी लोकांचे अनेक सिद्धान्त स्वीकारले. बायबलच्या 'जुन्या संहिते'च्या (ओल्ड टेस्टामेंटच्या)

मतानुसार हें जगच सर्वकांही आहे, आत्मा आणि परलोक यांना अस्तित्व नाही. पण बायबलच्या 'नवसंहितें'त (न्यू टेस्टामेन्टमधे) आपल्याला पारशांचे मरणोत्तर जीवन, मृताचें पुनरुत्थान इत्यादि सिद्धान्त आढळतात, आणि सैतानाची कल्पना तर पूर्णत: पारशांचीच आहे.

### यहुदी धर्म

'याव्हे मोलोक'ची उपासना हें यहुदी धर्माचें प्रमुख अंग होय. पण हें नांव कांही यहुद्यांच्या भाषेंतील नाही. कांहींच्या मतें तो इजिप्तमधील भाषेंतील शब्द आहे. तो नेमका कोठून आला हें नक्की कोणालाच माहीत नाही. फार दीर्घ काळपर्यंत यहुदी लोक इजिप्तमधेच बंधनांत राहिले होते अशीं वर्णनें बायबलमधें आहेत. पण त्यांवर आता क्वचितच कोणी विश्वास ठेवतो. आणि अब्राहम, आयझॅक, जोसेफ आदि मूळपुरुषांच्या कथा केवळ रूपककथा असल्याचें आता सिद्ध झालें आहे.

यहुदी लोक 'याव्हे'चें नांव घेत नसत. त्याच्याऐवजी ते 'आदुनॉय' म्हणत असत. जेव्हा यहुदी लोकांचें इस्राएली आणि एफ्रैमी अशा दोन शाखांत विभाजन झालें तेव्हा दोन्ही देशांत दोन प्रमुख देवालयें बांधण्यांत आलीं. इस्राएली शाखेने आपलें मंदिर जेरुसलेम येथें बांधलें. तेथील याव्हेची मूर्ति स्त्रीपुरुषाची संमीलित मूर्ति होती. ती एका पेटींत सुरक्षित ठेवण्यांत आली होती. मंदिराच्या दारापाशी एक मोठा पुंचिन्हस्तंभ होता. एफ्रैममधे सोन्याने मढलेल्या वृषभाच्या रूपांत याव्हेची पूजा होत असे.

देवतेसमोर वडील मुलाची अग्नींत आहुति देण्याची प्रथा दोन्ही ठिकाणीं होती. दोन्ही मंदिरांत स्त्रियांचे ताफेच्या ताफे राहत आणि खुद्द मंदिराच्या आवारांत या स्त्रिया अतिशय

अनीतिपूर्ण जीवन घालवीत. आणि अशा रीतीनें त्यांना मिळणाऱ्या द्रव्याचा उपयोग मंदिराच्या कामासाठी केला जात असे.

कालान्तराने यहुदी लोकांमधे एक नवा वर्ग निर्माण झाला. हे लोक देवासमोर गात किंवा नाचत असत आणि त्यावेळीं त्यांच्या अंगांत देवता संचारत असे. त्यांना 'नबी' किंवा 'प्रॉफेट्स' म्हणजे प्रेषित म्हणत असत. त्यांच्यापैकी अनेकांचा पारशी लोकांशीं संबंध येऊन त्यांनी मूर्तिपूजा, पुत्राचें बलिदान, अनीति, वेश्यावृत्ति आणि तत्सम गोष्टींना विरोध करायला सुरुवात केली. हळूहळू मानवबलीच्या ऐवजी सुंता होऊं लागली; वेश्यावृत्ति, मूर्तिपूजा आदि प्रकारहि हळूहळू लोप पावले. कालान्तराने या 'प्रॉफेट्स' लोकांमधूनच ख्रिस्ती धर्माचा उदय झाला.

**येशू ख्रिस्त ही व्यक्ति ऐतिहासिक होती काय ? 'हायर क्रिटिसिझम'**

येशू या नांवाचा माणूस खरोखर कधी जन्मला होता किंवा नाही याबद्दल मोठाच वाद आहे. बायबलच्या 'नवसंहितें'त जीं चार पुस्तकें आहेत त्यांपैकी सेंट जॉनचें पुस्तक तर बनावट म्हणून कांही लोक अग्राह्य मानतात. उरलीं तीन पुस्तकें. त्यांच्या-बद्दल असा निर्णय देण्यांत आला आहे की तीं कोणत्यातरी जुन्या ग्रंथांची नकल असावींत, आणि हें काम सुद्धा येशू ख्रिस्तांचा जो काळ मानण्यांत येतो त्याच्या कितीतरी नंतर झालें असावें.

तसेंच येशू ज्या काळीं जन्मल्याचें मानण्यांत येतें त्याच सुमारास खुद्द यहुदी लोकांमधे जोसेफस आणि फिलो नांवाचे दोन इतिहासकार जन्माला आले होते. त्यांनी यहुदी लोकांच्या अतिशय लहानलहान पंथांचादेखील उल्लेख केला आहे. परंतु येशूंचा किंवा ख्रिस्ती लोकांचा, किंवा रोमन न्यायाधिशाने येशूंना सुळावर ठार मारण्याची सजा दिल्याचा त्यांच्या लिखाणांत

कोठेहि उल्लेख आढळत नाही. या प्रसंगासंबंधी जोसेफसच्या ग्रंथांत फक्त एक ओळ होती. पण तीहि प्रक्षिप्त असल्याचें आता सिद्ध झालें आहे. त्या काळीं यहुदी लोक रोमनांच्या आधिपत्याखाली राहत होते आणि सगळचा कला आणि विज्ञानशास्त्रें ग्रीक लोकांपासून शिकत होते. त्या ग्रीक आणि रोमन लोकांनी यहुदी लोकांबद्दल पुष्कळ कांही लिहून ठेवलें आहे, पण येशूंचा किंवा ख्रिस्त्यांचा त्यांनी कोठेहि उल्लेख केलेला नाही.

आणखी एक अडचण आहे. जीं सद्वचनें, उपदेश किंवा सिद्धान्त आपल्याला बायबलची 'नवसंहिता' शिकविते तें सगळें इसवी सनाच्या पूर्वीच यहुदी लोकांमधे विद्यमान होतें. तें सगळें विभिन्न क्षेत्रांतून त्यांना प्राप्त झालें होतें आणि हिलेल आदि रब्बी म्हणजे उपदेशक त्याचा प्रचार करीत होते. विद्वान् मंडळींचीं मतें हीं अशीं आहेत. पण तो पडला त्यांचा स्वत:चाच धर्म; त्यामुळे इतर धर्मविरुद्ध ते जसे बोलतात तसें स्वत:च्या धर्माविरुद्ध ते एकदम कांही बोलूं शकत नाहीत, कारण त्यामुळे आपल्या प्रतिष्ठेला व कीर्तीला धक्का लागेल अशी त्यांना भीति वाटते. म्हणून ते या बाबतींत मंदगतीने पावलें टाकीत आहेत. यालाच म्हणतात 'हायर क्रिटिसिझम'—उच्च स्तरावरची आलोचना.

### भारतांत पुराणवस्तुसंशोधनाच्या मार्गांतील अडथळे

याप्रमाणे पाश्चिमात्य पंडित दूरदूरच्या विभिन्न देशांच्या धर्मांचा, त्यांच्या रीतीभातींचा आणि त्यांच्या वंशांचा अभ्यास करीत आहेत. पण आपल्या बंगाली भाषेंत तसलें कांहीच नाही. आणि असणार तरी कसें ? समजा सतत दहा वर्षं परिश्रम करून एखाद्या बंगाली माणसाने अशा एखाद्या ग्रंथाचें भाषांतर केलें. पण तो ग्रंथ त्याला कांही खायला थोडेंच देणार आहे ? त्याच्या

उपजीविकेचा प्रश्न कसा सुटणार? आणि तो ग्रंथ प्रकाशित करायला त्याला पैसा तरी कुठून मिळणार ?

पहिली गोष्ट अशी आहे की आपला देश फार गरीब आहे, आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या येथे विद्येची वाढ जवळजवळ नाहीच. विभिन्न कलांची आणि विद्यांची उपासना चालली आहे असा दिवस आपल्या देशांत कधी तरी उगवेल काय ? "मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्" असें जिच्या कृपेचें वर्णन आहे त्या आदिमाता जगदंबेलाच ठाऊक !

### युरोप--इटली

आमची बोट नेपल्सला आली—आम्ही इटलींत पोहोचलों. रोम ही इटलीची राजधानी आहे. होय हेंच तें रोम ! त्या प्राचीन अति बलशाली रोमन साम्राज्याची हीच राजधानी होती. त्या रोमन साम्राज्याची राजनीति, युद्धविद्या, वसाहती वसविण्याची कला, परदेश जिंकण्याच्या पद्धति आदि गोष्टी आजहि सगळ्या जगासमोर आदर्शभूत आहेत.

नेपल्स सोडल्यावर आमची बोट मार्सेलिसला थांबली आणि तेथून मग तिने सरळ लंडन गाठलें.

युरोपबद्दल तुम्हीं पूर्वीच पुष्कळसें ऐकलेलें आहे. तेथील लोक काय खातातपितात, त्यांची वेशभूषा कशी असते, त्यांचे आचार, त्यांच्या चालीरीती इत्यादि अनेक गोष्टी तुम्हांला विदितच आहेत. तेव्हा त्यांबद्दल इथे मीं कांही लिहावें असें मला वाटत नाही. परंतु युरोपियन लोकांची सभ्यता, ती कशी निर्माण झाली, तिचा आणि आपला काय संबंध आहे, किती प्रमाणांत आपण तिचा स्वीकार करावा—या आणि अशा गोष्टींबद्दल मला पुढे पुष्कळच सांगावयाचें आहे. पण बाबारे, या शरीराने

कोणाला सोडलें आहे ! आता मी थकलों आहें. म्हणून यासंबंधी पुढे केव्हा तरी सांगण्याचा प्रयत्न करीन. पण सांगून तरी कांही उपयोग आहे काय ? आपणां भारतीयांशीं, विशेषतः बंगाली लोकांशीं, बोलण्याच्या आणि चर्चा करण्याच्या बाबतींत अखिल पृथ्वीतलावर कोण बरें स्पर्धा करूं शकतो ? तुमच्यांत जर धमक असेल तर जें काय दाखवावयाचें तें प्रत्यक्ष कृतींत दाखवा. जें काय जगाला सांगायचें तें तुमच्या कृतीला सांगूं द्या; आणि तुमच्या जिव्हेला जरा विश्राम घेऊं द्या.

### गरिबांच्या उन्नतीनेच देशाची उन्नति

पण एक गोष्ट मात्र सांगणें आवश्यक आहे. युरोपांतील खालच्या गरीब वर्गांत जेव्हा विद्येचा आणि सामर्थ्याचा प्रवाह वाहूं लागला तेव्हाच युरोपची प्रगति होऊं लागली. घरांतील घाण बाहेर फेकावी तसे, देशोदेशींचे बाहेर ढकललेले अनेक दुःखी व गरीब लोक अमेरिकेंत येतात व त्यांना तेथे आश्रय मिळतो आणि हे लोकच अमेरिकेचा कणा बनतात. श्रीमंत माणसें आणि विद्वान लोक तुमचें म्हणणें ऐकोत वा न ऐकोत, ते तुमचें म्हणणें समजून घेवोत वा न घेवोत, ते तुमची स्तुति करोत वा निंदा करोत, त्याचें कांहीएक महत्त्व नाही. हे लोक म्हणजे नुसत्या अलंकाराप्रमाणे आहेत, देशाची नुसती शोभा आहेत ! खालच्या वर्गांतील लाखोकरोडो गरीब लोक हेच देशाचा प्राण होत. तुमच्या पाठीशीं लोक किती मोठ्या संख्येने आहेत याचें महत्त्व नाही. ते गरीब आहेत की श्रीमंत आहेत याचेंहि महत्त्व नाही. मनसा-वाचा-कर्मणा जर त्यांच्यांत ऐक्य असेल तर असे मूठभर लोकसुद्धा सगळें जग उलथेंपालथें करूं शकतात, ही श्रद्धा हृदयांत सतत बाळगा, तिचा कधीहि विसर पडूं देऊं नका. होऊं द्या

विरोध--जितका विरोध होईल तितका चांगला. अडथळा आल्याशिवाय का नदीला वेग प्राप्त होतो ? गोष्ट जितकी नूतन आणि श्रेष्ठ असेल तितका तिला प्रारंभीं अधिक विरोध होणारच. आपल्याला शेवटीं यश नक्की मिळणार हेंच हा विरोध सांगत आहे. जेथे विरोध नसतो तेथे यश कुठलें ? बरें आता, नमस्कार !

* * * *

### युरोपांतील प्रवास---कॉन्स्टॅन्टिनोपल

ज्याच्या तळपायावर चक्र असेल तो भटक्या बनतो असें आपल्याकडे म्हणतात. मला वाटतें, माझ्या तळपायावर जिकडे तिकडे चक्रेंच चक्रें आहेत. 'वाटतें' कशाला म्हणूं ? माझ्या तळपायांचें निरीक्षण करून मीं तीं चक्रें पाहण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो सर्व व्यर्थ गेला. कडक थंडीमुळे माझ्या पायाला इतक्या भेगा पडल्या आहेत की कुठलीं चक्रें अन् कुठलें काय ! पण आपल्याकडे तशी समजूत आहे तेव्हा माझ्या तळपायावरहि पायभर चक्रेंच चक्रें आहेत असें मी धरून चालतों, आणि त्यांचा परिणामहि अगदी स्पष्ट प्रत्ययाला येत आहे. पॅरिसला कांही काळ राहण्याची माझी फार फार इच्छा होती. पॅरिसला राहून फ्रेंच भाषा व फ्रेंच सभ्यता यांचा अभ्यास करावा असा मीं विचार केला होता. माझ्या जुन्या मित्रांना आणि परिचितांना सोडून आर्थिक स्थिति अगदीच साधारण असलेल्या एका नव्या फ्रेंच मित्राकडे मी येऊन राहिलों. त्याला इंग्रजी येत नव्हतें आणि माझें फ्रेंच काय विचारतां ! तें तर अगदी विचित्रच होतें. मी मनाशीं असें योजिलें होतें की मुक्यासारखें कांही आपल्याला राहतां येणें शक्य नाही, तेव्हा आपोआप फ्रेंच बोलणें भागच पडेल आणि मग थोड्याच दिवसांत मी अगदी धाराप्रवाही फ्रेंच बोलूं लागेन. पण मीं योजिलें

होतें काय आणि झालें काय ! आमचा आता व्हिएन्ना, तुर्कस्थान, ग्रीस, इजिप्त, जेरुसलेम असा दौरा चालू आहे. बरोबर आहे. भवितव्य कोण चुकविणार ? हें जें तुम्हांला मी पत्र लिहीत आहें ना, हें लिहीत आहे मुसलमानी अमलाखाली असलेल्या त्यांच्या उरल्यासुरल्या शेवटच्या राजधानींतून—कॉन्स्टॅन्टिनोपलहून.

### प्रवासांतील सोबती आणि मॅडम सारा बर्नहार्ड

माझ्याबरोबर आणखी तिघे सहप्रवासी आहेत. त्यांच्यापैकी दोघे फ्रेंच असून तिसरी एक अमेरिकन बाई आहे. अमेरिकन बाईंचें नांव आहे कुमारी मॅक्लिऑड. तुम्ही त्यांना चांगलें ओळखतां. फ्रेंच मंडळींपैकी एक आहेत मॉस्ये ज्यूल बोवा. फ्रान्स-मधील ते एक थोर तत्त्वज्ञ व साहित्यिक आहेत. तिसऱ्या फ्रेंच बाई आहेत. त्या आहेत जगप्रसिद्ध गायिका मॅड्मॉझेल काल्व्हे. फ्रेंच भाषेंत मिस्टरच्या ऐवजी मॉस्ये आणि मिस्च्या ऐवजी मॅड-मॉझेल म्हणतात. मॅडमॉझेल काल्व्हे ह्या आजच्या घटकेला सर्व गायिकांमधे अग्रगण्य आहेत. त्या नाटचगायिका आहेत. त्यांच्या गाण्याचे कार्यक्रम इतके यशस्वी होतात की केवळ गाण्याचें त्यांचें उत्पन्न वर्षाकाठीं तीनचार लक्ष रुपयांचें आहे. माझी त्यांच्याशीं यापूर्वीच ओळख झालेली होती. पाश्चिमात्य जगतांतील अग्रगण्य नटी मॅडम सारा बर्नहार्ड आणि अग्रगण्य गायिका काल्व्हे या दोघीहि फ्रेंच आहेत. दोघींनाहि इंग्रजी मुळीच येत नाही. पण दोघीहि मधूनमधून इंग्लंड-अमेरिकेंत जातात आणि आपल्या अभि-नयावर व गाण्यावर लाखो डॉलर मिळवितात. फ्रेंच ही पाश्चिमात्य जगतांतील शिष्टजनांची भाषा आहे. तें एक सभ्यतेचें लक्षण आहे. त्यामुळे इकडे सर्वांना ती भाषा बोलतां येते व समजते. त्यामुळे त्या दोघींना इंग्रजी शिकण्याची फुरसतहि नाही आणि

इच्छाहि नाही. मॅडम बर्नहार्ड ही चांगली वयस्क बाई आहे. पण वेशभूषा करून तिने एकदा रंगभूमीवर पाऊल ठेवलें की कोणत्याहि वयाच्या पुरुषाचा किंवा स्त्रीचा अभिनय असो, ती अगदी हुबेहुब वठविते. मुलगा म्हणा, मुलगी म्हणा, जें काय तुम्ही सांगाल तें अगदी यथातथ्य रूपांत ती समोर उभें करते. आणि काय तो अद्‌भुत आवाज ! लोक म्हणतात की तिच्या गळ्यांत रुपेरी तारांचा झंकार होत असतो ! मॅडम बर्नहार्ड यांच्या हृदयांत भारताविषयी विशेष आदरभाव वसत आहे. आपल्या भारताविषयी बोलतांना त्या पुनः-पुनः मला म्हणतात, "त्रे जाँसिएन, त्रे सिव्हिलिझे"—" अतिप्राचीन आणि अतिसुसभ्य."एके वर्षी भारतीय पार्श्वभूमीवर आधारलेलें एक नाटक त्यांनी बसविलें. त्यांत भारतांतील रस्त्याचा एक देखावा होता. त्यांनी तो अगदी हुबेहुब उभा केला. पुरुष, स्त्रिया, मुलें, साधु, नागा, अगदी सगळें त्यांत आणलें आणि तो देखावा बरोबर सजविला. कार्यक्रम आटोपल्यांवर त्यांनी मला सांगितलें की त्यासाठी त्या प्रत्येक पदार्थसंग्रहालयांतून फिरल्या होत्या. त्याद्वारें, भारतांतील स्त्री-पुरुष, त्यांची कपडे घालण्याची पद्धति, तिकडील रस्ते-घाट आदि सगळ्या गोष्टींचा त्यांनी पूर्ण परिचय प्राप्त करून घेतला होता. एकदा हिंदुस्थानांत जावें आणि तो देश पाहावा अशी त्यांची तीव्र इच्छा आहे.—" से माँ रॅव्ह "—" तें माझ्या जीवनाचें एक स्वप्न आहे " असें त्या म्हणतात. शिवाय प्रिन्स ऑफ वेल्सनेहि * त्यांना वाघाच्या आणि हत्तीच्या शिकारीवर नेण्याचें वचन दिलें आहे. पण त्यांचें म्हणणें असें की हिंदुस्थानांत जायचें तर दोनअडीच लाखांचा खर्च करायलाच हवा ! अर्थात् त्यांच्याजवळ पैशाला काय तोटा ?" ला दिव्हीन सारा " म्हणजे

* इंग्लंडचे राजे सातवे एडवर्ड. त्यावेळीं ते प्रिन्स ऑफ वेल्स होते.

"दैवी सारा" असेंच त्यांचें नांव आहे. त्यांच्या घरीं पैशाची तूट पडणें कसें शक्य आहे? खास आगगाडीशिवाय ज्यांचा कधी प्रवास होत नाही, युरोपांतील कित्येक राजांना देखील परवडणार नाही असा ज्यांचा थाटमाट असतो, ज्यांच्या कार्यक्रमाचें तिकिट मिळवायचें म्हणजे दुप्पट पैसे आणि तेंहि महिना महिना आधी देऊन आपली जागा सुरक्षित करवून घ्यावी लागते त्यांना पैशाची ददात पडणें कधीतरी शक्य आहे काय? पण सारा बर्नहार्ड यांना बेसुमार खर्च करण्याची सवय आहे. त्यामुळे सध्या तरी हिंदुस्थानच्या प्रवासाचा त्यांचा बेत नाही.

**मॅडमॉझेल काल्व्हे**

या हिवाळ्यांत मॅडमॉझेल काल्व्हे यांचे गाण्याचे कार्यक्रम बंद आहेत. त्या विश्रांति घेणार आहेत. त्यासाठी समशीतोष्ण हवामान असलेल्या इजिप्त आदि स्थानीं त्या जात आहेत. मी त्यांचाच पाहुणा म्हणून जात आहें. काल्व्हे यांनी केवळ संगीतालाच स्वत:ला वाहून घेतलें आहे असें नाही. त्यांच्या ठायीं बरीच विद्वत्ता आहे. तत्त्वज्ञानात्मक आणि धार्मिक साहित्याची त्यांना फार आवड आहे. त्यांचा जन्म फार गरिबींत झाला. त्यांना मोठ्या कष्टांत दिवस काढावे लागले. पुढे स्वत:च्या प्रतिभाबलाने आणि अतिशय परिश्रमाने त्यांनी अमाप संपत्ति मिळविली. आज मोठे मोठे राजे आणि सत्ताधीश देखील त्यांना सन्मान देतात.

तशा तर प्रसिद्ध गायिका इकडे अनेक आहेत. मॅडम मेल्बा, मॅडम एमा एमस इत्यादि नांवें देतां येतील. गायकांमधे जाँ द रेझ्के, फ्लाँसाँ आणि इतर नांवें अग्रगण्य आहेत. वर्षाला दोनतीन लाख रुपये इतकी या सगळ्यांची मिळकत आहे. पण काल्व्हे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांच्याठायीं असामान्य प्रतिभा आहे.

अप्रतिम सौंदर्य, तारुण्य, प्रतिभा आणि स्वर्गीय कंठस्वर हीं सारीं त्यांच्या ठायीं एकत्र झालीं आहेत. त्यामुळे गाणाऱ्यांमधे त्या सर्वश्रेष्ठ मानल्या जातात. दुःख आणि दारिद्र्य यांच्यासारखा दुसरा चांगला शिक्षक नाही. काल्व्हे यांना आपले बालपणाचे दिवस पराकोटीच्या दारिद्र्याशीं आणि हालअपेष्टांशीं झगडत काढावे लागले. त्यावर विजय मिळवितां मिळवितां त्यांची वृत्ति अतिशय दयाळू बनली; प्रगाढ गांभीर्य त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालें. ज्यांच्या अंगीं धमक आणि प्रयत्नशीलता आहे त्यांच्यासाठी पाश्चात्त्य जगतांत प्रगतीच्या विपुल संधि उपलब्ध आहेत. पण मोठ्या खेदाने म्हणावें लागतें की आपल्या देशांत संधीचीच वाण असते. एखाद्याच्या ठायीं प्रयत्नशीलता व धमक असूनहि त्याचे ते गुण बहुधा वायाच जातात. बंगाली स्त्रियांना शिक्षण घेण्याची कितीहि इच्छा झाली तरी काय उपयोग? योग्य संधि न मिळाल्या-मुळे त्यांची ती इच्छा असून नसून सारखीच होणार. आणि बंगाली भाषेंत शिकण्यासारखें आहे तरी काय ? फारच म्हटलें तर कांही दरिद्री कादंबऱ्या आणि भिकार नाटकें. त्यांतून, आज सगळी विद्या परकीय भाषेंत किंवा संस्कृतांत आहे आणि ती प्राप्त करणें थोडक्या निवडक लोकांनाच शक्य आहेत. पाश्चिमात्य देशांत त्यांच्या मातृभाषेंत विभिन्न विषयांचीं असंख्य पुस्तकें आहेत. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कोणत्याहि परकीय भाषेंत, एखादें नवें चांगलें पुस्तक प्रसिद्ध होतांच लगेच तें भाषांतरित होतें आणि जनतेपुढे येतें.

### ज्यूल बोवा

मॉस्ये ज्यूल बोवा हे एक प्रख्यात लेखक आहेत. विभिन्न अंधश्रद्धा धांडोळून त्यांतील ऐतिहासिक सत्यें हुडकून काढण्यांत

ते फार पटाईत आहेत. त्यांचें एक पुस्तक फार प्रसिद्ध आहे. त्यांत त्यांनी पिशाच्चपूजा, चेटुक, जारणमारणादि क्रिया, मोहिनी विद्या आणि तत्सम इतर जीं अनुष्ठानें मध्ययुगीन युरोपांत प्रचारांत होतीं आणि आजहि जीं कांही प्रमाणांत युरोपांत आढळतात त्यांचा व्यवस्थित इतिहास दिला आहे. श्रीयुत ज्यूल बोवा हे एक चांगले कवि आहेत आणि व्हिक्टर ह्यूगो, ला मर्टिन आदि फ्रेंच कवींवर आणि गटे, शिलर आदि जर्मन कवींवर ज्या भारतीय वेदान्त विचारांचा प्रभाव पडला आहे त्या विचारांचे ते पुरस्कर्ते आहेत. युरोपियन काव्यावर आणि तत्त्वज्ञानावर वेदान्ताचा मोठाच प्रभाव पडलेला आहे. मला तर असें आढळलें की प्रत्येक चांगला कवि वेदान्तीच आहे आणि जो कोणी तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ लिहितो त्याला वेदान्तांतून कांही ना कांही घ्यावेंच लागतें. ह्या लोकांपैकी हर्बर्ट स्पेन्सर आदींसारखे कांही-जण ऋण घेतल्याचें स्वीकार न करतां, आपण जें कांही लिहितों तें नवीन आहे असें भासवितात, येवढेंच काय तें, पण वहुतांश लोक मात्र तें ऋण स्पष्टपणें मान्य करतात. तारायंत्राच्या, आगगाडीच्या आणि वर्तमानपत्राच्या ह्या काळांत त्यांना तें मान्य केल्याशिवाय गत्यंतरहि नाही. मॉस्ये ज्यूल बोवा फारच नम्र आणि शांत प्रकृतीचे गृहस्थ आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिति साधारण असूनहि त्यांनी आपल्या पॅरिस येथील घरांत मला मोठ्या प्रेमाने पाहुणा म्हणून ठेवून घेतलें. आता या आमच्या प्रवासांत ते आमचे सोबती आहेत.

**पेअर हियासान्थ**

कॉन्स्टॅन्टिनोपलपर्यंतच्या प्रवासांत आमच्याबरोबर आणखीहि दोन साथीदार आहेत. ते म्हणजे पेअर हियासान्थ आणि

त्यांच्या पत्नी. पेअर म्हणजे पिता. पेअर हियासान्थ हे रोमन कॅथॉलिक संप्रदायाच्या एका कठोर तपस्वी शाखेचे संन्यासी होते. प्रगाढ विद्याव्यासंग, असामान्य वक्तृत्व आणि कठोर तपस्या यांमुळे केवळ फ्रान्समधेच नव्हे तर सगळ्या कॅथॉलिक संप्रदायांत त्यांनी विपुल कीर्ति मिळविली होती. श्रेष्ठ कवि व्हिक्टर ह्यूगो हे नेहमी दोघांच्या फ्रेंच भाषेच्या शैलीची वाखाणणी करीत असत. त्यांपैकी एक होते पेअर हियासान्थ. चाळिसाव्या वर्षीं ते एका अमेरिकन स्त्रीच्या प्रेमांत पडले आणि पुढे त्यांनी तिच्याशीं लग्न केलें. त्यामुळे सर्वत्र खूपच खळबळ उडाली आणि अर्थातच कॅथॉलिक संप्रदायाने तात्काल त्यांच्याशीं आपला संबंध तोडून टाकला. त्यांनीहि अनवाणी चालणें सोडलें आणि ढिली कफनी आदि आपला तापस वेश टाकून गृहस्थाश्रमी माणसाप्रमाणे हॅट, कोट, बूट आदि चढवून ते मॉस्ये लॉयसन या नांवाने वावरूं लागले. परंतु मी मात्र त्यांना अजून त्यांच्या पूर्वीच्याच नांवाने संबोधितों. ती गोष्ट आता खूप जुनी झाली, पण त्या वेळीं सगळ्या युरोपखंडभर त्या विषयाची चर्चा चालली होती. प्रॉटेस्टंट लोकांनी त्यांचें मोठें स्वागत केलें. पण रोमन कॅथॉलिक लोक त्यांचा द्वेष करूं लागले. त्यांची योग्यता जाणून पोप कांही त्यांना दूर लोटायला तयार नव्हते. "तुम्ही वाटल्यास ग्रीक कॅथॉलिक धर्मोपदेशक व्हा, पण रोमन चर्चचा संबंध सोडूं नका" असें त्यांनी त्यांना सांगून पाहिलें. (ग्रीक कॅथॉलिक संप्रदायाच्या धर्मोपदेशकांना लग्न करावयाची परवानगी असते, पण त्यांना एकदाच लग्न करतां येते, आणि त्यांना उच्च पद दिलें जात नाही.) पण श्रीमती लॉयसन यांनी त्यांना जबरदस्तीने पोपच्या दलांतून बाहेर काढलें. कालान्तराने त्यांना मुलें झालीं, नातवंडेंहि

झालीं आणि आता अतिशय वृद्ध झालेले लॉयसन जेरुसलेम येथे चालले आहेत. ख्रिस्ती आणि मुसलमान यांचे संबंध प्रेमाचे राहावेत अशा प्रयत्नासाठी ते तेथे जात आहेत. त्यांच्या पत्नीने कदाचित् अनेक स्वप्नें पाहिलीं असतील. आपला पति दुसरा मार्टिन लूथर होईल आणि पोपचें सिंहासन उचलून भूमध्यसमुद्रांत फेकून देईल अशा कल्पना तिने केल्या असतील. पण तसें कांहीच घडलें नाही. फ्रेंच लोक म्हणतात की 'इतो नष्टस्ततो भ्रष्टः' अशी त्यांची स्थिति झाली. पण श्रीमती लॉयसन अजूनहि अनेक दिवास्वप्नें बघत आहेत ! वृद्ध लॉयसन यांचें बोलणें फारच गोड आहे. त्यांचा स्वभाव नम्र असून त्यांचें मन भक्तिप्रवण आहे. जेव्हा जेव्हा ते मला भेटतात तेव्हा तेव्हा विविध धर्मांविषयी आणि पंथांविषयी ते खूप वेळ बोलत राहतात. पण स्वभावतः भक्तिमार्गाकडे विशेष कल असल्यामुळे अद्वैताबद्दल त्यांना थोडीशी धास्ती वाटते. मला वाटतें, माझ्याबद्दल श्रीमती लॉयसन यांचा कांही चांगला ग्रह नसावा. त्याग, वैराग्य, संन्यास आदि विषयांवर मी जेव्हा त्या वृद्धाशीं चर्चा करतों तेव्हा अनेक चिरवांच्छित भावना त्या वृद्ध हृदयांत जागृत होतात आणि तिकडे त्यांच्या पत्नीचा मात्र बहुधा मनांतल्या मनांत जळफळाट होत असतो. स्त्रियांनी काय किंवा पुरुषांनी काय, सगळ्या फ्रेंच लोकांनी त्या बाईलाच पूर्णतः दोषी ठरविलें आहे. "आमच्या एका थोर तपस्वी माधूला या वयेने बिघडविलें" असा ते तिच्यावर आरोप ठेवतात. कॅथॉलिक देशांत—पॅरिसमधे राहावें लागत असल्यामुळे श्रीमती लॉयसन बाईना फारच कचाटयांत सापडल्यासारखें झालें आहे. विवाहित धर्मोपदेशकाला पाहतांच फ्रान्समधील लोक त्यांचा तिरस्कार करतात. बायकोपोरें असलेल्या माणसाने धर्माचा

उपदेश करायचा ही कल्पना देखील कोणाहि कॅथॉलिकपंथीयाला महन होण्यासारखी नाही. आणि श्रीमती लॉयसन यांच्याहि ठिकाणीं थोडी द्वेषबुद्धि आहे. एकदा त्यांनी एका नटीबद्दल नापसंती दर्शवीत म्हटलें, "तुझें हें वागणें फारच वाईट आहे. त्या अमक्यावरोबर तूं खुशाल लग्न न करतां राहतेस हें कांही चांगलें नाही." त्या नटीने तात्काळ टोमणा मारला, "मी तुझ्यापेक्षा हजारपटीने बरी: मी एका सामान्य माणसाबरोबर राहत आहे. त्याच्याशीं मीं कायदेशीर रीतीने लग्न केलें नसेल. पण तूं तर महापापिणी आहेस. एका महान् साधूला तूं त्याचें धार्मिक व्रत मोडायला भाग पाडलेंस ! तुझें जर खरोखरच त्या साधुपुरुषावर इतकें प्रेम होतें तर तूं त्याची सेवादासी म्हणून राहायचें होतेंस. पण त्याच्याशीं लग्न लावून त्याला गृहस्थाश्रमी बनवून, तूं त्याचा सर्वनाश कां केलास ?"

## स्त्रियांचा आणि पुरुषांचा दृष्टिकोन

असो. आपल्याला त्या भानगडीशीं काय करायचें ? मी आपला कानावर येतें तें सगळें ऐकून घेतों आणि चूप बसतों. येवढें मात्र खरें की पेअर हियासान्थ हे खरोखरच अतिशय मधुरस्वभावी आणि शांत वृत्तीचे आहेत. ते आपल्या पत्नीसह आणि परिवारासह सुखांत आहेत. कोणाहि फ्रेंच माणसाला याच्याविरुद्ध काय म्हणतां येणार आहे ? मला तर वाटतें की लॉयसन बाईंनी आपला पारा जर थोडा खाली उतरविला तर सगळेंकांही सुरळीत होऊं शकेल. पण एक-गोष्ट माझ्या लक्षांत आली आहे. ती अशी की प्रत्येक देशांत कोणतीहि गोष्ट समजून घेण्याची व तिच्या-संबंधी निर्णय घेण्याची स्त्रियांची व पुरुषांची पद्धति वेगवेगळी असते. स्त्रियांचा दृष्टिकोन निराळा असतो आणि पुरुषांचा

निराळा असतो; स्त्रिया निराळ्या कसोट्या लावतात आणि पुरुष निराळ्या लावतात. पुरुष स्त्रियांना क्षमा करतात आणि सगळा दोष पुरुषांच्या माथीं थोपतात; तर स्त्रिया पुरुषांना क्षमा करतात आणि सर्व दोष स्त्रियांवर टाकतात.

या सगळ्या स्त्रीपुरुषांच्या सहवासांत माझा एक लाभ झाला. त्यांच्यापैकी एक अमेरिकन बाई आहेत. त्या वगळल्या तर बाकी कोणालाहि इंग्रजी येत नाही.त्यामुळे आपोआपच इंग्रजी बोलणें अजीबात बंद झालें आहे; * परिणामत: मला नेहमी फ्रेंच भाषाच ऐकावी लागते आणि कसेंहि करून फ्रेंच भाषाच बोलावी लागते.

### तोफनिर्माता मॅक्झिम

पॅरिसहून निघतांना, विभिन्न देशांचें मला नीट दर्शन घडावें या दृष्टीने माझें मित्र श्री. मॅक्झिम यांनी स्थानोस्थानींच्या लोकांना परिचयपत्रें दिलीं आहेत. श्री. मॅक्झिम हे सुप्रसिद्ध 'मॅक्झिम गन'चे निर्माते आहेत. त्यांच्या त्या तोफेने गोळ्यांच्या फैरी लागोपाठ झाडल्या जातात. त्यांना भरायला व उडवायला कांहीहि वेळ लागत नाही. ती सगळी व्यवस्था स्वयंचालित असते. श्री. मॅक्झिम हे जन्माने अमेरिकन आहेत. पण आता ते इंग्लंडमधे स्थायिक झाले आहेत. तेथे त्यांचा तोफांचा कारखाना इत्यादि व्याप आहे. एखाद्याने त्यांच्यासमोर जर त्यांच्या त्या तोफांचा विषय पुन:पुन: काढला तर ते चिडतात आणि म्हणतात, "मित्रा, तें विनाशकारी यंत्र शोधून काढण्यापलीकडे मीं दुसरें कांहीच केलें नाही काय?" ते चीनचे व भारताचे फार प्रशंसक आहेत. धर्म, तत्त्वज्ञान आदि विषयांवर ते उत्तम लेखन करतात. त्यांनी माझीं पुस्तकें फार पूर्वी

* पाश्चिमात्य देशांत चार मंडळी एकत्र जमली म्हणजे सर्वांना येणारी भाषाच बोलतात. दुसरी एखादी भाषा बोलणें शिष्टसंमत समजत नाहीत.

वाचलीं आहेत. तीं पुस्तकें वाचून त्यांना माझ्याविषयी खूप प्रेम--अतिरिक्त प्रेम वाटूं लागलें आहे. सगळ्या राजेरजवाड्यांना ते तोफा पुरवितात. प्रत्येक देशांतील लोक त्यांना ओळखतात, पण ली हुआंग चँग यांच्याशीं त्यांची विशेष मैत्री आहे. चीन देश आणि कनफ्यूशियस पंथ यांवर त्यांची विशेष भक्ति आहे. चिनी टोपणनांव घेऊन मधून मधून ते वर्तमानपत्रांतून लिहितात. ख्रिस्ती लोक चीनमधे कां जातात, त्यांचा तेथे जाण्याचा खरा उद्देश काय असतो आदि विषय मांडून ते ख्रिस्ती पाद्र्यांच्या विरुद्ध लिहितात. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्माचा प्रचार चीनमधे करावा हें त्यांना मुळीच सहन होत नाही. त्यांची पत्नी देखील आपल्या पतीसारखीच आहे. ती चीनवर प्रेम करते आणि ख्रिस्ती धर्माचा तिरस्कार करते ! श्री. मॅक्झिम यांना मूलबाळ कांही नाही. आता ते वृद्ध झाले आहेत. त्यांच्याजवळ विपुल संपत्ति आहे.

आमचा प्रवासाचा बेत पुढीलप्रमाणे ठरला आहे--पॅरिसहून आगगाडीने व्हिएन्ना व तेथून कॉन्स्टॅन्टिनोपल, तेथून आगबोटीने अथेन्स आणि ग्रीस; तेथून भूमध्यसमुद्र ओलांडून इजिप्तमधे जायचें आणि तेथून आशियामायनर, जेरुसलेम आदि स्थानें घेत घेत पुढे जायचें. 'ओरिएंटल एक्सप्रेस' नांवाची आगगाडी कॉन्स्टॅन्टिनोपलला जाण्यासाठी पॅरिसहून रोज निघते. त्या गाडींत अमेरिकेच्या धर्तीवर बसण्या-झोपण्याच्या, जेवण्याच्या आदि सर्व सुखसोयी आहेत. या गाडीचे डबे अमेरिकेंतील डब्यांइतके परिपूर्ण जरी नसले तरी चांगलेच सुसज्जित आहेत. त्या गाडीने २४ ऑक्टोबरला मी पॅरिस सोडणार आहे.

### पॅरिस येथील प्रदर्शन आणि डॉ. जगदीशचंद्र बोस

आज तारीख आहे २३ ऑक्टोबर. उद्या संध्याकाळीं मी

पॅरिस सोडणार. प्रसिद्ध जागतिक प्रदर्शन भरण्याचें हें वर्ष असल्यामुळे या वर्षी पॅरिस हें सगळ्या सभ्य जगाचें केंद्र बनलें आहे. त्यासाठी जगांतील विभिन्न भागांतून अनेक प्रसिद्ध स्त्रीपुरुष येथे जमले आहेत. आपल्या प्रतिभेचा चमत्कार दाखवून आपल्या देशाची ध्वजा उंच फडकविण्यासाठी देशोदेशींचे प्रतिभावान लोक आज पॅरिसमध्ये जमले आहेत. या केंद्रांतून घंटानिनादासह ज्या भाग्यवान पुरुषाचें नांव घोषित होईल तो त्याच क्षणीं आपल्या देशालाहि सर्व जगासमोर गौरव मिळवून देईल. हे जन्मभूमि, हे वंगदेशा, या महान् राजधानींत जर्मन, फ्रेंच, इंग्रज, इटालियन, आणि अन्य देशांतील विद्वानांचे थवेच्या थवे दिसत आहेत. यांत तुझें कोठे स्थान आहे? येथे तुझें नांव कोण उच्चारणार? कोण तुझ्या अस्तित्वाची ग्वाही देणार? कोण तुझ्या नांवाची घोषणा करणार? त्या गौरवर्णीय विद्वान मंडळींतून एक सुप्रसिद्ध वीर तरुण पुढे आला आणि त्याने आपल्या मातृभूमीचें--बंगालचें --नांव गाजविलें. तो तरुण वीर म्हणजे जगप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. जगदीशचंद्र बोस हे होत. त्या सगळ्या मंडळींमध्ये तो एकटा तरुण बंगाली पदार्थविज्ञानवेत्ता निराळा उठून दिसत आहे. वीज चमकावी आणि प्रकाश उजळावा तसें आपल्या उत्कृष्ट प्रतिभेने त्याने आज त्या पाश्चिमात्य श्रोत्यांना भारून टाकलें आहे. त्या विद्युत्संचाराने आपल्या मृतप्राय मातृभूमीच्या नसानसांतून नवचैतन्य खेळूं लागलें आहे. आज जगदीशचंद्र बोस हे सगळ्या पदार्थविज्ञानवेत्त्यांचा मुकुटमणि बनले आहेत. एक भारतीय, एक बंगाली! शाबास वीरा, शाबास! ज्या ज्या देशांत डॉ. बोस आणि त्यांची सर्वगुणसंपन्न आदर्श पत्नी जातात त्या त्या देशांत ते भारताचें नांव उज्ज्वल करतात, वंगदेशाचा गौरव वाढवितात.

धन्य आहे तें दांपत्य !

### श्री. लेगेट यांचा पॅरिस येथील प्रासाद

श्री. लेगेट यांनी येथे केवढा कार्यक्रम चालविला होता ! आपल्या पॅरिसमधील प्रासादांत अनेक नामांकित स्त्रीपुरुषांना फराळाला बोलवायचें, त्या निमित्ताने त्यांच्या गाठीभेटी घडवून आणायच्च्या असें सारखें चाललें होतें. किती अवाढव्य खर्च केला त्यांनी त्यासाठी,——तो सगळा कार्यक्रमदेखील आज संपणार.

कवि, तत्त्वज्ञ, वैज्ञानिक, नीतिशास्त्रज्ञ, राजकारणी, गायक, प्राध्यापक, चित्रकार, कलाकार, शिल्पकार, वादक इत्यादि विभिन्न क्षेत्रांतील नांवाजलेले स्त्री-पुरुष, श्रीयुत लेगेट यांच्या आतिथ्यामुळे व प्रेमामुळे आकर्षित होऊन त्यांच्या घरीं जमत असत. आणि मग एखाद्या डोंगरावरून कोसळणाऱ्या स्वच्छ आणि शुद्ध जलप्रपाता-प्रमाणे तेथे अखंड वाक्प्रवाह वाहत असे; अग्निस्फुलिंग उडावेत त्याप्रमाणे विभिन्न भावभावना सर्व बाजूंनी प्रकट होत असत; तें मंत्रमुग्ध करून टाकणारें संगीत ! प्रतिभावंत विद्वानांचे ते अद्‌भुत विचार! सगळ्यांना थक्क करून सोडणारा आणि स्थलकालाचें भान हरपविणारा तो त्यांच्यांतील वादसंगर ! हें सगळें आज संपणार.

या पृथ्वीवरील सगळ्याच गोष्टींना अंत हा आहेच. पॅरिसच्या त्या प्रदर्शनांतून आज मीं पुन्हा एकदा फिरून आलों. विद्युल्लतेला बांधून एके जागीं खिळवून ठेवावें तसेंच जणु या प्रदर्शनांत घडलें आहे. दिपवून टाकणाऱ्या अनेक विचारांचा आणि कल्पनांचा हा प्रचंड संग्रह आहे. याच्या रूपाने स्वर्गीय दृश्यांचा अनन्यसाधारण मेळावाच जणु पृथ्वीवर अवतरला आहे !

### पाऊस

गेले दोनतीन दिवस झाले पॅरिसमधे एकसारखा पाऊस पडत

आहे. वास्तविक सूर्याची फ्रान्सवर नेहमी कृपा असते. पण या दोनतीन दिवसांत त्याने आपली नेहमीची कृपा कमी केली आहे. कदाचित् देशोदेशींच्या कलांचा आणि कलाकारांचा, विद्यांचा आणि विद्वानांचा जो संगम या ठिकाणीं घडून आला आहे त्यांच्या मागे येथे जो रंगेल भोगविलासांचा गुप्त प्रवाह वाहत आहे तो पाहून, त्यामुळे उबग येऊन तर त्याने आपलें तोंड ढगांत दडविलें नसेल ना? किंवा रंगीबेरंगी कापडाच्या आणि लाकडाच्या साहाय्याने उभारलेल्या या स्वर्गीय मायानगरीचा लवकरच नाश होणार आहे हें जाणून दुःखाने तर त्याने आपलें तोंड ढगांच्या वस्त्राआड लपविलें नसेल ना ?

### मोडलेला बाजार

आम्हांला सुद्धा, आपण येथून जितक्या लवकर जाऊं तितकें बरें असें वाटत आहे, कारण प्रदर्शन संपणें म्हणजे एक मोठेंच प्रकरण असतें. प्रदर्शन संपलें म्हणजे पृथ्वीवरील या स्वर्गांत, पॅरिसच्या या नंदनवनांत गुडघा गुडघा चिखल होईल; चोहोकडे चुनाच चुना पसरेल. एकदोन मुख्य इमारतींचा अपवाद वगळल्यास बाकी सर्व इमारती नुसत्या लाकडाच्या आणि तरटाच्या बनविलेल्या आहेत. वरून सफेती देऊन त्यांना झकपक केलें आहे. आणि आपलें जग म्हणजे तरी काय अशीच रंगसफेती नव्हे काय ! एकदा पाडापाडी सुरू झाली की हवेंत जिकडेतिकडे चुन्याची धूळ उडूं लागते आणि मग तेथे जीव अगदी गुदमरूं लागतो. चिंध्या, वाळू आदींनी सगळे रस्ते भरून जातात आणि जिकडे-तिकडे घाणच घाण दिसूं लागते. त्यांत जर का आणखी पावसाची भर पडली तर मग विचारायलाच नको !

## फ्रेंच व जर्मन सभ्यता

२४ ऑक्टोबरला संध्याकाळीं आमच्या गाडीने पॅरिस सोडलें. रात्र काळोखी होती. बाहेर कांहीहि दिसणें शक्य नव्हतें. मॉस्ये बोवा आणि मी एका डब्यांत होतों. आम्ही लवकरच झोपीं गेलों. झोपेंतून जेव्हा जागे झालों तेव्हा फ्रेंच सीमा ओलांडून जर्मन प्रदेशांत प्रवेश केल्याचें आम्हांला आढळून आलें. जर्मनी हा देश मीं यापूर्वीच चांगला पाहिला होता. पण फ्रान्सनंतर जर्मनींत यायचें म्हणजे कसें अगदीच विसंगत वाटतें. कालिदासाच्या शाकुंतलांत आहे ना, "यात्येकतोऽस्तशिखरं पतिरोषधीनां"—"एका बाजूला चंद्र अस्तास जात आहे"—त्याचाच प्रत्यय येत होता. एका बाजूला, एके काळीं विश्वाला गवसणी घालायला निघालेला फ्रान्स आज क्षीण होत आहे; कृतकर्मांचीं फळें भोगत आहे; आंतल्या आंत पोखरला जात आहे; तर दुसऱ्या बाजूला, सर्व शक्ति केंद्रीभूत केलेला, तरुण, सामर्थ्यवान जर्मनी क्षितिजावर उदय पावत आहे व द्रुतगतीने उत्कर्षशिखरावर आरूढ होत आहे. एकीकडे हा अतिसभ्य फ्रेंच माणूस पाहा—नेहमी अनेक कला-कुसरीच्या कामांत गढलेला, इतका की कला हेंच त्याला जीवन वाटतें. त्याचे केस काळे कुळकुळीत आहे. बांधा जरासा ठेंगणा आहे आणि वृत्तीने तो विलासी आहे. तर दुसरीकडे हा जर्मन माणूस पाहा. तो उंच आहे; एखाद्या राक्षसासारखा धिप्पाड आहे; त्याचे केस पिंगट आहेत; त्याचें काम ओबडधोबड आहे, अकुशल आहे. पॅरिस सोडलें तर सगळ्या पाश्चिमात्य जगतांत त्या तोलाचें दुसरें शहर नाही. सगळीकडे आपल्याला पॅरिसचें अनुकरण आढळतें, निदान अनुकरण करण्याचा यत्न आढळतो. पण फ्रान्समधील विविध कलांमधे स्वर्गीय सौंदर्य आढळतें. त्याउलट

जर्मनींत, इंग्लंडमधे आणि अमेरिकेंत फ्रान्समधील गोष्टींची ढोबळ, ओबडधोबड नक्कल मात्र आढळते. फ्रेंचांनी केलेल्या दांडगाईंत सुद्धा जणु एकप्रकारचें सौंदर्य असतें, तर जर्मन लोकांचा सौंदर्याविष्कारसुद्धा भयानक असतो. प्रतिभावान फ्रेंच माणसाची तिरस्कार दर्शविणारी रागीट मुद्रासुद्धा सुंदर दिसते, पण प्रतिभावान जर्मन माणसाची स्मितयुक्त मुद्रासुद्धा भयकारी वाटते. फ्रेंच सभ्यता ही स्नायूंसारखी सूक्ष्म रूपाची आहे. कापूर किंवा कस्तुरी हवेंत झटदिशीं विरून आपल्या सुगंधाने खोली व्यापून टाकतात तशी फ्रेंचांची सभ्यता चहूकडे दरवळते. पण जर्मन सभ्यता ही पेशींसारखी स्थूल आहे. ती शिशासारखी किंवा पाऱ्यासारखी वजनदार आहे. जिथे एकदा पडली तिथे पडूनच राहते. त्यांच्या ठायीं चिकाटी आहे. एकदा घाव घालायला जर सुरवात केली तर मरेपर्यंत अविरत घाव घालीत राहण्याचें सामर्थ्य जर्मन पेशींत आहे. फ्रेंचांचीं शरीरें स्त्रियांच्या शरीरांसारखीं कोमल असतात. पण एकदा जर का त्यांनी आपली सगळी शक्ति केंद्रित करून घाव घातला तर तो घणाघातच असतो. मग कांही त्याच्यापुढे कोणाचा टिकाव लागत नाही.

फ्रेंचांचें अनुकरण करून जर्मन लोकहि मोठमोठीं घरें आणि प्रासाद बांधीत आहेत; त्यांच्या माथ्यांवर भव्य पुतळे, घोडेस्वारांच्या मूर्ति वगैरेहि उभारीत आहेत. पण एखादी दुमजली जर्मन इमारत पाहिली की "बाबांनो, ही माणसें राहण्याची जागा आहे की हत्तींचे आणि उंटांचे तबेले आहेत?" असें विचारण्याचा मोह होतो. त्याउलट फ्रेंचांनी हत्तींसाठी आणि घोड्यांसाठी बांधलेले पांचमजली तबेले पाहिले की, हें अप्सरांचें निवासस्थान तर नाहीना, असा भ्रम पडतो.

### जर्मनीचा प्रभाव

अमेरिकेचें प्रेरणास्थान जर्मनीच आहे. तींच ध्येयें त्यांनी उचललीं आहेत. अमेरिकेच्या एकेका शहरांत आपल्याला हजारो, लाखो जर्मन लोक आढळतात. अमेरिकेंतील भाषा अर्थात् इंग्रजीच आहे. पण तरीहि, अमेरिका हा देश हळूहळू जर्मनाळतो आहे येवढें मात्र खरें. जर्मनी आपली लोकसंख्या फार सपाट्याने वाढवीत आहे. जर्मन लोक अत्यंत कणखर आहेत. जर्मन देश हा आज सगळ्या युरोपचा हुकुमशहा होऊन बसला आहे. त्याने सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त केलें आहे. इतर देशांच्या कितीतरी आधी जर्मनीने आपल्या देशांतील स्त्री-पुरुषांना शिक्षण अनिवार्य केलें. निरक्षर माणसाला सजा व्हावी असा त्यांनी तेथे कायदाच केला. तो जो शिक्षणवृक्ष लावला गेला त्यांचीं फळें आज ते चाखीत आहेत. इतर कोणत्याहि देशाच्या सैन्यापेक्षा जर्मन सेनेची कीर्ति अधिक आहे. आणि आपलें आरमारहि सर्वश्रेष्ठ बनविण्याचा त्यांनी विडा उचलला आहे. विभिन्न वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतींत जर्मनीने इंग्लंडवर देखील मात केली आहे. जर्मन व्यापार आणि स्वत: जर्मन लोक अगदी इंग्रजांच्या वसाहतींत शिरून हळूहळू एकाधिकार मिळवीत आहेत. चीनशीं झालेल्या युद्धक्षेत्रांतील उदाहरण घ्या ना; जर्मन सम्राटाच्या आज्ञेनुसार, सर्व राष्ट्रांनी जर्मन सेनापतीचें नेतृत्व निमूटपणें मान्य केलें.

### युरोपमधे जकातीचा त्रास

आमची आगगाडी दिवसभर जर्मन प्रदेशांतून धावत होती. तिसऱ्या प्रहरीं ती ऑस्ट्रियाच्या सीमेवर पोहोचली. प्राचीन काळीं ऑस्ट्रिया हें जर्मन प्रभुत्वाचें केंद्र होतें. आता तें निराळें राज्य झालें आहे. युरोपमधून प्रवास करीत असतांना कांही गोष्टींचा

फारच त्रास होतो. प्रत्येक देशांत कांही वस्तूंवर अगदी भरमसाट जकात लावली आहे. कांही देशांनी कांही व्यापारी वस्तु पूर्णतः आपल्या अधिकारांत ठेवल्या आहेत. उदा० तंबाखू. तसेंच, रशियांत आणि तुर्कस्थानांत राजाचा परवाना असल्याशिवाय तुम्हांला मुळीच आंत शिरूं देत नाहीत. परवाना तुमच्याजवळ नेहमी असलाच पाहिजे. त्यांतहि आणखी एक गोष्ट म्हणजे रशियांत आणि तुर्कस्थानांत तुम्ही जाऊं लागलांत की तुमचीं सगळीं पुस्तकें व कागदपत्रें हिसकावून घेतलीं जातात; तीं बारकाईने तपासून पाहिलीं जातात. रशियामधील आणि तुर्कस्थानमधील सरकारच्या अथवा धर्माच्या विरुद्ध त्यांत कांही नाही अशी जर अधिकाऱ्यांची खात्री पटली तरच तें साहित्य तुम्हांला परत मिळतें, नाहीतर तें कायमचें जप्त केलें जातें. अन्य देशांमधे, तुमची ही साधी तंबाखू म्हणजे केवढें कटकटीचें प्रकरण ! तुमच्या पेटचा, ट्रंका, गाठोडीं सगळें तुम्हांला उघडावें लागतें. तंबाखू इत्यादि कांही आहे की काय त्याचें अधिकारी निरीक्षण करतात आणि त्यांची खात्री पटल्यावर मगच जाऊं देतात. आणि कॉन्स्टॅन्टिनोपलला जायचें म्हणजे तर कांही विचारूं नका. जर्मनी व ऑस्ट्रिया या मोठचा आणि अनेक छोटचा छोटचा देशांतून तो रस्ता जातो. हीं छोटीं छोटीं राष्ट्रें म्हणजे पूर्वी तुर्कस्थानचे जिल्हे होते. पण कालान्तराने सगळे स्वतंत्र ख्रिस्ती राजे एक झाले आणि त्यांनी मुसलमानांच्या तावडींतून जेवढे ख्रिस्ती जिल्हे सोडवितां आले तेवढे सोडविले. मोठचा प्राण्यांपेक्षा बारीक बारीक मुंग्यांचा चावा जास्त तापदायक असतो. तसेंच येथे आहे. ऑस्ट्रिया-जर्मनीसारखीं मोठीं राष्ट्रें जितका त्रास देत नाहीत तितका हीं चिमुकलीं राष्ट्रें देतात.

### व्हिएन्ना शहर

२५ ऑक्टोबरला संध्याकाळीं आमची गाडी ऑस्ट्रियाच्या व्हिएन्ना नामक राजधानीस पोहोचली. ऑस्ट्रियांतील आणि रशियांतील राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांना तिकडे 'आर्क डचेस' आणि 'आर्क ड्यूक' असें म्हणतात. आमच्या गाडींत दोन आर्क ड्यूक आहेत. ते व्हिएन्ना येथे उतरणार आहेत. आणि ते उतरून गेल्याशिवाय अन्य प्रवाशांना खाली उतरण्याची बंदी आहे. त्यामुळे आम्हांला थांबणें भाग पडलें. जरतारी गणवेष घातलेले कांही अधिकारी आणि तुरेदार टोप्या घातलेले शिपाई आर्क ड्यूकांची वाट पाहत उभे होते. आर्क ड्यूक त्यांच्या घेऱ्यांतच गाडींतून उतरले. मग आम्हींहि सुटकेचा श्वास सोडला आणि घाईघाईने खाली उतरलों. आमच्या सामानाची तपासणी झाली. तेथे उतरणारे प्रवासी फारच थोडे होते, त्यामुळे तपासणीचें कार्य संपून सुटका व्हायला अधिक वेळ लागला नाही. आम्ही आमचें सामान घेऊन बाहेर पडलों. एका हॉटेलला आधीच सूचना देण्यांत आलेली होती. त्याप्रमाणे त्या हॉटेलचा माणूस गाडी घेऊन आमची वाट पाहत उभा होता. लवकरच आम्ही हॉटेलमधे पोहोचलों. ती रात्रीची वेळ होती; तेव्हा प्रेक्षणीय स्थळें पाहायला जाण्याचा प्रश्नच नव्हता. मग दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही शहर पाहायला निघालों. इंग्लंड आणि जर्मनी हे देश वगळले तर बाकी युरोपमधील सर्व देशांतील सर्व हॉटेलांत फ्रेंच पद्धति अनुसरली जाते. तेथे हिंदूसारखीच दोन वेळां जेवणाची पद्धति असते. सकाळचें जेवण बारा वाजतां आणि संध्याकाळचें आठ वाजतां. सकाळीं लवकर अर्थात् आठनऊ वाजतां ते थोडीशी कॉफी घेतात. इंग्लंड आणि रशिया यांच्या व्यतिरिक्त अन्य देशांत चहा फारच कमी आढळतो. सकाळच्या जेवणाला

फ्रेंच भाषेंत ‘देजुने’ म्हणतात. इंग्रजींत त्यालाच ‘ब्रेकफास्ट’ म्हणतात. आणि संध्याकाळच्या जेवणाला म्हणतात ‘दिने’ म्हणजे इंग्रजींतील ‘डिनर’.

### चहा

रशियामधे चहाचा खूपच प्रचार आहे. हें स्वाभाविकच आहे. एक तर तो देश खूपच थंड आहे आणि दुसरें म्हणजे चीनहि अगदी जवळ आहे. चीनमधील चहा अगदी उत्कृष्ट असतो आणि तो अधिकांश रशियांत जातो. रशियन लोक चिनी लोकांसारखाच दूध न घालतां चहा पितात. दूध घातल्याने चहा किंवा कॉफी विषवत् अपायकारक होते. चिनी, जपानी, रशियन आणि मध्य आशियांतील रहिवासी---यांसारखे खरे खरे चहा पिणारे जे लोक आहेत ते दूध न घालतांच चहा पितात. त्याचप्रमाणे मूळ कॉफी पिणारे जे तुर्क लोक, तेहि दूध न घालतांच कॉफी पितात. रशियांत मात्र लोक चहांत एक लिंबाची फोड आणि साखरेचा खडा टाकतात. गरीब लोक साखरेचा खडा तोंडांत ठेवतात आणि वरून चहा पितात. आपलें चहा पिणें संपलें की तो खडा दुसऱ्याला देतात, मग त्याचें संपलें की तिसऱ्याला---असें चालतें.

### ऑस्ट्रियाचा राजवंश

व्हिएन्ना हें पॅरिसच्याच नमुन्यावर वसविलेलें एक लहानसें शहर आहे, पण ऑस्ट्रियन लोक आहेत जर्मन वंशाचे. पूर्वी ऑस्ट्रियाचा सम्राट म्हणजे जवळजवळ सगळ्या जर्मनीचा सम्राट असे. हल्ली त्यांत बरेंच स्थित्यंतर झालें आहे. हल्ली प्रशियाचा राजा हा ऑस्ट्रिया सोडून सगळ्या जर्मनीचा सम्राट आहे. हें कशामुळे घडून आलें, तर प्रशियाचा राजा विलहेल्म याच्या दूरदर्शीपणामुळे; त्याचा कर्तृत्ववान प्रधान जो बिस्मार्क, त्याच्या

राजनीतिनिपुणतेमुळे; आणि सेनापति व्हॉन मॉल्टके याच्या सैनिकी प्रतिभेमुळे. वैभवहीन, सामर्थ्यहीन ऑस्ट्रिया कसेंतरी आपलें जुनें नांव आणि जुनी प्रतिष्ठा कायम राखण्याचा प्रयत्न करीत आहे. ऑस्ट्रियाचें राजघराणें म्हणजे हॅप्सबर्ग वंश. हा आज युरोपांतील सर्वांत प्राचीन राजवंश आहे; आणि सर्वांत अधिक अभिजात असा राजवंश आहे. ज्या जर्मनींतील राजे युरोपांतील प्राय: सर्व देशांच्या सिंहासनावर बसले आहेत, जेथील लहानसहान सरदारजहागीरदार देखील इंग्लंड आणि रशिया यांच्यासारख्या सामर्थ्यशाली साम्राज्यांचे स्वामी बनले आहेत त्या जर्मनीवर सम्राट या नात्यानें आधिपत्य गाजविणारा हाच तो ऑस्ट्रियांतील हॅप्सबर्ग वंश ! तो सन्मान आणि ती प्रतिष्ठा आपल्याला पुन्हा प्राप्त व्हावी अशी इच्छा ऑस्ट्रिया आजहि बाळगून आहे. पण आज त्याच्याजवळ तें सामर्थ्य उरलेलें नाही. तुर्कस्थानला युरोपांतील 'रुग्ण वृद्ध' असें नामाभिधान प्राप्त झालें आहे. त्याच धर्तीवर, माझ्या मतें ऑस्ट्रियाला 'रुग्ण वृद्धा' असें म्हणण्यांत यावें. ऑस्ट्रिया कॅथॉलिक पंथाचा आहे आणि अगदी आता आतापर्यंत ऑस्ट्रियन साम्राज्याला 'पवित्र रोमन साम्राज्य' असें संबोधिलें जात असें. आधुनिक जर्मनींत मात्र प्रॅाटेस्टंट पंथीयांचें प्राबल्य आहे. ऑस्ट्रियाचा सम्राट म्हणजे पोपचा जणु उजवा हातच होता. तो पोपचा सदैव एकनिष्ठ अनुयायी असे आणि रोमन कॅथॉलिक संप्रदायाचा नेता असे. आज सगळ्या युरोपांत ऑस्ट्रियाचा सम्राट हाच एक कॅथॉलिक राजा आहे. कॅथॉलिक संप्रदायाची जणु थोरली मुलगी असा जो फ्रान्स देश, तेथे आज लोकसत्ताक राज्य आहे आणि स्पेन आणि पोर्तुगाल हे देश अगदीच अवनतीला पोहोचले आहेत !

**इटली आणि पोपचें राज्य**

इटलीने पोपला सिंहासन चालविण्यापुरतीच काय ती जागा ठेवली आहे. पोपचा सगळा प्रदेश, त्याचें सगळें वैभव इटलीने हिसकावून घेतलें आहे. इटलीचा राजा आणि रोमचा पोप हे एकमेकांचे शत्रु आहेत. ते एकमेकांचें तोंड सुद्धा पाहत नाहीत. रोमलाच पोपचें मुख्य पीठ होतें, पण तेथे आता इटलीची राजधानी आहे. पोपचा जुना प्रासाद इटलीच्या राजाने बळकावला असून त्यांतच तो हल्ली राहत आहे. पोपचें इटलींतील राज्य आता व्हॅटिकन वसाहतीपुरतेंच सीमित आहे. पण आजहि धार्मिक क्षेत्रांत पोपचा फार मोठा प्रभाव आहे. आणि या बाबतींत ऑस्ट्रिया हाच त्याचा प्रमुख सहायक आहे. युगानुयुगें इटली देश ऑस्ट्रियाच्या गुलामगिरींत होता. आधुनिक इटलीने गुलामगिरीचें जोखड फेकण्यासाठी ऑस्ट्रियाशीं म्हणजे पोपच्या मित्राशीं झुंज दिली. परिणामत: ऑस्ट्रियाला इटलीचा प्रदेश गमवावा लागला आणि त्या दोघांमधे शत्रुत्व निर्माण झालें. परंतु दुर्दैवाने नवोदित इटलीने इंग्लंडचें चुकीचें मार्गदर्शन स्वीकारलें आणि सामर्थ्यशाली सैन्य व आरमार जमविण्याचा प्रयत्न केला. पण इटलीजवळ पैसा कुठे होता ? त्यामुळे कर्जबाजारी होऊन तिच्यावर आता विनाशाप्रत जाण्याची पाळी आली आहे. इटलीचें आणखी दुर्दैव असें की तिने आपलें साम्राज्य आफ्रिकेंत पसरविण्याचा जो प्रयत्न केला त्यांतहि तिला जबरदस्त आपटी खावी लागली. ॲबिसीनियाच्या राजाने पराभव केल्यामुळे इटली देश आता पार रसातळाला पोहोचला आहे. त्या देशाचें वैभवहि गेलें आणि प्रतिष्ठाहि गेली. मध्यंतरींच्या काळांत रशियाने ऑस्ट्रियाचा एका महायुद्धांत पराभव केला आणि त्याची सीमा खूपच आंत लोटली.

ऑस्ट्रिया हळूहळू मृत्यूच्या पंथाला लागला आहे, तर इटलीने आपल्या नवजीवनाचा दुरुपयोग करून स्वतःच्याच हाताने स्वतःच्या पायांत बेड्या अडकवून घेतल्या आहेत.

### नेपोलियन बोनापार्ट

सगळ्या युरोपीय राजघराण्यांत, ऑस्ट्रियाचा राजवंश आजहि सर्वाधिक गर्विष्ठ आहे. 'आमचा वंश फार प्राचीन आहे आणि फार उच्च आहे' असा ते अभिमान बाळगतात. या घराण्याचे विवाहादि संबंध ठरवितांना फारच दक्षता बाळगली जाते व चौकशी केली जाते. रोमन कॅथॉलिक नसलेल्या कुटुंबांशीं असे संबंध कधीच घडून येत नाहीत. या घराण्याशीं आपला संबंध व्हावा या भपक्याच्या भरीस पडूनच त्या महावीर नेपोलियनने आपला नाश ओढवून घेतला. एखाद्या थोर राज-घराण्यांतील मुलीशीं आपला विवाह घडावा आणि आपल्या पुत्रपौत्रांचा एक महान् राजवंश स्थापन व्हावा या विचित्र कल्पनेने त्याच्या डोक्यांत घर केलें. त्या वीराला जेव्हा त्याची वंशावळ विचारण्यांत आली तेव्हा त्याने उत्तर दिलें होतें—"माझ्या श्रेष्ठत्वाची आणि कुलीनतेची पदवी मला कुणामुळे प्राप्त झालेली नाही. मी स्वतःच एका महान् वंशाचा संस्थापक होणार आहें." त्याच्या म्हणण्याचा आशय हाच होता की, "मी कांही कोणा पूर्वजाच्या नांवावर मोठा होण्यासाठी जन्मास आलों नाहीं. माझ्यापासूनच एक प्रतापशाली वंश सुरू होईल." एवढा तो वीर ! परंतु तो देखील कौटुंबिक प्रतिष्ठेच्या खोल आवर्तात सापडला.

साम्राज्ञी जोसेफाइनशीं घेतलेला घटस्फोट; ऑस्ट्रियाच्या सम्राटाचा पराभव करून त्याच्या मुलीशीं केलेला विवाह;

ऑस्ट्रियाची राजकन्या मेरी लुई हिच्याशीं बोनापार्टचा अतिशय थाटामाटाने झालेला विवाह; पुत्रजन्म; नवजात बालकाचा रोमचा राजा म्हणून राज्याभिषेक; नेपोलियनचें पतन; सासऱ्याचें त्याच्याशीं शत्रुत्व; लिपझिक, वॉटर्लू, सेंट हेलेना; साम्राज्ञी मेरी लुईचा आपल्या आपत्यासह पितृगृहीं निवास; नेपोलियनच्या साम्राज्ञीचा एका सामान्य शिपायाशीं विवाह; त्याच्या एकुलत्या एका मुलाचा, म्हणजेच रोमच्या राजाचा आपल्या आजोळीं झालेला मृत्यु;—या सगळ्या इतिहासांतील सुपरिचित घटना आहेत.

त्या वैभवकाळाच्या मानाने फ्रान्सची स्थिति आता फारच दुर्बल झाली आहे. त्यामुळे तो आता आपल्या प्राचीन वैभवाचें नुसतें स्मरण करीत आहे. आजकाल तेथे नेपोलियनवर खूपच पुस्तकें लिहिलीं जात आहेत. त्या दिवंगत नेपोलियनवर 'सार्द'—सारखे नाटककार अनेक नाटकें लिहीत आहेत, मॅडम बर्नहार्ड व रेजाँ यांच्यासारख्या नटी आणि काफेलाँसारखे नट प्रचंड प्रेक्षक-वर्गासमोर तीं नाटकें रोज रात्रीं करून दाखवीत आहेत. अगदी अलीकडे मॅडम बर्नहार्ड यांनी 'ल ईगल', म्हणजे 'गरुडाचें पिलूं' नामक नाटक बसविलें आहे. त्या नाटकाने सगळ्या पॅरिसला आकृष्ट केलें आहे.

### 'गरुडाचें पिलूं' नामक नाटक

गरुडाचें पिलूं म्हणजे व्हिएन्नाच्या राजवाड्यांत, आपल्या आजोबाच्या घरीं जवळजवळ कैदेंत असलेला नेपोलियनचा एकुलता एक मुलगा. ऑस्ट्रियाच्या सम्राटाचा चाणाक्यनीतिनिपुण असा मेटरनिक नांवाचा एक मंत्री असतो. त्या मंत्र्याच्या स्वाधीन त्या मुलाला करण्यांत आलेलें असतें. आपल्या वडिलांच्या शौर्य-

पराक्रमादींच्या कथादेखील कधी त्या मुलाच्या कानीं पडूं नयेत अशी मेटरनिकने कडेकोट व्यवस्था केलेली असते. पण नेपोलियनचे कांही जुने अनुयायी वेष बदलून त्या 'सान्‌बोर्न' राजवाड्यांत प्रवेश मिळवितात आणि त्या मुलाचे नोकर म्हणून वावरतात. कसेंहि करून मुलाला फ्रान्समधे न्यायचें आणि युरोपांतील राजांच्या सामूहिक मदतीने फ्रान्सच्या सिंहासनावर आरूढ झालेल्या बुरबाँ वंशाची हकालपट्टी करून त्या जागीं बोनापार्ट वंशाची स्थापना करावयाची अशी त्यांची योजना असते. तो मुलगा कितीहि झालें तरी महान् वीराचा मुलगा ! तेव्हा आपल्या वडिलांच्या तेजस्वी युद्धकथा ऐकून लवकरच त्याच्या हृदयांतील शौर्यपराक्रमादि सुप्त भावना जागृत होतात. एके दिवशीं त्या गुप्त कटवाल्यांबरोबर तो मुलगा सान्‌बोर्न राजवाड्यांतून पळून जातो, पण तीव्र बुद्धिमत्ता असलेल्या मेटरनिकला गुप्त कटाचा वास आधीच आलेला असतो. नेपोलियन बोनापार्टचा तो मुलगा वाटेंतच पकडला जातो आणि त्याला सान्‌बोर्न राजवाड्यांत परत आणण्यांत येतें. तें 'गरुडाचें पिलूं' पंख बांधलेल्या अवस्थेंत तेथे कांही दिवस तडफडत राहतें आणि शेवटीं हृदयभग्न होऊन तें मरतें.

### सान्‌बोर्न राजवाडा

हा सान्‌बोर्न राजवाडा म्हणजे एक सामान्य राजवाडा आहे. अर्थात् त्यांतील खोल्या इत्यादि अगदी मुक्तहस्ताने शृंगारलेल्या आहेत. एक खोली चिनी पद्धतीने सजवलेली असून तिथे सगळ्या कलाकृति चीनमधीलच आहेत, तर दुसरींत जिकडेतिकडे हिंदु कलेचे नमुने आहेत, आणि तिसरींत दुसऱ्याच एखाद्या देशांतील कलाकौशल्य दिसून येतें. विविध प्रकारें

नटलेल्या अशा अनेक खोल्या तेथे आहेत. आणि या राजवाड्या-जवळ जो बगीचा आहे तो तर खरोखर अतिशय सुंदर आहे. पण आता जे लोक तो राजवाडा पाहायला जातात ते नेपोलियन बोनापार्टच्या मुलाचें वसतिस्थान म्हणूनच तो पाहायला जातात. तो जिथे विश्राम घेत असे, जिथे तो अभ्यास करीत असे, जिथे त्याचा मृत्यु झाला तीं स्थानें लोकांना पाहायचीं असतात. अनेक अविवेकी फ्रेंच लोक इथल्या संरक्षकाला विचारतात, "काय हो, गरुडाचें पिलूं कोणत्या खोलींत राहत होतें ? कोणत्या अंथरुणावर गरुडाचें पिलूं झोपत होतें ?" इत्यादि. काय वेडे प्रश्न हे ! तो बोनापार्टचा मुलगा होता, आपल्या देशाच्या राजकन्येला जबर-दस्तीने नेऊन बोनापार्टने तिच्याशीं लग्न लावलें होतें येवढेंच काय तें ऑस्ट्रियन लोक ओळखतात. तो द्वेष ते आजहि विसरले नाहीत. तो निर्वासित राजपुत्र ऑस्ट्रियाच्या सम्राटाचा नातू होता. त्यामुळे त्याला आश्रय देणें त्यांना भागच होतें, पण ते त्याला 'रोमचा राजा' इत्यादि म्हणायला तयार नव्हते. ऑस्ट्रिया-च्या सम्राटाचा नातू असल्यामुळे तो आर्क डयूक होता येवढेंच काय तें. तुम्हीं फ्रेंच लोकांनी मारे त्याच्यावर पुस्तक लिहिलें असेल, त्यांत त्याला 'गरुडाचें पिलूं'हि केलें असेल, रसोत्कर्ष साधण्यासाठी अनेक काल्पनिक प्रसंगहि योजले असतील आणि मॅडम बर्नहार्डसारख्या प्रतिभावान नटीने त्या कथेला रंगभूमीवर खूप आकर्षकहि केलें असेल, पण म्हणून या राजवाड्यांतील या ऑस्ट्रियन संरक्षकाला तें नांव कसें ठाऊक व्हावें ? त्यांतून आणखी त्या पुस्तकांत 'ऑस्ट्रियाच्या सम्राटाने, मेटरनिकच्या सल्ल्यानुसार त्या नेपोलियनच्या मुलाला एकप्रकारें ठार मारलें' असें लिहिलें आहे !

'ल ईगल', म्हणजे गरुडाचें पिलूं हे शब्द ऐकतांच त्या संरक्षकाचा चेहरा लांबट झाला. तो आंतल्या आंत कांहीसा चिडला आणि एखाद्या यंत्रासारख्या निर्जीवपणाने त्याने त्या खोल्या आम्हांला एकामागोमाग कशातरी दाखविल्या. याहून दुसरें तो काय करूं शकणार ? कारण प्रवाशांकडून मिळणाऱ्या बक्षिसावर तो पाणी कसें सोडूं शकणार ? त्यांत आणखी ऑस्ट्रिया आदि देशांत सैन्यविभागांतील लोकांना फारच थोडा पगार दिला जातो. जेमतेम पोटापुरतें मिळतें म्हणाना ! अर्थात् कांही वर्षे नोकरी केल्यावर त्यांना घरीं मात्र परत जातां येतें. देशाभिमानामुळे त्या संरक्षकाचा चेहरा जरी पडल्यासारखा झाला तरी शेवटीं बक्षीस घेण्यासाठी त्याचा हात मात्र आपोआप पुढे आला. आमच्या ह्या फ्रेंच प्रवाशांनी त्या संरक्षकाच्या हातावर कांही चांदीचीं नाणीं ठेवलीं आणि 'गरुडाच्या पिला'ची चर्चा करीत व मेटरनिकला शिव्या देत ते मुक्कामाकडे परतले. त्या संरक्षकाने लांबलचक सलाम ठोकून दरवाजा बंद केला, पण मनांतल्या मनांत सगळ्या फ्रेंच लोकांच्या पूर्वजांचा त्याने अवश्य उद्धार केला असेल.

### पदार्थसंग्रहालय—डच चित्रकला

व्हिएन्नांतील पदार्थसंग्रहालय आणि विशेषत: त्यांतील विज्ञानविभाग अतिशय प्रेक्षणीय आहे. ती संस्था विद्यार्थ्यांच्या तर फारच उपयोगी आहे. नि:शेष झालेल्या विविध प्राचीन प्राण्यांच्या सांगाड्यांचा तेथे उत्कृष्ट संग्रह आहे. चित्रकलाविभागांत डच चित्रकारांनीच अधिकांश भाग व्यापला आहे. डच चित्रकलेच्या परंपरेंत सूचकतेला विशेष स्थान नसतें. नैसर्गिक वस्तूंची आणि प्राण्यांची हुबेहुब प्रतिकृति रेखाटण्यासाठी ही परंपरा प्रसिद्ध

आहे. त्या परंपरेंतील एखाद्या चित्रकाराने वर्षानुवर्षें खपून टोपलीभर माशांचें, किंवा मांसाच्या गोळ्याचें, किंवा पेलाभर पाण्याचें चित्र काढलें असेल. ते मासे, तो मांसाचा गोळा, तें पेल्यांतील पाणी--सगळें अगदी अद्‌भुत वाटतें. परंतु या डच परंपरेंतील चित्रकारांनी काढलेल्या स्त्रिया मात्र कुस्ती खेळणाऱ्या पहिलवानच वाटतात !

### ऑस्ट्रियाच्या अधःपतनाचें कारण

जर्मन विद्याव्यासंग आणि जर्मन बुद्धिमत्ताहि व्हिएन्नामधे विद्यमान आहेत. पण तुर्कस्थानचा ज्या गोष्टीमुळे हळूहळू अधःपात झाला ती गोष्टहि येथे आहे. ती गोष्ट म्हणजे विभिन्न वंशांचें आणि भाषांचें मिश्रण. खुद्द ऑस्ट्रियन लोक जर्मन बोलतात. हंगेरियन लोक तार्तर वंशाचे आहेत. त्यांची भाषा निराळी आहे. आणखी कांही लोक ग्रीक भाषा बोलतात. ते ग्रीक संप्रदायाचे ख्रिस्ती आहेत. या विभिन्न संप्रदायांत एकत्व प्रस्थापित करण्याचें सामर्थ्य ऑस्ट्रियामधे नाही. म्हणूनच त्याचा अधःपात झाला आहे.

आजकाल सगळ्या युरोपांत राष्ट्रवादाची एक प्रचंड लाट उसळली आहे. एका वंशाच्या, एका धर्माच्या, एक भाषा बोलणाऱ्या लोकांना आपसांत ऐक्य प्रस्थापित करावयाचें आहे. जेथे जेथे असें ऐक्य परिणामकारक रीतीने प्रस्थापित झालें आहे तेथे तेथे एक महान् शक्ति निर्माण झाली आहे. ज्या देशांतील लोकांना ऐक्य घडवितां आलें नाही त्यांचें मरण अटळ आहे. विद्यमान ऑस्ट्रियन सम्राटाच्या मृत्यूनंतर,* ऑस्ट्रियन साम्राज्यांतील जर्मन भाषा बोलणारा प्रदेश आपल्या देशांत संमीलित

* दुसरा फ्रॅन्सिस जोसेफ हा ऑस्ट्रियन सम्राट इ. स. १९१६ साली मरण पावला.

व्हावा असा जर्मनी नक्कीच प्रयत्न करील. आणि रशिया व अन्य देश त्या प्रयत्नांना नक्कीच विरोध करतील. अर्थात् त्यांतून भयानक युद्ध उद्भवण्याचीहि शक्यता आहे. विद्यमान ऑस्ट्रियन सम्राट म्हणजे अगदी पिकलें पान आहे; तें केव्हाहि गळून पडेल आणि युद्धाचे नगारे केव्हाहि वाजूं लागतील. जर्मन सम्राटाने आजकाल तुर्कस्थानच्या सुलतानाशीं मैत्री जोडली आहे. जर्मनी जेव्हा ऑस्ट्रियाचा प्रदेश बळकाविण्याचा प्रयत्न करील तेव्हा रशियाचा शत्रु असलेला तुर्कस्थान रशियाला विरोध करीलच. म्हणून जर्मन सम्राटाची तुर्कस्थानाशीं विशेष मैत्री झाली आहे.

**युरोप अवतीच्या मार्गावर आहे.**

व्हिएन्नाचा मला तीन दिवसांतच कंटाळा आला. पॅरिस पाहून आल्यावर युरोप पाहणें म्हणजे पंचपक्वान्नांचें भोजन झाल्यावर भाजीभाकरी खाण्यासारखेंच आहे. सगळीकडे तोच वेष, तीच भोजनपद्धति, सगळीकडे एकच प्रकार ! सगळ्या युरोपखंडांत तेच काळ्या रंगाचे विचित्र कपडे आणि डोक्यावर तीच चमत्कारिक हॅट ! आधीच वर आकाश नेहमी ढगाळलेलें असतें. त्यांत आणखी जमिनीवरहि काळे कपडे घातलेल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी दिसतात. कोट, पॅंट, हॅट सगळें काळें. अगदी जीव गुदमरल्यासारखें वाटतें. सगळ्या युरोपभर वेषभूषेची आणि एकंदर राहण्याची एकच एक पद्धति रूढ होत आहे. निसर्गनियमानुसार, हीं मृत्यूचीं चिन्हें होत. आपल्या पूर्वजांनी शतकानुशतकें आपल्याकडून कवाईत करवून घेतल्यामुळे, आपला जसा कांही एक साचा बनला आहे. दांत घासणें, तोंड धुणें, जेवणें आदि सर्वकांही आपण एकाच पद्धतीने करतों. परिणामतः आपण नुसतीं स्वयंचलित यंत्र बनलों आहोंत. आपल्या जीवनांतील

चैतन्य नाहीसें झालें आहे. आणि अनेक निर्जीव यंत्रें वावरावींत तसें आपण वावरत आहोंत. यंत्रें कधी 'हो' म्हणत नाहीत कीं 'नाही' म्हणत नाहीत. तीं आपल्या डोक्यांना कधी शीणच देत नाहीत. जिकडे पूर्वज गेले तिकडे तीं जातात--"येनास्य पितरो याताः" अशी त्यांची अवस्था असते. शेवटीं तीं सडतात आणि मरतात. या युरोपियन लोकांचीहि तीच गति होणार आहे. "कालस्य कुटिला गतिः" म्हणतात त्याप्रमाणे कालचक्र सारखें फिरतें आहे. सगळेच लोक जर एकच वेष, एकच भोजन, एकच भाषणपद्धति स्वीकारतील, सगळा जर एकच नमुना होऊन जाईल तर हळूहळू सर्व लोक असंख्य यंत्रें बनतील, "येनास्य पितरो याता" म्हणून बापजाद्यांच्या रुळलेल्या मार्गानें चालतील आणि मग त्याचा अपरिहार्य परिणाम त्यांना भोगावा लागेल--ते सडतील आणि मरतील !

## हंगेरी आणि ऑस्ट्रिया

२८ ऑक्टोबरला रात्रीं ९ वाजतां आम्ही पुन्हा त्या ओरिएंट एक्सप्रेसमधे बसलों. आमची गाडी ३० तारखेला सकाळीं कॉन्स्टॅन्टिनोपल येथें पोहोचली. या दोन रात्रींत व एका दिवसांत आम्हीं हंगेरी, सर्व्हिया आणि बल्गेरिया हे देश ओलांडले. हंगेरीची जनता ऑस्ट्रियाच्या सम्राटाची प्रजा आहे. पण त्याची बिरुदावलि 'ऑस्ट्रियाचा सम्राट आणि हंगेरीचा राजा' अशी आहे. हंगेरियन लोक आणि तुर्क लोक एकाच वंशाचे आहेत. ते तिबेटी लोकांसारखे आहेत. हंगेरियन लोकांनी कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडून युरोपांत प्रवेश केला, तर तुर्कांनी इराणच्या पश्चिम सीमेवरून आशियामायनरमधून हळूहळू आंत शिरून युरोपांतील प्रदेश बळकाविला. हंगेरींतील लोक ख्रिस्ती आहेत आणि तुर्क

लोक मुसलमान आहेत. पण तार्तार रक्ताचें वैशिष्टच असलेला जो लढाऊ बाणा तो दोघांच्याहि ठायीं दिसतो. ऑस्ट्रियापासून वेगळें होण्यासाठी हंगेरियन लोकांनी वारंवार लढा दिला आहे. आणि हल्लीचें त्या दोन देशांचें ऐक्य नुसतें नांवाचेंच आहे. ऑस्ट्रियाचा सम्राटहि नुसता नांवाचाच हंगेरीचा राजा आहे. बुडापेस्ट ही हंगेरीची राजधानी आहे. तें शहर फारच व्यवस्थित आणि सुंदर आहे. हंगेरियन लोक मोठे मौजी आहेत. संगीताची त्यांना फार आवड असते. पॅरिसमधे सगळीकडे तुम्हांला हंगेरियन लोकांचेच बँड आढळतील.

सर्व्हिया, बल्गेरिया आदि प्रदेश म्हणजे तुर्कस्थानचे जिल्हे होते. रशिया आणि तुर्कस्थान यांच्या युद्धानंतर ते प्रदेश व्यवहारतः स्वतंत्रच झाले आहेत. पण अजूनहि तुर्कस्थानचा सुलतान हाच त्यांचा सम्राट आहे; आणि सर्व्हिया व बल्गेरिया यांना परराष्ट्रीय संबंधाच्या बाबतींत कांहीहि अधिकार नाहीत. फ्रान्स, जर्मनी आणि इंग्लंड--युरोपांतील हीं तीन राष्ट्रेंच काय तीं सुसभ्य आहेत. इतरांची प्रायः आपल्याइतकीच दुरवस्था आहे. त्यांपैकी बहुसंख्य देश तर इतके असभ्य आणि अडाणी आहेत की त्यांच्याइतक्या हीन स्तराची एकहि जाति आशियांत सापडणार नाही. सर्व्हियांत आणि बल्गेरियामधे सर्वत्र मातीचीं घरें दृष्टीस पडतात; लोकांच्या अंगावर फाटकींतुटकीं लक्तरें दिसतात. जिकडे तिकडे घाणीचे ढीगच्या ढीग पडलेले असतात--मला तर असें वाटायला लागलें की आपण हिंदुस्थानांत परत आलों की काय ! त्यांतून ते लोक आहेत ख्रिस्ती; म्हणजे दोनचार डुकरें त्यांना पाळायलाच हवींत. आणि डुकरांचें तर असें आहे की, दोनशे रानवट माणसें जितकी घाण करूं शकणार नाहीत तितकी

घाण एक डुक्कर करतें. मातीचीं घरें, त्यांवर मातीचीं छपरें, अंगावर चिंध्या आणि चहुबाजूला डुकरें—म्हणजे सर्व्हियन किंवा बल्गेरियन माणसाचें चित्र झालें. अनेक लढाया देऊन आणि खूप रक्तपात करून त्यांनी तुर्कांच्या दास्याचें जूं झुगारून दिलें आहे. पण त्याबरोबरच त्यांना धोका निर्माण झाला आहे. त्यांनी आता ताबडतोब युरोपियन धर्तीवर सैन्य उभारायला हवें. अन्यथा त्यांचें कोणाचेंहि जीवित सुरक्षित नाही. एक दिवस जगणें सुद्धा त्यांना कठीण जाईल. अर्थात् आज ना उद्या हे सगळे प्रदेश रशियाच्या पोटांत जाणार आहेत ही गोष्ट निराळी. पण जे काय दोनचार दिवस त्यांना स्वतंत्र म्हणून जगायचें असेल तें जगणेंहि सैन्याशिवाय केवळ अशक्य आहे. म्हणून त्यांना सक्तीची लष्करभरतीच करायला हवी.

एका कुमुहुर्तावर जर्मनीने फ्रान्सचा पराभव केला. क्रोधाने आणि भीतीने फ्रान्सने लागलीच आपल्या प्रत्येक नागरिकाला सैनिक बनविलें. प्रत्येक माणसाने कांही ना कांही काळ सैन्यांत नोकरी केलीच पाहिजे, लष्करी शिक्षण घेतलेंच पाहिजे, कोणाचीहि या नियमांतून सुटका नाही असें ठरविण्यांत आलें. कोणी जन्मजात लक्षाधीश का असेना, त्याने तीन वर्षें बराकींत राहून युद्धकलेचें शिक्षण घेतलेंच पाहिजे व खांद्यावर बंदूक उचललीच पाहिजे असा कडक नियम झाला. त्या काळांत सरकार त्याला अन्नवस्त्र देतें, आणि त्याला पगार मिळतो एक पैसा रोज! शिक्षण पूर्ण झाल्यावर तो घरीं जातो. पण दोन वर्षांत केव्हाहि आदेश आल्यास त्याला सैनिककार्यार्थ जावें लागतें. त्यासाठी त्याने नेहमी सिद्ध असलें पाहिजे. पुढील पंधरा वर्षांत तो कोठेहि असला तरी पहिल्याच हाकेला त्याने आलें पाहिजे व नोकरी

बजावली पाहिजे. असे सगळे नियम तेथे झाले आहेत. जर्मनीने जणु एका सिंहालाच डिवचलें होतें. तेव्हा त्याला स्वतःलाहि आता तयार राहणें भाग होतें. त्यामुळे तेथेहि तेंच वातावरण निर्माण झालें आहे. इंग्लंड सोडून इतर सर्व देशांतहि एकमेकांच्या भीतीने अशीच सक्तीची लष्करभरती सुरू झाली आहे. इंग्लंड बेट आहे, त्यामुळे तो देश सतत आपलें आरमार बलिष्ठ करीत आहे. पण कोणीं सांगावें, बोअर युद्धाने जो त्यांना धडा शिकविला आहे त्यामुळे कदाचित् त्यांनाहि सक्तीची लष्करभरती आवश्यक वाटूं लागेल. रशियाची लोकसंख्या सर्वांत मोठी आहे. त्यामुळे युरोपांत सर्वांत मोठें सैन्य तो उभें करूं शकतो. युरोपांतील शक्तिशाली राष्ट्रांनी तुर्कांचें साम्राज्य मोडून सर्व्हिया, बल्गेरिया आदि जीं नामधारीं राष्ट्रें उभीं केलीं आहेत त्यांनाहि जन्मल्या-बरोबर अद्ययावत् प्रशिक्षित आणि सुसज्ज असें सैन्य व तोफा आदि हवेंच आहे. पण येवढें सगळें करण्यासाठी आवश्यक तो पैसा कोठून येणार ? परिणामतः शेतकऱ्यांना अंगावर चिंध्या धारण कराव्या लागतात; आणि शहरांत जाऊन पाहाल तर तेथे सैनिक भपकेबाज गणवेष घालून मिरवीत असतात. सगळ्या युरोपला जसें कांही शिपायांचें वेड लागलें आहे--शिपाई, जिकडेतिकडे शिपाई. पण कितीहि झालें तरी स्वातंत्र्य व दास्य यांत अंतर असणारच. काम कितीहि उत्कृष्ट असलें तरी तें जर दुसऱ्याच्या जबरदस्तीमुळे करावें लागत असेल तर त्यांतील आनंद नाहीसा होतो. स्वतःवरील जबाबदारीची जाणीव असल्या-शिवाय कोणालाहि या जगांत कोणतेंहि श्रेष्ठ कार्य करतां येणार नाही. सोन्याच्या साखळ्या असल्या तरी दास्य हें हेयच, आणि एकभुक्त राहावें लागून चिंध्या नेसाव्या लागत असल्या तरी

स्वातंत्र्य हें त्यापेक्षा लाखपटीने श्रेष्ठच. गुलामाला इहलोकीं आणि परलोकींहि नरकच भोगावा लागतो. युरोपियन लोक सर्व्हियन, बल्गेरियन आदि लोकांची खूप थट्टा उडवितात; त्यांच्या चुकांबद्दल व अडाणीपणाबद्दल त्यांच्यावर टोमणे मारतात. पण त्यांनी बिचाऱ्यांनी वर्षानुवर्षें गुलामगिरींत घालविलीं. ते काय सगळे एका दिवसांत निपुण बनतील ? त्यांच्या हातून चुका ह्या होणारच. होय, ते शेकडो चुका करतील. पण चुका करतांकरतांच ते शिकतील आणि मग आपल्या सगळ्या चुका सुधारतील. जबाबदारी अंगावर येऊन पडली म्हणजे दुर्बळांतील दुर्बळ माणूस सुद्धा सबळ होतो आणि अडाणीसुद्धा शहाणा बनतो.

आमची गाडी हंगेरी, रुमानिया आदि देशांतून जात आहे. मरणोन्मुख ऑस्ट्रियन साम्राज्यांत ज्या जाती आहेत त्यांपैकी हंगेरियन लोक आजहि कांही दम राखून आहेत. एकदोन लहान जाती वगळल्यास युरोपांतील बाकीच्या सर्व जाती युरोपियन विद्वान् ज्याला ‘ इंडो-युरोपियन ’ किंवा ‘ आर्यन ’ म्हणतात त्या वंशाच्या आहेत. संस्कृतजन्य भाषा न बोलणाऱ्या ज्या थोड्याशा जाती आहेत त्यांपैकी हे हंगेरियन लोक आहेत. पूर्वी मीं सांगितलेंच आहे की हंगेरियन लोक आणि तुर्क लोक एकाच वंशाचे आहेत. याच बलशाली वंशाने युरोपांत आणि आशियांत आपलें साम्राज्य प्रस्थापित केलें. या गोष्टीला कांही फार काळ लोटला नाही. पश्चिम हिमालयाच्या आणि हिंदुकुश पर्वताच्या उत्तरेला असलेला जो देश आज तुर्कस्थान म्हणून ओळखला जातो तोच या तुर्कांचा मूळ देश होय. ‘ चागवई ’ हें त्या देशाचें तुर्की नांव आहे. दिल्लीचें मोगल घराणें, हल्लीचें इराणी राजघराणें, कॉन्स्टॅन्टिनोपल येथील तुर्की सुलतानाचें घराणें आणि हंगेरियन

घराणें हीं सर्व मूळचीं त्याच देशांतील होत. तेथूनच तीं घराणीं क्रमाक्रमाने पुढे सरकलीं आणि हिंदुस्थानापासून सुरुवात करून पुढे थेट युरोपपर्यंत पोहोचलीं. आजहि हीं घराणीं स्वत:ला 'चागवई' म्हणवितात आणि त्यांची भाषाहि एकच आहे. अर्थात् फार पूर्वी हे तुर्क लोक नुसते रानटी होते. वन्य भटक्या जातींसारखें त्याचें जीवन होतें. मेंढ्यांचे कळप, घोडे, गुरेढोरें, बायकापोरें आणि असेल नसेल ती सगळी मालमत्ता बरोबर घेऊन ते हिंडत असत. त्यांच्या जनावरांना जिथे खायलाप्यायला भरपूर मिळे तिथे ते तळ ठोकीत आणि तिथला चारा संपला, पाणी आटलें की आणखी कोठेतरी जात. या वंशांचीं अनेक कुटुंबें आजदेखील मध्यआशियांत असेंच भटकें जीवन व्यतीत करीत आहेत. या लोकांचें मध्य-आशियांतील लोकांशीं भाषेच्या बाबतींत पूर्ण साम्य आहे; पण चेहरेपट्टींत मात्र जरा फरक आहे. डोक्याचा आकार आणि गालाचीं हाडें पुढे असणें या बाबतींत तुर्क लोकांचें मंगोलियन लोकांशीं साम्य आढळतें. पण तुर्कांचें नाक चपटें नसतें; थोडेसें लांब असतें; डोळे सरळ रेषेंत असतात आणि मोठे असतात. परंतु दोन डोळ्यांमधील अंतर मंगोलियन लोकांप्रमाणेच जरा अधिक असतें. फार प्राचीन काळापासून आर्य आणि सेमेटिक या वंशांचें रक्त तुर्कांच्या रक्तांत मिसळलें असावें असें वाटतें. फार प्राचीन काळापासून ही तुर्क जात अतिशय युद्धप्रिय असल्याचें आढळतें. त्यांचा पुढे संस्कृत बोलणाऱ्या जातींशीं आणि कंदहार व इराण येथील लोकांशीं शरीरसंबंध होऊन त्यांतूनच अफगाण, खिलजी, हजारा, बरखजाइ, युसुफजाइ आदि युद्धप्रिय जाती उत्पन्न झाल्या. या जातींना युद्धाचें जणुकांही वेडच असतें. त्यांनी भारतावर वारंवार आक्रमणें केलीं आहेत.

फार प्राचीन काळीं या तुर्कवंशीयांनी लागोपाठ स्वाऱ्या करून भारताचे पश्चिम प्रांत जिंकून विस्तृत राज्यें प्रस्थापित केलीं होतीं. त्यांच्यापैकी कांही आधीच बौद्ध होते, तर कांही भारतीय प्रदेश जिंकून येथे स्थायिक झाल्यावर बौद्ध बनले. काश्मीरच्या प्राचीन इतिहासांत हुश्क, युष्क, कनिष्क आदि नांवें जीं आपल्याला आढळतात ते तुर्की सम्राटच होत. या कनिष्कानेंच उत्तर भारतांत प्रचलित असलेल्या महायान नामक बौद्ध पंथाची स्थापना केली. बराच काळ लोटल्यानंतर त्यांच्यापैकी अधिकांश लोक मुसलमान बनले; आणि त्यांनी कंदहारकाबूलसारखीं मध्य आशियांतील बौद्धपंथाचीं केंद्रें पार उध्वस्त करून टाकलीं. मुसलमान बनण्यापूर्वी हे लोक जिकलेल्या प्रदेशांतील सभ्यता, विद्या आदि आत्मसात् करीत असत आणि देशोदेशींच्या विद्या ग्रहण करून सभ्यतेचा प्रसार करण्याचा प्रयत्न करीत असत. पण मुसलमान झाल्यापासून त्यांच्या ठायीं आता फक्त त्यांचा युद्धप्रियतेचा गुण उरला आहे. विद्या आणि संस्कृति यांचा त्यांच्या ठायीं मागमूसहि उरला नाही. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या तडाख्यांत जे देश सापडतात त्यांची सभ्यताहि हळूहळू नष्ट होते. आजच्या अफगाणिस्थानांत किंवा कंदहार आदींमधे अनेक ठिकाणीं त्यांच्या बौद्ध पूर्वजांनी बांधलेले अद्भुत स्तूप, मठ, मंदिरें, भव्य पुतळे वगैरे अजूनहि आढळतात. तेथील लोकांचें तुर्कांशीं मिश्रण झाल्यामुळे आणि त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारल्यामुळे तेथील मंदिरें इत्यादि उध्वस्त झालीं आहेत. आजचे अफगाण आणि इतर लोक फारच असभ्य आणि अशिक्षित आहेत. आपल्या पूर्वजांनी उभारलेल्या या शिल्पकलाकृति आहेत, त्यांचें आपण अनुकरण करावें हा दृष्टिकोन तर दूरच राहिला, उलट हीं 'जिन' आदि उपदेवतांचीं

१७/३/७९

कृत्यें आहेत असें ते मानतात. अशा कृति उभारण्याचें सामर्थ्य माणसांत असणें शक्य नाही असा त्यांचा दृढ विश्वास आहे. इराणच्या वर्तमान अवनतीचें कारण हेंच आहे की त्याचें राजघराणें सामर्थ्यवान पण असभ्य अशा तुर्कवंशाचें आहे आणि प्रजाजन आहेत अतिशय सुसभ्य अशा प्राचीन इराणीवंशाचे. अशा रीतीनें कॉन्स्टॅन्टिनोपलचें साम्राज्य, म्हणजेच, सुसभ्य अशा वंशांतील ग्रीक आणि रोमन लोकांचें शेवटचें राजकीय कार्यक्षेत्र नष्ट झालें; सामर्थ्यशाली पण रानटी तुर्कांनी तें पायातळीं तुडविलें. भारतांतील फक्त मोगल सम्राटच या नियमाला अपवादभूत ठरले. कदाचित् हिंदु रक्ताचें व विचारांचें त्यांच्याशीं जें मिश्रण झालें त्याचा हा परिणाम असावा. रजपूत भाटांनी आणि चारणांनी आपल्या इतिहासग्रंथांत भारत जिकणाऱ्या सर्व मुसलमान घराण्यांना तुर्कच म्हटलें आहे. ही संज्ञा अगदी यथायोग्य आहे, कारण विजय मिळविणारें मुसलमान सैन्य कोणत्याहि जातीचें वा वंशांचें असलें तरी त्याचें नेतृत्व नेहमी फक्त तुर्कच करीत असत.

भारतावर वारंवार आक्रमण करून तो जिंकणारे सेनापति जातीने मुसलमान तुर्क होते. ते मूळचे बौद्धधर्मी होते. त्यांचे सैनिकहि हिंदुजातीचे होते. ते मूळचे कांही बौद्ध धर्मानुयायी तर कांही वैदिक धर्मानुयायी होते. पण तुर्कांनी आपल्या सामर्थ्यानें त्यांना जबरदस्तीने मुसलमान बनविलें होतें. अशा ह्या सैनिकांनी आपल्या सेनापतींच्या नेतृत्वाखाली आपल्याच पूर्वजांचा धर्म सांभाळून असलेल्या इतर हिंदूंवर जीं आक्रमणें केलीं त्यांनाच इतिहासांत मुसलमानांचें हिंदुस्थानावर आक्रमण, त्यांचा भारत-विजय आणि त्यांचा साम्राज्यविस्तार असें म्हणतात.

अर्थात् कालाच्या प्रवाहांत तुर्कांच्या चेहरेपट्टींत जशी

सरमिसळ झाली तशीच त्यांच्या भाषेंतहि झाली. विशेषत: चागवईपासून जे खूप दूर गेले त्यांच्या भाषेंत तर खूपच मिश्रण झालें. या वर्षीं इराणच्या शहाने पॅरिसच्या प्रदर्शनाला भेट दिली. तेथून तो आगगाडीने कॉन्स्टॅन्टिनोपलमार्गें परत गेला. कॉन्स्टॅन्टिनोपलचा सुलतान आणि इराणचा शहा यांची भेट झाली. त्या दोघांत स्थलाचें व कालाचें पुष्कळ अंतर असूनहि ते एकमेकांशीं आपल्या मातृभाषेंत म्हणजे प्राचीन तुर्की भाषेंत बोलले. पण सुलतानाच्या भाषेंत फारशी, अरबी आणि थोडयाफार ग्रीक शब्दांची बरीच सरमिसळ होती, तिच्या तुलनेंत शहाची भाषा पुष्कळच शुद्ध होती.

प्राचीन काळीं या चागवइ तुर्कांचे दोन वर्ग होते. एक होता 'काळया मेंढयावाला' वर्ग, तर दुसरा होता 'पांढऱ्या मेंढयावाला' वर्ग. काश्मीरच्या उत्तरेला असलेल्या आपल्या मूळ भूमींतून हे दोन्ही वर्ग आपल्या मेंढ्या चारीत चारीत आणि लूटमार करीत करीत कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचले. त्यांच्यापैकी पांढऱ्या मेंढयावाला वर्ग कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडून युरोपांत शिरला आणि त्याने त्या वेळीं नष्टप्राय झालेल्या रोमन साम्राज्याचा एक लचका तोडून हंगेरीचें राज्य स्थापन केलें. दुसरीकडे काळया मेंढयावाला वर्ग कास्पियन समुद्राच्या दक्षिणेकडून पुढे गेला. हळूहळू त्याने इराणचा पश्चिम भाग व्यापला. नंतर त्याने कॉकेशस पर्वत ओलांडला व क्रमाक्रमाने आशियामायनरसारख्या अरबी प्रदेशाचा तो स्वामी बनला. त्याचें पुढे घुसणें चालूंच होतें. पुढे जातां जातां त्याने खलीफाचें सिंहासनहि हस्तगत केलें व नंतर अशाच गतीने पश्चिम रोमन साम्राज्याचा अल्प शेषांशहि त्याने गिळंकृत केला. अति प्राचीन काळीं हें तुर्क

लोक सर्पाची खूप पूजा करीत. कदाचित् प्राचीन हिंदु याच लोकांना 'नाग', 'तक्षक' आदि नांवांनी संबोधीत असत. पुढे त्यांनी बौद्धधर्म स्वीकारला. नंतर ते ज्या काळीं जो देश जिंकीत त्या काळीं तेथे प्रचलित असलेला धर्म स्वीकारीत. प्राय: आधुनिक काळीं, ज्या दोन वर्गांविषयी आपण वर चर्चा केली त्यांपैकी पांढऱ्या मेंढ्यावाल्या वर्गाने ख्रिस्ती लोकांना जिंकलें आणि स्वत: ख्रिस्ती धर्म स्वीकारला, तर तिकडे काळ्या मेंढ्यावाल्या वर्गाने मुसलमानांना जिंकलें व इस्लाम धर्म स्वीकारला. अशा रीतीने ते जरी ख्रिस्ती व मुसलमान झाले असले तरी संशोधन करणाऱ्याला आजहि त्यांच्या ठिकाणीं सर्पपूजेचे आणि बौद्धधर्माचे कांही स्तर आढळून येतील.

हंगेरियन लोक वंशाने आणि भाषेने तुर्क असले तरी धर्माने ख्रिस्ती आहेत. ते रोमन कॅथॉलिक पंथाचे अनुयायी आहेत. प्राचीन काळीं धर्मवेडापुढे इतर कोणतेहि पाश टिकत नसत आणि भाषाप्रेम, वंशप्रेम, देशप्रेम सगळें तुच्छ मानलें जात असे. हंगेरियन लोक तुर्कांचें अगदी कट्टे वैरी आहेत, आणि इतिहास असें सांगतो की अनेक प्रसंगीं हंगेरीने मदत केली म्हणूनच ऑस्ट्रियासारखीं ख्रिस्ती राज्यें जगूं शकलीं. आधुनिक काळीं, शिक्षणाचा प्रसार झाला आहे; भाषाशास्त्राचा आणि मानववंशशास्त्राचा शोध लागला आहे; त्यामुळे भाषेच्या व वंशाच्या ऐक्याचें आकर्षण आता वाढूं लागलें आहे आणि धार्मिक ऐक्य शिथिल होऊं लागलें आहे. याच कारणामुळे हल्ली सुशिक्षित हंगेरियन आणि तुर्क लोकांमधें वांशिक ऐक्याची भावना वाढत आहे.

आज जरी हंगेरी ऑस्ट्रियन साम्राज्याचा एक भाग आहे तरी त्यापासून फुटून निघण्याचे त्याने सतत प्रयत्न केले आहेत.

हंगेरियन लोक अनेकदा बंड करून उठले. अनेकदा त्यांनी क्रांति घडवून आणली. परिणामीं, आता हंगेरी हा केवळ नांवालाच ऑस्ट्रियन साम्राज्याचा प्रांत आहे. व्यवहारतः ते लोक सर्व दृष्टींनी स्वतंत्र झाले आहेत. 'ऑस्ट्रियाचा सम्राट आणि हंगेरीचा राजा' असें ऑस्ट्रियन सम्राटाचें बिरुद आहे. हंगेरींतील लोक आपल्या अंतर्गत व्यवहाराविषयी सर्व प्रकारचे निर्णय घेण्यास पूर्ण मोकळे आहेत. त्या बाबतींत ऑस्ट्रियन लोकांची कांहीएक लुडबुड चालत नाही. ऑस्ट्रियन सम्राट आज त्यांचा नामधारी अधिपति आहे, पण हे संबंधहि आता फार दिवस टिकतील असें वाटत नाही. युद्धकलाकौशल्य, औदार्य आदि तुर्कवंशीय गुणविशेष हंगेरियन लोकांमधेहि भरपूर प्रमाणांत आढळतात. त्यांतून मुसलमान नसल्यामुळे संगीतादि कलांचें व त्यांचें शत्रुत्व नाही. मुसलमान लोक तर संगीतादि स्वर्गीय कलांना सैतानाचें जाळेंच समजतात. पण हंगेरियन लोक गायनवादनादि कलांत फार प्रवीण आहेत आणि त्याकरिता सगळ्या युरोपभर त्यांची ख्याति आहे.

पूर्वी माझी अशी कल्पना होती की, थंड प्रदेशांतील लोक मिरच्या खात नसून ती उष्णप्रदेशीय लोकांचीच वाईट सवय आहे. पण येथे निराळेंच पाहिलें. हंगेरीपासून मिरच्या खाण्याची सवय सुरू होते. वाढतां वाढतां रुमानिया, बल्गेरिया आदि देशांत तर ही सवय पराकोटीला पोहोचल्याचें आढळतें. इतकें की त्या बाबतींत हे लोक तुमच्या त्या मद्राशांवरसुद्धा मात करतील !

# पुरवणी *

### कॉन्स्टॅन्टिनोपल

कॉन्स्टॅन्टिनोपलचें पहिलें दर्शन आम्हांला गाडींतूनच घडलें. ते एक प्राचीन नगर आहे. त्या शहरांत जिकडेतिकडे भिंतींना भेदून जाणाऱ्या मोठमोठ्या नाल्या काढल्या आहेत. सगळीकडे अरुंद आणि वाकड्यातिकड्या घाणेरड्या बोळी आहेत. घरें लाकडाचीं आहेत, पण नेहमीपेक्षा निराळा नमुना दिसल्यामुळे त्यांत एकप्रकारचें सौंदर्य भासतें. स्टेशनवर उतरल्यावर आमच्या-जवळच्या पुस्तकांमुळे आम्हांला फारच त्रास झाला. मॅडमॉझेल काल्व्हे आणि ज्यूल बोवा यांनी फ्रेंच भाषेंतून जकात अधिकाऱ्यांना समजाविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याचें भांडणांतच रूपान्तर झालें. त्या अधिकाऱ्यांचा प्रमुख तुर्क होता आणि त्याचें जेवण तिकडे वाढून तयार होतें, त्यामुळे आणखी कांही भानगडी निर्माण न होतां तें प्रकरण तेथेच मिटलें. दोन पुस्तकें त्यांनी ठेवून घेतलीं. बाकीचीं सगळीं आम्हांला परत केलीं. तीं दोन पुस्तकें आम्हीं तुमच्या हॉटेलमधे पाठवून देऊं असें त्यांनी म्हटलें होतें. पण तीं त्यांनी मुळींच परत केलीं नाहीत. आम्ही इस्तंबूलच्या—कॉन्स्टॅन्टि-नोपलच्या—बाजारांतून हिंडलों, शहरांतून फिरलों. 'पोन्ट' म्हणजे समुद्राची खाडी. तिच्या पलीकडे 'पेरा' म्हणजे परदेशां-तील लोकांची वस्ती आहे. तिथे हॉटेलें इत्यादीहि आहेत. तेथूनच आम्हीं गाडी ठरविली. गाडींत बसून सगळें शहर पाहिलें आणि मग थोडी विश्रांति घेतली. संध्याकाळीं आम्ही 'वुड्स पाशा'

---

* हीं मनोरंजक टिपणें स्वामीजींच्या कागदपत्रांत आढळलीं.

यांना भेटून आलों. दुसऱ्या दिवशीं आम्हीं एक नाव ठरविली आणि 'बॉस्फोरस'मधे फेरफटका करायला निघालों. थंडी कडाक्याची पडली होती आणि वाराहि जोराने वाहत होता. त्यामुळे मी आणि कुमारी मॅक्लिऑड पहिल्याच स्टेशनवर उतरलों. दुसऱ्या तीरावरील स्कुटारी येथे जावें आणि मग तेथे पेअर हियासान्थ यांना भेटावें असें ठरलें. आम्हांला कांही तेथील भाषा येत नव्हती, त्यामुळे खुणाखाणांनीच आम्हीं एक नाव ठरविली आणि तींत बसून काठावर आलों. मग आम्हीं एक भाड्याची गाडी ठरविली. आम्हांला वाटेंत एका सुफी फकिराचें स्थान लागलें. हे फकीर रोग्यांना रोगमुक्त करतात. त्यांची पद्धति पुढीलप्रमाणे असते : आधी ते धर्मशास्त्रांतील कांही भाग वाचतात. तो वाचतांना ते पुढे मागे डुलत राहतात. मग ते नाचूं लागतात. हळूहळू त्यांच्या अंगांत स्फूर्ति संचरल्यासारखें होतें. नंतर ते रोग्याचें शरीर तुडवून त्याचा रोग बरा करतात.

पुष्कळ वेळ आम्ही पेअर हियासान्थ यांच्याशीं 'अमेरिकेंतील महाविद्यालयें' या विषयावर बोलत बसलों. मग आम्ही एका अरब दुकानांत गेलों. तेथे आम्हांला एक तुर्की विद्यार्थी भेटला. मग आम्हीं स्कुटारीहून परतलों. आम्हीं एक नाव ठरविली, पण ती कांही आम्हांला आमच्या इच्छित स्थळीं पोहोचवूं शकली नाही. शेवटीं आम्ही ट्रॅममधे बसलों आणि इस्तंबूलमधील ज्या भागांत आमचें हॉटेल होतें तेथे येऊन पोहोचलों. पूर्वी जेथे ग्रीक सम्राटांचे जनानखाने होते तेथेच हल्ली इस्तंबूलचें पदार्थसंग्रहालय आहे. तेथील कांही शवपेटिका फार विलक्षण होत्या; इतरहि अनेक मजेदार वस्तु तेथे होत्या. तोफखान्यावर चढून आम्हीं शहराचें सुंदर विहंगम दृश्य पाहिलें. फार दिवसांनंतर येथे मला

तळलेले वाटाणे खायला मिळाले. ते मीं आनंदाने खाल्ले. त्याचप्रमाणे मसालेभात आणि अन्य तुर्की पद्धतीने तयार केलेले पदार्थहि मीं खाल्ले. स्कुटारी येथील स्मशानभूमि पाहून आल्यावर आम्ही प्राचीन तट पाहायला गेलों. तटाच्या आंत तुरुंग होता. तें स्थान महाभयानक होतें. नंतर आम्ही 'वुड्स पाशा' यांना भेटून बॉस्फोरसला जायला निघालों. फ्रान्सच्या राजदूताकडे आम्ही जेवलों. एका ग्रीक पाशाशीं आणि एका अल्बेनियन सद्गृहस्थाशीं आमची भेट झाली. पोलिसांनी पेअर हियासान्थ यांच्या व्याख्यानांना प्रतिबंध घातला आहे. तेव्हा मी देखील व्याख्यान देऊं शकत नाहीं. श्री. देवनमल आणि श्री. चोबेजी यांच्याशीं आमची भेट झाली. चोबेजी एक गुजराथी ब्राह्मण आहेत. येथे अनेक भारतीय आहेत. कांही उत्तर हिंदुस्थानांतील लोक आहेत, तर कांही मुसलमान आहेत. तुर्की भाषाशास्त्रावर आमचें बोलणें झालें. बोलतां बोलतां नूर बे यांचा विषय निघाला. त्यांचा आजा फ्रेंच होता. तो एखाद्या काश्मिरी माणसासारखा सुस्वरूप असल्याचें लोक म्हणाले. इकडील स्त्रिया पडदापद्धति पाळीत नाहीत. त्या फार मोकळेपणाने वावरतात. वेश्यावृत्ति मुख्यत: मुसलमानांकडून चालविली जाते. खुर्द पाशाबद्दल आणि आर्मेनियन लोकांच्या कत्तलीबद्दलहि आम्हीं तेथे बरेच ऐकलें. आर्मेनियन लोकांना बिचाऱ्यांना स्वत:चा असा देश नाही. आणि ज्या प्रदेशांत ते वसती करून आहेत त्या बहुतेक भागांत मुसलमानांचें प्राबल्य आहे. आर्मेनिया नांवाचा स्वतंत्र भूभाग कांही आज अस्तित्वांत नाही. सध्याचा सुलतान, खुर्द लोकांमधून एक हमीदी घोडदळ उभारीत आहे. कोसॅक लोकांच्या धर्तीवर त्यांना शिक्षण दिलें जाणार आहे. आणि त्यांना सक्तीच्या लष्करभरतीपासून मुक्तता

मिळणार आहे.

सुलतानाने आर्मेनियन आणि ग्रीक प्रमुखांना बोलाविलें व त्यांच्यापुढे असा प्रस्ताव मांडला की "तुम्हांला जर कर देणें नको असेल तर त्याऐवजी सक्तीची लष्करभरती तुम्हीं मान्य केली पाहिजे; अशा रीतीने संरक्षणकार्यांत भाग घेऊन तुम्हांला तुमच्या मातृभूमीची सेवा करतां येईल आणि करहि द्यावा लागणार नाही." त्यावर त्यांनी उत्तर दिलें की "समजा आम्ही भरती झालों तर आम्हांला तुम्ही लढाईवर पाठवाल, मग मुसलमानांच्या बरोबरीने, त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून आम्हांला लढावें लागेल. अशा स्थितींत आम्हांला जर मृत्यु आला तर आमच्या अंत्यक्रियेच्या बाबतींत फारच घोटाळा होईल." त्यावर सुलतानाने उत्तर दिलें की, "त्यावर उपाय करतां येईल. आम्ही प्रत्येक सेनाविभागाच्या दिमतीला मुसलमान मुल्ला व ख्रिस्ती पाद्री असे दोघेहि ठेवूं की झालें. युद्धाचा प्रसंग ओढवून, शेकडो लोक मारले जाऊन, ख्रिस्त्यांच्या व मुसलमानांच्या प्रेतांचे मिसळलेले ढीगच्या ढीग जेव्हा एकदम पुरण्याची पाळी येईल तेव्हा दोघेहि धर्माचार्य आपापल्या धर्माप्रमाणे एकदमच अंत्यक्रिया पार पाडतील. मृतात्म्यांनी आपलीं धर्मवचनें ऐकून शिवाय दुसऱ्याच्या धर्माचींहि वचनें जरी ऐकलीं तरी त्याने कांही बिघडणार नाही." पण ख्रिस्ती लोकांनी कांही या प्रस्तावाला मान्यता दिली नाही आणि त्यांच्यावरचा कर तसाच चालू राहिला. हा प्रस्ताव त्यांनी नाकारण्याचें खरें कारण असें होतें की मुसलमानांच्या बरोबर राहून आपण पूर्णतः मुसलमान होऊन जाऊं अशी त्यांना भीति वाटत होती. इस्तंबूलचा सध्याचा सुलतान फार मेहनती आणि उद्योगप्रिय आहे. प्रत्येक गोष्टीवर

त्याची जातीने देखरेख असते. राजवाड्यांतील रंगभूमीवर होणाऱ्या मनोरंजक कार्यक्रमांची व्यवस्थाहि तो स्वत: पाहतो. ह्याच्या आधीचा सुलतान 'मुराद' नांवाचा होता. तो अगदीच अयोग्य माणूस होता. पण हा मात्र फार बुद्धिमान आहे. गादीवर आल्यापासून त्याने इतक्या विविध आणि विपुल सुधारणा केल्या की त्या पाहून अगदी आश्चर्यच वाटतें. लोकप्रतिनिधिसभेची पद्धति या देशांत कांही यशस्वी होऊं शकणार नाही.

**अथेन्स, ग्रीस**

सकाळीं दहा वाजतां आम्हीं कॉन्स्टॅन्टिनोपल सोडलें. एक रात्र व एक दिवस आम्ही समुद्रावर होतों. समुद्र अगदी शांत होता. हळूहळू आम्ही गोल्डन हॉर्न येथे व मार्मोरा समुद्रांत पोहोचलों. मार्मोरांतील एका बेटांत आम्हीं ग्रीक धर्माचा एक मठ पाहिला. एकीकडे आशिया व दुसरीकडे युरोप अशा मध्यवर्ती स्थानीं तो वसलेला असल्यामुळे प्राचीन काळीं तेथे धार्मिक शिक्षणाची फार चांगली सोय होती. सकाळीं बाहेर पडून आम्ही भूमध्यसमुद्रांतील द्वीपसमूह पाहायला गेलों. तेथे प्राध्यापक लिपर यांची भेट झाली. मद्रास येथील पचिअप्पा महाविद्यालयांत त्यांची व माझी पूर्वीच ओळख झालेली होती. एका बेटांत आम्हांला एका मंदिराचे अवशेष आढळले. समुद्रकिनाऱ्यावर त्याची बांधणी झालेली पाहून ते बहुधा [illegible] या देवतेचें असावें असें वाटतें. संध्याकाळीं आम्ही अथे[illegible] पोहोचलों. सगळी रात्र आम्हांला वेगळें ठेवण्यांत आलें. सकाळीं आम्हांला किनाऱ्यावर उतरण्याची परवानगी मिळाली. पायरुस बंदर हें लहानसेंच पण टुमदार नगर आहे. मधूनमधून झगे घातलेले दोनचार ग्रीक लोक दिसतात; येवढी एक गोष्ट सोडली तर बाकी सर्व बाबतींत तेथे अगदी

युरोपियन वातावरण आहे. तेथून वाहनें करून, पांच मैल दूर असलेल्या अथेन्सच्या प्राचीन भिंती पाहावयास आम्ही गेलों. प्राचीन काळीं त्या भिंतींनी शहर आणि बंदर जोडलेलें होतें. मग आम्ही शहरांत हिंडलों. त्या नगरांतील किल्ला ('अॅक्रोपोलिस'), भोजनालयें, घरें, रस्ते आदि सगळें आम्हांला मोठें स्वच्छ व टापटिपीचें दिसलें. तेथील राजवाडा लहानसाच आहे. त्याच दिवशीं आम्ही पुन्हा बाहेर पडलों व एक टेकडी चढून गेलों. तेथून आम्हीं नगराचें दृश्य पाहिलें. किल्ला, 'विंगलेस व्हिक्टरी'चें मंदिर, पार्थेनॉन आदि स्थानें तेथून फारच सुंदर दिसत होतीं. मंदिर पांढऱ्या संगमवरी दगडांचें बांधलेलें आहे. अवशेषरूपाने उभे असलेले कांही खांबहि आम्हीं पाहिले. दुसऱ्या दिवशीं मॅडमॉझेल मेलकार्वी यांच्याबरोबर पुन्हा आम्ही हीं सगळीं स्थानें पाहून आलों. त्यांनी आम्हांला त्या स्थानांसंबंधीच्या अनेक ऐतिहासिक गोष्टी समजावून सांगितल्या. दुसरे दिवशीं, 'ऑलिम्पियन झीअस'चें मंदिर, 'थिएटर डायॉनिसियस' आदि स्थानें पाहत पाहत आम्ही समुद्रकिनाऱ्यापर्यंत गेलों. तिसऱ्या दिवशीं आम्हीं 'एल्युसिस' पाहायला निघालों. तें ग्रीकांचें मुख्य धर्मपीठ होतें. तीं प्रसिद्ध 'एल्युसीनियन मिस्टरीज' (गूढ धार्मिक नाटकें) येथेच होत असत. या ठिकाणची ती प्राचीन रंगभूमि एका श्रीमंत ग्रीक माणसानें पुन्हा बांधून काढली आहे. आता ऑलिंपियन खेळांचेंहि पुनरुज्जीवन झालें आहे. हा खेळांचा कार्यक्रम स्पार्टाजवळील एके ठिकाणीं साजरा केला जातो. त्यांपैकी पुष्कळ खेळांत अमेरिकन लोकांना यश मिळालें. पण त्या स्थळापासून अथेन्सच्या या रंगमंदिरापर्यंत पळत जाण्याच्या स्पर्धेत मात्र ग्रीकांलाच विजय झाला. या वर्षी पुन्हा तुर्कांबरोबर स्पर्धा ठेवून व जिंकून त्या

बाब्रतींतील आपली पारंगतता त्यांनी निर्विवाद सिद्ध केली आहे.

चवथ्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां आम्हीं इजिप्तला जाणाऱ्या 'झार' नांवाच्या एका रशियन बोटीवर पाय ठेविला. तेथे पोहोचल्यावर ती बोट तिसऱ्या प्रहरीं चार वाजतां सुटणार असल्याचें आम्हांला कळलें. आम्हीच लवकर आलों होतों की माल भरायला वाजवीपेक्षा अधिक वेळ लागणार होता कोण जाणे ! म्हणून पुन्हा भ्रमण करायला निघण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता तेव्हा आम्ही अजलादसच्या, आणि फिडिअस, मायरन व पोलिक्लेटस या त्याच्या तीन शिष्यांच्या शिल्पकलेची धांवती ओळख करून घेतली. ख्रिस्तपूर्व ५७६ ते ख्रिस्तपूर्व ४८६ या काळांत हे लोक होऊन गेले. येथे देखील आम्हांला फारच उकडत होतें. रशियन बोटींत पहिल्या वर्गांतील लोकांच्या खोल्या बोटीच्या पंख्यावर असतात. आणि बाकी सगळें नुसतें 'डेक' असतें. तें प्रवाशांनी, गुराढोरांनी आणि मेंढ्यांनी भरलेलें असतें. शिवाय, या बोटीवर बर्फहि मुळीच मिळत नाही.

**पॅरिस येथील लूव्हर पदार्थसंग्रहालयांतील ग्रीक कलेचे नमुने**

पॅरिसमधील लूव्हर पदार्थसंग्रहालय पाहून आल्यापासून ग्रीक कलेच्या तीन अवस्था माझ्या लक्षांत आल्या. सर्वांत आधी मिसेनियन कला होती. मग खरी ग्रीक कला सुरू झाली. एचियन राज्य जेव्हा आसपासच्या सर्व बेटांवर पसरलें तेव्हा आशियांतून पूर्वीच तेथे आलेल्या सर्व कलाहि त्यांनी हस्तगत केल्या. याप्रमाणे ग्रीस देशांत कलांचा प्रथम आविर्भाव झाला. इतिहासपूर्वकालापासून ख्रिस्तपूर्व ७७६ पर्यंत मिसेनियन कला प्रचलित होती. आशियांतील कलेचें अनुकरण करण्याचेंच कार्य या काळांत प्रामुख्याने झालें. नंतर ख्रिस्तपूर्व ७७६ ते ख्रिस्तपूर्व १४६ ह्या

काळांत हेलेनिक कला किंवा खरी ग्रीक कला नांदली. डोरियन वंशाने एचियन साम्राज्याचा नाश केल्यावर युरोपांत आणि द्वीपसमूहांत राहणाऱ्या ग्रीक लोकांनी आशियांत जाऊन तेथे अनेक ठिकाणीं आपल्या वसाहती स्थापन केल्या. त्यांतूनच बाबिलोन आणि इजिप्त यांच्याशीं त्यांचा सतत संघर्ष निर्माण झाला आणि परिणामस्वरूप ग्रीक कला उदयाला आली. कालान्तराने ग्रीक कलाकारांनी त्यांच्यावर असलेली आशियाची छाप अजीबात पुसून टाकली आणि ते निसर्गाच्या हुबेहुब प्रतिकृति निर्माण करूं लागले. ग्रीकांची कला आणि इतर देशांतील कला यांत हेंच अंतर आहे की ग्रीक लोक निसर्गांतील जिवंत घटनांचीं हुबेहुब चित्रें रेखाटतात.

खिस्तपूर्व ७७६ ते खिस्तपूर्व ४७५ हा आर्केइक ग्रीक कलेचा काल होता. या काळांतील आकृति जडवत् साचेबंद दिसतात; त्यांत जिवंतपणा आढळत नाही. त्या आकृतींतील ओठ किंचित् विलग असतात; जसे कांही सदा स्मितच करीत आहेत. या बाबतींत इजिप्तच्या कलाकारांशीं त्यांचें साधर्म्य असल्याचें दिसतें. या काळांतील सगळ्या पुतळ्यांचे पाय खांबासारखे सरळ आहेत; अगदी ताठ आहेत. त्यांचे केस, दाढी आदि कशीं सरळ रेषांसारखीं दर्शविलेलीं आहेत. कपडेहि अंगाभोवती अगदी घट्ट गुंडाळल्यासारखे दिसतात. सहज घातल्यासारखे घोळदार दिसावेत तसे दिसत नाहीत.

आर्केइक ग्रीक कलेनंतर क्लासिक ग्रीक कलेचा काल येतो. तो आहे खिस्तपूर्व ४७५ ते खिस्तपूर्व ३२३, म्हणजे अथेन्सकडे नेतृत्व आल्यापासून तों महासामर्थ्यशाली शिकंदरच्या मृत्यूपर्यंतचा काळ. पेलोपोनेशस आणि अॅटिका या राज्यांत या काळांतील कलेची

सर्वाधिक अभिवृद्धि झाली. अथेन्स ही ॲटिकाची राजधानी होती. एका विद्वान् फ्रेंच कलामर्मज्ञाने याविषयीचें आपलें मत पुढीलप्रमाणे प्रकट केलें आहे--" (क्लासिक) ग्रीक कला जेव्हा आपल्या उत्कर्षाच्या परमोच्च शिखरावर आरुढ होती तेव्हा तिने प्रचलित कलानियमांचीं सगळीं बंधनें झुगारून दिलीं व ती पूर्ण स्वतंत्र बनली. त्या वेळीं कोणत्याहि देशाच्या कलानियमांना तिने मानलें नाही, किंवा कोणाचेंहि मार्गदर्शन स्वीकारलें नाही. त्या दृष्टीने ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकाचा जितका जितका अभ्यास करावा तितका तितका तत्कालीन कलेच्या तेजस्वितेचा अधिकाधिक प्रत्यय येतो. याच काळांत शिल्पकलेचे सर्वोत्कृष्ट नमुने निर्माण झाले. हें सर्व पाहून आपल्या मनांत एक कल्पना अधिकाधिक दृढ होत जाते. ती ही की, ग्रीक लोकांनी जेव्हा पारंपरिक नियमांना झुगारून दिलें तेव्हाच त्यांच्या कलेंत नवजीवन आणि तेज संचरलें." या क्लासिक ग्रीक कलेच्या दोन परंपरा होत्या. पहिली होती ॲटिक परंपरा आणि दुसरी होती पेलोपोनेशियन परंपरा. पुन्हा ॲटिक परंपरेंतहि दोन निरनिराळ्या शाखा होत्या. पहिली शाखा महान् शिल्पकार जो फिडियस त्याच्या प्रतिभेंतून निर्माण झाली. एका फ्रेंच विद्वानाने त्याच्या कलेचें पुढील शब्दांत वर्णन केलें आहे--"सौंदर्याच्या परिपूर्णतेचा तो एक अद्भुत चमत्कार आहे. शुद्ध आणि उदात्त कल्पनांचा तो एक देदीप्यमान नमुना आहे. त्याच्या कलाकृतींनी मानवी मनाची जी पकड घेतली आहे ती चिरकाल तशीच राहील." स्कोपस आणि प्रॅक्झिटेलस हे ॲटिक परंपरेच्या दुसऱ्या शाखेचे आचार्य होते. या शाखेने कलेला धर्मापासून पूर्णपणें पृथक् केलें आणि केवळ मानवी जीवनाच्या चित्रणांत रमविलें.

१४२२२

क्लासिक ग्रीक कलेच्या दुसऱ्या म्हणजे पेलोपोनेशियन परंपरेचे आचार्य होते पोलिक्लेटस आणि लिसिपस: यांच्यापैकी एकाचा जन्म ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकांतला आहे आणि दुसऱ्याचा जन्म ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकांतला आहे. मानवी शरीराची जी प्रमाणबद्धता आहे ती जशीच्या तशीच कलेमधेंहि चित्रित झाली पाहिजे हा दंडक प्रस्थापित करणें हेंच त्यांचें ध्येय होतें.

ख्रिस्तपूर्व ३२३ ते ख्रिस्तपूर्व १४६ हा काळ, म्हणजे शिकंदरच्या मृत्यूपासून तों रोमन लोकांनी ॲटिका जिंकण्या-पर्यंतचा काळ हा ग्रीक कलेच्या अवनतीचा काळ होय. या काळांतील ग्रीक कलेंत एक गोष्ट लक्षांत येते. या कलाकारांनी भपकेबाज अलंकरणाकडे अनावश्यक लक्ष पुरविलें आहे. असामान्य भव्य आकाराचे पुतळे तयार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. रोमन लोकांनी जेव्हा ग्रीस देश पादाक्रांत केला तेव्हा तेथील कलाकार आपल्या जुन्या कलाकारांच्या कृतींचें अनुकरण करण्यांतच समाधान मानूं लागले; कोणाहि व्यक्तीचा चेहरा अगदी हुबेहुब काढणें हेंच त्यांचें नवीन वैशिष्टच होतें.

७५२०९ ... प्र. प्रमाण
१५/३/६१

# आमचें अन्य प्रकाशन

| | | रु. न.पै. |
|---|---|---|
| १. | श्रीरामकृष्ण-चरित्र— न. रा. परांजपे कृत—प्रथम भाग (चवथी आवृत्ति) | ४.२५ |
| २. | ,, ,, —द्वितीय भाग (तिसरी आवृत्ति) | ४.३७ |
| ३. | श्रीरामकृष्ण-वचनामृत—श्री. 'म' कृत (दुसरी आवृत्ति) | ५.५० |
| ४. | स्वामी विवेकानंद यांचें चरित्र— सुधारलेली दुसरी आवृत्ति . . . | ७.२५ |
| ५. | साधु नागमहाशय-चरित्र–(दुसरी आवृत्ति) . . | २.०० |
| ६. | हिमालयाच्या कुशींत—स्वामी अखंडानंद . . | २.५० |
| ७. | श्रीरामकृष्ण-वाक्सुधा—(पांचवी आवृत्ति) स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित . . . | १.०० |
| ८. | स्वामी विवेकानंदांच्या आठवणी–(दुसरी आवृत्ति) . | १.७५ |

## स्वामी विवेकानंदकृत योगावरील पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ९. | ज्ञानयोग . . . . . . | ४.०० |
| १०. | राजयोग (पतंजलींच्या योगसूत्रविवरणांसह) . . | ३.०० |
| ११. | कर्मयोग–(तिसरी आवृत्ति) . . . . | २.१० |
| १२. | भक्तियोग–(दुसरी आवृत्ति) . . . . | १.७५ |

## स्वामी विवेकानंदकृत विविध विषयांवरील लोकप्रिय पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १३. | कोलंबो ते अल्मोरा (भारतांत दिलेलीं व्याख्यानें) . | ६.२५ |
| १४. | स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत— (संकलक श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती) . . | ४.५० |
| १५. | स्वामी विवेकानंदांचीं पत्रें . . . . | ४.७५ |
| १६. | दैवी वाणी (Inspired Talks) . . . | २.७५ |
| १७. | बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें . . | २.२५ |
| १८. | आत्मसाक्षात्कार : साधना व सिद्धि . . . . | २.२५ |

REFBK-0014282

| | | रु. न.पै. |
|---|---|---|
| १९. | स्वामी विवेकानंद यांच्या मुलाखती आणि प्रश्नोत्तरें | २.०० |
| २०. | भारतीय नारी–(दुसरी आवृत्ति) | २.०० |
| २१. | वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव | १.७५ |
| २२. | महापुरुषांच्या जीवनकथा–(सातवी आवृत्ति) | १.६२ |
| २३. | स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | १.६० |
| २४. | कविता | १.५० |
| २५. | वेदान्त आणि जीवन | १.२५ |
| २६. | पूर्व आणि पश्चिम | १.२५ |
| २७. | सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना | १.०० |
| २८. | माझे गुरुदेव–(चवथी आवृत्ति) | १.०० |
| २९. | शिकागो व्याख्यानें | ०.९० |
| ३०. | पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व | ०.६० |
| ३१. | सुबोध राजयोग | ० ६० |
| ३२. | हिंदुधर्माचें-नव-जागरण–(दुसरी आवृत्ति) | ०.५६ |
| ३३. | शिक्षण–(दुसरी आवृत्ति) | ०.५६ |
| ३४. | पवहारी बाबा–(दुसरी आवृत्ति) | ०.५० |

## पॉकेटसाईज पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ३५. | माझें जीवन आणि कार्य–स्वामी विवेकानंद | ०.६५ |
| ३६. | माझ्या मोहिमेची योजना-स्वामी विवेकानंद | ०.५० |
| ३७. | विवेकानंद - वाणी–चवथी आवृत्ति | ०.९० |
| ३८. | स्वामी विवेकानंद म्हणतात– | ०.५० |
| ३९. | रामकृष्ण - संघ—ध्येय व इतिहास–स्वामी तेजसानंद | ०.७५ |

याशिवाय आमच्या आश्रमाने हिंदी भाषेंतूनहि समग्र रामकृष्ण-विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें.

श्री रा म कृ ष्ण आ श्र म, धं तो ली, ना ग पू र – १